१९५५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ९७०२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
नोंदि.
वाचनालय शाखा



मुन्शी प्रेमचंद

व्हीनस पुरवणी वाचनमाला : क्र. ३

# मुन्शी प्रेमचंद


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम. ९८२८०
विभाग ८१. ९२.
क्र. ९०००५५


लेखक :


डॉ. प्रल्हाद नरहर जोशी

एम्. ए., एम्. एड्., पीएच्. डी.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ८५५९


मूल्य १-८-०


व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति १ ली : १९५५

* * *

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

* * *

प्र का श क
**सदाशिव कृष्ण पाध्ये**
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार पेठ : पुणें २

* * *

मु द्र क
**दत्तात्रय गणेश गपचूप**
श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार : पुणें २

* * *

चित्रकार : शं. धो. आफळे

## निवेदन

१९५४ मध्यें माध्यमिक शाळांच्या बदललेल्या अभ्यासक्रमास अनुसरून आम्ही ही नवीन पुरवणी वाचनमाला तयार करीत आहोंत. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर जीवनांतील सर्व अंगांना परिपुष्ट करण्याचे सतत प्रयत्न सुरू झाले आहेत. या देशाच्या वैभवाचा सर्व इमला ज्यांच्या खांद्यांवर आज ना उद्यां येणार आहे अशा आजच्या कोंवळ्या विद्यार्थ्यांच्या मनाच्या जोपासनेचें कार्य या दृष्टीनें फारच महत्त्वाचें आहे. या नव्या पिढीच्या शिक्षणाबद्दल सर्वत्र चर्चा होत आहे. जुनें बदलून टाकावें असें सर्वत्र बोललें जात आहे; पण नेमकें नवें काय आकारास आणावें याबद्दल मात्र अजून निश्चिति झालेली दिसून येत नाहीं. जीवनाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून शिक्षणाच्या कल्पना आज मोठ्या विस्तारानें वाढीस लागल्या आहेत. विद्यार्थ्यांचें अनुभवक्षेत्र विस्तृत व्हावें, नव्या नव्या प्रश्नांची त्यांना माहिती व्हावी व नव्या ज्ञानाची भूक त्यांच्यांत निर्माण व्हावी म्हणून सतत प्रयत्न चालू आहेत. शिक्षणाची व्यापकताहि दिवसेंदिवस वाढत आहे. या देशांतील बहुसंख्य जनता आतां शिक्षणाच्या मार्गावर वाटचाल करूं लागलेली आहे. तेव्हां या संक्रमणाच्या काळांत विद्यार्थिवर्ग व सामान्य वाचक साधारणपणें काय वाचावें या प्रश्नांतच गोंधळून जाण्याची शक्यता आहे. मनाची व शरीराची झपाट्यानें वाढ ज्या वयांत होत असते त्याच वयांत विद्यार्थ्यांच्या मनाच्या विकासाच्या दृष्टीनें कांहीं सकस व सद्विचारसंपन्न वाङ्मय त्यांच्या हातीं देण्यासाठीं नव्या अभ्यासक्रमास अनुसरून आम्ही ही पुरवणी वाचनमाला तयार करीत आहोंत. लघुकथा, कादंबऱ्या, एकांकिका, प्रवासवृत्तें, चरित्रें इत्यादि विविध वाङ्मय-प्रकारांची निवड या मालेसाठीं जाणीवपूर्वक केलेली आहे. नामवंत लेखकांच्या व व्यासंगी शिक्षकांच्याच साह्यावर या मालेची उभारणी झालेली असल्याकारणानें विद्यार्थ्यांना ती अतिशय उपयुक्त होईल असें वाटतें. प्रस्तुतच्या मालेंतील पुस्तकें सर्व दृष्टींनीं परिपूर्ण व सर्वांगसुंदर बनविण्याचा प्रयत्न आम्हीं केलेला आहे.

— संपादक-मंडळ

— प्रकाशक

**संपादक-मंडळ :**

श्री. के. नारखेडे,
एस्. टी. सी.

डॉ. द. न. गोखले,
बी. ए. (ऑनर्स), बी. टी.,
पीएच्. डी.

डॉ. प्र. न. जोशी,
एम्. ए., एम्. एड्.,
पीएच्. डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ............
अनुक्रम ९८२८७
विभाग ...


## माझें मनोगत

हिन्दी भाषेंतील सर्वश्रेष्ठ कथाकार मुन्शी प्रेमचंद यांचें चरित्र पूर्ण करून आज वाचकांच्या हातीं देत आहें. हिन्दी ही आपली राष्ट्रभाषा असल्याकारणानें तिचा परिचय थोड्याफार प्रमाणांत यापुढें प्रत्येकास करून घ्यावयास पाहिजे. हिन्दीच्या प्रचारपरीक्षांस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाचनांत प्रेमचंदांची एखादी कथा किंवा एखादी कादंबरी आलेली असते. पण तेवढ्यावरून प्रेमचंदांची ओळख संपूर्णतया होईलच असें नाहीं. प्रेमचंदांनीं आपलें कथासाहित्य ज्या विस्तृत अशा अनुभूतीवर उभें केलें आहे तिचा परिचय त्यांच्या जीवनाबरोबर होणारा आहे. शेतकऱ्याचें, मजुराचें जीवन प्रेमचंद स्वतः जगले व तेंच विश्व तन्मयतेनें त्यांनीं आपल्या कलात्मक लेखणीनें हिंदी साहित्यांत अजरामर केलें. हा देश शेतकऱ्यांचा आहे, मजुरांचा आहे, कामकऱ्यांचा आहे, असा जयघोष स्वातंत्र्याच्या काळानंतर तर विशेषत्वानें होत आहे. स्वराज्य आलें तें सर्वसामान्य जनतेच्या सुखांत भर घालण्यासाठीं. त्यांच्या आशाआकांक्षा पूर्ण व्हाव्यात, त्यांच्या भावना पल्लवित व्हाव्यात, त्यांचीं दुःखें दूर व्हावींत, विद्येचा आणि ज्ञानाचा अधिकार त्यांनाहि मिळावा म्हणून तर या देशांत स्वराज्याचा व स्वातंत्र्याचा एवढा पुरस्कार झाला. आजहि सर्वसामान्य लोकांसाठींच स्वराज्य व स्वातंत्र्य असा सूर सर्वत्र व्याख्यानांतून व लेखनांतून प्रकट झालेला दिसून येतो. किंबहुना भारताच्या स्वातंत्र्य-चळवळींतील ती एक प्राणभूत कल्पना आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

साहित्याच्या प्रान्तांत या दृष्टीनें खराखुरा प्रामाणिकपणें प्रयत्न करणारा मुन्शी प्रेमचंद यांच्याएवढा दुसरा कथाकार शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्याखेरीज भारतांत दुसरा झाला नाहीं. जे दलित आहेत, पीडित आहेत, दुःखीकष्टी आहेत, त्यांची विचारपूस करणारा, त्यांचे अश्रु पुसणारा एक थोर हृदयाचा कलावंत म्हणून मुन्शी प्रेमचंद यांचें नांव आपण ध्यानांत ठेवावयास पाहिजे. किसान-मजुरांचें जीवन प्रेमचंदांनीं प्रामाणिकपणें रेखाटलेंच, पण जे धनी आहेत, संपत्तिवान् आहेत, भांडवलदार-कारखानदार आहेत त्यांच्याहि लीलांवर त्यांनीं योग्य तो प्रकाश टाकला आहे. साहित्यांतील वा राजकारणांतील प्रचाराची एक टूम म्हणून प्रेमचंदांनीं साम्यवादाचा पुरस्कार केला असें नव्हे, तर

प्रारंभींच्या जीवनापासून त्यांना अनेक धक्के सहन करावे लागले, मोठ्या बिकट परिस्थितींतून शिक्षण घ्यावें लागलें, विपत्तींना टक्कर देत देत सतत संग्राम करावा लागला म्हणूनच या संघर्षमय जीवनांतून त्यांच्या तत्त्वज्ञानाचा जन्म आपोआप झालेला आहे. साम्यवाद या शब्दाचा अर्थहि येथें स्पष्ट करून सांगावयास पाहिजे. राजकारणांत अनेक पंथोपपंथ रोज उदयास येतात नि रोज लयास जातात. यांपैकींचा साम्यवाद प्रेमचंदांच्या मनांत होता असें नव्हे. परदेशचें तत्त्वज्ञान वाचून त्यांनीं आपल्या देशाच्या उद्धाराची कमर कसली असें नाहीं; दुसऱ्या देशचे ऋषिमुनि काय म्हणतात हें पाहून प्रेमचंदांनीं आपल्या तात्त्विक विचारांची बैठक अंथरली असें नव्हे—तर मुन्शी प्रेमचंद यांनीं हिंदुस्थानांतील शेतकऱ्याचें दारिद्र्य व त्याचें दैन्य उघड्या डोळ्यांनीं पाहिलें; कांहीं काळ तें स्वतः भोगलें, तेव्हांच शारीरिक कष्टांतून मातीचें सोनें बनविणाऱ्या या कष्टाळू माणसांची दया त्यांच्या मनांत निर्माण झाली. या दयामय वृत्तींतूनच प्रेमचंद यांच्या साहित्याची निर्मिति झाली आहे. विस्तृत अशी सहानुभूति व मनोज्ञ कलासक्ति यांच्या मिश्रणाचें मधुर रूप म्हणजे प्रेमचंद यांचें कथा-वाङ्मय!

हिन्दी आपली राष्ट्रभाषा, तेव्हां तिच्यांतील एका श्रेष्ठ साहित्यकाराचा परिचय आपण करून घ्यावा, एवढाच हेतु या चरित्रापाठीमागें नाहीं. हिंदी ही राष्ट्रभाषा झाली तेव्हां तिचें वैभव वाढलेंहि असेल. पण ती एका फार मोठ्या जनसमूहाची भाषा आहे ही गोष्ट ध्यानांत घेऊनच प्रेमचंद यांच्या साहित्याकडे व त्यांच्या चरित्राकडे पाहिलें पाहिजे. या देशांतील सागराएवढ्या पसरलेल्या अथांग जनतेची सर्वांगीण सुधारणा व्हावयाची असेल तर 'माझें, माझ्या प्रांतापुरतें' असें म्हणून चालणार नाहीं. आपला भारत खंडप्राय देश असला तरी व त्याच्यांत जगांतील सर्व बाबतींतील विविधता एकवटलेली असली तरी सांस्कृतिक कल्पनांची समानता मात्र सर्वत्र दिसून येते. ही एकता टिकवून धरावयाची असेल तर एकमेकांचे आचारविचार, एकमेकांच्या चालीरीती, एकमेकांचीं श्रद्धास्थानें, एकमेकांचीं आदरस्थानें आपण सहानुभूतीनें समजावून घेतलीं पाहिजेत. भारत देशाच्या या आंतरिक ऐक्यासाठीं आज 'आंतरभारती' किंवा मध्यवर्ती सरकारची 'साहित्य अकादमी' यांसारख्या संस्था आपापल्यापरीनें खटपट करीत आहेत. पण एकमेकांतील गैरसमज दूर होण्यासाठीं, एकमेकांच्या भावना नीटपणें समजावून घेण्यासाठीं, माझ्या

मतें, आज दोन साधनें आपल्यासमोर उरलीं आहेत. वरवर दिसणाऱ्या विविधतेंत एकता निर्माण करणारें आपलें अद्वैताचें तत्त्वज्ञान आहे. याच तत्त्व ज्ञानावर आधारलेले विविध भक्तिपंथहि आपल्या देशांत उदयास आले. भक्तिमार्गाच्या प्रचारकांनीं समाजकार्यहि फार मोठ्या प्रमाणावर केलें आहे. ज्या माणुसधर्माची महती आज सर्वत्र गायिली जात आहे त्या माणुसधर्माचा पुरस्कार आपल्या देशांतील साधुसंतांनीं प्राचीन काळापासून केला आहे. ज्ञानदेव, नामदेव, कबीर, तुळशीदास, सूरदास, गौरांगप्रभु नरसी मेहता इत्यादि संतपुरुषांनीं एकाच परमेश्वराची आराधना करून सर्वसामान्य लोकांना श्रद्धेस योग्य अशा प्रकारचा आसरा निर्माण करून दिला. वधर्माच्या कल्पनांमुळें जगांत प्रचंड वादविवाद आणि भयंकर रणें माजलीं ही गोष्ट खरीच, पण भारतीय भक्तिमार्गाचा इतिहास मात्र वेगळा आहे. कबीरदास व ज्ञानेश्वर यांनीं सांगितलेला मानवधर्म आजहि आचरून पाहण्यासारखा आहे.

एकमेकांच्या भावना समजावून घेणें, विचार पटवून घेणें व मनाच्या ऐक्याची अनुभूति प्राप्त करून घेणें यासाठीं आपलें भक्तिसाहित्य जसें उपयोगी पडणार आहे त्याचप्रमाणें ललित साहित्याचाहि उपयोग मोठ्या प्रमाणांत होण्यासारखा आहे. निरनिराळ्या प्रान्तांतील समाजाच्या गुणावगुणांचें व मानसिक उत्क्रांतीचें प्रतिबिंब ललित साहित्यांत पडलेलें असतें. मानवाचीं सुखदुःखें समान भूमिकेवरून ललित साहित्यांतच चित्रित झालेलीं असतात. देशकालातीत असणाऱ्या अशा थोर कलाकृति निर्माण करणारे प्रेमचंद्रांसारखे कलाकारहि देशाच्या एकजिनसी बांधीव व भरभक्कम उभारणीस खचित हातभार लावतील. मराठी भाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्यांनीं व सामान्य जनसमुदायानें प्रेमचंदांसारख्या कथाकाराची ओळख करून घ्यावयाची ती याच कारणासाठीं. केवळ हिन्दी ही राष्ट्रभाषा आहे म्हणून नव्हे तर बहुसंख्य लोकांचीं सुखदुःखें तींत चित्रित झालेलीं आहेत म्हणून हिन्दीस मीं मान्यता दिली व उर्दू आणि हिंदी या भाषांत सारख्याच प्रभावानें कथावाङ्मय निर्माण करणाऱ्या प्रेमचंदांचा परिचय मराठी वाचकांना करून देण्याचा यथामति प्रयत्न मीं केलेला आहे. याच धोरणास अनुसरून भारताचे सर्वश्रेष्ठ कथाकार शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचेंहि चरित्र मुन्शी प्रेमचंद यांच्या चरित्राबरोबरच मी मराठी भाषिकांच्यासमोर ठेवीत आहें.

येथें एका आक्षेपाचा खुलासा केला पाहिजे. हिंदी किंवा बंगाली भाषेतील साहित्य वाचून ' मराठी वाङ्मयांत कोठें आहेत अशा कलाकृति ? ' यासारखे प्रश्न विचारण्यासाठीं हा प्रयत्न नाहीं. मराठी वाङ्मयांतील कथा-वाङ्मयाचें मोजमाप या दृष्टीनें करावें असेंहि माझ्या मनांत नाहीं. ' हे पहा शरच्चंद्र-प्रेमचंद; यांसारखे चंद्रसूर्य आपल्या मराठी भाषेस केव्हां लाभणार ? ' अशा प्रकारच्या धिटाईचा प्रश्नहि माझ्यासमोर निश्चितपणें नाहीं. हरिभाऊ आपटे, वामनराव जोशी, ज्ञानकोशकार केतकर, नाथमाधव, तात्यासाहेब केळकर, वरेरकर, माडखोलकर, खांडेकर, फडके यांची ओळख जशी आपला विद्यार्थि-वर्ग करून घेणार आहे त्याचप्रमाणें त्यानें प्रेमचंद व शरच्चंद्र इत्यादींच्या वाङ्मयाची गोडी अनुभवावी व त्यांच्याहि परिचयास उत्सुक व्हावें म्हणून या चरित्रांचा उपक्रम आहे. मातृभाषेतील साहित्याच्या अभ्यासास पूर्णता आणण्याच्या दृष्टीनें शेजारच्या भाषांतील साहित्यकारांचें दर्शन निश्चितपणें उपकारक होणारें आहे. भारतीय जनतेतील वैचारिक व भावनात्मक ऐक्याचें स्वप्न खरें व्हावयाचें असेल तर अशा साहित्यसेवकांचा परिचय आवश्यकच आहे असें वाटतें.

तसें पाहिलें तर प्रेमचंदांचें नांव मराठी वाचकांना नवें नाहीं. मराठी मासिकांतून मधून मधून प्रेमचंदांच्या गोष्टी आपल्या भाषेंत अनुवादित झालेल्या आहेत. आजहि कोठें कोठें त्यांच्या कथा आपणांस वाचावयास मिळतात. नागपूरचे आनंदराव जोशी यांचें ' प्रेमचंदांच्या गोष्टी ' व श्री. ह. बा. अत्रे यांचें ' कथामंजरी ' हीं दोन पुस्तकें प्रेमचंद यांच्या कथांचा परिचय करून देणारीं आहेत. श्री. यदुनाथ थत्ते यांनींहि प्रेमचंद यांच्या कांहीं गोष्टींचा अनुवाद मराठींत केलेला आहे. प्रेमचंद यांच्या ' प्रेमाश्रम ' कादंबरीचा अनुवादहि श्री. प्र. श्री. भसे यांनीं प्रसिद्ध केला आहे. श्री. शं. बा. शास्त्री यांचें ' कायाकल्प ' या प्रेमचंदांच्या कादंबरीचें ' चिरंजीवन ' हें भाषांतरहि मराठीस परिचित आहे.

मुन्शी प्रेमचंद यांच्या सहानुभूतीची मर्यादा अति विस्तृत अशी होती. घरांतील नोकरमाणसें, मुलेंबाळें यांच्यावरच नव्हे तर स्वतःच्या छापखान्यांतील कामगारांवरहि मुन्शी प्रेमचंदांची विलक्षण ममता होती. कोठें हिंदुस्थान, कोठें रशिया ! पण मुन्शी प्रेमचंद यांच्या हृदयास मॅक्झिम गॉर्की यांच्या मृत्यूनें धक्का बसल्यासारखें झालें. याच मनोगतांत मागें मीं असें म्हटलें आहे कीं,

दुसऱ्यांच्या तत्त्वज्ञानावर प्रेमचंदांनीं आपल्या कथाविश्वाची इमारत उभी केली नाहीं. त्यांच्या अनुभवांचा पाया अति विस्तृत असा होता. त्यामुळें त्यांच्या ललित कृतींना देशकालाचें बंधन उरलें नव्हतें. त्यांचाच समानधर्मीय मॅक्झिम गॉर्की. दोघेहि दलितांच्या–पीडितांच्यासाठीं झटले. दोघांच्याहि आयुष्यांत संग्राम होता. त्याचमुळें गॉर्कीच्या मृत्यूमुळें प्रेमचंद विव्हळ होऊन उठले. अनेक टीकाकारांनीं प्रेमचंद व गॉर्की यांची तुलना केलेली आहे. त्यांतील आशय असा कीं, दोघेहि मानवधर्माचे महान् पुरस्कर्ते होते. एकाचें तत्त्व-ज्ञान वा एकाची स्फूर्ति दुसऱ्यानें घेतली असें नव्हे. अद्वितीय कलाकार, ध्येयवादी साहित्यिक, कर्मयोगी संपादक आणि दीन-दुःखितांचा वाली म्हणून मुन्शी प्रेमचंद यांचें नांव भारतीय कथासृष्टींत अजरामर होण्यासारखें आहे.

या चरित्राचा मी नाममात्र लेखक आहें. मूळची कथावस्तुच श्रेष्ठ असल्या-कारणानें या चरित्रांत जर थोडा चांगुलपणा असेल तर तो त्या वस्तूचा आहे; माझा नाहीं. श्रीमती शिवरानीदेवी यांचें ‘ प्रेमचंद घरमें ’, श्री. हंसराज रहबर यांचें ‘ प्रेमचंद : जीवन और कृतित्व ’, मन्मथनाथ गुप्त व रमेंद्रनाथ वर्मा यांचें ‘ कथाकार प्रेमचंद ’ या पुस्तकांचा मला फार उपयोग झाला आहे. सन १९३७ सालीं प्रसिद्ध झालेल्या ‘ हंस ’च्या प्रेमचंद-स्मारकांकाचाहि मीं उपयोग करून घेतलेला आहे. या सर्व लेखकांचा मी अतिशय ऋणी आहें. येथील सर परशुरामभाऊ कॉलेजमधील हिन्दीचे प्राध्यापक श्री. प्र. रा. भुपटकर यांनीं आपल्या संग्रहीं असलेलें मुन्शी प्रेमचंद यांचें दुर्मिळ चित्र उपलब्ध करून दिलें त्याबद्दल त्यांना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच होतील. राष्ट्र-भाषा प्रचार समितीचे संचालक श्री. डांगरे यांचीहि दर वेळीं मला मदत झाली आहे. त्यांच्या स्नेहशील वृत्तीचें मोजमाप तरी कसें करावें !

येथील व्हीनस प्रकाशनाचे उत्साही चालक श्री. स. कृ. पाध्ये या हौशी व तडफदार प्रकाशकांचें साह्य नसतें तर हीं दोनहि चरित्रें या आकर्षक स्वरूपांत वाचकांपुढें येतीं ना. तेव्हां त्यांच्या कर्तृत्वाचें चीज मराठी वाचकवर्ग उत्साहानें करील अशी आशा व्यक्त करून येथेंच हें मनोगत थांबवितों.

४३७ नारायण पेठ,<br>पुणें २

प्र. न. जोशी<br>— २६-१-५५

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | धनपतराय | १ |
| २. | डेप्युटी इन्स्पेक्टर | ११ |
| ३. | धनपतराय प्रेमचंद झाले | १५ |
| ४. | कर्मयोगी संपादक | २६ |
| ५. | फिल्मी दुनियेंत प्रेमचंद | ३५ |
| ६. | ध्येयवादी साहित्यिक | ४३ |
| ७. | किसानमित्र प्रेमचंद | ५० |
| ८. | " मी तर मजूर आहें " | ५९ |
| ९. | घरगुती वातावरणांत प्रेमचंद | ६९ |
| १०. | " मैं लुट गयी " | ७९ |
| ११. | प्रेमचंद कोण होते ? | ८६ |
| १२. | प्रेमचंदांची साहित्यसृष्टि | १०० |
| १३. | प्रेमचंद : विचारदर्शन | १२४ |
| १४. | प्रेमचंद : भाषासौंदर्य | १३७ |
| १५. | प्रेमचंदांचा जीवनसंदेश | १४८ |

ग्रंथसंग्रहालय
क्र. ८५५८
९६२८८
२५-८-८२
१०५५५

# मुन्शी प्रेमचंद

## धनपतराय : १

सन १९२९ मधील चैत्रांतील एका अष्टमीचा दिवस होता. अलाहाबाद स्टेशनांत उभी असलेली गाडी उतारूंनीं भरून गेली होती. मिळेल तेथें जागा मिळविण्याचा, धक्काबुक्की करण्याचा, डब्यांत घुसून बाचाबाची करण्याचा प्रयत्न शेतकरी लोक करीत होते. या भाबड्या खेडुतांना नाहींतर सहजासहजीं जागा कशी मिळणार ? कांहीं खेडवळ शेतकरी एका इंटरच्या डब्यांत घुसले. त्यांना वाटलें, हा तिसऱ्या वर्गाचाच डबा असावा. इंटर वर्गाच्या डब्यांतहि खूप गर्दी होती. आंतील धनवान् माणसें संत्रस्त झालेलीं असल्यानें खेड्यांतील या भोळ्या शेतकऱ्यांना डब्यांत घुसतांना पाहतांच त्यांना अधिकच अडचण भासूं लागली. याच डब्यांत एक उमदा गृहस्थ आपल्या पत्नीबरोबर कांहीं बातचीत करीत बसला होता. त्या व्यक्तीचा चेहरा भव्य होता. पाणीदार डोळ्यांनीं एकंदरींत रुबाबांत चांगलीच भर पडलेली होती. गर्दीगर्दीनें आंत घुसणाऱ्या खेडुतांना त्यानें दटावलें, "हा इंटरचा डबा आहे. दीडपट भाडें पडतें. तिकिटें आहेत तुमच्यापाशीं ?..." शेतकऱ्यांनीं दीन मुद्रेनें उत्तर दिलें, "बाबूजी, काय करावें ? दोन दिवस इथेंच पडून आहोंत...शीतलादेवीच्या दर्शनाला गेलों होतों..."

शेतकऱ्यांचें गाऱ्हाणें ऐकल्यासारखें करून बाबूजी म्हणाले, "शीतलादेवीच्या दर्शनानें काय मिळालें तुम्हांला ? प्रत्येकानें पंधरापंधरा रुपये खर्च केले. या खर्चांत चार महिन्यांचें धान्य मिळालें असतें तुम्हांला. यापेक्षां देवीची पूजा तुम्हीं घरींच कां नाहीं केली ? परमेश्वराचा वास तर सर्वत्र आहे. घरच्या घरीं आरामांत देवीची पूजा केली तर तुमची दगदग थांबेल व त्यामुळें देवीहि संतुष्ट होईल."

गाडीचा डब्बा खच्चून भरलेला होता. श्वास घेणेंहि कठीण झालें होतें. उकडा मनस्वी असल्यामुळें बाबूजींची बायको बोलली, " उगाच घेतलेत आंत यांना. देवधर्मांचा उपदेश तरी यांना काय कामाचा ? ...अडाणी... पुढल्या स्टेशनवर द्या उतरवून साऱ्यांना... "

" वा ! खूप सांगतेस... " बाबूजी चकित होऊन बोलूं लागले, " याच लोकांसाठीं तूं तुरुंगांत जातेस, सरकारशीं झुंज खेळतेस...आणि आज प्रसंग आल्याबरोबर तूंच त्यांना दूर लोटतेस ! बिचारे अर्धपोटीं राहून खोट्या धर्मांच्या नांवाखालीं मरत आहेत. यांना कोण शहाणे करणार ? कोण शिकवणार आहे यांना ? "

" कोण म्हणजे ? तुम्ही तर दर महिन्याला यांच्यासाठीं पानेंच्या पानें लिहितां... "

" पण माझ्या कथा-कादंबऱ्या हे लोक थोडेच वांचतात ? हो, एक उपाय आहे; माझ्या कथांचे चित्रपट तयार करून गांवोगांव मोफत दाखविले तर होईल काम..."

पतिपत्नींचें एवढें बोलणें होत आहे तों एक रेल्वे पोलीस डब्यांत येऊन पोंचला. खेडुतांना धमकी देत आणि दरडावीत तो विचारूं लागला, " कां तुम्ही येथें घुसलांत ? हा इंटरचा डब्बा आहे. जादा पैसे द्या; नाहींतर उतरा लोकर खालीं. " या अरेरावीमुळें बाबूजी एकदम क्रुद्ध झाले आणि पोलिसास उद्देशून आवाज चढवीतच ते बोलले, " आपण कोण माणूस आहांत कीं पशु ? तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत जागा असती तर ते येथें येतात तरी कशाला ? त्या वर्गाचें भाडें तुम्हीं घेतलें पण जागा देण्याची जबाबदारी मात्र जणुं तुमची नव्हे. जनावरांसारखें माणसांना डब्यांतून कोंबून बसविलें आहे ! यांचें भाडें घेतलें... यांची सोय कोण लावणार ? चला. अगोदर जागा करून द्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत...मीहि येतों तुमच्याबरोबर... "

आणि खेडुतांच्याबरोबर बाबूजी खरोखरच खालीं उतरले. रेल्वे पोलीस मनांत वरमला. त्यानें प्रत्येकाला कशीबशी जागा करून दिली. बाबूजी मनांतल्या मनांत संतुष्ट झाले.

गरीब खेडुतांची कड घेऊन रेल्वे पोलिसांशीं भांडण करणारे हे बाबूजी म्हणजे हिन्दी भाषेंतील सर्वश्रेष्ठ कथाकार मुन्शी प्रेमचंद होत. आपल्या कथा-

कादंबऱ्यांतूनच नव्हे तर प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनांतहि भारतीय शेतकऱ्यांबद्दल कमालीची सहानुभूति प्रेमचंद यांना वाटत असे. दलितांबद्दल, दुःखितांबद्दल त्यांच्या अंतःकरणांत दया भरपूर भरलेली असे. दलितांचा कैवार घेणारा एवढा मोठा कथाकार शरच्चंद्र चतर्जींखेरीज आपल्या देशांत दुसरा झाला नाहीं. किसान-मजुरांचें दुःख प्रेमचंदांनीं स्वतः अनुभाविलें व आपल्या कथांतून तन्मयतेनें रंगविलें. त्यांच्या कादंबऱ्या गरिबांच्या व दुःखितांच्या सहानुभूतीनें कांठोकांठ भरलेल्या आहेत. मानवजातीबद्दल वाटणारी विशाल ममता हाच श्रेष्ठ ललितकृतीचा आत्मा मानला जातो. प्रेमचंदांच्या कथांतून व कादंबऱ्यांमधून भारतीय जनतेच्या सामाजिक व राजकीय संघर्षाचें चित्र तर मिळतेंच; पण त्याबरोबरच आपला देश शेतकऱ्यांचा आहे, मजुरांचा आहे, त्यांचीं दुःखें दूर झालीं तरच या देशाचें वैभव वाढेल, ही एकच भावना प्रेमचंदांच्या सर्व साहित्यांत प्रकट झालेली दिसून येते. त्यांनीं भारतीय किसानांचें जीवन जवळून निरखलें होतें. ते स्वतःला मजूर म्हणूनच समजत. शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षा, सुख-दुःखाच्या भावना त्यांनीं बरोबर घेतल्या जाणून होत्या. दारिद्र्याची, अज्ञानाची, विपत्तीची आंच कशी असते, हें त्यांनीं अनुभविलें होतें. प्रेमचंदांचें जीवनहि एक संग्राम-कथाच आहे.

सन १८८० च्या ३१ जुलै रोजीं प्रेमचंदांचा जन्म बनारसपासून चार मैल दूर असणाऱ्या लमही गांवीं झाला. त्यांच्या पित्याचें नांव अजायबराय असून ते पोस्ट खात्यांत कारकून होते. त्या वेळीं कारकुनास मुन्शी म्हणण्याची वहिवाट असल्यानें अजायबराय यांना सर्व लोक मुन्शीच म्हणूं लागले आणि मग तें नांव या घराण्याच्या उपनांवासारखें बनून गेलें. पोस्ट खात्यांतील कारकुनास पगार असा किती मिळणार ? वीस रुपयांपासून वाढतां वाढतां चाळीस रुपयांपर्यंत पगाराची मर्यादा पोंचली असली तरी वाढत्या संसारांत त्याची मदत अपुरीच होती. वडिलोपार्जित थोडी जमीन होती, पण तिचें उत्पन्न मात्र असून नसल्यासारखेंच होतें. मुन्शी अजायबरायांनीं आपल्या मुलाचें नांव मोठ्या हौसेनें धनपतराय असें ठेवलें. पण या कुटुंबांत कधीं धनाचा वा संपत्तीचा पाय मात्र ठरत नसे. सर्वसाधारण मध्यमवर्गीय लोकांप्रमाणेंच आपत्तींशीं झगडण्यांतच त्याचें सर्व जीवन खर्च व्हावें, असा ईश्वरी संकेत असावा. मुन्शी घराण्यांत प्रत्यक्ष शेती कोणीं केली नसली तरी राहणी

खेड्याची असल्यामुळें शेतकऱ्यांचीं सुखदुःखें, त्यांचीं संकटें, त्यांच्या आशा-आकांक्षा इत्यादींचा परिचय त्यांच्या घराण्यांत सर्वांना जवळून होता.

धनपतराय हें प्रेमचंदांचें वडिलांनीं ठेवलेलें नांव. पण त्यांचे चुलते त्यांना मुन्शी नवाबराय असें म्हणत. धनपतराय बालपणापासून मोठे उपद्व्यापी आणि विनोदी वृत्तीचे होते. एके दिवशीं कांहीं मुलें-मुलें मिळून केस कापण्याचा खेळ खेळूं लागलीं. धनपतराय न्हावी बनले व समोरच्या मुलाचे केस कापूं लागले. कापतां कापतां त्यांनीं त्या मुलाच्या कानास जबर जखम केली. भळभळां रक्त वाहूं लागलें. पोराच्या किंचाळीनें त्याची आई गर्जून धांवत आली. धनपतराय दाराआड लपून राहिले. पण त्यांच्या आईसहि या गोष्टीचा राग आला होता. तिनें या उपद्व्यापी पोराला पकडलें व तीनचार थपडा ठेवून दिल्या आणि बोलली, " मोठी कामगिरी केलीस ! कां ? त्या पोराचा कान कां कापलास ? " त्यावर रडत रडतच धनपतरायांनीं उत्तर दिलें, " मीं नाहीं त्याचा कान कापला; फक्त केस कापले. " पोराच्या कानांतून रक्त वाहत असल्यामुळें धनपतरायांची कारागिरी सर्वांना समजली होती. पुनः असले खेळ करावयाचे नाहींत, असें त्यांस बजावण्यांत आलें.

धनपतरायांचें शिक्षण वयाच्या पांचव्या वर्षापासून सुरू झालें. एका मौलवी साहेबापाशीं उर्दू शिकण्यासाठीं ते जात असत. शिक्षणांत धनपतरायांची बुद्धि चांगली होती. त्या वेळीं उर्दू-फारसी यांच्या अभ्यासासच महत्त्व असल्यामुळें धनपतरायांनाहि तोच अभ्यास लहानपणीं करावा लागला. घरची गरिबी असल्यामुळें फार कष्टांतच त्यांना दिवस काढावे लागले. तळवे फाटलेलें पायताण आणि जाडेभरडे कपडे त्यांना कित्येक दिवसपर्यंत वापरावे लागत होते. त्यांच्या सोबतीला त्यांचें चार चुलतभाऊ नेहमीं असत. गांवांतील पोरें जमवून विटीदांडूचा खेळ खेळण्याची मनस्वी हौस धनपतराय यांना होती. या खेळाच्या ऐन भरांत त्यांची तहानभूकहि हरपून जात असे. पुढील आयुष्यांत प्रेमचंदांनीं ' विटीदांडू ' ( गुल्लीडंडा ) नांवाची एक सुंदर कथा लिहिली. तींत या खेळाची आपणांवर किती पकड होती याचें चित्रण त्यांनीं उठावदार रीतीनें केलें आहे. त्यांत त्यांच्या देशाभिमानाचीहि छटा उमटलेली दिसते. कथेच्या प्रारंभींच प्रेमचंदांनीं लिहिलें आहे, " आपले इंग्रज मित्र मानोत किंवा न मानोत, विटीदांडू हाच खेळांचा राजा असें माझें मत आहे. हा खेळ मुलें खेळूं लागलीं कीं मी

बेचैन होतों व त्यांच्यांत जाऊन खेळावें असें मलाहि वाटूं लागतें... विलायती खेळांच्या सर्व वस्तु महाग असतात... पण इंग्रजी वस्तूंची हौस आपण एवढी वाढवली कीं, आपणांस त्याच महागड्या वस्तु आवडूं लागल्या. भारतीय खेळ एक पैसाहि खर्च न होतां खेळले जात असतांना विलायती खेळांसाठीं शेंकडों रुपये आमच्या शाळा कां खर्च करतात ? धनवानांच्यासाठीं इंग्रजी खेळ आहेत. गरिबांच्या माथीं हे महागडे खेळ कशासाठीं ?...... विटीदांडूच्या खेळांत मी बालपणापासून रमून गेलों आहें. तें सकाळीं घरांतून बाहेर पडणें, झाडावर चढून फांदी तोडणें, विटीदांडू बनविणें,...... तो उत्साह, तें ममत्व, तो लढाई-झगडा···घरचे लोक रागावलेले असत, वडील संतापत, आई दाराशीं येऊन वाट पाहत आहे,···पण मी आपला खेळण्यांत गुंग ! आंघोळीची कीं जेवणा-खाण्याची शुद्ध असे कोणाला ? विटी पाहिली तर पुरी वीतभरहि नाहीं पण तिच्यांत सर्व जगतांतील गोडी आणि आनंद भरला आहे असें मला वाटे ... ” गोष्टींतील हें वर्णन पुष्कळशा अर्थानें धनपतरायांच्या बालपणाला लागू पडतें.

परंतु खेळण्याबागडण्याचें भाग्य त्यांना फार दिवस लाभलें नाहीं. धनपत-राय आठ वर्षांचे असतांनाच त्यांच्या आईचा अखेरचा आजार सुरू झाला. सहा महिनेपर्यंत त्यांची आई अंथरुणाला खिळून राहिली होती. तिच्या उशाशीं बसून लहानगे धनपतराय पंख्यानें वारा घालीत असत. त्यांचे चुलत-भाऊ औषधपाण्याची व्यवस्था करीत. पण कोणताहि उपाय न चालून धनपत-रायांची आई मुलांना त्यांच्या वडिलांच्या हातीं सोंपवून देवाघरीं गेली. प्रेमचंदांनींच या प्रसंगाचें वर्णन केलें आहे : “ बहीण, पिताजी, भाऊ सर्व जण रडत होते. काय झालें आहे हें माझ्या नीट ध्यानांत येत नव्हतें. आईच्या मृत्यूनंतर बहीण आपल्या घरीं निघून गेली... माझे भाऊ दुधांत साखर घालून मला देत असत; पण आईचें प्रेम त्यांत कोठें होतें ? एकांतांत बसून मी खूप रडत असें. ” येथून प्रेमचंदांचें स्नेहशून्य जीवन सुरू झालें. आईच्या मृत्यूनें त्यांच्या सुकुमार हृदयावर मोठाच आघात झाला. आपल्या कथांतून पुढें धनपतरायांनीं – प्रेमचंदांनीं – मातृप्रेमाचा मंगल महिमा मुक्तकंठानें गायिला आहे. ‘ प्रेरणा ’ नांवाच्या एका कथेंत ते लिहितात; “ दूध, मिठाई व खेळणीं यांपेक्षांहि मुलांना प्रेमाची भूक अधिक असते. आईच्या मांडीवर बसून राहिलेल्या मुलास सर्व जगताचें राज्यहि तुच्छ वाटतें... ” ‘घरजमाई’

या कथेंत ते लिहितात; " लहान मुलाचें सर्वस्व म्हणजे त्याची आई. एक मिनिटाचा वियोग त्याला सहन होत नाहीं. बाप कोठेंहि असला तरी त्याला फारशी फिकीर नसते. पण आई मात्र सोळा आणे स्वतःची हवी असते... "

धनपतरायांचें दुर्दैव असें कीं, त्यांच्या पिताजींनीं पुनः लग्न केलें व त्यांना नवी आई आली. लहानग्या धनपतला या सावत्र आईपासून त्रास होऊं लागला. नवी आई आली आणि लागलीच मालकीण बनली. तिच्याबरोबर तिचा भाऊहि आला व त्याचाच बडेजाव घरांत सुरू झाला. दीड रुपया भाड्याचें एक घर होतें, त्यांत दाराशीं असणाऱ्या एका घाणेरड्या खोलींत धनपत रात्रीं एकटाच झोपत असे. सावत्र आईच्या स्वभावाचें चित्रणहि पुढें प्रेमचंदांनीं अनेक ठिकाणीं केलें आहे. ' सौतेली माँ ' नांवाची एक कथा त्यांनीं याच विषयावर करुणाजनक अशी लिहिली आहे. आईच्या मरणानें धनपतरयांच्या मनावर मोठाच दुःखद असा आघात केला. मातृसुखास आंचवलेल्या धनपतरायांच्या मनांत बालपणींच कल्पनांचे किल्ले निर्माण होऊं लागले. स्नेहशून्य झालेलें बालमन कल्पनेंतील स्नेहमय वातावरणांत रममाण होऊं लागलें. हवीहवीशी वाटणारी आवश्यक अशी वस्तु अप्राप्य असली म्हणजे मनुष्य कल्पनाशील बनूं लागतो. कल्पनापूर्तीतील विलक्षण अनुभूतीमुळें तो भारावून गेलेला असतो. ज्या अद्‌भुत अशा मायानगरीची इच्छा खऱ्या जीवनांत मनुष्य करीत असतो ती त्याला सहसा कधींच मिळत नाहीं; मग तो कल्पनेच्या साम्राज्यांतील इमारती बांधूं लागतो. त्याच मायाविश्वांत त्याला विशेष आनंद प्राप्त होतो. धनपतच्या बालमनासहि हीच चटक पहिल्यापासून लागली.

रामचंद्राचें जीवनसार नृत्य-नाट्याच्या साह्यानें उभें करणारी रामलीला लहानग्या धनपतरायला विलोभनीय अशी वाटे. रामलीलेच्या खेळांत त्याला मनस्वी सुख प्राप्त होई. " माझ्या शेजारींच रामलीलेचा खेळ होत असे. त्यांतील राम, लक्ष्मण, सीता मला फार आवडत असत. त्या वेळीं माझ्याजवळ जी मौल्यवान वस्तु असे ती घेऊन मी रामचरणीं अर्पण करीत असें. थोडेफार पैसे जवळ असले कीं रामरायाला अर्पण करण्यांत मला धन्यता वाटे. रामचंद्र माझ्याशीं थोडें बोलेल तर काय मजा येईल असें मनांत येई... मी किती भोळा व भोंदू होतों. आजकालचीं मुलें माझ्यापेक्षां अधिक चलाख

दिसतात. " असे उद्गार त्यांनीं आपल्या बालपणींच्या रामभक्तीबद्दल काढलेले आहेत. पुढें प्रेमचंदांनीं लहानपणींच्या या जिवंत रामलीलेवर एक छोटी कथाहि रंगविली आहे.

धनपतरायाच्या कल्पनाप्रवण स्वभावास आणखी एक खाद्य याच वेळीं मिळालें. शाळेंत जाण्याचें विसरूनहि धनपतराय उर्दू कथा-कादंबऱ्या वाचण्यांत दंग होऊन जात असे. मौलाना शरर, पं. रतननाथ सरशार, मिर्जा रुसवा, मौलवी मुहम्मदअली इत्यादि त्या वेळच्या प्रसिद्ध उर्दू कथाकारांचें सारें वाङ्मय धनपतरायांनीं वाचून काढलें होतें. रेनॉल्ड या इंग्रजी कादंबरीकाराच्या कल्पनारंजित व अद्भुत अशा कादंबऱ्यांचे उर्दू अनुवाद त्या वेळीं भराभर प्रसिद्ध होत होते, तेहि या कोंवळ्या विद्यार्थ्याच्या हातून सुटले नाहींत. " दोन-तीन वर्षांत मीं शेंकडों कादंबऱ्या वाचून काढल्या. कथा-कादंबऱ्यांचा संच संपत आला तेव्हां नवलकिशोर प्रेसनें प्रसिद्ध केलेले पुराणांचे उर्दू अनुवादहि मी वाचूं लागलों. 'तिलस्मी होशरुबा' नामक अद्भुत ग्रंथाचे सतरा भाग त्या वेळीं प्रसिद्ध झाले होते. एक एक भाग मोठा रॉयल आकाराचा असून प्रत्येकाचीं पृष्ठें दोन हजारांपेक्षां कमी नव्हतीं. यांतील कांहीं भाग मीं त्याच वेळीं वाचून काढले. " धनपतरायाच्या या आत्मकथनांतील सार ध्यानांत येण्यासारखें आहे. धनपतचें मन सदैव भुकेलेलें होतें. समोर दिसेल तें वाचून काढणें एवढेंच तें जाणत होतें. वडिलांची बदली गोरखपूर येथें झाल्यावर धनपतच्या शिक्षणाची सोय याच गांवीं करण्यांत आली. खेड्यांतून शहरांत आल्यावर धनपतचें बालमन अधिकच चकित होऊन गेलें. गोरखपूर येथील एका मिड्ल स्कूलमध्यें धनपतांचें शिक्षण सुरू झालें आणि याच वेळीं त्यांना उर्दू कथा-कादंबऱ्यांचें विलक्षण वेड लागलें. " गोरखपूर येथें मिशन हायस्कूलमध्यें मी आठव्या वर्गांत होतों. बुद्धिलाल नांवाचा एक पुस्तक-विक्रेता माझ्या ओळखीचा होता. त्याच्या दुकानांत बसून तेथील कादंबऱ्या वाचण्याचा सपाटा मीं सुरू केला... " आणि लहानपणींच कथा वाचण्यास चटावलेल्या धनपतच्या मनांत डोकावून गेलें असेल कीं, आपणहि अशाच प्रकारचें लेखन करावें. कारण शाळेच्या अभ्यासू वातावरणांत धनपतचें लक्ष कधींच फारसें रमलें नाहीं. इतिहासांतील शुष्क सनावली व गणितांतील निर्जीव आंकडे यांचा लोभ त्याच्या मनाला केव्हांच वाटला नाहीं. भरमसाट

वाचन झालेलें असल्यामुळें तसल्याच प्रकारच्या लेखनाचा उद्योगहि धनपतनें बालपणींच सुरू केलेला होता. वाचावें, लिहावें व फाडून टाकावें याच क्रमानें त्याच्या लेखनक्रियेस प्रारंभ झाला.

घरच्या गरिबीमुळें धनपतराय नेहमींच हैराण झालेला असे. वयाच्या पंधराव्या वर्षींच विद्याभ्यास चालू असतांनाच धनपतचें लग्न करून दिलें होतें. वडिलांना पगार प्रारंभीं वीस रुपये होता. तो वाढतां वाढतां चाळीस रुपयांपर्यंत वाढला, पण या वेळीं धनपतच्या पिताजींचाहि स्वर्गवास झाला. मधून मधून विचारपूस करणारें एवढें एकच मायेचें मनुष्य त्याला होतें तेंहि काळानें हिरावून नेल्यावर धनपत अधिकच उदास बनला. घरांत जो कांहीं थोडासा पैसा होता तो वडिलांच्या आजारपणांत व क्रियाकर्मांत खर्च होऊन गेला. धनपतच्या मनांत प्रबल इच्छा अशी कीं, आपण एम्. ए., एल्एल्. बी. व्हावें व वकिली करावी. पण दारिद्र्यानें पाठ एकसारखी पुरविल्यामुळें धनपतच्या साऱ्या इच्छा-आकांक्षा धुळीस मिळाल्या. देहावर धड कपडे नसत. अनवाणी पायांनींच त्याला भटकावें लागे. महागाई विलक्षण होती. खाण्यापिण्याची थोडी सोय व्हावी म्हणून धनपतला आदल्या वर्षींच हौसेनें शिवलेला कोट विकावा लागला! या कष्टदायक परिस्थितींत असतांना त्याची प्रवेश-परीक्षा उत्तीर्ण झाली. नंबर वर आलेला नव्हता म्हणून त्या वेळीं नांवाजलेल्या क्वीन्स कॉलेजमध्यें जाण्याची शक्यता संपली. तेथें धनपतला नादारी कोण देणार?

धनपतचें सुदैव असें कीं, त्याच वर्षीं हिन्दु कॉलेज नव्यानेंच निघालें. त्या कॉलेजांत जाण्याचा निश्चय त्यानें केला. फीच्या सवलतीचा वशिला लावणें भाग होतें. प्रिन्सिपॉल रिचर्डसन यांच्या घरीं धनपतराय गेले. 'कॉलेजमधील काम घरीं नाहीं होणार, कॉलेजांत या' असें उत्तर मिळालें. अर्थात् पुढें कॉलेजमध्यें भेटूनहि कांहीं उपयोग झाला नाहीं. कोणा प्रतिष्ठित माणसानें शिफारस केली तर काम होणार होतें. धनपतरायांस शिफारस-पत्र कोण देणार? नशिबानें ठाकुर इंद्रनारायण सिंह या एका प्रतिष्ठित गृहस्थाचें शिफारस-पत्र हातीं आल्यावर धनपतच्या आनंदास सीमा उरली नाहीं. पण शिफारस-पत्र प्रिन्सिपॉलना दाखविण्यापूर्वींच धनपतराय तापानें आजारी झाले. यांत एक महिना निघून गेला. भीतभीतच धनपतराय शिफारस-पत्र

घेऊन प्रिन्सिपॉलसाहेबांना भेटावयास गेले. करड्या नजरेनें पाहून प्राचार्यांनीं विचारलें, " इतके दिवस कुठें होती स्वारी ? "

" आजारी होतों. "

" काय होत होतें ? "

धनपतरायांना उत्तर देतां येईना. केवळ तापासाठीं एक महिन्याचा उशीर साहेब कसा सहन करील ? कष्टसाध्य असणाऱ्या एखाद्या रोगाचें नांव मनां-तल्या मनांत ते आठवूं लागले. शिफारस-पत्र देत असतांना ठाकुर इंद्रनारायण सिंहांनीं आपल्या धडकणाऱ्या हृदयाच्या विकारासंबंधीं कांहीं बातचीत केली होती, ती आठवून धनपतरायांनीं बेधडकपणें उत्तर दिलें, " पाल्पिटेशन ऑफ हार्ट, सर ! "

साहेबानें विचारलें, " आतां ठीक आहे ना ? "

" हो. "

" जा. आजच्या आज कॉलेजांत नांव घाल. "

धनपतरायांच्या शिरावरील पर्वतच जणुं खालीं उतरला. अर्ज भरून त्यांनीं कॉलेजच्या ऑफिसमध्यें दाखल केला. कांहीं तासांनीं अर्ज परत आला. ' उमेद-वाराची चांचणी घेऊन त्यास प्रवेश द्यावा ' असा शेरा त्यावर होता ! धनपत-रायांच्या सर्व आकांक्षा येथेंच संपल्या. इंग्रजीशिवाय कोणत्याहि विषयांत एका-एकीं पास होण्याची शक्यता त्यांना वाटेना. बीजगणित व भूमिति यांचें नांव काढल्याबरोबरच त्यांना भीति वाटे. सर्व कांहीं विसरून गेलेलें असल्यामुळें पास होण्याची आशाच नव्हती. वर्गांत याच धडकीनें त्यांनीं प्रवेश केला. पहिला इंग्रजीचा तास कसाबसा गेला. दुसऱ्या तासास बीजगणित शिकविणारे बंगाली प्राध्यापक वर्गांत आले. धनपतरायांची परीक्षा घेण्यांत आली. अपयश आल्या-मुळें फॉर्मवर ' असंतोषजनक ' असा शेरा मिळाला. हताश झालेल्या धन-पतरायांस खिन्न होऊन घरचा रस्ता सुधारण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. " गणित मेरे लिये गौरीशंकर की चोटी थी ! " असे उद्‌गार त्यांनीं या वेळेस काढले. धनपतरायांच्या कॉलेजमधील अध्ययनाची ही तऱ्हा. पण मनांत शिक-ण्याची तर मनस्वी हौस. गणिताचा अभ्यास त्यांनीं पुनः सुरू केला. एका वकिलाच्या मुलांना शिकविण्याचें काम त्यांनीं पत्करलें व या पांच रुपये मिळ-णाऱ्या मासिक वेतनांतील कांहीं भाग घरीं पाठवून उरलेल्यांत आपलें शिक्षण

धनपतरायांनीं सुरू केलें. मोठ्या काबाडकष्टांत दिवस काढीत गणिताच्या अध्ययनास प्रारंभ केला खरा. पण धनपतरायांचें मन कसें विचित्र पहा, गणित करण्यासाठीं मिणमिणत्या दिव्यासमोर बसत पण सारी रात्र जागून एखादी अद्‌भुत कादंबरी वाचून काढीत. ' फिसाना आज़ाद ', ' चंद्रकान्ता संतति ' आणि बंकिमचंद्रांचे कांहीं अनुवाद त्यांनीं या वेळीं वाचून गणिताच्या अभ्यासाचा फार्स केला. गरिबी त्यांच्या पाठीमागें हात धुऊन लागली होती. कांहीं चांगली नोकरी मिळेल तर बरी, या विचारांत धनपतराय होते. पण सहजासहजीं नोकरी या विक्षिप्त माणसास कोण देणार ? दारिद्र्य आणि गणितांतील कच्चेपणा यांमुळें धनपतरायांस कॉलेजचें शिक्षण घेणें अशक्य होऊन बसलें. त्यांना आतां पोट भरण्यासाठीं नोकरीच्या शोधांत भटकणें भाग होतें. पण मनांतील विद्येची लालसा स्वस्थ झाली नव्हती. पुढें दहाबारा वर्षांनीं जेव्हां परीक्षेस गणित हा ऐच्छिक विषय झाला तेव्हां धनपतरायांचें उच्च शिक्षण मार्गीं लागलें.

दारिद्र्यामुळें विद्या घेण्याची इच्छा कित्येकांना मारावी लागत असल्याचें धनपतरायांनीं पाहिलें होतें; स्वतः अनुभविलें होतें. आपल्या कथा-कादंबऱ्यांतून अशा प्रकारची टोचणी त्यांनीं रंगविलेली दिसून येते. ' कर्मभूमि ' या त्यांच्या गाजलेल्या कादंबरीची सुरुवातच अशी आहे : " आपल्या शाळा-कॉलेजांतून फीचे पैसे ज्या प्रकारें वसूल केले जातात तसा प्रकार कदाचित् सावकारहि करीत नसेल. महिन्यांतील एखादी तारीख ठरवून त्या दिवसापर्यंत पैसे आले नाहींत तर नांव काढलें जातें किंवा रोजचा दंड सुरू होतो...अशा कठोर नियमांचा उद्देश गरिबांना शिक्षण घेतां येऊं नये याशिवाय दुसरा कोणता असणार !...शाळा-कॉलेजांतहि पैशाचें राज्य आहे; आणि तेंहि निर्दय आणि कठोर. उशिरां आलें तर दंड, आलेंच नाहींतरी दंड, गृहपाठ झाला नाहीं तर दंड, पुस्तकें विकत घेणें शक्य नसलें कीं दंड ! कोणताहि अपराध होऊं द्यात, त्याला दंड हा असणारच. हीं विद्यालयें कीं दंडालयें ! पाश्चात्य शिक्षणाचा हाच आदर्श आहे आणि याच शिक्षणाची मोठी तारीफ केली जाते. या प्रकारच्या विद्यालयांत पैशाकडेच लक्ष देणारे असतील, गरिबांचे गळे कापणारे असतील, पैशासाठीं आत्मा विकणारे असतील, तर त्यांत आश्चर्य तें कोणतें ? "

धनपतरायांना आलेला अनुभवच त्यांनीं येथें साकार केलेला आहे.

आपल्या आत्मकथनपर वृत्तान्तांत त्यांनीं लिहिलें आहे; “ शाळेंतून साडेतीन वाजतां सुट्टी मिळे. हेडमास्टरनें फी माफ केली होती. पण परीक्षा आ वासून उभी होती. शिकवण्या चालूच असत. थंडीचे दिवस होते. चार वाजतां शिकवणी संपे. तेथून पांच मैल दूर असणाऱ्या खेड्याकडे मी निघें. वेगानें चालूनहि रात्रीं आठाच्या आंत घरीं येणें केव्हांच मला जमलें नाहीं. सकाळीं आठ वाजतां परत शाळेला निघत असे. वेळेवर जाणें कधींच जमलें नाहीं. रात्रीं जेवण झाल्यानंतर मिणमिणत्या दिव्यासमोर बसून राही. झोप केव्हां लागत असे हेंहि ध्यानांत नसे. पण हिंमत सोडली नव्हती. ”

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

## डेप्युटी इन्स्पेक्टर

शिक्षणाची तीव्र लालसा आणि घरच्या प्रपंचाची हलाखीची अवस्था यामुळें धनपतराय क्षणभर वैतागून गेले. घरीं सावत्र आई व सावत्र भाऊ यांचा त्रासच होई. शिकवणीचे पैसे अपुरे पडत. नोकरीच्या शोधांत असतांनाचा एक प्रसंग धनपतरायांनींच वर्णन केला आहे :

“ थंडीचे दिवस होते. जवळ एक कवडीहि नव्हती. एक-एक पैशाचें खाऊन दोन दिवस घालविले होते. यापुढें उधार देण्यास दुकानदार तयार नव्हता. एका पुस्तकविक्रेत्याच्या दुकानांत कांहीं पुस्तकें विकण्यासाठीं मी गेलों होतों. चक्रवर्ती गणितकुंजी ( गाइड ) दोन वर्षांपूर्वी विकत घेतलें होतें. चोहोंबाजूंनीं निराश झाल्यानंतर आज तें पुस्तक विकावयास काढलें होतें. दोन रुपयांच्या पुस्तकाचा सौदा एका रुपयावर ठरला. एक रुपया घेऊन मी दुकानाच्या पायऱ्या उतरत होतों, तों मोठ्या मोठ्या मिशावाल्या एका सौम्य माणसानें मला विचारलें, ‘ तुम्ही कोठें शिकत असतां ? ’

‘ तूर्त कुठेंच शिकत नसतों. पण इच्छा मात्र आहे. ’

‘ प्रवेशपरीक्षा पास झाली आहे का ? ’

‘ होय. ’

‘ नोकरी करण्याची इच्छा आहे ? ’

'पण मिळते आहे कुठें नोकरी ?'

चौकशी करणाऱ्या गृहस्थास एका सहकारी अध्यापकाची जरूरी होती. ते एका लहान शाळेचे हेडमास्तर होते. दर महिन्यास अठरा रुपये पगार मिळणार होता. मीं एकदम नोकरी स्वीकारली. माझ्या कल्पनाशक्तींतील सर्वांत उंच भरारीसुद्धां दरमहा अठरा रुपयांच्या मानानें ठेंगणी होती. सन १८९९ ची गोष्ट आहे ही."

वकिली करण्याची इच्छा धरणारे धनपतराय एका लहानशा शाळेंत शिक्षक बनले. परंतु कल्पनासाम्राज्यांत रममाण होणाऱ्या या तरुण माणसाचें मन शिक्षकाच्या पेशांत कसें रमणार ? शिक्षणाची लालसा अर्धवट राहिलेली, घरच्या दारिद्यानें मन पेटलेलें, अशा विरोधी परिस्थितींत धनपतरायांनीं शिक्षकाची नोकरी पत्करली. तींत त्यांना आत्मीयता अशी वाटलीच नाहीं. 'होली की छुट्टी' नांवाच्या कथेंत जणुं त्यांनीं आत्मवृत्तच लिहिलें आहे : "मॅट्रिक्युलेशन झाल्यावर मला एका प्रायमरी शाळेंत शिक्षकाची जागा मिळाली. ही शाळा माझ्या घरापासून अकरा मैल दूर होती. आमचे हेड-मास्तर सुट्टींतहि विद्यार्थ्यांना शिकवावें, अशा मताचे होते. एप्रिल महिन्यांत वार्षिक परीक्षा असे. यासाठीं जानेवारीपासूनच अभ्यास उरकण्याचें तंग वातावरण सुरू होई. सहकारी अध्यापक रात्रीं बोलावले जात नव्हते हें नशीब; परंतु त्यांना सुट्टी कशी ती माहीत नव्हती. सोमवती आवस आली आणि गेली, शिवरात्र आली आणि संपली...कित्येक महिन्यांत मला घरीं जाण्यास सांपडलें नव्हतें. या होळीच्या सुट्टींत काय वाटेल तें होवो, घरीं जाण्याचा निश्चय मीं केला होता. एक आठवडा सुट्टीस उरला तेव्हां मीं हेडमास्तरांना रीतसर सूचना दिली, '२० मार्चला सुट्टी सुरू होत आहे, १९ मार्चलाच मला जाण्याची जरूरी आहे.' हेडमास्तरांनीं मला बोलावून घेतलें आणि ते बोलले, 'अजून लहान आहांत तुम्ही. किती मुश्किलीनें ही नोकरी तुम्हांस मिळाली...एप्रिलमध्यें वार्षिक परीक्षा आहे, तीनचार दिवस तुम्हीं रजा घेतलीत तर सांगा किती मुलें पास होतील ? वर्षाची सारी मेहनत फुकट जाईल ना. माझें ऐका तुम्ही. या सुट्टींत जाऊं नका तुम्ही. परीक्षा संपल्या-नंतर खुशाल आपल्या घरीं जा. ईस्टरच्या सुट्टींत मी एक दिवसहि तुम्हांला थांबविणार नाहीं.' हेडमास्तरांचें बोलणें ऐकल्यावरहि मी माझ्या जागींच

स्थिर होतों. उपदेश किंवा धमकी यांचा परिणाम माझ्यावर कांहींहि झाला नाहीं. १९ जानेवारी रोजीं शाळा बंद झाली आणि हेडमास्तरांना न विचारतांच मी माझ्या निवासस्थानांतून बाहेर पडलों. त्यांना नमस्कार करण्याच्या भानगडींत पडतों तर एक ना दुसरी गोष्ट सांगून त्यांनीं मला अडविलें असतें. रजिस्टरमध्यें फीच मांडून टाका, उपस्थितिपत्रकें भरलींत का, विद्यार्थ्यांचे निबंध तपासलेत का, त्यांच्या चुका दुरुस्त झाल्या कीं नाहीं, अशीं शेंकडों कामें त्यांनीं मला सांगितलीं असतीं. जणुं मी शेवटच्या महायात्रेला निघालों होतों ! सारी निरवानिरव त्यासाठींच होती..."

शिक्षकाच्या नोकरींत धनपतरायांना कितपत सुखसमाधान वाटत असावें याचा अंदाज वरील उताऱ्यावरून येईल. चार भिंतींत स्वतःला कोंडून घेवून वीस-पंचवीस मुलांच्यासमोर घसा कोरडा करीत बसण्याचें रुक्ष जीवन या कल्पनाप्रवण माणसास रुचलें नाहीं. कांहीं तरी भव्य-दिव्य करून दाखवावें, विशाल अशा लोकजीवनाचा अभ्यास करावा, एम्. ए. ची व वकिलीची परीक्षा द्यावी, हाच एक ध्यास धनपतरायांना लागून राहिलेला होता. अपयशाशीं टक्करा देत देत यशस्वी व्हावयाचें, हेंच त्यांच्या जीवनाचें सार दिसत होतें. प्रायमरी स्कूलमध्यें अध्यापक असतांनाच दोन वेळां इंटरच्या परीक्षेस ते बसले आणि दोनहि वेळां नापास झाले. सन १९०२ मध्यें आणखी एका परीक्षेची तयारी धनपतरायांना करावी लागली. प्रायमरी शाळेंत दोन वर्षें नोकरी झाल्यानंतर सरकारतर्फें शिक्षकांना शिक्षण दिलें जात असे. या सुमारास धनपतरायांची भरती अलाहाबादच्या ट्रेनिंग कॉलेजांत झाली. या ठिकाणीं मात्र त्यांच्या बुद्धिमत्तेची चमक दिसून आली. एक वर्षाचा शिक्षणक्रम होता. ज्यूनियर क्लासच्या परीक्षेंत धनपतरायांनीं अव्वल दर्जाचें यश मिळविलें. कॉलेजचे प्रिन्सिपॉल त्यांच्यावर खूष झाले. ट्रेनिंग कॉलेजच्या मिड्ल स्कूलवर त्यांनीं धनपतरायांची हेडमास्तर म्हणून नेमणूक केली. तरी गणित विषय शिकविण्याची पात्रता त्यांच्यांत केव्हांच येऊं शकली नाहीं. धनपतरायांची परीक्षा देण्याची चिकाटी मात्र विलक्षण होती. इंटरच्या परीक्षेंत कित्येक वेळां अपयश आलें तरी त्यांनीं आपला दीर्घोद्योग मात्र साडून दिला नाहीं. सन १९१० सालीं गणितविषय ऐच्छिक झाला तेव्हां तो सोडून देऊन त्यांनीं इंटरची परीक्षा दिली. इंग्रजी, फारसी, तत्त्वज्ञान आणि वर्तमानकाळचा इति-

हास असे विषय त्यांनीं या परीक्षेसाठीं घेतले होते. पुढें इंग्रजी, फारसी व इतिहास हेच विषय घेऊन ते बी. ए. ची परीक्षाहि दुसऱ्या श्रेणींतून उत्तीर्ण झाले. धनपतरायांनीं एवढ्या परीक्षा दिल्या, पण या परीक्षांच्यावरहि त्यांची श्रद्धा नव्हती. पाठ्यपुस्तकांत त्यांचें मन कधींच रमलें नाहीं. जीवनांतील विविध समरप्रसंग रंगविणाऱ्या आणि मानवी भावनांचें अद्‌भुत असें विश्व चित्रित करणाऱ्या कथा-कादंबऱ्यांची हौस त्यांना अवीट होती. जुन्या गोष्टी व कहाण्या यांबद्दल त्यांना फार प्रेम वाटे. त्यामुळें व्यवसाय शिक्षकाचा असला तरी धनपतरायांची चित्तवृत्ति मात्र कथा-कादंबऱ्यांतच रेंगाळत राहिली.

धनपतरायांच्या लग्नाचा उल्लेख मागें आलाच आहे. अजाणपणीं झालेलें लग्न त्यांना अर्थातच पसंत पडलें नाहीं. ममतेचें असें काळजी वाहणारें कोणीच नसल्यामुळें एका कुरूप व अर्धवट मुलीशीं संसार करण्याचें दुर्भाग्य धनपतरायांच्यावर येऊन ठेपलें. पण त्यांनीं याहि संकटांतून मार्ग काढला. सन १९०५ मध्यें धनपतरायांनीं दुसरें लग्न केलें. या दुसऱ्या पत्नीचें नांव शिवरानीदेवी. वयाच्या अकराव्या वर्षींच त्यांचें लग्न झालेलें होतें; पण विवाह कसा, केव्हां झाला, पहिल्या पतीचा मृत्यु कोणत्या कारणामुळें झाला, वगैरे गोष्टींचा कोणताच अंदाज शिवरानीदेवींना नव्हता. विवाह झाल्यावर तीन-चार महिन्यांतच त्यांच्यावर वैधव्याचा आघात झाला. त्यांच्या वडिलांचें नांव मुन्शी देवीप्रसाद असें होतें. पोरीची ही दैन्यावस्था त्यांच्या मनांत एक-सारखी खटकत होती. या अभागी मुलीला सुख कसें मिळेल हीच एक चिंता त्यांच्या मनास लागून राहिलेली होती. लेकीचें लग्न पुनः करण्याचा विचार देवीप्रसाद यांनीं केला. आणि याच वेळीं धनपतरायांचें पत्र त्यांच्या हातांत आलें, "मी विवाह करूं इच्छीत आहें. असें असें माझें शिक्षण व अशी अशी माझी सांपत्तिक स्थिति आहे." देवीप्रसादना हें स्थळ पसंत पडलें आणि शिवरानीदेवींचा विवाह धनपतराय यांच्याशीं झाला. शिवरानी-देवी जणुं सोन्याच्या पावलांनींच धनपतरायांच्या घरांत आली. पहिले कांहीं दिवस किरकोळ परिस्थितीमुळें वातावरण तंग राहिलें तरी धनपतरायांच्या साहित्यिक प्रवृत्तीस फुलविणारी अशी ही शिवरानीदेवी होती. विवाह झाल्याच्या दुसऱ्याच महिन्यांत धनपतराय डेप्युटी इन्स्पेक्टर झाले; आणि १९०५ पासून त्यांचें वास्तव्य कानपुरास होऊं लागलें. धनपतरायांच्या वाङ्मयीन जीवनाचा

प्रारंभ येथूनच खऱ्या अर्थानें झाला. त्यांच्या जीवनांत खराखुरा पण आवश्यक असा बदल येथूनच होऊं लागला. १९०५ हें साल आपल्या देशाच्या राजकीय इतिहासांतहि महत्त्वाचें म्हणून गणलें जातें. इंग्रजांच्या साम्राज्यशाहीची चढती कमान होती व टिळक, लजपतराय, बिपिनचंद्र पाल इत्यादि देशभक्तांच्या स्वदेशप्रीतीसहि भरती आलेली होती. देशभर नवचैतन्याचें वारें खेळूं लागलें होतें. धनपतरायांसारखा भावनाप्रधान पण वृत्तीनें कणखर असा कल्पक मनुष्य या वावटळींत न सांपडेल तरच नवल !

●●●

## धनपतराय प्रेमचंद झाले : ३

धनपतरायांना अद्‌भुतरम्य कथा-कादंबऱ्या वाचण्याचें वेड बालपणींच लागलें होतें, तें मोठेपणींहि अर्थातच फारसें कमी झालें नाहीं. शुष्क व दरिद्री अशा त्यांच्या जीवनांत जी कांहीं नवलाई निर्माण झाली होती ती कादंबरीच्या अपूर्व विश्वामुळेंच. भोंवतालच्या भल्याबुऱ्या समाजाचें निरीक्षण त्यांनीं चालूच ठेवलें होतें. देशपरिस्थितीकडेहि डोळेझांक करणें धनपतरायांसारख्या भाविक मनाच्या तरुणास तेव्हां अशक्य होऊन बसलें होतें. डोक्यांत विचारांचें काहूर व मनांत अस्वस्थ हुरहूर यामुळें त्यांच्या संघर्षमय जीवनाची अभिव्यक्ति व्हावयास फारसा वेळ लागला नाहीं. हजारों कथा-कादंबऱ्या वाचीत असतांनाच त्यांनीं स्वतः लिहावयासहि प्रारंभ केला. स्वतःच्या लेखनविषयक प्रगतीसंबंधीं ते लिहितात: “ सन १९०७ च्या अगोदरच मीं कथा लिहावयास प्रारंभ केला. डॉक्टर रवीन्द्रनाथांच्या कित्येक कादंबऱ्या मीं इंग्रजींतून वाचल्या होत्या. उर्दू पत्रिकांतूनहि त्यांचा अनुवाद प्रसिद्ध झाला होता. सन १९०१ मध्येंच मीं कादंबरीलेखनास सुरुवात केली. माझी पहिली कादंबरी सन १९०२ मध्यें, दुसरी सन १९०४ मध्यें प्रसिद्ध झाली. पण कथा मात्र सन १९०७ च्या पूर्वीं मीं एकहि लिहिली नव्हती. माझ्या पहिल्या कथेचें नांव होतें ‘ संसार का सबसे अनमोल रत्न ’. सन १९०७ मध्यें ‘ ज़माना ’ मासिकांत उर्दू भाषेंतून ही कथा प्रसिद्ध झाली. ”

याहि पूर्वी धनपतरायांच्या एकदोन कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या होत्या. १९०१ मध्यें आणि १९०२ मध्यें 'कृष्णा' व 'हम खुरमा और हम सबाब' या त्या दोन कादंबऱ्या. याहिपूर्वी म्हणजे वयाच्या चौदाव्या वर्षी धनपतरायांनीं एक 'होनहार बिरवान के चिकने-चिकने पात' नांवाचें एक नाटकहि लिहिलें होतें. प्रारंभिक काळांत झालेल्या या प्रकारच्या लिखाणांत स्वाभाविकपणेंच अद्‌भुत आणि अतिरंजित अशा विषयांना प्राधान्य असे. कल्पनांचें उड्डाण या वयांत विशेष असल्यामुळें धनपतरायांच्या पहिल्या कथा-कादंबऱ्या अद्‌भुतरम्य अशाच आहेत. मानवी जीवनांतील संघर्ष व त्यांतील पदोपदीं अनुभवास येणारी कटुता यांचा अनुभव तर त्यांना सदोदित येत होताच. पण जीवनाचें हें दर्शन त्यांच्या लेखनांतून साधेपणाच्या मार्गानें प्रकट होण्यास अजून अवधि होता.

सन १९०५ मध्यें डेप्युटी इन्स्पेक्टर म्हणून धनपतराय कानपुरास आले आणि येथूनच त्यांच्या खऱ्या साहित्यिक जीवनास प्रारंभ झाला. त्यांची साहित्यसाधना याच कालापासून सुरू झाली. पहांटे चार वाजतां उठून प्रातर्विधि उरकून काय असेल त्यावर सकाळची भूक भागवून धनपतराय लिहावयास बसत. एखाद्या मजुराचें फावडें ज्या गतीनें काम करीत असतें त्याच गतीनें धनपतरायांची लेखणीहि काम करी....दौऱ्यावर असतांना सुद्धां त्यांच्या लेखनव्यवसायांत कधीं खंड पडत नसे. मुन्शी दयानारायण निगम नांवाचे एक सज्जन गृहस्थ कानपूर येथें 'ज़माना' नांवाचें मासिक-पत्र काढीत असत. त्यांची व धनपतरायांची चांगलीच मैत्री जमली. कित्येक दिवस-पर्यंत दोघेहि एकाच घरांत राहत असत. 'ज़माना'च्या कार्यालयांत अनेक साहित्यिक नाना प्रकारचे वादविवाद करण्यासाठीं येत. त्यांच्या बैठकी साहित्य-चर्चेनें रंगत असत. धनपतरायांचें अध्ययन, चिंतन व मनन चालूच होतें. मानवी जीवनाच्या हरएक अंगाचा परिचय करून घेण्यांत त्यांना धन्यता वाटे.

१९०८ च्या सुमारास कानपूरहून हमीरपुर जिल्ह्यांतील महोबा येथें धनपतरायांची बदली झाली. या ठिकाणीं जवळजवळ सहा वर्षे त्यांनीं वास्तव्य केलें. तेथील वातावरणांत त्यांची देशप्रीतीची वृत्ति जागृत झाली. १९०४ पासूनच हिंदुस्थानांतील राजकीय वातावरण तंग बनलें होतें. इंग्रजांविरुद्ध तीव्र असंतोष पसरविण्याचें प्रखर कार्य देशभर सुरू होतें. बंगालच्या फाळणीच्या

प्रश्नामुळें सर्व देशभर जागृति निर्माण झालेली होती. मधूनमधून होणाऱ्या प्राणघातक बॉंबस्फोटांमुळें किंवा पिस्तुलाच्या बारांमुळें बंगाल व महाराष्ट्र दणाणून गेला होता. स्वदेश व स्वातंत्र्य यांचा जयघोष सर्व देशांत निनादत होता. स्वराज्याची हांक त्या काळच्या तरुणाच्या कानांपर्यंत जाऊन भिडल्यामुळें तो खडबडून जागा झाला होता. धनपतरायांसारख्या कल्पनासंपन्न तरुण लेखकाच्या मनांत या वावटळींमुळें चलबिचल झाली. परी आणि राजकन्या यांच्या अद्‌भुतरम्य कथांमध्यें रममाण होणारें त्यांचें भाविक मन देशप्रेमानें भारावून निघालें. ऐतिहासिक काळांतील असे कित्येक घडाडीचे व शौर्याचे प्रसंग आहेत कीं, जे अद्‌भुतरम्यहि आहेत व सत्यसृष्टींत घडलेले असल्यामुळें वास्तवहि आहेत. तेव्हां अशा प्रसंगांवर कांहीं लिहिलें तर जनताजागृतीचें कर्तव्य पार पाडतां येईल, या भावनेनें धनपतरायांनीं ऐतिहासिक कथा लिहावयास प्रारंभ केला. ' राजा हरदौल ', ' आल्हा ', ' रानी सारंधा ', ' विक्रमादित्य का तेगा ' इत्यादि ऐतिहासिक गोष्टी त्यांनीं याच काळांत लिहून प्रसिद्ध केल्या. रजपुतांचें शौर्य व त्यांचा त्याग या कथांतून प्रकट झालेला असल्यानें वाचकांनाहि एकप्रकारचें स्फुरण चढल्यासारखें झालें. बुंदेलखंडांतील शौर्याची व पराक्रमाची स्तुति करणारी कादंबरी ' रूठी-रानी ' हीसुद्धां याच कालखंडांतील. धनपतरायांच्या या प्रकारच्या लिखाणामुळें जनतेच्या मनांत साहसप्रीति निर्माण होऊन स्वाभिमानाचा स्फुल्लिंग चेतविला गेला. भारताच्या गौरवशाली इतिहासांत पराक्रमास व स्फूर्तीस चेतना देणाऱ्या अनेक प्रसंगांची मालिकाच दिसून येते. लोकांच्या मनांत स्वदेशाभिमान निर्माण करण्यासाठीं या अमोल ठेव्याचा उपयोग करण्याचें काम धनपतरायांनीं केलें. ' संसार का सब से अमूल्य रत्न ' नांवाच्या कथेंत त्यांनीं देशहितासाठीं अर्पित झालेल्या रक्ताच्या थेंबास अमूल्य रत्न समजून देशभक्तीच्या भावनेचा गौरव केला आहे. याच काळांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या ' वरदान ' कादंबरीची सुरुवातच अशी आहे : " देवीची पूजा आई नेहमींच करते. तिची पूजा-अर्चा पाहून देवी जेव्हां जेव्हां प्रसन्न होते तेव्हां आईनें एक वर मागितला, ' देवी, मला एक पुत्र दे. ' देवीनें विचारलें, ' कसा पुत्र पाहिजे ? धनवान् हवा ? बलवान् हवा ? जगांत नांव कमावणारा हवा ? ' आईनें उत्तर दिलें, ' नको नको. आपल्या देशावर अनंत उपकार करणारा पुत्र मला हवा. "

देशभक्तीची ही तीव्र भावना धनपतरायांच्या या काळच्या सर्वच लेखांतून प्रकट झालेली दिसून येते. ऐतिहासिक कथांचा एक संग्रह त्यांनीं ' सोजे वतन ' नांवानें प्रसिद्ध केला होता. देशप्रेमाची भावना या संग्रहांतील पांचहि कथा कोणत्या ना कोणत्या तरी मार्गानें प्रभावित करीत होत्या. इंग्रजी राजसत्ते-विरुद्ध असंतोष पसरविण्याचें कार्य या संग्रहामुळें होत असल्याचा संशय सरकारला लागलींच आला. सरकारचा पगार खाणारा गृहस्थ सरकारच्याच विरुद्ध लिहितो, याचा अर्थ काय ? इंग्रजांचे स्तुतिपाठ गाण्याऐवजीं ऐति-हासिक काळांतील स्मृति जागृत करून देशप्रेमाची भावना प्रज्वलित करणाऱ्या या लेखकास शासन करण्याचा विचार इंग्रज अधिकाऱ्यांनीं केला. ललितलेखन करणाऱ्या लेखकावर हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें धनपतरायांच्या जीवनांत ' सोजे वतन ' या छोट्या पुस्तकाच्या कर्तबगारीस फारच महत्त्व आहे. स्वतः धनपतरायांनींच या प्रसंगाचें वर्णन केलें आहे :

" त्या वेळीं मी शिक्षणखात्यांत हमीरपूर जिल्ह्यांत डेप्युटी इन्स्पेक्टर होतों. पुस्तक छापून सहा महिने होऊन गेले होते. एके दिवशीं रात्रीं मी माझ्या राहुटींत बसलों असतांना एकदम कलेक्टराकडून तांतडीनें भेटण्यासंबंधींचा हुकूम आला. थंडीचे दिवस होते. मीं लागलींच बैलगाडी तयार करण्यास सांगितलें आणि रातोरात तीस-चाळीस मैलांचा प्रवास करून साहेबास जाऊन भेटलों. त्यांच्यासमोरच ' सोजे वतन ' ची एक प्रत पडलेली होती. गुप्त पोलीस या पुस्तकाच्या लेखकाच्या मार्गावर आहेत, अशी कुणकुण मला लागली होती. त्याच कामासाठीं मला बोलावून घेतलें असेल हें माझ्या चटकन् ध्यानांत आलें. साहेबानें मला विचारलें, ' हें पुस्तक तुम्हीं लिहिलें ? ' मीं ' होय ' म्हणून सांगितलें. साहेबानें मला एकएका कथेचा आशय विचारला आणि क्रोधायमान होऊन शेवटीं तो बोलला, ' तुमच्या या कथांतून राजद्रोह भरलेला आहे. इंग्रजी राजवटींत आहांत हें भाग्य समजा तुमचें ! मोंगलांच्या काळांत असतां तर दोनहि हात छाटले गेले असते. तुमच्या कथा एकांगी आहेत. इंग्रज सरकारचा तुम्हीं अपमान केला आहे. ' इ०

या प्रकरणाचा निकाल असा झाला कीं, ' सोजे वतन ' च्या सर्व प्रती मीं सरकारच्या हवालीं कराव्यात व पुनः साहेबाच्या परवानगीशिवाय एक ओळहि लिहूं नये. मी समजलों, थोडक्यांत मिटलें. एक हजार प्रती छापल्या

होत्या. मोठ्या मिनतवारीनें आतांपर्यंत तीनशें प्रती खपल्या होत्या. उरलेल्या सहाशें प्रती मी 'जमाना' कार्यालयाकडून मागविल्या व साहेबास अर्पण केल्या.

मी समजलों कीं, संपली कटकट. पण एवढ्या साध्या प्रकारानें साहेबाची तृप्ति झाली नाहीं. नंतर मला समजलें कीं, सुपरिंटेंडेंट, पोलीस, दोन डेप्युटी कलेक्टर आणि डेप्युटी इन्स्पेक्टर माझ्या कृत्याचा निकाल लावण्यासाठीं बसले. एका कलेक्टरनें सिद्ध केलें कीं, प्रत्येक कथेंत राजद्रोह प्रारंभापासून शेवटपर्यंत भरलेला आहे; आणि हा राजद्रोहहि साधासुधा नाहीं; सांथीच्या रोगाप्रमाणें फैलावत जाणारा आहे. पोलिसानें निश्चयानें सांगितलें, 'अशा दुष्ट माणसास चांगली शिक्षाच होणें जरूर आहे.' एक डेप्युटी इन्स्पेक्टर माझ्याशीं बरे होते. त्यांनीं प्रस्ताव मांडला कीं, 'लेखकाची लेखणी थोडी कडक आहे इतकेंच. राजनैतिक आन्दोलनाशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं.' 'सोजे वतन'च्या प्रतींवर मात्र सरकार पूर्णपणें संतप्त झालें होतें. पुस्तकें जप्त करून साहेबाचें समाधान कसें होणार ? त्याच्या हातांत जेवढया प्रती 'सोजे वतन'च्या आल्या तेवढया सर्वच्या सर्व त्यानें जाळून टाकल्या. हिंदुस्थान देशांत निर्माण होत राहिलेली देशप्रीतीची भावनाहि त्यायोगें जळून खाक होईल, अशी त्या भोळ्या साहेबाची कल्पना !"

धनपतरायांच्या जीवनांत 'सोजे वतन' पुस्तकाला वरील कारणामुळें महत्त्व आहेच; पण आणखी एका कारणामुळें 'सोजे वतन' धनपतरायांच्या जीवनांत विशेष स्थान मिळवून राहिलें आहे. या काळापर्यंत धनपतरायांचें सर्व लिखाण 'नवाबराय' नांवानें प्रसिद्ध होत असे. 'सोजे वतन'च्या प्रती अग्निसात् झाल्यानंतर त्यांच्या मनास अतिशय वेदना झाल्या. सरकारची नोकरी पत्करली असल्यामुळें कमीअधिक कांहीं बोलतां येईना, लिहितां येईना. या पुस्तकांतील कथा अंतःकरण ओतून लिहिलेल्या होत्या. त्यांत धनपतरायांनीं आपलें सर्वस्व ओतलें होतें. ऐतिहासिक कथांच्या साह्यानें हेतुपूर्वक राष्ट्रजागृति करण्याच्या या प्रयत्नास अशा रीतीनें सरकारी सुरुंग लागल्यामुळें धनपतरायांच्या चित्तास वेदना होत राहिल्या. या प्रखर घावामुळें त्यांचें हृदय शतशः विदीर्ण होत राहिलें. 'सोजे वतन' या विषारी पुस्तकाचा प्रचार इंग्रज सरकारनें अति विक्षिप्त त्वरेनें थांबविला; पण या गोष्टीचा परिणाम मात्र दूरगामी झाला. 'सोजे वतन'च्या ज्वाळांतून अनंत ठिणग्या बाहेर निघाल्या आणि प्रत्येक जळती

ठिणगी भोंवतालचा प्रदेश प्रज्वलित करण्यास समर्थ ठरली. स्वतः धनपत-रायांनीं आपल्या आयुष्याचें ध्येय निश्चित करण्यास प्रारंभ केला. मनास योग्य व इष्ट वाटेल तें लिहितां येणार नाहीं तर तें जीवन कसलें ? आणि मग ती सरकारी नोकरी तरी कशास ? ही सोनेरी शृंखला ताड्कन तोडावी व मुक्त होऊन मनास येईल त्याप्रमाणें देशगौरव गावा, दलितांचा, पीडितांचा उद्धार कारावा, असे विचारप्रवाह धनपतरायांच्या मनांत निर्माण होऊं लागले. अद्भुतरम्य वातावरणांत रममाण होणारें त्यांचें मन आतां मानवाच्या व्यावहारिक जीवनाशीं प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करूं लागलें. या सर्व मानसिक आन्दोलनाचा परिणाम असा झाला कीं, हिन्दी साहित्यक्षेत्रांत धनपतराय 'नवाबराय' या नांवाखालीं न लिहितां आतां 'प्रेमचंद' या नांवानें आपलें लिखाण करूं लागले. 'प्रेमचंद' या नांवाची जन्मकथा थोडक्यांत ही अशी आहे. 'सोजे वतन'मुळें धनपतरायांच्यावर आलेल्या आपत्तीमुळें त्यांच्या मित्रांनाहि मनस्वी दुःख झालें. या प्रकाराबद्दल मुन्शी प्यारेलाल शाकिर मेरठी लिहितात : " 'सोजेवतन' हें एक छोटें पुस्तक होतें. त्यांत पांच कथा होत्या व किंमतहि पांच आण्यांपेक्षां अधिक नव्हती. पण या छोट्या पुस्तकाचें कर्तृत्व असें कीं, त्यानें लेखकास 'प्रेमचंद' बनविलें. पुस्तकाच्या नांवा-वरूनच माहीत होईल कीं, त्यांतील कथा देशप्रेम आणि राष्ट्रीय भावना व्यक्त करणाऱ्या होत्या. सर्वत्र या कथांची वाखाणणी झाली होती. मुन्शीसाहेबांचा संबंध शिक्षणखात्याशीं होता. 'सोजे वतन' वरच सरकारची वक्रदृष्टि येऊन भिडली असें नव्हे तर लेखकाच्या नोकरीवरहि गदा आली होती; पण दादा-बाबा करतां करतां प्रसंग टळला. पण यामुळें मुन्शीसाहेबांचा कायापालट मात्र होऊन गेला."

या कायापालटाचें वर्णन 'ज़माना'चे संपादक मुन्शी दयानारायण निगम यांनीं उत्कृष्ट प्रकारें केलें आहे. 'सोजे वतन'च्या प्रतींवर मुद्रकाचें नांव छापलेलें नव्हतें म्हणून मुन्शी दयानारायण यांना पन्नास रुपयांचा दंड झाला होता. या संपादकांनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे : " प्रेमचंद प्रारंभींच्या काळांत नवाब-राय नांवानें लिहीत असत; आणि हें नांव त्यांना फार प्रिय होतें. कारण त्यांचे पिताजी मोठ्या प्रेमानें 'नवाब' म्हणून त्यांना हांक मारीत असत. हिंदु-मुसलमानांची सामाजिक एकता स्मरणांत राहण्यासाठीं हें नांव फारच महत्त्वाचें

होतें. पण ‘ सोजे वतन ’च्या प्रती जप्त झाल्यानंतर अधिकाऱ्यांनीं लेखनास बंदी केल्यावर हें नांव सोडून देणें त्यांना भाग पडलें. व्यथित हृदयाच्या अधिकाऱ्यांचें म्हणणें धनपतरायांनीं ऐकलें असतें तर आज हिंदुस्थानी साहित्यांत प्रेमचंद हें नांवहि जन्मास आलें नसतें. पण नदीचा प्रवाह कोण अडवणार ? हवेचा संचार कोण बदलूं शकणार ? नवाबरायांच्या आत्म्यानें ‘ प्रेमचंद ’चीं वस्त्रें धारण करून जन्म घेतला... ”

सरकारनें ज्या पुस्तकांच्या प्रती जप्त केल्या त्याच नेमक्या जपून ठेवण्याची प्रवृत्ति समाजांत वाढीस लागते हें एक क्रांतीच्या मार्गांतील सत्य आहे. आपल्या मराठी साहित्यांतील स्वातंत्र्यवीर सावरकर व कै. शि. म. परांजपे यांच्या जप्त झालेल्या वाङ्मयाच्या कथा अद्‌भुत अशाच आहेत. सरकारची करडी नजर या साहित्यावर असल्यामुळें लोकांनीं त्याची जपणूक काळजीपूर्वक केली. गुप्त मार्गानें त्याच साहित्याचा प्रचार सतत होत राहिला. ‘ सोजे वतन ’च्या बाबतींत नेमकें हेंच घडलें मुन्शी दयानारायण निगम पुढें लिहितात : “ ‘ सोजे वतन ’ च्या जेवढ्या प्रती लेखकाजवळ होत्या त्या सर्व त्यांनीं अधिकाऱ्यांजवळ देऊन टाकल्या. पण माझ्याजवळ त्या प्रतींचा जो सांठा होता त्याची दाद कोणालाहि नव्हती. हीं पुस्तकें मात्र नष्ट झालीं नाहींत; आणि त्यांची विक्रीहि हळूहळू होत होती. साहित्याच्या प्रभावी शक्तीचें महत्त्व याच वेळीं प्रेमचंद यांना तीव्रतेनें समजून आलें. स्वातंत्र्य-संग्रामास जोराची चालना देण्यासाठीं साहित्याखेरीज दुसरें साधन नाहीं, याची जाणीव धनपतरायांना या प्रकारामुळें स्पष्ट तऱ्हेनें झाली. सरकारच्या अवकृपेस बळी न पडतां आपल्याला हवा तसा प्रचार कोणत्या मार्गानें करतां येईल याचा विचार तर प्रेमचंदांनीं केलाच; पण वेळप्रसंग पडला तर नोकरी लाथाडून देण्याची मानसिक तयारीहि याच काळांत त्यांनीं केली. ”

याच समयास प्रेमचंदांच्या प्रकृतींत बिघाड झाला. हमीरपूरहून एखाद्या चांगल्या ठिकाणीं बदली व्हावी म्हणून त्यांनीं अधिकाऱ्यांकडे अर्ज केला तेव्हां त्यांची बदली नेपाळच्या तराईंत असणाऱ्या बस्ती जिल्ह्यांत झाली. दगदग अधिकच वाढली. या दूर देशांत सुशिक्षित इष्टमित्रांची संगत तरी कोठून मिळणार ? आजार वाढल्यामुळें एक महिन्याची रजा घेऊन प्रेमचंद बनारस येथें आले व एका हकिमाचें औषध त्यांनीं सुरू केलें. पण फारसा उपयोग

झाला नाहीं. घरच्या प्रापंचिक कटकटीहि वाढीस लागल्या. सन १९१५ मध्यें बस्ती येथेंच सरकारी शाळेंत प्रेमचंद यांची दुय्यम शिक्षक म्हणून नेमणूक झाली. थोडी स्वस्थता मिळाल्यामुळें साहित्यसेवेकडे पुनः त्यांना नीट लक्ष देतां आलें. 'धोखा', 'दो भाई', 'बेटी का धन', 'पंचपरमेश्वर', 'जुगनू की चमक', 'शंखनाद', इत्यादि कथा त्यांनीं याच काळांत लिहिल्या. सन १९१८ मध्यें गोरखपूर येथें आल्यानंतर त्यांच्या साहित्यसेवेस गौरवाचें स्थान प्राप्त होऊं लागलें. हिंदी साहित्यांतील विख्यात कर्मयोगी देशभक्त महावीरप्रसाद पोद्दार यांच्याशीं प्रेमचंदांचा परिचय झाला. उर्दू आणि हिन्दी या दोनहि भाषांतून प्रेमचंदांचें सफाईदार लिखाण आतां लोक मनापासून वाचूं लागले होते. याच आधारावर प्रेमचंदांनीं आपली पहिली मोठी कादंबरी 'प्रेमाश्रम' लिहावयास प्रारंभ केला. या कादंबरींतून प्रेमचंदांनीं हिंदुस्थानच्या दरिद्री व संकटग्रस्त शेतकऱ्याचें चित्र लोकांसमोर उभें केलें. या दलित खेडुतांसाठीं स्वराज्य व स्वातंत्र्य यांची आवश्यकता आहे असें त्यांना मनापासून वाटे. प्रेमचंदांची सहानुभूति आतां अधिक विस्तृत झाली होती व तिला संकटग्रस्त शेतकऱ्यांची चिंता वाटूं लागली होती. खेडेगांवच्या वातावरणाचा परिचय प्रेमचंद यांना जवळून झालेला होता. आपलें सर्व लेखनसामर्थ्य या गरिबांच्या उद्धारासाठीं खर्च करण्याचा निश्चय त्यांनीं केला. कारण ऐंशी टक्के असणारा ग्रामीण समाज हाच खरा हिंदुस्थान आहे! या समाजाची उन्नति म्हणजेच भारताची उन्नति, हें तत्त्व लोकांच्या गळीं उतरवून शेतकऱ्यांच्या दास्याच्या नायनाट करावा हा एक प्रधान हेतु त्यांच्या येथून पुढल्या कथा-कादंबऱ्यांतून दिसून येतो.

दलित समाजाचें दुःख वेशीवर लेखकाखेरीज कोण टांगणार? प्रोफेसर, वकील, डॉक्टर इत्यादि प्रतिष्ठित वरिष्ठ लोक आपल्याच उच्च वातावरणांतील कैफांत दंग असतांना बहुजनसमाजाचीं दुःखें कोण समजावून घेणार? सामान्य माणसास कोणाचा आधार होता? पैसा, अधिकार, विद्या इत्यादि गोष्टींना वंचित झालेली जनता प्रगतिपथावर येणार तरी कशी? या सर्वांची चिंता प्रेमचंद यांना लागून राहिली. नोकरीनिमित्त प्रेमचंदांनीं आधींच पुष्कळ भ्रमण केलें होतें. नोकरी मिळाल्यानंतर शाळांच्या तपासणीसाठीं त्यांना पुष्कळच हिंडावें लागे. दौऱ्यावर असतांना प्रेमचंदांनीं डोळे उघडे ठेवून

समाजस्थितीचें निरीक्षण केलें. कोर्ट-कचेऱ्या, सावकार, सरकारी अधिकारी, जमीनदार, व्यापारी, कारखानदार, इत्यादि वरिष्ठ वर्ग शेतकरी व मजूर यांना कसा छळीत असतो याचा देखावा त्यांनीं स्वतः पाहिला होता. उन्हापावसांत रात्रंदिवस श्रम करून नवें धन निर्माण करणारा किसान उपासमारीनें हैराण झालेला पाहून प्रेमचंदांचें अंतःकरण तिळतिळ तुटत राही. गांधीजींच्या विश्वव्यापी चळवळीमुळें सर्वत्र जागृति होत होतीच; पण साहित्यसाधनेच्या द्वारां प्रेमचंदांनीं दलितोद्धाराचें कार्य प्रामाणिकपणें बजावण्यास प्रारंभ केला. रशियाच्या महान् क्रांतीचा परिणामहि त्यांच्या मनावर खोलवर झाला. मजूर व शेतकरी यांच्यांत असणारी प्रचंड शक्ति कार्यान्वित करण्याची प्रेरणा हिन्दी साहित्यांत निर्माण करणारे एकमेव लेखक म्हणजे प्रेमचंद, अशी जी कीर्ति पुढें त्यांना प्राप्त झाली तिची ही नुसती सुरुवात आहे.

महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाची छाप प्रेमचंदांच्या मनावर प्रारंभींच्या काळांत तरी निश्चितपणें होती. सन १९१९-२०च्या सुमारास असहकाराच्या चळवळीचा पूर्वरंग दिसूं लागला. महात्मा गांधी गोरखपूर येथें आले होते. त्यांच्या व्याख्यानास ब्रिटिश जुलमास कंटाळलेले आणि मार्गदर्शनाची इच्छा धरणारे हजारों लोक जमा झाले होते. मुन्शी प्रेमचंद त्यांतील एक प्रमुख होते. गांधीजींच्या प्रेरक वक्तव्याचा परिणाम इष्ट असाच झाला. स्वतः प्रेमचंद यांनीं या घटनेचें वर्णन केलें आहे : “सन १९२० ची गोष्ट आहे. असहकाराचें आंदोलन जोरांत सुरू होतें. जालियनवाला बागेचें भीषण हत्याकांड नुकतेंच संपलें होतें. याच वेळीं महात्मा गांधींचें आगमन गोरखपूर येथें झालें. गाजीमिया मैदानांत व्यासपीठ तयार केलें होतें. दोन लाखांच्यावर जनसमुदाय जमला होता. शहरांतून, खेडेगांवांतून सारी जनता दौडत आली होती. असा समारंभ मीं माझ्या आयुष्यांत कधीं पाहिला नव्हता. महात्माजींच्या दर्शनाचा प्रभाव हा कीं, माझ्यासारखा मेलेला मनुष्य जागृत होऊन उठला. यानंतर दोनचार दिवसांच्या अवधींतच मीं आपल्या वीस वर्षांच्या नोकरीचा राजिनामा दिला.” हातीं असलेल्या वीस वर्षांच्या नोकरीवर आपल्या हातानें पाणी सोडणें ही मोठीच धैर्याची गोष्ट होती. घरची सांपत्तिक स्थिति बेताचीच आणि चरितार्थाचें दुसरें साधनहि नाहीं, अशा वेळीं हातची नोकरी सोडणाऱ्या या लेखकबहादुराची तारीफ करावी तरी

किती ? नोकरींत करावी लागणारी खुशामत प्रेमचंदांच्या मानी स्वभावास लाख लाख दंश करीत असे. ' सोजे वतन 'च्या प्रकारामुळें सरकारच्या द्वेषाची ठिणगी आधींच फुलूं लागली होती. महात्माजींच्या स्फोटक व्याख्यानामुळें तिचा भडका उडाला इतकेंच.

प्रेमचंदांच्या जीवनांतील सर्वांत महत्त्वाची घटना ही आहे. शिवरानीदेवींनीं या प्रसंगाचें विस्तारानें पण मार्मिक रीतीनें वर्णन केलें आहे : " सन वीसची बात आहे. असहयोगाचा जमाना होता. गांधीजी गोरखपूरला आले होते. यांची प्रकृति नीट नव्हती, तरी सुद्धां मी, दोन मुलें व बाबूजी असे सर्व जण मीटिंगला गेलों. महात्माजींचें भाषण ऐकून आम्ही दोघेहि प्रभावित झालों; विवश झालों. सरकारी नोकरीसंबंधींचा तिरस्कार याच वेळीं दृढ झाला...

एके दिवशीं मला बोलले – ' तूं संमति देशील तर मी सरकारी नोकरी आत्तांच्या आत्तां सोडणार आहें. ' या प्रश्नावर विचार करण्यासाठीं मीं दोन-चार दिवस मागून घेतले. त्यांच्याप्रमाणेंच माझ्याहि मनाची तगमग झाली होती...त्या वेळीं यांना सर्व मिळून महिना १२५ रु. मिळत असत. शाळा-खात्यांतील नोकरी असल्यामुळें घरीं इतर उद्योग करण्यासहि मिळत नसे. तेव्हां नोकरी सोडून दिल्यावर भागणार कसें, अशी चिंता माझ्या मनांत निर्माण झाली. एक मुलगा व मुलगी समोर होतीच...स्वतःची ( प्रेमचंदांची ) प्रकृतीहि बरी नसे. ना घर, ना दार. या सर्व गोष्टी नजरेंत आल्यावर वाटे, नोकरी सोडून कसें चालेल ! चारपांच दिवसांनीं त्यांनीं पुनः निर्णयासंबंधीं विचारलें...मीं त्या वेळीं विचार केला – यांची प्रकृति बरी झाली म्हणजे वाटेल ती नोकरी इतर ठिकाणची सुद्धां मिळेल. ईश्वर चांगलें करणारा असेल तर यांची प्रकृतीहि सुधारेल...जालियनवाला बागेंत जें भीषण हत्याकांड झालें त्याच्या ज्वाला सर्वांच्याच हृदयास जाऊन भिडलेल्या होत्या. माझ्याहि अंतःकरणास इजा पोंचली होती...दुसऱ्या दिवशीं मीं त्यांना सांगितलें, ' सोडून द्या नोकरी. पंचवीस वर्षांची नोकरी सोडून देतांना यातना होतील; पण देशावर जो सध्यां अत्याचार चालू आहे त्याच्या मानानें नोकरी सोडून देतांना होणाऱ्या यातना कांहींच नव्हत. ' मीं नोकरी सोडा म्हणून सांगितल्यावर स्वारी हसून बोलली, ' दुसऱ्याच्या अन्तांत तुझाहि शेवट आहे ध्यानांत आहे ना ! '

मग मी म्हणालें, ' हो, बरोबर लक्षांत आहे. जेव्हां तुम्ही बरे व्हाल तेव्हां

रानावनांत राहूनहि मी दिवस आनंदानें काढीन. माझा विश्वास आहे कीं, परमेश्वर भलें करणारा आहे.'

आपण म्हणाले, 'नीट विचार कर. पुनः म्हणशील, दोघांनाहि त्रास झाला म्हणून. पुढें अनेक संकटें उभीं आहेत. नीट खायलाप्यायला मिळालें तरी पुरें. तुझा निश्चय झाला?'

मी बोललें, 'हो!'

आपण बोलले, 'तर मग मी उद्यांच नोकरीचा राजीनामा देतों. आणि उद्यांच हें सरकारी घरहि आपणांस सोडावें लागेल. कोठें जावयाचें हें नक्की नाहीं.'

मी म्हणालें, 'गांवीं जाऊं.'

आपण बोलले, 'गांवीं तरी तुला तुझें घर कोठें आहे? कारण आपल्या जुन्या घरांत चाची ( सावत्र आई ) वगैरे लोक राहतात. त्यांत तुला स्थान नाहीं...' —

मी म्हणालें, 'मग काय घर त्यांचेंच फक्त वाटतें? अर्धें ते घेतील. अर्धें आपण घेऊं...'

पतिपत्नींत बराचसा वादविवाद झाला. पण प्रेमचंदांनीं नोकरीचा राजीनामा द्यावा याबद्दल मात्र दोघांत एकमत होतें. प्रेमचंदांनीं राजीनामा देतांना कोणते शब्द वापरले असावेत हें कळण्यास मार्ग नाहीं. पण सन १९२१ मध्यें 'लाल फीता' नांवाची एक कथा त्यांनीं लिहिली. या कथेचा नायक हरिविलास आपल्या नोकरीचा राजीनामा देतांना लिहितो —

"श्रीमान्‌जी, राजनैतिक व्यवस्था ही ईश्वराच्या इच्छेचें स्वरूप आहे असा माझा विश्वास आहे. आणि त्याचे कायदेकानू सुद्धां दया, सत्य, आणि न्याय यांवर आधारलेले असतात. मी पंधरा वर्षेपर्यंत आपली सेवा माझ्या सामर्थ्याप्रमाणें प्रामाणिकपणें केली...सरकारी नोकरीहि देशसेवेचें एक माध्यम आहे असें मी आजपर्यंत समजत होतों. पण परिपत्रक क्र....मध्यें जो आदेश दिला गेला आहे तो माझ्या आत्म्यास मारक आहे. त्याचें पालन करण्यास मी समर्थ नाहीं. प्रजेचें स्वातंत्र्य व राजनैतिक जागृति यांचा घात करणारा असा तो आदेश आहे. अशा परिस्थितींत सरकारशीं संबंध ठेवणें म्हणजे देश व राष्ट्र यांची हानि करण्यासारखें आहे..."

यावरून या वेळच्या प्रेमचंदांच्या मानसिक परिस्थितीची जाणीव होईल. उत्कृष्ट शिक्षक म्हणून प्रेमचंदांचा लौकिक होता. विद्यार्थ्यांचा निरोप घेतांना व्यथित होणाऱ्या आत्म्याचा परिचय त्यांच्या 'प्रेरणा' कथेमध्यें होतो; "विद्यार्थ्यांनीं मला प्रेमाचा निरोप दिला आणि सर्वच्या सर्व मला स्टेशनवर पोंचविण्यास आले. त्या वेळीं सर्व मुलांचे डोळे पाण्यानें भरून आले होते. मीहि माझ्या अश्रूंना थांबवूं शकलों नाहीं. मंद गतीनें गाडी चालूं झाली. मुलें कित्येक पावलें गाडीबरोबर चालत होतीं. खिडकीबाहेर तोंड काढून मी उभा होतों. कित्येक वेळपर्यंत मुलांचे हलणारे रुमाल मला स्पष्टपणें दिसत होते."

• • •

## कर्मयोगी संपादक : ४

सरकारी नोकरी आपण सोडून दिली खरी पण आतां प्रपंच कसा चालणार, ही एक मोठीच चिंता प्रेमचंदांना होती. घरीं सावत्र आई, तिचीं मुलें आणि भावंडें असल्यामुळें तेथेंहि प्रेमचंदांचें सुखानें जमण्यासारखें नव्हतें. महावीरप्रसाद पोद्दार यांच्या सहकार्यानें चरखे विकण्याचें एक दुकान काढण्यांत आलें. पण त्यांत कांहींच नफा होण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हां प्रेमचंद आपल्या गांवीं गेले. तेथेंहि घरच्या कटकटी वाढल्या होत्या. भातावर तूप घेण्यासहि सवड नसल्याचें पाहून प्रेमचंद उद्विग्न झाले. या उदास मनःस्थितींत त्यांनीं कानपूर येथें मारवाडी विद्यालयांत मुख्याध्यापकाची जागा पत्करली. पण याहि ठिकाणीं प्रेमचंदांचें पटलें नाहीं. त्यांच्या मानी स्वभावाला आतां नोकरी, मग ती कोणतीहि असो, पटण्यासारखी नव्हती. चरितार्थाचें एकच साधन आतां त्यांच्याजवळ उरलें होतें, तें म्हणजे त्यांची लेखणी. प्रेमचंदांएवढा दुसरा प्रभावी लेखक हिन्दी भाषेंत नव्हता. पण कथाकादंबऱ्या लिहून पोटास मिळावें असा तो काळ नव्हता. कथा लोक छापीत असत, पण मोबदला मात्र देण्यास नाराज असत. कादंबरी प्रसिद्ध झाली तरी प्रती खपण्यास कितीतरी काळ लागे. 'बाजारे हुस्न' म्हणजेच 'सेवासदन' कादंबरी त्यांनीं प्रथम उर्दूत लिहिली होती. पण कलकत्त्याच्या एका पुस्तककंपनीनें ती हिंदींतून

प्रसिद्ध केली आणि लेखकास पहिला हप्ता म्हणून चारशें रुपये दिले. आपल्या साहित्यिक जीवनांत प्रेमचंद यांना एवढी मोठी रक्कम प्रथमच मिळाली. त्यानंतर त्यांच्या 'प्रेमाश्रम' नांवाच्या सर्वश्रेष्ठ कादंबरीस तीन हजार रुपये मिळाले होते. पण या सर्व प्रकारावर निश्चितपणें अवलंबून राहतां येणें कठिण होतें. बहुतेक प्रकाशक फसविणारे किंवा फुकट छापणारे निघाले. साहित्यावर जगणें ही गोष्ट आपल्या देशांत तरी अजून कठीण अशीच आहे. प्रकाशक आणि विक्रेते यांच्या हातांत न सांपडतां आपणच आपलें वाङ्मय स्वतंत्रपणें छापून प्रसिद्ध करावे, असा विचार प्रेमचंदांनीं केला. मनास मानेल तें लिहावें व अधिकाधिक लोकांना वाचतां येईल एवढें सुलभ करून विकावें ही त्यांची मनीषा होती. स्वतःचा छापखाना काढावा, स्वतःची प्रकाशनसंस्था स्थापन करावी, ही एक प्रेमचंद यांच्या कर्मयोगी मनाची भूक होती. पूर्वीपासूनच हे विचार त्यांच्या मनांत तरळत होते. सन १९१३ मध्यें कानपूरच्या 'प्रताप' कार्यालयांत त्यांची व श्री. गणेश शंकर विद्यार्थी यांची भेट झाली. छापखान्यांतील सर्व काम स्वतःच्या हातांनीं गणेश शंकर करतात हें पाहून प्रेमचंद खूष झाले. घरीं येऊन त्यांनीं शिवरानीदेवीजवळ गणेश शंकरांची खूप तारीफ केली आणि नोकरी सोडून देऊन आपणहि असाच एक छापखाना काढावा, अशी इच्छाहि त्यांनीं त्याच वेळीं व्यक्त केली. गोरखपूर येथें असतांना छापखाना काढण्यासाठीं एका मारवाड्याशीं त्यांनीं कांहीं व्यवहारहि केला होता, पण प्रेमचंदांचें तेथेंहि जमण्यासारखें नव्हतें.

सर्व बाजूंनीं परिस्थिति चमत्कारिक बनली होती. छापखाना सुरू करण्यास जवळ पुरेंसें भांडवल नव्हतें. मारवाडी विद्यालयाचे व्यवस्थापक हुकूमशाही-वृत्तीचे असल्यामुळें त्यांच्या कुटिल कारस्थानांत प्रेमचंदांचें निभण्यासारखें नव्हतें. सन १९२२ मध्यें त्यांनीं त्याहि नोकरीचा राजीनामा दिला. बनारस येथें शिवप्रसाद गुप्त 'मर्यादा' नांवाचें एक मासिक प्रसिद्ध करीत असत. या मासिकाचे संपादक बाबू संपूर्णानंद असहकाराच्या चळवळींत तुरुंगांत गेले, तेव्हां त्यांच्या जागीं प्रेमचंद संपादक झाले. पण दीड वर्षांतच संपूर्णानंद मुक्त झाले तेव्हां अर्थातच प्रेमचंदांना तें काम सोडावें लागलें. 'मर्यादा' मासिकाचे संपादक म्हणून प्रेमचंद यांना महिना दीडशें रुपये मिळत होते. यानंतर काशी विद्यापीठांत रु. १३५ वर अध्यापक म्हणून त्यांची नियुक्ति

झाली. राष्ट्रीय विद्यालय म्हणून या विश्वविद्यालयाची ख्याति असली तरी प्रेमचंद यांना तेथील वातावरण मानवलें नाहीं. एक वर्षाच्या आंतच त्यांनीं तीहि नोकरी सोडून दिली. जेथें स्वतःचें स्वातंत्र्य धोक्यांत आहे अशी जागा कितीहि मानाची वा मोठी असली तरी ती प्रेमचंदांना पटली नाहीं. मन मारून दास्य करण्यास हा स्वतंत्र कलाकार तयार नव्हता. याबद्दलचें एक उदाहरण देण्यासारखें आहे. सन १९२४ चें वर्ष होतें. प्रेमचंद लखनौस असतांना अलवार संस्थानच्या महाराजांकडून चिठ्ठी घेऊन पांचसहा माणसें त्यांना भेटावयास आलीं. आपल्याजवळ राहण्यासाठीं राजेसाहेबांनीं बोलावलें होतें. कथाकादंबऱ्यांचे शोकी असल्यामुळें महाराज प्रेमचंदांना महिना चारशें रुपये रोख, दिमतीस एक मोटार, राहण्यास स्वतंत्र हवेशीर बंगला इत्यादि सुखसोयी प्राप्त करून देणार होते. त्यांनीं प्रेमचंदांना सहपरिवार आमंत्रण दिलें. त्या राजेसाहेबांच्या निमंत्रणास उत्तर देतांना प्रेमचंद लिहितात : " मी आपणांस निमंत्रणाबद्दल धन्यवाद देतों. मीं माझें जीवन साहित्यसेवेसाठीं समर्पित केलें आहे. जें कांहीं लिहितों तें आपण मनापासून वाचीत असतां हें वाचून आनंद वाटला. आपण मला जो तनखा देणार आहांत त्याला योग्य असा मनुष्य मी नाहीं. लक्षपूर्वक माझें लिखाण आपण वाचाल तरीसुद्धां मी स्वतःस धन्य समजेन. आपल्या दर्शनासहि एखाद्या वेळीं येऊन जाईन. — एक साहित्यसेवी, धनपतराय. " पायीं चालून आलेली संपत्ति आणि मानसन्मान ! पण ज्या ठिकाणीं स्वतंत्रता नाहीं त्या ठिकाणचें वारेंहि प्रेमचंद यांची प्रकृति खराब करणारें ठरलें. राजेमहाराजे यांच्या घरीं चाकरी करण्यांत केवढेंहि सुख असलें तरी स्वतंत्र प्रकृतीचा आत्मा तडफडत राहतो. या संदर्भात आपल्या मराठी भाषेंतील एक सर्वप्रसिद्ध उदाहरण दिल्यास अस्थानीं होणार नाहीं. गेल्या पिढींतील सर्वश्रेष्ठ संतवाङ्मयसेवक ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांचा १९२०-२१ सालीं इंदोर राजघराण्याशीं संबंध आला. पांगारकरांनीं कांहीं दिवस तेथला थाटाचा पाहुणचार घेतलाहि. पण थोडक्याच दिवसांत पांगारकर इंदूर सोडण्याचा विचार करूं लागले. एका अधिकाऱ्यास त्यांनीं सांगितलें, " ...माझ्या वाङ्मयसेवेचें कार्य येथें राहून होणार नाहीं. तें पुण्याच्या परिसरांत राहूनच होईल. दुसरें असें कीं, माझ्या वृत्तीला एक आणासुद्धां पराधीनता खपत नाहीं. पांगारकरसाहेब येथें किती महिने राहिले,

कोणाच्या परवानगीनें ते जातात व येतात, पांचपांच महिने ते बाहेरगांवीं जातात व स्वतंत्रपणें वागतात तेव्हां त्यांच्या तोंडास लगाम घातला पाहिजे असे विचार कांहीं कारभाऱ्यांच्या मनांत घोळत आहेत...अध्यात्मज्ञानाची महती अगाध आहे. त्याचें मोल महिने अन् तास यांनीं करूं पाहणें गैर आहे! ज्ञान अमोल आहे. द्रव्याच्या राशींनीं त्याचा हिशेब करूं नये." पांगारकरांनीं याच वेळीं आपल्या पत्नीसहि लिहिलें, "वर्षभर बंद ठेवलेला 'मुमुक्षु' पुन्हा चालू करावा व ग्रंथलेखन सपाट्यानें पुनः सुरू करावें असें मनांत येत आहे. मन उल्हासानें भरलें आहे. आपल्या आयुष्याचें मुख्य कर्तव्य ग्रंथरचना हें आहे, तें येथें राहून साध्य होणें शक्य नाहीं." ('चरित्रचंद्र' पृ. ३२७-२८)

मुन्शी प्रेमचंदांची महती एवढ्यासाठीं कीं, त्यांना पांगारकरांसारखा अनुभवहि घेण्याची जरूर नव्हती. अलवारच्या महाराजांजवळ आपली स्वतंत्र प्रतिभा कोमेजून जाणार हें त्यांनीं अगोदरच ओळखलें होतें. त्यांनीं तो सोन्यारुप्यानें मढवून काढलेला मार्ग मुळांतच पत्करला नाहीं. स्वतंत्र छापखाना काढून स्वतःचें वाङ्मय स्वतः छापून प्रासिद्ध करावें ही प्रेमचंदांची सर्वांत मोठी महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठीं त्यांनीं साडेचार हजार रुपये जमा केले व एक-दोघांच्या सहकार्यानें बनारस येथें सरस्वती प्रेसची स्थापना केली. या प्रेसमधून फायदा होण्याऐवजीं हळूहळू नुकसानच होऊं लागलें; तेव्हां भागीदार आपापला हिस्सा घेऊन निघून गेले व प्रेसचा सर्व भार एकट्या प्रेमचंदांवर येऊन पडला. कोणतेंहि काम अर्धवट सोडणें प्रेमचंदांच्या जिवावर येई. आपली सर्व शक्ति त्यांनीं छापखान्याच्या कार्यांत खर्च करण्याचें ठरविलें. रात्रभर जागून वाचन-लेखन करावें आणि दिवसभर प्रेसमध्यें काम करावें हा त्यांचा क्रम चालू झाला. यामुळें प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होऊं लागल्यामुळें शिवरानीदेवीनें तक्रार केली. प्रेमचंदांनीं हंसून उत्तर दिलें—

"तूंच सांग मग काय करूं तें. सकाळीं फिरावयास जाणें अगदीं आवश्यक म्हणून जातों. फिरून आल्यावर थोडें खाणें झालें म्हणजे खोलींत काम करावयास बसतों. स्वतः लिहितों-वाचतोंच, पण तुझ्या मुलांनाहि लिहावयास-वाचावयास शिकवितों. त्यानंतर स्नान वगैरे झाल्यावर प्रेसमध्यें जातों. तेथून आल्यावर एक तासभर मुलांशीं गप्पागोष्टी करण्यांत वेळ जातो. त्यांच्याशीं बातचीत करण्यानें सारे श्रम दूर होतात. त्यानंतर प्रेसमधून

कारकून येतो, त्याच्याजवळ कांहींना कांहीं तरी बोलणें करावें लागतें. नऊ वाजतां पुनः जेवण करतों; नंतर एक तास मिळतो त्यांत कांहीं वाचनलेखन करावेंसें वाटतें. पण तुमचा हुकूम होतो कीं, दहा वाजतां झोपलेंच पाहिजे... आतां तूंच सांग कीं, मला रिकामा वेळ असा कोठें सांपडतो ? एक एक क्षण मी गुंतून राहिलों आहें. माझा ईश्वरावर विश्वास आहे आणि त्याला प्रार्थना करीत असतो कीं, रात्र छोटी करून दिवस मोठा कर. "

याप्रकारें प्रेमचंद यांनीं प्रेसमध्यें आपला आत्माच जणुं समर्पण केला होता. स्वतःच्या प्रकृतीची पर्वा त्यांनीं कधींच केली नाहीं. एकदां प्रेमचंद फारच अजारी झाले. या वेळीं शिवरानीदेवी परगांवीं होती. पण औषधपाण्यासाठीं जे पैसे ती पाठवून देई ते सर्व प्रेमचंद छापखान्याच्या कामासाठीं खर्च करीत असत. दोन महिने असेच लोटल्यावर शिवरानीदेवीनें आपल्या गांवीं चलण्याचा आग्रह केला. तेव्हांचा त्यांचा संवाद ऐकण्यासारखा आहे —

प्रेमचंदः—मग प्रेसमधील कामें कोण करणार ?

शिवरानीः—पण प्रकृति नीट नाहीं तर त्या कामास काय करावयाचें ?

प्रेमचंदः—वा ! मला काम तर नेहमीं केलेंच पाहिजे.

शिवरानीः—राहूं द्या तें तुमचें काम. तीं कामें कधींच संपावयाचीं नाहींत.

प्रेमचंदः—काय ? काम राहूं द्या. छे ! काम पूर्ण झाल्याखेरीज कोणतीच सुट्टी मला घेतां येणार नाहीं.

प्रेमचंद निष्ठावान् कर्मयोगी होते. स्वधर्माप्रमाणें स्वतःच्या वांट्यास आलेलें कर्तव्य करण्यांत त्यांनीं केव्हांहि कुचराई केली नाहीं. 'कायाकल्प', 'कर्मभूमि', 'गबन', 'गोदान' या एकापेक्षां एक सरस अशा कादंबऱ्या त्यांनीं येथूनच प्रसिद्ध केल्या. 'मानसरोवर' हे स्वतःच्या कथांचे संग्रहहि प्रेमचंद यांनीं सरस्वती प्रेसतर्फेंच प्रसिद्ध केले. पण हिन्दी साहित्यांत मंदीची लाट मोठीच होती. पुस्तकें विकलीं जात नव्हतीं. कथाकादंबऱ्यांचे ढीगच्या ढीग पडून होते व विक्रेत्यांकडून पैसे वसूल करणें अशक्य झालें होतें. छापखान्यास पूरक काम व्हावें व स्वतःची हौस भागावी म्हणून त्यांनीं 'हंस' नांवाचें मासिक सुरू केलें. त्याच्याबरोबर 'जागरण' नांवाचें साप्ताहिकहि प्रेमचंद काढूं लागले. पण या सर्व प्रकारांमुळें प्रेमचंदांना प्रेसकडून कोणताहि लाभ झाला नाहीं. प्रतिकूल परिस्थितीशीं सतत झुंज

खेळतां खेळतां व अपयशाशीं टक्कर देतां देतां त्यांचें शरीर जर्जर झालें. पोटासाठीं पुनः मधून मधून नोकरी करण्याचाहि प्रसंग त्यांच्यावर आला. इतर मासिक पत्रांतूनहि ते कथात्मक वाङ्मय लिहीत असत. काय वाटेल तें झालें तरी प्रेस बंद करूं नये, हा मात्र त्यांचा ठाम निश्चय होता. 'हंस' आणि 'जागरण' नियमित प्रसिद्ध करतां यावींत म्हणून त्यांनीं अक्षरशः हाडाचीं काडें केलीं. कर्मयोगी संपादक म्हणून प्रेमचंदांनीं फार मोठें नांव कमावलें. संपादक होण्याची इच्छा त्यांच्या मनांत पूर्वीपासूनच होती. सन १९०२ मध्यें नवाबराय नांवानें ते जेव्हां लिहीत असत तेव्हां अलाहाबादच्या इंडियन प्रेसच्या संचालकांनीं त्यांना एका मासिकाचे संपादक होण्यासाठीं बोलावलें होतें. पण त्या वेळीं तो योग जुळून आला नाहीं. त्यानंतर 'ज़माना' व 'आज़ाद' या पत्रांचे संपादक म्हणून प्रेमचंदांनीं कांहीं दिवस काम केलेंच होतें. वकील बनण्याची इच्छा त्यांच्या मनांत लहानपणापासून होती; पण प्रेमचंद संपादक बनले व त्यांनीं दलित, पीडित आणि उपेक्षित जनतेची वकिली चालू केली. देशांत जागृति निर्माण व्हावी, दुर्बलांना होणारा जाच थांबावा, गरिबांची दाद लागावी आणि शेतकरी-मजूर यांना सुख लाभावें, म्हणून संपादकानें अहोरात्र कष्ट घेतले पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष होता. पैसे मिळविणें किंवा वेड्यावाकड्या बातम्या छापून लोकांची दिशाभूल करीत राहणें हें संपादकीय पेशाला लांछनास्पद आहे, असा प्रेमचंदांचा विश्वास होता. प्रेस काढण्याचा त्यांचा हेतु दुहेरी स्वरूपाचा होता. एक तर स्वतःस वाटेल तशीं पुस्तकें छापून प्रसिद्ध करतां यावींत व दुसरें म्हणजे एखादें मासिक व एखादें नमुनेदार साप्ताहिकहि काढतां यावें. पण प्रेमचंदांचें हें स्वप्न मोठ्या कष्टानें साकार होत होतें. प्रेसमध्यें होणारा तोटा भरून काढण्यासाठीं त्यांना दुसरे उद्योग करावे लागत असत. लखनौच्या गंगा पुस्तकमालेच्या कचेरींत जाऊन शाळांच्यासाठीं क्रमिक पुस्तकें तयार करण्याचें नीरस कामहि प्रेमचंदांना करावें लागलें. सन १९२९ मध्यें लखनौच्या नवलकिशोर प्रेस-तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'माधुरी' मासिकाचे संपादक म्हणूनहि त्यांनीं काम पत्करलें.

पण या मासिकाच्या व्यवस्थापकांच्या निधनानंतर सर्व भानगडी कोर्टांत गेल्या आणि प्रेमचंदांना संपादकत्व सोडावें लागलें. सर्व स्थिरस्थावर झाल्या-

वर ' माधुरी ' मासिक निघूं लागलें. पण प्रेमचंद संपादक असतांना जी लोकप्रियता या मासिकास लाभली होती ती पुनः मिळाली नाहीं. सन १९३० मध्यें प्रेमचंदांनीं स्वतःचें ' हंस ' मासिक चालू केलें. नव्या नव्या लेखकांना आत्मसात् करणें व त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण करणें हें संपादकाचें कर्तव्य प्रेमचंद यांनीं बरोबर हेरलें होतें. नव्या लेखकाचा लेख आला कीं प्रेमचंद खूप मेहनत घेऊन त्यांत सुधारणा करीत आणि कित्येक प्रसंगीं लेखकाला सौम्य शब्दांत सूचना देऊन प्रोत्साहनहि देत असत. कोणी नवोदित लेखक आपली कलाकृति दाखविण्यास आला कीं त्याला प्रथम विश्वासांत घेऊन प्रेमचंद योग्य तें मार्गदर्शन मनापासून करीत असत. ' हंस ' टिकून रहावा म्हणून प्रेमचंदांनीं अपार कष्ट केले. सन १९३५ ची हकीगत आहे. बरेच दिवस प्रेमचंदांचीं प्रकृति ठीक नव्हती. खाणें दूरच पण दूध वगैरे पिणेंहि बंद होतें. पहांटे चार वाजतां ताप उतरला तेव्हां नित्याप्रमाणें तोंड वगैरे धुऊन ' हंस '-साठीं लेख लिहिण्यास प्रेमचंद बैठक मारून बसले. शिवरानीदेवी त्यांच्यावर खूप रागावली. तेव्हां प्रेमचंद हंसून म्हणाले, " लेख लिहूं नको तर 'हंस' छापला कसा जाईल ! 'हंस' वेळेवर निघाला नाहीं तर ग्राहक नाराज होतील ना ? त्यांना थोडेंच माहीत आहे कीं, मी आजारी आहें म्हणून ? त्यांनीं वर्गणी दिलेली आहे; वेळेवर ' हंस ' त्यांच्या हातांत पोंचलाच पाहिजे. "

त्यावर शिवरानीदेवीनें सांगितलें, " आतां लिहावयास बसाल तर लेखणी मोडून टाकीन, कागद फाडून टाकीन. " असें हें प्रेमचंदांचें स्वकर्तव्यावरील प्रेम. ' मृत्यु के पीछे ' नांवाची त्यांची एक कथा संपादकाचें आदर्श जीवन चित्रित करणारी असल्यामुळें प्रेमचंदांच्या तपस्येची खूण म्हणून तिचा उल्लेख करणें अगत्याचें आहे. पण प्रेमचंदांच्या निःस्वार्थी सेवेला फारसें यश प्राप्त झालें नाहीं. महिन्याला दोन-अडीचशें रुपये ' हंस 'पायीं नुकसान होत होतें. आदर्श संपादक कर्जबाजारी होऊं लागला. लेखकांना मोबदला देणें कठीण झाल्यामुळें तो वर्ग नाराज झाला. या कठीण परिस्थितीमुळें ' हंस 'च्या प्रकाशनाचें कार्य हिंदी परिषद् करीत होती. प्रेमचंद संपादनाचें काम पाहत असत व पैसा परिषद् खर्च करीत होती. एवढ्यानेंहि भागेना म्हणून ' हंस ' ची सर्व व्यवस्था परिषदेनें घ्यावी असा विचार ठरला. या सर्व प्रकारामुळें प्रेमचंद यांना मनस्वी दुःख झालें. महात्मा गांधींच्या देखरेखीखालीं हिंदी परिषद् चालली होती.

अनुक्रम ९६२८८ दि. विभाग ५८२७ १०।७।५५

' हंस ' परिषदेनें चालवावा असा निर्णय वर्धा येथील एका बैठकींत कायम झाला. प्रेमचंद त्या बैठकीस हजर होतेच. मुन्शी प्रेमचंदांना या प्रकारानें फारच दुःख होत राहिलें. सन १९३६ मध्यें सेठ गोविंददास यांच्या एका लेखामुळें ' हंस 'वर सरकारची अवकृपा झाली. फार मोठें डिपॉझिट ठेवणें अशक्य असल्यामुळें ' हंस ' बंद करण्याची घोषणा परिषदेनें केली. या वेळीं प्रेमचंद मृत्यु-शय्येवर होते. त्यांना या वार्तेमुळें मोठाच धक्का बसला. परिषदेचें हें कृत्य त्यांना आवडलें नाहीं. त्यांनीं ताबडतोब रक्कम जमा केली व ती सरकारदरबारीं भरून ' हंस ' परत आपल्या ताब्यांत घेतला. यापूर्वीहि दोनतीन वेळां सरकारी अवकृपेस ' हंस ' बळी पडला होता. पण प्रेमचंदांच्या निष्ठेमुळें त्याचें रक्षण झालें. ' हंस ' व ' जागरण ' जिवंत रहावींत म्हणून सबंध हयातभर प्रेमचंदांनीं अति कष्ट केले. जीविताच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांना ' हंस 'ची चिंता लागून राहिली होती. मोत्यांचा चारा खाणारा हंस; पण प्रेमचंदांच्या घरीं चणे खाऊन तो तग धरून होता. डोंगराएवढ्या आपत्ति याव्यात व त्यांस टक्कर देतां देतां रक्तबंबाळ होऊन स्वतः समाप्त व्हावें, हें प्रेमचंदांच्या जीवनाचें सार होतें. प्रेस चालू रहावा, ' हंस ' टिकावा म्हणून पैसे मिळविण्यासाठीं प्रेमचंदांनीं नानाप्रकारचे उद्योग करून पाहिले. त्यांतील त्यांचा महत्त्वाचा उद्योग म्हणजे सिनेमा कंपनीशीं संधान बांधून आपल्या कथांचे चित्रपट तयार करावेत हा होय. फिल्मी दुनियेंत प्रेमचंदांना काय काय अनुभव आले याचा विचार आपण स्वतंत्रपणें करणार आहोंतच.

एक खंदा पण अपेशी संपादक म्हणून प्रेमचंदांचें वर्णन करतां येईल. अपयश आलें खरें पण तें आर्थिक बाजूनें विचार करावा तेव्हां. साहित्याच्या प्रान्तांत प्रेमचंदांची कीर्ति सदोदित वर्धमानच राहिली. या दरिद्री देशांतील जनतेची सर्वांगीण सुधारणा व्हावी, शेतकऱ्यांची लूटमार थांबावी, म्हणून प्रेम-चंदांनीं आपल्या कथाकादंबऱ्यांची निर्मिति केली. सरकारी कृपेची वा अव-कृपेची पर्वा त्यांना कधींच नव्हती. एका मोठ्या संस्थानिकाची नोकरी त्यांनीं लाथाडली, त्याचप्रमाणें सरकार पदवी देत असतांनाहि त्यांनीं तिचा अव्हेर केला. तो काळच असा होता कीं, सरकारकडून मोठमोठ्या पदव्या घेण्यांत लोकांना भूषण वाटे; पण प्रेमचंद यांना मात्र यांतील धोका स्पष्ट दिसत होता. ' हंस ' वर जप्तीचा हुकूम काढणारें किंवा ' सोजे वतन 'च्या प्रती जाळून

टाकणारें सरकार प्रेमचंदांना पदवी देण्यास कसें उत्सुक होतें व प्रेमचंदांनीं सरकारला काय उत्तर दिलें, याचा वृत्तान्त शिवरानीदेवीनें लिहिलेला आहे : " मी त्या वेळीं लखनौस होतें. हेलीसाहेब गव्हर्नर म्हणून आला होता. त्यानें आपल्या एका हिंदुस्थानी मित्रास सांगितलें, ' धनपतरायांना आपण एक पत्र लिहा. मी त्यांना रावसाहेब हा किताब देऊं इच्छितों. कारण भारताचे सर्वांत मोठे कथाकार आज प्रेमचंद आहेत. हा हिन्दुस्थानी मित्रहि प्रेमचंदांच्या वाङ्मयाचा मोठा भक्त होता. त्यानें आनंदानें पत्र लिहिलें कीं, गव्हर्नरसाहेब आपणांस पदवी देणार आहेत. त्यांना कृपा करून आपण भेटावें. हें पत्र घेऊन ते आंत आले व मला म्हणाले, ' गव्हर्नरसाहेबांचें मला एक पत्र आलें आहे. '

' काय लिहिलें आहे त्यांनीं त्यांत ? '

' साहेबबहादुर मला रावबहादुर पदवी देणार आहेत. '

' खुद्द त्यांचेंच पत्र आहे कीं कोणीं दुसऱ्यानें लिहिलें आहे ? '

' हो. कोणीं दुसऱ्यानेंच लिहिलेलें दिसतें. '

' कोण हा महाशय ? '

' आहे एक कोणीतरी. त्यालाहि सरकारकडून ' सर ' पदवी मिळाली आहे. '

' घ्या मग रावसाहेबी किताब...... नुसती पदवीच देणार कीं आणखी कांहीं ? '

' आणखीहि कांहीं अटी लादण्याचा इरादा दिसतोय्. '

' मग मुळींच स्वीकारूं नका... फार महाग सौदा होईल. '

' मग त्यांना उत्तर काय देणार ? '

' त्यांना मी धन्यवाद देईन व लिहीन कीं, मी एक जनतेचा तुच्छ सेवक आहें. जनतेकडून रावसाहेब पदवी मिळेल तरच धन्य होईन. सरकारकडून अशी पदवी घेण्याची इच्छा बिलकुल नाहीं. माझ्या वतीनें गव्हर्नरसाहेबांना धन्यवाद द्या ! ' "

प्रेमचंदांचें जिणें हें निःस्पृह होतें. सोन्याचांदीची दुनिया पुष्कळांना भुरळ पाडते, पण प्रेमचंदांची दृष्टि फार निराळी होती. सरकारदरबारीं राहून ते सांगतील तसें लिहून मानसन्मान मिळविण्यापेक्षां दीनदरिद्री जनतेची सेवा करावी, त्यांच्या दुःखांना वाचा फोडावी, त्यांची कड घेऊन सरकारशीं,

पुंजीपतींशीं, जमीनदारांशीं भांडण करावें, हेंच कर्तव्य प्रेमचंदांना श्रेष्ठ प्रतीचें वाटलें. ऐटबाज श्रीमंती व मदोन्मत्त भांडवलदार यांचें व प्रेमचंदांचें कधींच जमलें नाहीं. संपादक या नात्यानें गरिबांशीं प्रामाणिक राहून त्यांनीं स्वतः मजुराचें जिणें पत्करलें. शेतकऱ्याचें साधेंभोळें जीवन ते जगले व तोच जीवनाचा आदर्श रहावा म्हणून त्यांनीं आपल्या कथांमधून प्रचारहि केला. त्यांना सरकारच्या सोनेरी बेड्या बद्ध कशा करणार ?

●●●

## फिल्मी दुनियेंत प्रेमचंद : ५

खोऱ्यानें पैसा ओढावा आणि मन मानेल त्याप्रमाणें विलास भोगावे यासाठीं जे उद्योगधंदे प्रसिद्ध आहेत त्यांत चित्रपटनिर्मितीचा उद्योग प्रमुख आहे. या धंद्यांत पैसे गमावणारे जसे आहेत तसे कमावणारेहि पुष्कळ आहेत. डोळे दिपवणाऱ्या या फिल्मी दुनियेंत अनेक जण लक्षाधीश झाले. नटनटींचे हजारोंनीं मोजले जाणारे पगार आणि चित्रपट चालू झाला कीं थिएटरच्या मालकापाशीं जमणारी पैशाची रास पाहिली कीं वाटतें, लक्ष्मीचे खरे खेळ याच ठिकाणीं चालू असतात. चित्रपटनिर्मितीच्या बाबतींत जगांत आपल्या भारताचा अमेरिकेच्या खाळोखाल दुसरा क्रमांक लागतो असें म्हणतात. कोट्यवधि रुपयांचें भांडवल या धंद्यांत सदोदित गुंतलेलें असतें. लक्ष्मीपुत्रांचे हे खेळ सर्वसामान्य जनांस चार आण्यांच्या पिटांत बसूनच पाहावयास मिळत असलें तरी त्यांची भव्यता मात्र त्यांच्या डोळ्यांत भरून गेलेली असते.

मुन्शी प्रेमचंद यांना आपल्या कथाकादंबऱ्यांचें चित्रीकरण करावें असें वाटूं लागलें याचें कारण अमाप पैसा कमवावा किंवा बंगले-मोटारींची प्राप्ति करून घ्यावी यांपैकीं नव्हतें. या चरित्राच्या प्रारंभींच दिल्याप्रमाणें शीतलादेवीच्या यात्रेस पंधरा रुपये खर्च करूं पाहणारे आणि त्यामुळें उपाशीं राहणारे दीन शेतकरी पाहून चित्रपटांची कल्पना प्रेमचंद यांच्या मनांत आली. अलाहाबाद स्टेशनवर गाडींत खूप गर्दी झाली असतांना कांहीं भाबडे शेतकरी

इंटरच्या डब्यांत घुसले. त्यांची काळजी प्रेमचंद यांनीं किती घेतली हें आपण पाहिलेंच. शिवरानीदेवीनें विचारलेल्या प्रश्नांचें उत्तर देतांना प्रेमचंद बोलले, " तूं म्हणतेस तें खरेंच. मी यांच्यासाठीं पुष्कळ लिहिलें. पण यांना तें वाचतां थोडेंच येणार ! हां, माझ्या कादंबऱ्यांवर बोलपट तयार करून गांवोगांव मोफत दाखविले तर हे लोक कदाचित् शहाणे होतील." कथाकादंबऱ्यांवर चित्रपट तयार करून खेडुतांना ते मोफत दाखविण्याची इच्छा करणाऱ्या या माणसाचें मन केवढें असेल ! पैसा मिळवावा, धनवान् व्हावें, स्वतःची चैन वाढवावी, या कल्पनाच प्रेमचंद यांच्या मनास कधीं शिवल्या नाहींत. आपल्या प्रतिभेचें सामर्थ्य शक्य तेवढें आपल्याच बांधवांच्या कल्याणासाठीं खर्च व्हावें, ही एकच इच्छा या श्रेष्ठ कलाकाराची होती. कथा-कादंबऱ्यांवर फिल्म तयार करावी या विचारास आणखीहि एक कारण आहे. 'हंस' मासिक आणि 'जागरण' साप्ताहिक हीं दोन्ही तोट्यांत चालत होतीं. इतरत्र अनेक ठिकाणीं नोकरी करून व भाडोत्री लेखन करूनहि पैसा पुरा पडणें शक्य नव्हतें. तेव्हां चित्रपट-सृष्टींत प्रवेश करावा व मिळेल त्या पैशाचा उपयोग पुनः लोकसेवेसाठींच करावा, हा प्रेमचंद यांचा पवित्र व शुद्ध हेतु होता. त्याप्रमाणें सन १९३४ मध्यें मुंबईच्या अजण्टा सिनेटोन फिल्म कंपनीनें प्रेमचंद यांच्याशीं बोलणें सुरू केलें. संधि चांगली चालून आली आहे, असा विचार करून प्रेमचंदांनीं आपलें मनोगत शिवरानीदेवीस सांगितलें. पती-पत्नींचें मोठें मनोरंजक संभाषण झालें या वेळीं. जातांना भाडेखर्चास लागणारे पैसे जमा करणेंहि कठीण होऊन बसलें. पण मुंबईस जाण्याचा निर्धार करून प्रेमचंद आपल्या पत्नीस बोलले,

" तूंहि चल मुंबईस. एक सफर करून येऊं. फिल्म कंपनीनें मला बोलावलें आहे."

" फिल्म कंपनीवाले बोलावतात हें ठीकच आहे. पण तेथील हवापाणी आपणांस मानवणार का ? आपली प्रकृतिहि कमजोर आहे. आपलें तेथें निभणार तरी कसें ? "

" मुंबईस लोक राहतातच कीं."

" त्यांची गोष्ट निराळी आहे आणि आपली निराळी. आपण मुंबईस जावें असें मला तरी वाटत नाहीं."

" तूं नीट विचार कर. त्याशिवाय कांहीं काम नीट होणारच नाहीं. येथें जी कांहीं थोडी मिळकत आहे ती आपल्या प्रपंचालाच पुरेशी होत नाहीं. ' हंस ', ' जागरण ' कसें चालणार ? "

" तरीसुद्धां मुंबईस जाणें ठीक नाहीं. "

" पण मग दारीं हे दोन मोठे हत्ती बांधले आहेत त्यांना चारा कोण देणार ! त्यांना जिवंत तरी ठेवलेंच पाहिजे ना ? "

" आपण जें कांहीं कराल त्यांत स्वतःच्या जिवाची पर्वा थोडी तरी असूं द्यावी कीं ! "

" ही तुझी रडकथा नेहमींचीच आहे. ... दुसरें असें पहा कीं, कथा-कादंबऱ्या लिहून जेवढा उपयोग होणार नाहीं त्यापेक्षां जास्त उपयोग त्यांवर चित्रपट तयार करून होईल. कथा-कादंबऱ्या ज्यांना वाचतां येतें त्यांच्याचसाठीं आहेत. फिल्म तयार झाली तर हजारों लोकांना एकदम फायदा घेतां येईल. "

" होईल लोकांचा फायदा, माझें काय त्यांत बरें होणार ? "

" ही चूक आहे तुझी. लोकांनीं उलट माझें किंवा तुझें बरें करावें म्हणून मी थोडेंच लिहितों ! मी माझ्या आत्म्याच्या शांतीसाठीं लिहीत असतों, तेव्हां तें लिहिणें जितक्या जास्त लोकांना समजेल, जितके लोक पाहूं शकतील, वाचूं शकतील, तितकें जास्त समाधान मला मिळेल. आणि दुसरा फायदा असा कीं, ' हंस ' व ' जागरण ' नीटपणें चालविण्यासाठीं आपणांजवळ पैसा जमा होईल. वर्षाचे नऊ हजार रुपये देण्याचा करार कंपनीवाले करणार आहेत. मुंबईस वर्ष-दीड वर्ष राहिलें कीं मग मला येथूनहि कथा पाठवितां येईल, नऊ-दहा हजार रुपये वर्षास घरबसल्या मिळतील. मग सांग, वर्षा-दीड वर्षासाठीं मुंबईस जाणें काय वाईट गोष्ट आहे ? "

पतीचा अडचण पत्नीनें जाणली. प्रेमचंदांच्या मनास कोणती भूक लागली होती हेंहि शिवरानीदेवींनें हेरलें आणि मुंबईस जाण्याची परवानगी दिली. मुंबईच्या प्रवासाची तयारी सुरू झाली. प्रकृति नीट नसतांना एवढ्या लांब प्रवास करणाऱ्या अस्वस्थ पतीची सर्व तयारी शिवरानीदेवींनें करून दिली. इकडचे तिकडचे जमवून तिनें शंभर रुपयांची तजवीजहि केली. त्यांपैकीं प्रारंभिक तयारीसाठीं वीस रुपये खर्च झाले आणि ऐंशी रुपये बरोबर घेऊन प्रेमचंद मुंबईस फिल्मी जगताच्या नव्या सृष्टींत प्रवेश करण्यासाठीं

निघाले. त्या दिवशीं प्रेमचंद रात्रभर जागून राहिले; कारण पहांटेची चार वाजतांची गाडी पकडावयाची होती. दूरवरचा प्रवास असल्याकारणानें दोघेहि व्यथित झाले होते. मुलांचा निरोप घेऊन प्रेमचंद मुंबईस गेले. मुंबईस जाण्यांत त्यांचा हेतु कोणता होता हें आपण पाहिलेंच आहे. प्रेमचंदांनीं आपल्या मित्रमंडळींनाहि आपला मनोदय कळविला होता. दि. १० जुलै १९३४ च्या पत्रांत प्रेमचंद ' ज़माना ' च्या संपादकांना लिहितात,

" मी एक जुलैला मुंबईस निघून आलों. येथें एका कंपनीशीं करारनामा केला आहे. वर्षाच्या सहा कथा त्यांना तयार करून द्यावयाच्या. तेथील उद्योगांत एकसारखें नुकसान होत होतें. पुस्तकविक्रेत्यांकडून पैसे वसूल होत नव्हतें. कागदाच्या खर्चाचा बोजा वाढत होता. अगतिक होऊन मीं हा करारनामा केला आहे. सहा कथा लिहिणें अवघड नाहीं. हो, दिग्दर्शकास पसंत पडेल असें लिहिणें अगत्याचें आहे. फिल्मच्या दृष्टीनें काय उपयुक्त हें तोच ठरवणार... " प्रेमचंदांचे परम मित्र हिन्दींतील प्रख्यात लेखक जैनेन्द्र-कुमार. त्यांनाहि एका पत्रांत प्रेमचंदांनीं लिहिलें, " मुंबईच्या एका फिल्म कंपनीनें मला बोलावलें. मासिक पगाराची बात नाहीं. करारपत्र आहे. ८००० रुपये वर्षाचे. मी अशा परिस्थितींत येऊन पोंचलों आहे कीं, या-शिवाय दुसरा मार्ग माझ्याजवळ नाहीं....चार-पांच हजार रुपये हातीं आले तरच त्यामुळें ' हंस ' व ' जागरण ' नीट चालतील; आर्थिक संकट तेवढ्यापुरतें तरी दूर होईल. "

प्रेमचंद कोणत्या परिस्थितींत सांपडले होते, तें आतां ध्यानांत येईल. मोठ्या कष्टानें आपल्या कथा दिग्दर्शकाच्या हातांत देण्यास किंवा कंपनी-वाल्यांना विकण्यास प्रेमचंद तयार झाले होते. एरवीं मुंबईस त्यांना कोठून चैन पडणार ? गजबजलेल्या त्या मायानगरींत प्रेमचंद प्रारंभापासूनच कंटाळून गेले. घरीं लिहिलेल्या एका पत्रांत ते लिहितात, " या विस्तीर्ण मुंबई शहरांत मला तुमच्याशिवाय सुनें सुनें वाटतें. वारंवार मनांत येतें कीं, हें सर्व सोडावें आणि तिकडे पळून यावें. मीं अजून येथें जागा घेतली नाहीं, तें एक बरेंच झालें. नाहीं तर घर खायला उठलें असतें. तुमचें जेव्हां पत्र येतें तेव्हांच घरीं आल्या-सारखें वाटतें. " मुंबईस माणसांचाहि अथांग सागर पसरलेला, पण प्रेम-चंदांना तेथें एकटें एकटें वाटे. चित्रपटनिर्मितीच्या धंद्यांतहि त्यांना फारसा

चांगला अनुभव आला नाहीं. प्रेमचंद यांच्या कथेवर एक पहिला चित्रपट निघाला, त्याचें नांव ' मिल मजदूर '. या वेळीं सर्वत्र मंदीची लाट असून बेकारी मात्र वाढत होती. गिरणी-मालक व मजूर यांच्या कटकटी वाढीस लागल्या होत्या. मजुरांची अवस्था अति बिकट झाली होती. तिची चौकशी सहृदय प्रेमचंदांखेरीज कोण करणार ? आपला संदेश मजुरांपर्यंत पोंचता करण्यासाठीं प्रेमचंदांनीं ही कथा लिहिली.

बोलपट तयार होत असतांना मूळ कथालेखकावर अन्याय झाल्याचीं उदाहरणें अनेक सांपडतील. आपल्या अद्वितीय प्रतिभेनें लेखक कथा कांहीं एका विशिष्ट पद्धतीनें व हेतूनें निर्मीत असतो तर कंपनीवाले किंवा दिग्दर्शक यांची आवड निराळीच असते. स्वतःच्या मनांतील कल्पनांची भरती केल्या-खेरीज चित्रकथा पूर्ण झाली असें त्यांना वाटत नाहीं. त्यामुळें मूळ लेखकाची मूळ कथा व पडद्यावर बोलकी झालेली चित्रकथा यांत जमीन-अस्मानाचें अंतर पडलेलें दिसून येतें. बिचारा लेखक गरजू असतो; दिग्दर्शकाच्या श्रीमंती ऐटीपुढें त्याला कोण पुसणार ? पैसेवाल्यांजवळ सर्व गुणांचा आश्रय असतो. जणुं मुन्शी प्रेमचंद यांच्या ' मिल मजदूर ' या कथेचेहि कसे धिंडवडे निघाले तें पाहण्यासारखें आहे. प्रेमचंद यांच्याच शिफारशीवरून ललितकुमार नांवाच्या गृहस्थाची नट म्हणून योजना झाली होती. प्रेमचंदांना चांगलेंच जाणणाऱ्या या गृहस्थानें ' मिल मजदूर ' चित्रपट कसा तयार झाला, याची मनोरंजक हकीगत लिहिली आहे. त्यांत तो लिहितो, "आपली कथा ' मिल मजदूर ' नांवाची समाप्त करण्यांत प्रेमचंद त्या वेळीं व्यग्र झाले होते. कथा समाप्त झाल्याबरोबर त्यांना तिचा उर्दू अनुवाद करणें भाग पडलें. कारण कीं, कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, फिल्म डायरेक्टर मिस्टर भूतानी आणि त्यांचे साथीदार मिस्टर खलील आफताब हिंदी न जाणणारे होते. चित्र-कथेच्या सोयीसाठीं भूतानीसाहेबांच्या संमतीनें तींत अनेक प्रकारचे बदल करण्यांत आले. कांहीं नवीन गोष्टी घुसडण्यांत आल्या. कांहीं रद्द करण्यांत आल्या. ज्या गोष्टी प्रारंभीं निश्चित झाल्या होत्या, त्या सर्व रद्द करून कथेस एकदम नवें रूप देण्यांत आलें. त्यामुळें कथानकांत उणीव निर्माण झालीच पण कांहीं ठिकाणीं खऱ्या अर्थाचें व भाषेचें माधुर्य सुद्धां निघून गेलें. यानंतर शूटिंग सुरू झालें. पुनः कित्येक प्रसंग बदलण्यांत आले आणि शेवटीं रात्रंदिवस श्रम करून तीन महिन्यांत फिल्म तयार झाली.

"...या फिल्मबद्दल कंपनीनें मोठमोठ्या आशा बाळगल्या होत्या. धनवान् मालक व गरीब मजूर यांच्यांतील झगडा या कथेंत चित्रित केलेला असल्यामुळें चित्रपटाचें यश हुकमी होतें. मालकाचा स्वार्थपूर्ण व्यवहार, अत्याचार, दडपण, मनास येईल तसें वर्तन, मजुरांची दुर्दशा, त्यांच्या आयाबहिणींची दीन दशा आणि या सर्वांचा वाईट परिणाम हें सर्व या चित्रपटांत स्पष्ट आणि योग्य रीतीनें दाखविलें गेलें होतें... "

या चित्रपटांत एक ग्रामपंचायतीचेंहि दृश्य होतें. पंचायतीचे मुख्य प्रधान खुद्द प्रेमचंद होते. मिलमालक व मजूर यांच्या समन्वयाचे मार्ग हुडकून काढून दोघांत एकोपा निर्माण होण्याची शक्यता येथें दर्शविली आहे. गांधीवादांत महत्त्वाची गगलो गेलेली समन्वयवादाची भूमिका या ठिकाणीं प्रेमचंदांनीं घेतलेली होती. मिलमालक व मजूर यांनीं पितापुत्रांप्रमाणें वागावें, असा भावार्थ या कथेंतून प्रकट होत होता. गांधीवादांत असणारी कमतरताहि प्रेमचंद जाणून होते. फिल्मच्या या नावीन्यामुळें तीस यश प्राप्त होईल अशी आशा सर्वांना वाटत होती. पण नियंत्रण-मंडळानें फिल्मची छाटाछाट खूप केली. फिल्मचें स्वरूप जें होतें तेंहि बिघडून गेलें. प्रभावशाली दृश्यें होतीं तींच नेमकीं काटलीं केलीं. त्यामुळें फिल्मचा मूळ उद्देश नष्ट झाला आणि चेहरा विकृत होऊन गेला. मुंबई सरकार भांडवलदारांच्या बाजूचें नेहमीं असे. त्यानें फिल्म दाखविण्यास बंदी केली. मजूर-गिरणीमालक यांच्या झगड्याचें प्रदर्शन करून अशांतता निर्माण होऊं नये म्हणून या प्रकारची काळजी घेतली गेली. एकदीड वर्षांच्या प्रयत्नानें 'उसे गरीब मजदूर' या नांवानें फिल्म दाखविण्याची परवानगी मिळाली.

या सर्व घटनांमुळें प्रेमचंद निराश झाले. भांडवलवाले श्रीमंत, दिग्दर्शक सरकार इत्यादि लोकांच्या ओढाताणींत प्रेमचंदांच्या स्वतंत्र प्रकृतीचे अतोनात हाल झाले. त्यांचा स्वाभिमान तर दुखावला गेलाच, परंतु धनवान् वर्गाबद्दलची त्यांच्या मनांतील अढी अधिक दृढ झाली. संपत्ति धारण करणाऱ्या माणसाचें आणि प्रेमचंदांचें उभ्या जन्मांत जमलें नाहीं. ज्या इच्छा घेऊन ते मुंबईस आले होते, त्या सर्वांचा अशा प्रकारें चक्काचूर झाला. त्यांनीं 'नवजीवन' नांवाची आणखी एक चित्रकथा लिहिली, पण तींतहि त्यांना म्हणावेंसें यश प्राप्त झालें नाहीं. दिग्दर्शकांची मध्यस्ती त्यांना पदोपदीं जाचक

ठरली. सन्मित्र जैनेंद्रकुमार यांना प्रेमचंदांनीं लिहिलें, "मी ज्या हेतूंनीं येथें आलों होतों त्यांतील एकहि पुरा झाला नाहीं. हे निर्माते ज्या ढंगानें कथा तयार करतात त्यामध्यें थोडाहि फरक करण्यास ते राजी नसतात. भडक अश्लीलतेला हे लोक देखाव्याचा प्राण समजतात. अद्‌भुत गोष्टींवर यांचा भारी विश्वास. राजाराणी, त्यांच्या प्रधानांचीं कारस्थानें, नकली लढाया इत्यादि प्रमुख साधनें यांच्या हातांत असतात. मी कांहीं सामाजिक कथा लिहिल्या आहेत, ज्या सुशिक्षित समाजानेंहि पाहाव्यात अशा आहेत; पण त्यांवर फिल्म तयार केली तर ती चालेल कीं नाहीं याबद्दल या निर्मात्यांना नेहमीं शंका वाटते. हें वर्ष तर येथेंच राहणें आहे. कर्जबाजारी बनलों आहें. कर्ज फेडून टाकीन; पण लाभ होण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. 'गोदान' कादंबरीचीं शेवटचीं पृष्ठें लिहिणें आहे. येथें मन रमत नाहीं. आपल्या जुन्या स्थानावर जाऊन बसावें असें वाटतें. तेथें धन नसेल पण संतोष मात्र भरपूर आहे. येथें तर कष्ट होतात. आयुष्य फुकट जात आहे."

प्रेमचंदांच्या स्वतंत्र प्रकृतीचा कोंडमारा मुंबईच्या विलासी आणि वैभवसंपन्न अशा वातावरणांत कसा होत राहिला, हें यावरून ध्यानांत येण्यासारखें आहे. दुसऱ्या एका पत्रांत ते लिहितात, "'मजदूर' तुम्हांस पसंत पडला नाहीं हें मीं जाणलें. तें चित्र माझें आहे असें मी म्हणतों व म्हणूं शकतहि नाहीं. त्यांत एक रोमान्स भरून राहिलेला आहे, तो मात्र मीं लिहिलेला नाहीं. 'मजदूर'मध्यें माझें असें फारच थोडें उरलें आहे. खुद्द फिल्ममध्यें जें कांहीं आहे तें स्वतः दिग्दर्शकांनीं तयार केलेलें आहे. लेखक स्वतःस लेखणीबहादुर समजत असेल पण येथें मात्र डायरेक्टरचें साम्राज्य आहे. त्याच्या राज्यांत लेखकाची हुकमत कशी चालणार? त्याच्या हुकमतीखालींच लेखकानें वागलें पाहिजे. 'मी लोकांची रुचि आपल्यापेक्षां अधिक चांगल्या प्रकारें जाणूं शकतों' असें म्हणण्याची लेखकाची छाती दिग्दर्शकापुढें होणार नाहीं. तोच उलट ओरडेल, 'जनतेस काय हवें हें मीच बरोबर जाणतों. आणि येथें आम्हांस जनतेच्या पसंतीची पर्वा काय म्हणून असावी? हा धंदा आहे. धन मिळवणें हें आमचें ध्येय आहे. जनता जें मागेल तें आम्ही तिला पुरवूं.' या उद्दाम बोलण्याचें उत्तर असें कीं, 'अच्छा साहेब, आमचा सलाम घ्या

नि आम्हांला घरीं जाऊं द्या.' आणि तेंच मी करणार आहें. फिल्ममध्यें माझ्या मनास संतोष झाला नाहीं, म्हणून माघार घेत आहें. मी ध्येयवादाचा पुरस्कर्ता आहें पण त्यानें जनतेची खुली करमणूक कशी होणार ? पण या गोष्टी मला परवडणार नाहींत. माझ्याभोंवतीं माणसेंहि अशीं जमा झालीं आहेत कीं, त्यांना उर्दूहि समजत नाहीं आणि हिन्दीहि कळत नाहीं. इंग्रजींत अनुवाद करून सांगण्याचें काम करावें लागतें. मला आपली माझी जुनी कार्य-व्यवस्थाच ठीक वाटते..."

फिल्मी दुनियेस प्रेमचंद याप्रमाणें पूर्ण विटून गेले होते. धन कमाविण्याची इच्छा त्यांना नव्हतीच. त्यामुळें लक्ष्मीपुत्रांशीं त्यांचें जमलें नाहीं. शिवरानी-देवीसहि त्यांनीं लिहिलें, "येथें सर्व कांहीं सिनेमाच्या मालकाच्या हातांत आहे. लेखकाला कोणीच पुसत नाहीं. पैसा मिळविणें हेंच त्यांचें ध्येय असतें." प्रेमचंदांचें मनहि थोडें बालकासारखें होतें. श्रीमंती ऐटींत तें कधींच रमलें नाहीं. जमीनदार, कारखानदार, भांडवलवाले यांच्याशीं त्यांची दोस्ती कधींच जमली नाहीं. एवढी मुंबई करमणुकीच्या साधनांनीं गजबजलेली, पण प्रेमचंद मात्र सदा बेचैन झालेले. घरीं लिहिलेल्या एका पत्रांत ते लिहितात, "तुम्ही मुलांबाळांसमवेत सुखरूप असाल. आणि इकडे मी मात्र विचार करीत आहे कीं, हा दीड महिना कसा जाणार म्हणून. काम करून करून तरी किती करणार ? बैल तर नव्हे मी ? माणसाची करमणूक होण्यास कांहीं साधन तरी असावें कीं नाहीं ? माझें मनोरंजन घरच्या मुलांबाळांतच सर्वांत अधिक होतें. मनोरंजनाचें याशिवाय दुसरें साधन माझ्या जीवनांत नाहीं. जेवावयास बसावें तों बरें वाटत नाहीं. कारण येथें तर सर्वत्र साहेबी थाटमाट. आणि साहेब म्हटला कीं माझा जीव घाबरून जातो." प्रेमचंदांचा जीव एवढ्या अफाट मुंबईत रमला नाहीं. फिल्मी दुनियेस कंटाळून प्रेमचंद परत बनारसला आले. 'कशी काय मुंबई आहे ?' या पत्नीच्या प्रश्नास उत्तर देतांना प्रेमचंद बोलले, "काय सांगूं ? फिल्मी जगत् हा एक नवाच संसार आहे. तिथें साहेबच साहेब आहेत. माझ्याशीं त्यांचा व्यवहार फार चांगला असे. मीं एक घर भाड्यानें घेतलें आहे. तूं येत असशील तर दाखवीन तुला. बनारसला असतांना जसा मी घरून प्रेसमध्यें व प्रेसमधून घरीं जात-येत असें त्याच-प्रमाणें तेथील स्टुडिओचें काम चाले. पण या ठिकाणीं तुम्हां सर्वांच्या समवेत

असल्यामुळें कसलीच चिंता नाहीं. येथें जीव घाबरत नाहीं. तेथें काय कामच काम. ज्यांना नाटक-सिनेमाचा शोक आहे त्यांना मुंबई फार चांगली. मला काय तिचा उपयोग ? मियाची दौड मशिदीपर्यंत. तसेंच माझेंहि जाणें स्टुडिओ-पर्यंत. माझी प्रकृति तेथें बिघडत राहिली."

कांहीं दिवस प्रेमचंद सहकुटुंब मुंबईस येऊन राहिले होते. कामाचा ताण फारच पडत होता. एका स्टुडिओवाल्यानें सांगितलें, "आमच्याबरोबर तुम्ही इंग्लंडला चला." यासंबंधीं शिवरानीदेवी सांगते, "घरीं येऊन मला म्हणूं लागले, स्टुडिओंतील लोक म्हणतात, इंग्लंडला चला. तेथें फिल्म तयार करूं. एक वर्ष राहून परत येऊं. एका वर्षांचे दहा हजार रुपये मला मिळतील. पांच चित्रकथा मला लिहाव्या लागतील." परदेशच्या प्रवासांत प्रकृति पूर्णपणें बिघडून जाईल या भीतीनें शिवरानीदेवीनें इंग्लंडला जाण्याची परवानगी प्रेमचंदांना दिली नाहीं. प्रेमचंद चित्रपटांच्या बाबतींत अधिकच उदास बनले. महालक्ष्मी सिनेटोननें 'सेवासदन' कादंबरीवर बोलपट तयार केला. ती फिल्म पाहून प्रेमचंद अधिकच कष्टी झाले. मुंबईची हवा सर्व दृष्टींनी त्यांना मानवली नाहीं. बनारसला जाऊन राहण्याचा त्यांचा आग्रह सुरू झाला. फिल्मी जगतास रामराम ठोकून प्रेमचंदांनीं त्या लक्ष्मीनगरीस कायमचा नमस्कार केला. धन, वैभव, ऐश्वर्य, विलास या जगांतील मोहांस प्रेमचंद विटून गेले. सरळ, साध्या जीवनाचा आदर्श हजारों लोकांपुढें ठेवण्याच्या इराद्यानें ते चित्रपट-व्यवसायांत पडले पण लागलीच त्यांच्या ध्यानांत आलें कीं, येथें ध्येयवादास बिलकुल अवसर नाहीं. संपत्तीच्या उब्रेंत ध्येयवादाचीं रोपें नेहमीं कोमेजून जातात.

●●●

## ध्येयवादी साहित्यिक : ६

फिल्मी जगतांतून प्रेमचंद निराश झाले हें एक प्रकारें बरेंच झालें. साहित्यिकांचें खरें कर्तव्य समाजनिरीक्षण करून आपल्या कलेच्या द्वारां त्यास सन्मार्गावर लावणें हेंच असतें. प्रेमचंद निष्ठावान् साहित्यिक होते. त्यामुळें

भांडवलदार, निर्माता, नटनटी, दिग्दर्शक, संगीत-दिग्दर्शक इत्यादींच्या गडबडींत प्रेमचंदांसारख्या ध्येयवादी साहित्यिकाराचें जमण्यासारखें नव्हतें, त्यामुळें प्रेमचंदांनीं तेथून निरोप घेतला व बनारस येथें राहून पुनः त्यांनीं आपल्या साहित्याच्या उपासनेस आरंभ केला. प्रेमचंदांची कीर्ति आतां चोहों दिशांनीं वाढीस लागली होती. सेवासदन ( १८१६ ), प्रेमाश्रम ( १९२२ ), रंगभूमि ( १९२५ ), कायाकल्प ( १९२८ ), ग़बन ( १९३१ ), कर्मभूमि ( १९३२ ) इत्यादि एकापेक्षां एक सरस अशा कादंबऱ्या लिहून प्रेमचंद यांनीं आपलें हिंदी साहित्यांतील स्थान निश्चित केलें होतें. प्रेमचंद यांची कीर्ति उभ्या हिंदुस्थानांत पसरली होती.

हिन्दी हीच राष्ट्रभाषा होण्यासारखी आहे असें समजून भारतांत सर्वत्र हिंदीचा प्रसार व प्रचार सुरू झाला होता. हिंदी भाषेच्या स्वरूपाबद्दल प्रेमचंदांसारख्या मुरब्बी साहित्यिकाकडून कांहीं मार्गदर्शन झालें तर त्याचा मोठा उपयोग होईल म्हणून प्रेमचंद यांना ‘ दक्षिण भारत हिन्दी प्रचार सभा ’ या संस्थेकडून वार्षिक पदवीदान-समारंभास आमंत्रण देण्यांत आलें. प्रेमचंद यांनीं तें आमंत्रण मोठ्या आनंदानें स्वीकारलें. १९३४ सालीं शिवरानीदेवी, प्रेमचंद व नाथूराम प्रेमी असे तिघे जण मद्रास येथें जाण्यास निघाले. मद्रासच्या हिन्दीप्रेमी लोकांनीं प्रेमचंदांचें मनापासून स्वागत केलें. स्टेशनवर हारतुरे घेऊन तीनशें स्त्रीपुरुष प्रेमचंदांचा सत्कार करण्यासाठीं उपस्थित होते. भाषेचा अभ्यास करून करण्यांत मद्रासी लोक कोणास हार जाणार नाहींत. शिवरानीदेवीस प्रेमचंद त्या वेळीं बोलले, “ पहा, या प्रांतांत हिन्दीचा प्रचार किती जोरदार आहे. महात्मा गांधींच्या तपस्येचें हें सर्व फळ आहे. जें कार्य ते हातांत घेतील तें सफल करून दाखवतील. इंग्रजी भाषा याच लोकांनीं प्रथम उत्तम प्रकारें आत्मसात् केली. मोठमोठ्या अधिकारांवर असणारे फर्डे इंग्रजी बोलणारे लोक याच प्रान्तांतील आहेत. आज हिन्दीची उपासना येथील लोक करूं लागले आहेत. या ठिकाणीं हिन्दीचें भविष्य उज्ज्वल आहे. ” मद्रासच्या हिंदीप्रेमी मंडळींत प्रेमचंदांनीं नवजीवन निर्माण केलें. पांच-सहा दिवस त्यांचें वास्तव्य मद्रास येथें होतें. तेथून म्हैसूर, बंगलोर इत्यादि ठिकाणींहि प्रेमचंदांचा आदरसत्कार चांगल्या प्रकारें झाला.

प्रेमचंदांच्या या दक्षिण भारताच्या दौऱ्यासंबंधीं मद्रासचे हिन्दी-प्रचारक

श्री. व्रजनंदन शर्मा यांनीं लिहिलें आहे, "आम्हीं प्रचारकांनीं त्यांना मधमाशांप्रमाणें घेरलें होतें. पुष्कळ हिंदीप्रेमी व विद्यार्थी दहा-दहा रुपये खर्च करून प्रेमचंदांचें दर्शन घेण्यासाठीं आले होते. शिवरानीदेवीसुद्धां त्यांच्या-बरोबर होती. प्रेमचंद दक्षिण भारतांतील सर्व हिन्दी प्रचार केंद्रांना भेट देणार आहेत, असें समजल्याबरोबर द्राविड भाषा बोलणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर एक आनंदाची चमक उठून दिसली. जवाहरलाल नेहरू किंवा राजेन्द्रप्रसाद यांच्या दौऱ्यापेक्षां प्रेमचंदांचा दौरा कोणत्याहि बाबतींत कमी नव्हता. प्रेमचंद राष्ट्र-भाषेचें गौरवस्थान होतें. हिन्दी साहित्याचें दारिद्य प्रेमचंदांनींच दूर केलें. प्राचीन साहित्यांत तुलसीदास व आधुनिक साहित्यांत प्रेमचंद यांच्याच नांवां-वर दक्षिण भारतांत सुद्धां आमचें मस्तक उंच झालें आहे. वाचकांना आश्चर्य वाटेल, प्रेमचंद यांना उत्तरेपेक्षां दक्षिणेंतच अधिक मान होता. कारण येथील लोकांनीं त्यांच्याकडे कलाकार व ध्येयवादी लेखक या दृष्टीनीं पाहिलें होतें. मद्रास प्रान्तांतील हिंदी विद्यार्थी समाज, प्रेमचंदांच्या नांवाबरोबर हर्षित होऊन गेला आहे. चांगले चांगले शिकलेले लोक तर प्रेमचंदांना टॉल्स्टॉय म्हणून संबोधतात.

हिन्दी भाषेच्या प्रचारकांनाच प्रेमचंद मार्गदर्शन करीत, असें नव्हे. संपादक म्हणून कित्येक नव्या लेखकांना प्रेमाच्या सूचना त्यांनीं दिल्या आहेत. अनेक ठिकाणीं भाषणें देऊन साहित्यिकाच्या कर्तव्यासंबंधीं त्यांनीं जाणीव करून दिलेली आहे. वाङ्मयीन कार्य करणाऱ्या कांहीं संस्था स्थापन कराव्यात व एकत्रित येऊन साहित्यचर्चा व्हावी, यासाठींहि प्रेमचंद त्यांचे प्रयत्न चालू असत. मुन्शी दयानारायण निगम व प्रेमचंद यांच्या साह्यानें १९२३-२४ सालीं 'हिंदुस्तानी एकॅडेमी' नांवाची संस्थाहि चालू झाली होती. सदर संस्थेच्या बैठकीस प्रेमचंद उपस्थित असत. या संस्थेच्या कारभारांत इतर लोकांचाहि भरणा झाल्याकारणानें कार्य करणाऱ्या साहित्यिकांना वाव राहिला नाहीं. त्यामुळें प्रेमचंद निराश झाल्यासारखे होत. या संस्थेसंबंधीं त्यांनीं उद्गार काढले आहेत, "या ठिकाणीं कार्य करण्यास भरपूर वाव नाहीं. हिंदुस्थानांतील हरएक भाषेचा एक एक लेखक या कमिटींत असावा. एखाद्या विषयावरील नवें पुस्तक निघालें कीं त्या त्या सभासदास तें दाखविलें जावें. यामुळें पुस्तकांच्या निकृष्ट निर्मितीस आळा बसेल; लेखकांच्या

गुणांचा विकास होण्यास मदत होत राहील; साहित्याची उन्नति लेखकांच्या गुणविकासाबरोबरच होत राहील. नव्या लेखकांच्या गुणदोषांची चर्चा कोण करणार ? नुसतें 'ठीक आहे' म्हणून शेरा मारणें न्यायाचें नाहीं. नव्या लोकांना मार्गदर्शन करणें हें विद्वान् लेखकांचें एक कर्तव्य आहे. ...... पोटभऱ्या प्रकाशकांची आज आवश्यकता नाहीं. लेखकालाहि थोडा द्रव्यलाभ झाला पाहिजे. एकॅडेमी व लेखक यांच्यांत स्नेहाचा कौटुंबिक संबंध स्थापन व्हावयास पाहिजे.... साहित्याची अभिवृद्धि व्हावयास पाहिजे. ज्या भाषेचें साहित्य उत्तम तिचा समाजहि प्रगतिपथावर आहे असें समजावें. समाजाच्या प्रगतीबरोबर त्याची राजनीतिहि चांगलें रूप धारण करणारी असते...... मोठमोठ्या लोकांचें लक्ष गरिबांच्या प्रश्नांकडे केव्हां वळणार !..." प्रेमचंदांच्या मनांत या प्रकारचे विचार सदैव घोळत असत. लेखकांची चिंता तर त्यांना रात्रंदिवस वाटत होती. सत्यजीवन वर्मा यांच्या मदतीनें प्रेमचंदांनीं 'लेखक संघ' नांवाची एक संस्थाहि स्थापन केली होती. हिचें रूपांतर पुढें 'प्रगतिशील लेखक संघ' या संस्थेंत होऊन या संस्थेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष मुन्शी प्रेमचंद झाले. या स्थानावरून मुन्शी प्रेमचंदांनीं जें भाषण केलें तें भारतीय साहित्याच्या इतिहासांत अजरामर होऊन राहण्यासारखें आहे. त्या भाषणानें अनेक भाषांतील साहित्यकारांना स्फूर्ति व मार्गदर्शन मिळालें आहे. लखनौ येथें सन १९३६ मध्यें झालेल्या या महत्त्वाच्या भाषणाचा कांहीं भाग येथें देणें आवश्यक आहे–

"भाषा साधन आहे, साध्य नाहीं. आतां आपल्या भाषेनें असें रूप धारण केलें आहे कीं, केवळ भाषेपेक्षां तिच्यांतील भावाकडे अधिक लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. ज्या भाषेंत प्रारंभीं 'बागो बहार', 'बैताल पचीसी' आदि रचना झाली त्याच भाषेंत आतां शास्त्र आणि विज्ञान यांची चर्चा व्हावयास पाहिजे...जें कांहीं लिहिलें जातें तें साहित्य असें मुळींच नाहीं. ज्यांतून सत्यदर्शन होतें, ज्याची भाषा प्रौढ व डौलदार आहे आणि समृद्ध असे अनुभव ज्यांतून प्रकट होतात त्यास साहित्य म्हणावें. अद्भुतरम्य परीकथा, भूतपिशाचांच्या गोष्टी, प्रेमवियोगाचीं आख्यानें यांना कांहीं एका काळीं फार महत्त्व होतें ही गोष्ट खरीच, पण आज आपणांस त्यांत खरें स्वारस्य वाटत नाहीं....माझ्या मतें 'जीवनाची आलोचना' हीच साहित्याची सर्वोत्तम व्याख्या आहे.

" ...आपल्या अनुभूतींची तीव्रता वाढविणें हेंच काव्य व साहित्य यांचें उद्दिष्ट आहे. स्त्री-पुरुषांचें प्रेम हेंच केवळ माणसाचें जीवन नाहीं. शृंगारिक मनोभाव मानवी जीवनाचा एक अंशमात्र आहे....आज साहित्यानें केवळ मनोरंजन करून चालणार नाहीं. नायकनायिकांचे संयोगवियोग वर्णन करणें एवढेंच साहित्यिकाचें कर्तव्य नसून जीवनांतील इतर अनेक प्रश्नांचा विचार त्यानें केला पाहिजे.

" ...नीतिशास्त्र व साहित्यशास्त्र यांचें ध्येय एकच आहे. उपदेश करण्याच्या पद्धतीमध्यें मात्र थोडा फरक आहे. नीतिशास्त्र तर्क व उपदेश यांच्या मदतीनें बुद्धि व मन यांच्यावर प्रभाव दाखवितें, तर साहित्य मानसिक अवस्था व नाना प्रकारचे भाव यांचें वर्णन करीत असतें. मानवी जीवनांत आपण जें जें पाहतों, ज्या ज्या आपत्ति आपल्यावर येतात, त्या त्या गोष्टींतून साहित्याची निर्मिति होत असते. ज्या साहित्यामुळें आपली अभिरुचि जागृत होणार नाहीं, आध्यात्मिक आणि मानसिक तृप्ति होणार नाहीं, आपलें सौंदर्य-प्रेम जागृत होणार नाहीं, सत्यसंकल्पांचा जन्म ज्यामुळें होणार नाहीं, अनेक संकटांत धैर्यानें तोंड देण्याची दृढता ज्यामुळें उत्पन्न होणार नाहीं, त्याला साहित्य हें नांव देखील शोभणार नाहीं....

" ...पूर्वींच्या जमान्यांत समाजाचा लगाम धर्माच्या हातीं होता. मनुष्याची आध्यात्मिक आणि नैतिक सुधारणा धर्माच्या आदेशानें होत असे; आज साहित्यानें हें काम आपल्या शिरावर घेतलें आहे. सौंदर्य-प्रेम या साधनानें साहित्य हें कार्य करणार आहे. ज्याच्यांत सौंदर्यप्रेम नाहीं, असा मनुष्य सहसा सांपडणार नाहीं. साहित्यकारांत ही वृत्ति जितकी अधिक जागृत व सक्रिय राहते तितक्या प्रमाणांत त्याच्या कलाकृतींत अधिक प्रभाव निर्माण होतो. सृष्टीचें निरीक्षण आणि स्वतःची तीव्र अनुभूति यांच्या साह्यानें त्याच्या सौंदर्य-बोधशक्तींत इतकी तीव्रता उत्पन्न होते कीं, जें असुंदर आहे, अभद्र आहे, माणुसकीस सोडून आहे, त्याचा त्याला तिटकारा वाटूं लागतो. जो दलित आहे, पीडित आहे, वंचित आहे, मग ती व्यक्ति असो किंवा समाज असो, त्याची तरफदारी व वकिली करणें हेंच साहित्यिकाचें परम कर्तव्य आहे...

" ...आपल्या सर्व कमजोरींचें कारण आपल्यांत निर्माण झालेली हीन अभिरुचि व प्रेमभावाचा अभाव हें आहे. जेथें खरें सौंदर्यप्रेम आहे, येथें

प्रेम अमर्याद आहे, तेथें कमजोरी कोठून राहणार ? प्रेम हेंच आत्म्याचें भोजन आहे. हें भोजन मिळालें नाहीं किंवा दूषित झालेलें मिळालें तर साऱ्या आपत्ति एकदम निर्माण होतील. कलाकार सौंदर्याची अनुभूति निर्माण करून प्रेमाची उष्णता उत्पन्न करतो. त्याचें एक वाक्य, एक शब्द, एक संकेत, अशा प्रकारें आपल्या अंतःकरणांत घुसतो कीं, सारें चित्त एकदम प्रकाशित होऊन जातें... पण सौंदर्य म्हणजे तरी काय ? सूर्योदय आणि सूर्यास्त आपण पाहिले आहेत. उषा आणि संध्या यांची लाली आपण पाहिली आहे. सुगंधानें परिपूर्ण भरलेलें सुंदर फूल आपण पाहिलें आहे. चिवचिव असे गोड शब्द बोलणाऱ्या चिमण्या आपल्या परिचयाच्या आहेत. खळखळ आवाज करून वाहणाऱ्या नद्या आपण पाहिल्या आहेत. नाचणारे झरे आपण पाहिले आहेत...सौंदर्य सौंदर्य म्हणून म्हणतात तें हेंच. हीं सर्व दृश्यें पाहिल्याबरोबर आपलें अंतःकरण कां जागृत होतें ? कारण यांच्यांत रंग आणि ध्वनि यांचा सुंदर मिलाफ झालेला असतो. पेटीच्या स्वरसाम्यांतील मेळ हीच संगीतांतील मोहकता आहे. आपली साहित्यिक रचनाहि अनेक तत्त्वांच्या रमणीय संयोगानें बनलेली आहे...

" ... साहित्यिक किंवा कलाकार स्वभावतःच प्रगतिशील असतो... जगताच्या नश्वरतेबद्दल काथ्याकूट करणारी कविता निरर्थक आहे. आज मासिकांचीं पानेच्या पानें प्रेमकथांनीं भरलेलीं दिसतात तींहि आपल्या दृष्टीनें निरर्थक आहेत. दोन प्रेमी जीवांबद्दल आपण फक्त अश्रु ढाळले तर आपल्या सौंदर्याच्या रुचींत गति कशी निर्माण होईल ? कर्तव्याचा संदेश देणारी कला आज आपणांस पाहिजे. हजरत इक्बालच्याबरोबर आज आपणहि म्हणूं शकतों कीं : जीवनाच्या रहस्याच्या शोधांत तुम्ही असाल तर संघर्ष हाच तुमचा पथदर्शक आहे. सागरांत जाऊन विश्रांति घेणें नदीला लज्जास्पद वाटलें पाहिजे. आनंद मिळविण्यासाठीं घरट्यांत बसून कसें भागेल ? फुलांनीं युक्त अशा फांद्यांवर किंवा नदीच्या तीरांवरच आपणांस आलें पाहिजे...

" ... आनंद ही एक उपयोगी वस्तुच आहे. उपयोगाच्या दृष्टीनें पाहिल्यास एकच गोष्ट सुखहि देऊं शकते, दुःखहि देऊं शकते. आकाशांत निर्माण होणारी मधुर लाली निःसंशय सुंदर असते. पण आषाढाच्या महिन्यांत ही लाली आपणांस दिसेल तर ती प्रसन्नता आणणार नाहीं. त्या वेळीं आकाशांत काळे काळे ढगच आपणांस आनंदित करताता. फुलला पाहून

आपणांस यासाठीं आनंद होतो कीं, त्यापासून फळाची निर्मिति होणार असते. सृष्टीशीं आपल्या जीवनाचा सूर मिळवून राहण्यांत आध्यात्मिक सुख एवढ्यासाठीं मिळत असतें कीं, त्यामुळें आपलें जीवन विकसित आणि पुष्ट होतें. वृद्धि आणि विकास हाच सृष्टीचा नियम आहे....

"... सौंदर्याची कसोटीहि आपण आतां बदलली पाहिजे. पूर्वी अमीर-उमरावांच्या विलासांत आपण सौंदर्य पाहिलें. त्यांच्या सुखदुःखाच्या भावना, आशानिराशा, यांचेंच वर्णन होत असे. कलाकाराची दृष्टि त्याचे बंगले व अंतःपुर यांच्याकडेच गुंतून राहिलेली असे. गरिबाची झोपडी त्यांच्य नजरेंत कोठून येणार ! माणुसकीपासून वंचित झालेला मनुष्य त्याच्या थट्टेचाच विषय होता. तोहि मनुष्य आहे, त्याला पण हृदय आहे, त्याच्याहि कांहीं आशाआकांक्षा आहेत—या गोष्टी कलाकाराच्या कल्पनेंतहि येत नसत. जीवनसंग्रामांतील सौंदर्य त्याला कसें दिसणार ? उपासमार आणि नग्नता यांमधील सौंदर्य त्याच्या दृष्टीस कसें पडणार ? सुंदर स्त्रींतच सौंदर्य हुडकणाऱ्या कलावंतास रूपविहीन मुलांबाळांच्या आईंत सौंदर्य कसें दिसणार ! शेतांत घाम गाळीत काम करणाऱ्या स्त्रीकडे त्याचें लक्ष तरी कसें जाणार ? रंगलेले ओठ, गाल आणि भुंवया यांतच सौंदर्याचा निवास आहे अशी ज्याची खात्री, त्यास जटा झालेल्या केसांत, सुरकुत्या पडलेल्या ओठांत आणि खड्डे पडलेल्या गालांत सौंदर्य दिसणार तरी कसें ? पण त्या कलाकाराची दृष्टि साफ झाली तर त्याला दिसून येईल कीं, त्या रंगलेल्या ओठांत आणि गालांत रूपाचा गर्व आणि निष्ठुरता दडलेली आहे. आणि या सुरकतलेल्या ओठांत आणि गालांवरील अश्रूंत त्याग, श्रद्धा आणि कष्ट-सहिष्णुता आहे. होय, त्याच्यांत नाजुकपणा नाहीं, देखावा नाहीं, सुकुमारता नाहीं....

" ... तारुण्यांतील प्रेमगान करण्यांतच आपली कला रममाण झालेली आहे. पण छातीवर हात ठेवून कविता गाण्यांत किंवा नायिकेच्या विरह-गीतांतच कला नाहीं. ध्येयवाद, हिम्मत, धैर्य, आत्मत्याग यांचेंच नांव जवानी—तारुण्य—आहे......

" ...साहित्यकाराचें ध्येय केवळ सभा गाजविणें किंवा मनोरंजन करणें एवढेंच नाहीं. देशभक्ति व राजनीति यांच्यामागून चालणारी सत्यता म्हणजेहि

साहित्याचें कार्य नव्हे; पण या सर्वांच्या पुढें मशालीच्या रूपांत राहून मार्ग दाखविणें हेंच साहित्यकाराचें कर्तव्य आहे......

" ...... ज्यांना धनवैभवाची आसक्ति आहे, त्यांना साहित्यमंदिरांत स्थान नाहीं. निःसीम उपासकांची येथें आवश्यकता आहे. सेवा हेंच जीवनाचें सार ज्यांनीं मानलें आहे, ज्यांच्या चित्तांत दुःखाच्या वेदना आहेत, प्रेमाची प्रेरणा आहे, तेच खरे साहित्यिक. सेवेंतच खरा आध्यात्मिक आनंद आहे..........समाजाचा झेंडा खांद्यावर घेऊन जाणारे शिपाई आपण साहित्यिक आहोंत. साध्या जीवनांतून उंच ध्येय गांठण्यावर आमचें चित्त पाहिजे...... "

प्रेमचंदांनीं आजवर जीं जीं स्वप्नें पाहिलीं तीं तीं साकार करण्याचा प्रयत्न त्यांनीं या भाषणांत केलेला आहे. प्रगतिशील लेखक संघाच्या अध्यक्षीय भाषणाचा शेवट करतांना त्यांनीं म्हटलें, " ज्यांत उच्च प्रकारचें चिंतन आहे, स्वाधीनतेचा भाव आहे, सौंदर्याचें सार आहे, निर्मितीची प्रेरणा आहे, जीवनांतील सत्याचा प्रकाश आहे, जें आमच्यांत गति आणि संघर्ष निर्माण करील, बेचैनी पैदा करील, तेंच साहित्य खऱ्या कसोटीस उतरेल. कारण आतां जास्त वेळ निद्रा घेणें हें मृत्यूचें लक्षण आहे. "

● ● ●

# किसान-मित्र प्रेमचंद : ७

भारताच्या सर्वांगीण उन्नतीची भाषा जेव्हां जेव्हां बोलली जाते, लिहिली जाते, तेव्हां तेव्हां या देशांतील शेतकऱ्यांची स्थिति सुधारली पाहिजे, या एका मुद्द्यास फारच महत्त्व देण्यांत येतें. या अवाढव्य देशांत शेंकडा ८० टक्के लोक शेतीवर उपजीविका करतात तेव्हां देशाचा उद्धार म्हणजे शेतकऱ्यांचा-किसानांचा उद्धार होय, या तत्त्वास चांगलीच चलती मिळून अनेक चळवळींचा व राजकीय पंथांचाहि उदय या एकाच महत्कार्यासाठीं झाला. लेखक आपली लेखणी या ग्रामीण समाजाकडे वळवूं लागले आणि जानपद साहित्याला एक प्रकारचें वैशिष्ट्य प्राप्त झालें. शेतकऱ्यांचीं सुखदुःखें, त्यांच्या आशानिराशा,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ८५५८

त्यांच्या मनांतील लालसा, त्यांच्या सामाजिक चालीरीती इत्यादींचा पडसाद भारतीय देशी भाषांतून उमटूं लागला. ग्रामीण प्रश्नावरच ललितकथा लिहावयाच्या, ही एक पुढें टूमच बनल्यामुळें कित्येक प्रसंगीं त्यांत निर्जीवता व कृत्रिमता येत राहिली हीहि गोष्ट खरीच. पण यामुळें शेतकऱ्यांच्या जीवनावरील श्रेष्ठ ललितकृतींचा महिमा कमी थोडाच होणार ! ग्रामीण प्रश्नांचा विशाल सहानुभूतीनें व आपल्या सामर्थ्यवान् लेखणीच्या जादूनें सर्वांगीण विचार करणारा मुन्शी प्रेमचंदांएवढा साहित्यिक भारतांत दुसरा झाला नाहीं. दलित, पीडित, पतित यांचीं मानसिक आन्दोलनें तपासणारा श्रेष्ठ कलाकार म्हणून शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांची महती मान्य करूनहि हेंच म्हणावेंसें वाटतें कीं, भारतीय किसानांचा एकमेव साहित्यिक मित्र म्हणजे मुन्शी प्रेमचंद.

मुन्शी प्रेमचंद यांनीं आपल्या ललितकृतींतून सर्व प्रकारच्या लोकांना स्थान दिलें आहे; पण भारतीय शेतकऱ्यांचा प्रश्न निघाला, खेडेगांवच्या बिकट समस्यांची चर्चा निघाली कीं प्रेमचंदांच्या लेखणीस तेज प्राप्त होई. सजीव होऊन ती सहस्त्र मुखांनीं दीनदुःखी शेतकऱ्यांची करुण कहाणी सांगूं लागत असे. प्रेमचंदांचा जन्मच खेडेगांवीं झाला आणि त्यांचें बालपणहि शेतकरी लोकांतच गेलें. मध्यमवर्गीय परिस्थितींत गरिबीचे जे चटके भोगावे लागतात, त्या सर्व अवस्थांतून प्रेमचंदांना जन्मभर जावें लागलें होतें. दारिद्र्यामुळें मानवी भावना कशा तुडाविल्या जातात, आशा-आकांक्षा कशा धुळीस मिळतात, या सर्व गोष्टी प्रेमचंदांच्या अनुभवांतील होत्या. शाळेंतील मास्तर असतांना वा शिक्षणखात्यांत इन्स्पेक्टर असतांना दौऱ्यावर निघते वेळीं त्यांनीं अनेक खेड्यांना भेटी दिल्या आणि भारतीय शेतकऱ्यांचें जीवन जवळून निरखून पाहिलें—अनुभवलें. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून भारतीय कृषकवर्गाचें एवढें जिवंत चित्र आपणांस पहावयास मिळतें तें त्यांच्या विस्तृत व दयापूर्ण अंतःकरणांतील सहानुभूतीमुळें. त्यांनीं सुमारें तीनशें कथा लिहिल्या. त्यांतील निम्म्याअधिक कथांतून भारतीय शेतकऱ्यांची कैफियत अत्यंत आपुलकीनें मांडलेली आपणांस दिसेल. या झुंझार कलावंताची दृष्टि भारतीय किसानांच्या दुःखद यातना पाहून नेहमीं पाणावलेली दिसून येते. खेडेगांवच्या संस्कृतीवर प्रेमचंदांचें विलक्षण प्रेम होतें. सरळ, प्रामाणिक, सहज, साधेंसुधें, निर्मळ म्हणून ग्रामीण जीवनाचें अतिरिक्त गोडवे या श्रेष्ठ

कथाकारानें गाइिले नाहींत, तर त्यांतील दोषांचें, विकृतींचेंहि दिग्दर्शन अति हळुवार पद्धतीनें प्रेमचंदांनीं केलें आहे. भारतीय किसानाची परिस्थिति सुधारावी, त्याचीं दुःखें कमी व्हावींत, तो शहाणा व्हावा, या एकाच हेतूनें प्रेरित होऊन प्रेमचंदांनीं आपल्या कथासाहित्याची उभारणी केली आहे.

कलेसाठीं कला किंवा अतिरिक्त सौंदर्याचें वा भोगलालसेचें वेड यांनीं त्यांच्या साहित्यिक मनाला पछाडलेलें नव्हतें. प्रेमचंद अव्वल दर्जाचे कलावंत होतेच, परंतु त्यांच्या सर्व कलाकृति दलितांच्या अश्रुबिंदूंनीं पावन झाल्या आहेत. जो दलित आहे, पीडित आहे, वंचित आहे, मग ती व्यक्ति असो वा समाज असो, त्याची सेवा करणें, त्याची वकिली करणें, हेंच साहित्यिकाचें कर्तव्य म्हणून प्रेमचंद आग्रहानें सांगतात. सन १९३६ सालीं अखिल भारतीय प्रगतिशील लेखक संघाच्या लखनौच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळीं प्रेमचंदांनीं अध्यक्षपदावरून जें भाषण केलें आहे तें सर्व तथाकथित साहित्यकारांनीं मनन करण्यासारखें आहे. त्यांच्या मतें, "साहित्यकारका लक्ष्य केवल महिफल सजाना और मनोरञ्जनका सामान जुटाना नहीं है — उसका दर्जा इतना न गिराइये। वह देशभक्ति और राजनीतिके पीछे चलनेवाली सचाई भी नहीं, बल्कि उनके आगे मशाल दिखाती हुई चलनेवाली सचाई है।" आणि या आदर्शानुसार प्रेमचंदांच्या ललितकृतींची निर्मिति झालेली दिसून येते. श्रमिक शेतकऱ्यांचें आयुष्य प्रेमचंदांच्या डोळ्यासमोर होतें. स्वतः प्रेमचंद आठ-आठ दहा दहा तास श्रमत असत. ऐपत असूनहि त्यांनीं चैनीस वा विलासास आपल्या जीवनांत कधींहि स्थान दिलें नाहीं. घरीं स्वतःचें काम—खोली झाडण्यापासूनचें—स्वतः करीत असत. सेवाधर्म तर त्यांच्या व्यक्तित्वाचा एक विशेष पैलू होता. प्रेसमधील कामगारांवर त्यांची दृष्टि वात्सल्यानें पूर्ण भरलेली होती. अनेक दीन-दुःखितांना त्यांनीं आसरा दिला. अनेकांच्या यातना त्यांनीं दूर केल्या. प्रेमचंद स्वतःस तर मजूर समजत असत. या मजूर साहित्यिकाच्या जीवनांत विलासास कोठून स्थान मिळणार ! प्रेमचंदांनीं निक्षून सांगितलें आहे, "जिन्हें धनवैभव प्यारा है, साहित्यमंदिरमें उनके लिये स्थान नहीं है। यहाँ तो उन उपासकोंकी आवश्यकता है, जिन्होंने सेवा ही अपने जीवनकी सार्थकता मान ली हो, जिनके दिलमें दर्द की तड़प हो और मुहब्बत का जोश हो।" आणि

प्रेमचंदांच्या कथासाहित्यांतून हीच अनुभूति प्रकट झालेली दिसून येते. दलितांची कैफियत मांडण्याचें ठरल्यावर या देशांत शेतकरी मजूर यांच्याइतकें दुःखी कोणी नाहीं व याच दीन-दुबळ्यांनीं देश भरून गेला आहे. यांच्या उद्धाराखेरीज देशाचा उद्धार कसा? ही विचारसरणी प्रेमचंदांनीं बरोबर हेरली आणि तिला अनुसरून त्यांची साहित्यसृष्टि आकारास आली. प्रेमचंदांच्या साहित्यांत ठायीं ठायीं प्रेमचंदांचें जीवन प्रकट झालेलें दिसतें. या महान् आत्म्याचा साक्षात्कार पदोपदीं वाचकास घडून येतो. प्रेमचंदांच्या पत्नीनें—श्रीमती शिवरानीदेवीजींनीं—'प्रेमचंद घरमें' नांवाचें एक अत्यंत रमणीय पुस्तक लिहिलें आहे; त्यांत प्रेमचंदांचें मूल्यमापन करतांना त्या लिहितात, "वह बहुत ऊँचे हृदयके आदमी थे। यहाँ तक कि उन मज़दूरों को भी वे अपने समान ही समझते थे। सबकी तकलीफोंका ध्यान रखते थे। वे अक्सर अपने को मज़दूर कहते। ... मेरे दिलमें बारबार यही उठता है कि वे कोई सन्त थे!" आयुष्यभर सहचारिणी म्हणून भाग्य लाभलेल्या देवीजींच्या या उद्‌गारांत खचित सत्यदर्शन आहे. रंजल्या-गांजलेल्यांची चिंता करणाऱ्या प्रगल्भ मानवासच आपण संत समजतों नाहीं?

या रंजलेल्या व गांजलेल्या समाजाची सेवा प्रेमचंदांच्या हातून घडलेली आहे. खेडेगांवच्या शेतकऱ्यांवर त्यांचें प्रेम आहे तें यासाठीं. अंधश्रद्धा, खोटी मर्यादा, अज्ञान, वेडगळ समजुती, डोईजड कर्ज या ओझ्याखालीं भारतीय किसान कसा दडपलेला आहे, हें त्यांनीं डोळ्यांनीं पाहिलें होतें. या सर्व आपत्तींतून भारताचा हा भूमिपति मुक्त झाल्याखेरीज देश स्वतंत्र झाला असें कसें म्हणतां येईल? 'पंच-परमेश्वर' 'बेटी का धन', 'नमक का दारोग़ा' इत्यादि कथांतून खेडेगावच्या चित्रणाचा जिवंत नमुना आपणांस दिसेल. 'रंगभूमि', 'कर्मभूमि', 'प्रेमाश्रम', 'गोदान' इत्यादि कादंबऱ्यांतून शेतकरी-मजूरवर्गाचीं दुःखें कोणतीं व त्यांवरील नेमके उपाय कोणते याची चर्चा आपणांस वाचावयास मिळेल. भारतासारख्या कृषिप्रधान देशांत देशी मालास उत्तेजन देऊन खेडेगांवच्या शेतकऱ्यांस दारिद्र्यापासून वांचवावें हा तर त्यांच्या 'प्रेमाश्रम' कादंबरीचा विषय. जमीनदारांनीं व सावकारांनीं शेतकऱ्यांना कसें छळलें याचाहि तपशील प्रेमचंदांच्या कथांतून वाचावयास मिळतो. आपल्या महाराष्ट्रांत हे सर्व प्रश्न कांहींसे जुने झाल्यासारखे वाटतात; पण सर्व

भारतवर्षाचा विचार करतांना शेतकऱ्यांची हलाखीची स्थिति आज कांहीं सुधारलेली आहे असें म्हणतां येणार नाहीं.

प्रेमचंदांच्या कथा-कादंबऱ्यांतून खेडेगांवचें निसर्गसौंदर्यवर्णन तर जागोजागीं सांपडेल; पण पाऊस आल्यावर शेतकऱ्यास केवढा आनंद होतो, पिकांच्या पेरणीस प्रारंभ कसा करतात, हंगामाच्या वेळीं पिकांची जपणूक कशी करतात, भोळ्याभाळ्या किसानबंधूंच्या विचित्र समजुती कशा असतात इत्यादि गोष्टींची मार्मिक चिकित्साहि प्रेमचंद करीत असतांना दिसतील. भारतीय शेतकऱ्याचें जीवन सजीवतेनें आकारास आलेलें दिसतें तें प्रेमचंद यांच्या साहित्यांत. वेळच्या वेळीं पाऊस आला नाहीं तर काय होतें पहा—
" सावनका महीना आ गया था और बगूले उठ रहे थे। कुओंका पानी भी सूख गया था और रुख तापसे जली जाती थी। नदी से थोडा थोडा पानी मिलता था पर उसके पीछे आये दिन लाठियाँ चलती थीं। यहाँ तक कि नदीने भी जवाब दे दिया, जगह जगह चोरियाँ होने लगीं, डाके पड़ने लगे। सारे प्रान्तमें हाहाकार मच गया। " आणि अशा ताणलेल्या परिस्थितींत मेघराजानें कृपा केली तर? " बारे कुशल हुआ कि भादोंमें वर्षा हो गयी और किसानोंके प्राण हरे हुए। कितना उछाह था उस दिन। प्यासी पृथ्वी जैसे अघाती ही न थी और प्यासे किसान जैसे उछल रहे थे, मानों पानी नहीं अशर्फियाँ (सुवर्णमोहरा) बरस रही हैं। बटोर लो जितना बटोरते बने। खेतोंमें जहाँ बगूले उठते थे वहाँ हल चलने लगे। बालवृन्द निकल निकलकर तालाबों और पोखरों और गड़हियोंका मुआयना कर रहे थे। ' ओ हो तालाब तो आधा भर गया ' और वहाँ से गड़हियाकी तरफ़ भागो। " (गोदान) अशीं जिवंत शब्दचित्रें प्रेमचंद यांच्या कथासाहित्यांत अनेक ठिकाणीं मिळतील.

मुन्शी प्रेमचंद यांची ' गोदान ' कादंबरी त्यांच्या कीर्तिशिखरावरील कळस म्हणून मानली जाते. भारतीय शेतकऱ्याचें एवढें नितांतरम्य चित्र अन्यत्र सांपडणें कठीण आहे. या कादंबरींत कोणताहि प्रचार नाहीं, विचारांचा वा तत्त्वांचा अट्टाहास नाहीं. येथें सर्वसामान्य अशा एका शेतकऱ्याची करुण कहाणी आहे. एकामागून एक अशा येणाऱ्या सर्व आपत्तींना हंसत हंसत टक्कर देणाऱ्या व त्यांतच अंत होत असतांना सार्थक मानणाऱ्या एका कर्मवीर

शेतकऱ्याची ही कथा आहे. ' गोदान 'मधील होरीराम भारतीय शेतकऱ्यांचा एकमेव प्रतिनिधि आहे. हिंदी साहित्यांतील ही एक अमर व्यक्तिरेखा सदैव सजीव अशी बनलेली आहे. भारताचा प्राण म्हणजे शेतकरी आणि शेतकऱ्याचा प्राण ?– त्याची जमीन. पण भारतीय शेतकऱ्यास आणखी एक वस्तु प्राणप्रिय अशी वाटते आणि ती म्हणजे गाय. ' गोदान ' कादंबरीच्या प्रारंभींच होरीरामाच्या मनांत हे विचार येत आहेत, एक गाय घ्यावी, तिची खूप सेवा करावी, पोराबाळांना दूध पाजावें, रोज सकाळीं तिचें दर्शन घेऊन स्वतः पावन व्हावें, हीच एक इच्छा होरीची असते. होरीरामाच्या जीवितांतील हें एकमेव स्वप्न होतें. या ठिकाणीं प्रेमचंदांची मिश्किल लेखणी बोलते, " बँकेकडून येणाऱ्या व्याजावर चैन करावी अथवा मोठी इस्टेट खरेदी करावी, या मोठ्या आकांक्षा होरीरामाच्या छोट्या दिलांत कशा मावणार ? "

—आणि मोठ्या प्रयासानें ऐंशी रुपयांचा वायदा करून होरीनें घरीं गाय आणली. रात्रभर होरीराम विचार करीत होता, गाईस बांधावें कोठें ? ती त्याची संपत्ति होती. तिच्या प्राप्तीनें तो ऐश्वर्यसंपन्न झाला होता. साक्षात् देवीनें त्याच्या घरीं पाऊल टाकलें होतें. गायीवर त्याची केवळ श्रद्धा वा भक्ति नव्हती, ती त्याचें एक सजीव वैभव होतें. आपल्या दाराची व आंगणाची शोभा वाढविणाऱ्या या रत्नाला आपण दारांतच बांधावें असें त्या भोळ्या जिवास वाटलें. कोणींहि येणाऱ्या-जाणाऱ्यांनीं विचारावें – कोणाचें हें घर ? मग लोक म्हणतील होरीराम पाटलाचें !— ही होरीची इच्छा; पण त्याची बायको धनिया अधिक व्यवहारचतुर होती. गाय दृष्टावेल ही तिच्या मनांत भीति – तिनें गाय आंतल्या पडवींतच बांधण्याचा आग्रह धरला. – होरीराम आणि धनिया हीं साधींसुधीं माणसें प्रेमचंदांच्या कलापूर्ण सृष्टींत अजरामर होऊन गेलीं आहेत. त्यांचें एकमेकांवरील प्रेम व त्यांच्यामध्यें वारंवार होणारा झगडा वाचून प्रत्येकास आपल्या परिचयाचा शेतकरी आठवावा. होरीरामाचें दुर्दैव कीं, त्याच्याच एका आप्ताकडून या गाईस विषप्रयोग झाला. होरीरामाच्या घरांत गडबड उडून गेली. दिवा पेटवून मंडळी गोठ्यांत आली. पाहतात तों ' सुंदरिया 'च्या मुखांतून फेस बाहेर येत होता, डोळे निर्विकार होत होते, पोट फुगत चाललें असून चारी पाय ताणले जात होते. धनियानें डोकें बडवून घेण्यास सुरुवात केली. तिची एकमेव संपत्ति तिच्या डोळ्यादेखत नष्ट होत होती !

होरीच्या भावानें विषप्रयोग केल्याचें सिद्ध झालें. धनिया दुसऱ्या दिवशीं क्रोधानें लालीलाल होऊन शिव्यांचा वर्षाव करूं लागली, तेव्हां होरीरामानें भावाची कड घेतली. तो तिला निर्दयपणें मारूं लागला. गांवचे लोक जमा झाले. धनियाची सोडवणूक झाली. मारामुळें धनियाचें अंग विलक्षण ठणकत होतें—कित्येक दिवसपर्यंत होरीराम व धनिया यांच्यांतील बोलणें बंद होतें. मानिनी धनिया या अत्याचारी नवऱ्याशीं बोलण्यास राजी नव्हती—पण मध्यंतरीं होरीरामास ताप येऊं लागला. एक महिनाभर तो खाटेवरच पडून होता. या वेळीं धनियानें विचार केला, पति मरण्याच्या पंथास आहे, आतां त्याच्याशीं वैर काय कामाचें ? अशा अवस्थेंत वैऱ्याशींहि दावा साधूं नये. तो तर आपला पति आहे. असेल वाईट; पण त्याच्याचबरोबर पंचवीस वर्षें आपण संसार केला ना ? सुख त्याच्याबरोबरच भोगलें आणि दुःखहि त्याच्याच संगतींत सहन केलें ! आतां तो बरा असो वाईट असो, आपला आहे ही गोष्ट खरी. साऱ्या गांवाच्या देखत त्यानें आपणांस बेदम मार दिला. पण त्या वेळपासून किती शरमिंदा झाला आहे ! भाकरी खायला बसतो तें मान खालीं घालून. आपण कांहीं बोलूं कीं काय या विचारानें बिचारा शरमिंदा होऊन गेला आहे !—धनियानें मनोभावें होरीरामाची सेवा केली आणि त्याचा ताप दूर झाला. पतिपत्नींमधील वादळ थांबलें. एके दिवशीं धनियानें विचारलें, “एवढा राग कोठून आला तुम्हांला ? त्या भरांत मी मरतच होतें.” त्यावर होरी बोलला, “आतां ती गोष्ट नको काढूंस धनिया ! माझ्या अंगांत भूत संचारलें होतें, तूं मेली असतीस तर मी जिता कसा राहिला असतों ? तुझ्याच संगतीं चितेवर आलों असतों ना.”

असा हा शेतकऱ्याच्या जीवनांतील झगडा व प्रेमप्रसंग. प्रेमचंदांच्या कलापूर्ण लेखणीनें त्यांत सारें चैतन्य ओतून दिलें आहे. होरीरामाची धनिया तर शेतकरी स्त्रीचा अर्क आहे. जितकी भांडखोर तितकी प्रेमळ. अन्याय तिला सहन होत नाहीं. सहसा ती बोलणार नाहीं, पण बोलूं लागली कीं मागेंपुढें पाहणें कसचें सुचणार तिला ? मी मी म्हणणाऱ्या मर्दांनाहि तिनें लाजविलें होतें. पोलीस पाहिला कीं शेतकरी भिऊन जातो; आणि याच प्रसंगीं धनिया चंडिका बनते. गायीस विष कोणीं दिलें, गुन्हेगारास काय शिक्षा व्हावी, म्हणून गांवपाटील, पंच, पोलीस यांची बैठक बसली आहे.

पैसे चारून आपल्या भावास बांचाविणाऱ्या नवऱ्याची धनियानें निर्भर्त्सना केली. पोलीसपाटील चपापला; पण थट्टेच्या लहरींत बोलला, "मला तर असें वाटतें कीं, याच अवदसेनें दिरावर आळ आणण्यासाठीं स्वतः जनावरास विष घातलें —"

धनिया एकदम गर्जून उठली. आपले दोनहि हात अधिकाऱ्यापुढें करून ती बोलूं लागली, "हो हो. मीं दिलें विष. गाय माझी होती. मीं मारली. मग ? कोणाचें दुसऱ्याचें जनावर तर नाहीं मारलें ? तुमच्या तपासांत हेंच निघत असेल तर असेंच लिहा. घाला माझ्या हातांत बेड्या. तुमचा न्याय आणि तुमच्या अकलेची दौड तरी मला पाहूं द्या. —" सारी सभा या चंडिकेच्या अवतारापुढें चकित झाली, फिकी पडली. असा हा शेतकऱ्याच्या पत्नीचा राग. पण या धनियेच्या पोटांत दयेचा व मायेचा अक्षय झरा निरंतर वाहत असलेला दिसून येईल. स्वतःचा मुलगा गोवर्धन कोणा एका तरुण विधवेच्या मायाजालांत सांपडला. धनिया हें सर्व जाणून होती. होरीरामला वारंवार लक्ष देण्यास बजावीत होती. पण आपत्तींत गाडलेल्या होरीला या गोष्टीकडे ध्यान देण्यास सवड नव्हती. शेवटीं व्हायचें तेंच झालें. नको त्या आपत्तींत सांपडून झुनिया – गोवर्धनची प्रेयसी – धनियाच्या आश्रयास निघाली ! आणि धनिया तर संतापून चिथरली होती. त्या काळतोंडी रांडेला घरांत एक क्षणभरहि राहूं न देण्याचा तिनें निश्चय केला. रात्रींच्या वेळीं होरीरामाबरोबर झुनिया घरीं आली. धनिया काय बोलते याची चिंता होरीरामास, व संतापी होरी पोरीला काय करतो याची फिकीर धनियास. त्यांना दाराशीं पाहतांच धनिया बोलली, "पहा बरं. शपथ आहे माझी. पोरीच्या अंगाला हात लावूं नका. आपली आपणच रडते आहे बिचारी. खोट्या दैवाची नसती तर हा दिवस आला नसता —"

होरीरामाचे डोळे पाणावले. धनियाच्या या मातृस्नेहामुळें या अंधाऱ्या रात्रींहि त्याच्या डोळ्यासमोर प्रकाशरेखा चमकून गेली. घरांत आल्यावर दयार्द्र अंतःकरणानें पोरीच्या पाठीवरून हात फिरवीत होरी म्हणाला, "भिऊं नकोस बेटा. घर तुझें आहे. आम्ही तुझेच आहोंत. आरामांत रहा." धनियाहि पोरीची दयनीय अवस्था पाहून विरघळून गेली. थोड्या वेळापूर्वी जिला धनियानें कुलटा व कलंकिनी म्हटलें तिलाच या वेळीं तिनें वात्सल्यानें

पोटाशीं धरलें. होरीखेरीज कोणाहि पुरुषाकडे न पाहणाऱ्या या साध्वीनें–धनियानें – पापिष्टा झुनियेला जवळ घेतलें, तिचे डोळे पुसले, तिनें तिचें सांत्वन केलें. जणुं पक्षिणीच्या पंखाखालीं पांखरानें आसरा घेतला. अशी ही धनिया आणि असा हा तिचा नवरा होरीराम !

ग्रामीण जीवनाचें व भारतीय शेतकऱ्याचें यथार्थ चित्रण आपणांस प्रेमचंदांच्या 'गोदान' कादंबरींत पहावयास मिळेल. गरीब शेतकऱ्याची एकमेव इच्छा गाय पाळण्याची–पण ती पुरी होत नाहीं. आपत्तींनीं, कर्जाच्या बोजानें, कष्टांनीं होरीराम खचला जातो. पण त्याचें कर्तव्यकर्म सुटत नाहीं. टकरा देतां देतां मरण्यांतील सुख तो चाखणार होता. हाच मानवी जीवनांतील मथितार्थ असाच जणुं त्याचा संदेश होता. नवी गाय घेण्याची लालसा त्याच्या मनांतच राहून गेली. त्याचें नातवंड दुधावांचून उपाशी होतें. त्याचा आयुष्यसूर्य कलला होता. पण गाय घेण्याची इच्छा मात्र त्याला अस्वस्थ करीत होती. जीवनांतील सारीं संकटें, साऱ्या निराशा आतां त्याच्या परिचयांतील होत्या. जीवनसंग्रामांत होरी पराभूत झाला असें कोण म्हणेल ? झुंजतां झुंजतां होरीच्या अंगावर ज्या जखमा झाल्या होत्या तींच त्याचीं विजयचिन्हें होत. देहांत ताकद नसतांना तो शेतावर काम करण्यास गेला. पाय भरून येत होते. चालतांना तोल जात होता. होरी अंतिम क्षणाची वाटचाल करीत होता. घरी येऊन होरीराम बेचैन झाला. सारा आयुष्यक्रम त्याच्या डोळ्यासमोर आला; आणि सरते शेवटीं एक कामधेनु त्याच्या दृष्टीसमोर उभी राहिली. ही एक लालसा अपुरी राहिली. घरून धनिया दौडत होरीरामापाशीं आली. जीवनाचा आधार सुटत चालल्याचें तिनें हेरलें. डबडबल्या डोळ्यांनीं तिनें आपल्या जीर्ण साथीदाराकडे पाहिलें व म्हटलें, "माझ्याकडे पहा ना. मी आहें. मला ओळखलें नाहीं ?"

पत्नीच्या मृदु व सदय स्पर्शानें होरी क्षणभर शुद्धीवर आला. दीन मुद्रेनें त्यानें धनियाकडे पाहिलें. डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंना सावरीत सावरीत तो बोलला,– "माझें बरेंवाईट बोलणें माफ कर धनिया ! आतां जातों. गायीची इच्छा मनांतच राहिली. उरलेले रुपये क्रियाकर्मासच लागतील···रडूं नकोस धनिया ! किती दिवस मला जगवशील ? सारी दुर्दशा झाली आहे. आतां मरूं दे." होरीरामाची जीवितयात्रा संपत असल्याचें पाहून कोणी बोलले, "बाई, मन घट्ट करा आतां, गोदान करा. होरीराम चालला···"

धनिया यंत्राप्रमाणें उठली. घरांत वीस आणे शिल्लक होते ते होरीरामाच्या थंड होणाऱ्या हातांत ठेवून बोलली, " घरांत गाय नाहीं, वासरूं नाहीं, पैसा नाहीं. हा सव्वा रुपया हेंच गोदान."

आणि धनिया मूर्च्छित होऊन पडली !

हा भारतीय किसानाचा मृत्यु ! सर्वत्र दुःख, दैना, उपासमार, निराशा–पण वृत्ति झुंजाराची, कर्मवीराची. प्रेमचंदांनीं भारतीय शेतकऱ्याचें हेंच वैभव ओळखलें व त्यास आपल्या कथा-कादंबऱ्यांतून अमर केलें. ' गोदान ' हें भारतीय शेतकऱ्याच्या जीवनावरील एक रमणीय असें महाकाव्य आहे.

• • •

## " मी तर मजूर आहें.... " : ८

कोणत्याहि लेखकाचें मोठेंपण केवळ त्यानें निर्माण केलेल्या बऱ्यावाईट साहित्यावरच अवलंबून असतें असें नव्हे. तसें असतें तर आजकाल शेतकरी-कामकरी यांच्या जीवनावर लिहिणारे अनेक लेखक आहेत. दीनदलितांच्या उद्धाराची भाषा बोलावयाची व ग्रामीण भाषेंत कथा सांगण्याची ऐट आणावयाची, यापलीकडे या लेखकांची मजल गेलेली नसते. प्रत्यक्ष व्यवहारांत ते सामान्य जनतेपासून शेंकडों मैल दूर असतात. दलितांचें जीवन त्यांनीं दुरून पाहिलेलें असतें. त्यामुळें त्यांनीं निर्माण केलेल्या साहित्यांत एक प्रकारची कृत्रिमता आलेली असते. केवळ एक फॅशन म्हणून कथाकादंबऱ्यांत वा चित्रपटांत गरिबांना सहानुभूति दर्शविणें किंवा किसान-मजुरांचें वर्णन करणें यांत काय महत्त्व ! प्रेमचंदांची दृष्टि याहून फार निराळी होती. त्यांच्या सहानुभूतीला कोणतीहि मर्यादा नव्हती. स्वतः गरिबींत दिवस काढल्यामुळें त्यांना त्या वर्गांतील दुःखाची जवळून नीट कल्पना होती. नोकरीनिमित्त हिंडावें लागल्यामुळें शेतकऱ्यांची स्थिति त्यांनीं नीट तपासून पाहिली होती. ऐपत असतांना सुद्धां खाजगी जीवनांत ते कमालीच्या साधेपणानें वागत. गरिबीचें जीवन ते जगले. मजुराप्रमाणें ते राबत असत. अपार शरीरकष्ट करण्यांत त्यांना मनस्वी आनंद वाटे. शारीरिक श्रमांची किंमत त्यांनीं बरोबर ओळखली होती. ते स्वतःस मजूरच समजत असत.

सन १९२८ मध्यें प्रेमचंद लखनौस होते त्या वेळची गोष्ट. कालाकाँकरचे राजे अवधेशसिंह घरीं आले होते. त्यांच्याबरोबर आणखीहि बडी बडी मंडळी होती. बराच वेळ गप्पागोष्टी झाल्या. चहापाणी झालें आणि मंडळी निघून गेली. शिवरानीदेवीनें प्रेमचंदांना विचारलें, " कोण होते हे लोक ! "

प्रेमचंदांनीं उत्तर दिलें, " खुद्द महाराजसाहेब आले होते. "

" त्यांना कोठें बसवलें होतें ? "

" जेथें मी बसलों होतों तेथें. "

" हें कांहीं ठीक नाहीं. मीं शंभर वेळां आपणांस सांगितलें कीं, चारपांच खुर्च्या घरांत आणून टाका. ते लोक मनांत काय म्हणाले असतील ! आणि आपणांला तरी बरें वाटलें का ! "

प्रेमचंद मनसोक्तपणें हंसले व बोलले,

" मी काय राजेमहाराजे यांच्या व्यवस्थेसाठीं थोडाच आहें ! मी तर बोलूनचालून मजूर. जें कांहीं जाडेंभरडें मिळतें तें पांघरतों. जमीन हीच माझी गादी आहे. आतां त्या लोकांना हें ठीक वाटलें नसेल तर मी काय करूं !... प्रत्येकानें टेबल-खुर्चीचें ढोंग कां म्हणून करावें ? हें हिंदुस्थान आहे रानी, येथें सामान्य माणसाची रोजची कमाई सहा पैसे आहे. पुष्कळांना पोटभर भाकरीहि कधीं मिळत नाहीं. आणि तूं म्हणतेस, टेबलें-खुर्च्या घेऊन थाटमाट करा. हा संग्रह काय कामाचा ? गरिबांची ही केवळ लूट आहे. " यानंतर प्रेमचंदांनीं जगतांतील विषमतेवर एक व्याख्यानच दिलें. लोक भुकेनें पिडलेले असतांना आपण विलास करावेत हें प्रेमचंदांना कधींच पटण्यासारखें नव्हतें. एकीकडे उपासमार होत असतांना दुसरीकडे चैन चालली आहे, असें दिसतांच ते विव्हळ होऊन उठत. गरिबांच्या श्रमानें निर्माण झालेली संपत्ति ऐदी लोक आळशीपणानें उधळीत राहिलेले पाहतांच त्यांना मनस्वी खेद होई.

त्याच वर्षीची गोष्ट. नोव्हेंबर महिन्यांत व्हाइसरॉयसाहेबांची स्वारी लखनौस येणार होती. प्रेमचंद कचेरींतून घरीं आले व म्हणाले, " आज शहरांत ४०,००० रुपयांची रोषणाई होणार आहे. दारूकामहि फार सुंदर होणार. तूं असा सोहळा कधीं जन्मांत पाहिला नसणार. "

" कोणाजवळ असा रिकामा पैसा आहे कीं, दारूकामांत आणि विजेच्या रोषणाईत खर्च व्हावा ?... "

" कोणाचा म्हणून काय पुसतेस ? चल तर पहावयास. मुलांना घेऊन येशील ? "

" आपण याल तर..."

" हो–हो. कां नाहीं येणार ? गरिबांच्या घराची राख झालेली पाहण्यास कां नाहीं येणार ? एक आतशबाजीची कथा. आज येथें व्हाइसरॉय येणार आहे. हिंदुस्थानांतील राजेमहाराजे आणि युवराज या ठिकाणीं येऊन त्यांचें नंगी स्वागत करणार आहेत. जेथें कमतरता पडेल त्या ठिकाणीं गरिबांकडून वसूल झालेला पैसा आहेच. गरिबांच्या श्रमाचा पैसा आतशबाजीमध्यें फुंकून टाकण्यास काय हरकत आहे ? ज्या देशांतील सामान्य माणसाचें उत्पन्न रोजीं सहा पैशांपेक्षां जास्त नाहीं तेथील लोकांना एके दिवशीं चाळीस हजार रुपये रोषणाई आणि आतशबाजी यांत खर्च करण्याचा काय अधिकार आहे ? अंगावर वीतभर कपडाहि नाहीं, दोन वेळ रोटी मिळण्याची पंचाईत, त्याच देशांत हा पैसा बेछुटपणें असा उधळला जाणार आणि कशासाठीं तर व्हाइसरॉय खूष व्हावा म्हणून–त्याच्याकडून बडे बडे किताब मिळावेत म्हणून." गोरगरिबांच्या पैशाची होणारी ही लूटमार प्रेमचंदांना उघड्या डोळ्यांनीं पहावेना. शिवरानीदेवीनें प्रेमचंदांच्या मनचें दुःख ओळखलें. ती म्हणाली, " कधीं काळीं स्वराज्य येईल, परिस्थिति पालटेल. आपण त्या वेळीं नेमकें काय कराल ? " प्रेमचंदांनीं ताडकन् उत्तर दिलें, " मी किसान-मजुरांच्या बाजूचा होईन. त्यांच्यासाठीं लढेन. मी सर्वांना सांगेन कीं, मी तर मजूरच आहें. तुम्ही फावडें चालवितां, मी कलम चालवितों. आपण दोघेहि समानच आहोंत. "

मजुरांबद्दलची प्रेमचंदांची ही भाषा केवळ बोलण्यांतली किंवा कथाकादंबऱ्यांतील नकली पात्रांच्या तोंडांतलीच नव्हती. ते स्वतः तसलें जीवन जगत तर होतेच, पण गरिबांचीं दुःखें दूर करण्यासाठीं ते स्वतः नित्य झटत असत. कारखानदार आणि मजूर यांच्यांतील झगडा सर्वत्र आहे. खुद्द प्रेमचंद यांच्याच छापखान्यांत कांहीं तेढ माजली व कामगार संपावर निघाले. प्रेमचंद उदास होऊन घरीं आले, त्या वेळचा शिवरानी व प्रेमचंद यांचा संवाद ऐकण्यासारखा आहे.

" काय, तब्बेत बरी दिसत नाहीं ! "

" फार छान आहे प्रकृति. "

" मग उदास कां म्हणून ? "

" या प्रेसच्यामुळें मला फार यातना होतात. "

" काय झालें ? सांगा ना. "

" काय सांगूं ? प्रेसचा मॅनेजर आणि मजूर यांचें पटत नाहीं. "

" कामगारच काम करीत नसतील. बिचारा मॅनेजर काय करणार ? "

" तो स्वतःस तर परमेश्वराचा बाप समजतोय्. कोणाला धमकी देतो, कोणाचे पैसे काटतो. "

" पण त्यांत त्याचा काय दोष ? "

" होय. मॅनेजरचीच सारी दुष्टता आहे. मीं त्याला एकांतांत खूप समजावून पाहिलें. छापखान्यास दर महिना तूट येत आहे. गरीब मजुरांच्या वेतनांतून का ती भरून निघणार आहे ? आपणांसारख्यांना जास्त पैसे मिळतात, पण ते आपणांस पुरतात का ? मग त्या गरिबांचें कसें निभणार ? आम्ही शिकले-सवरलेले लोकहि किती ठिकाणीं चुका करीत असतों. मग त्या बिचाऱ्या अशिक्षित कामगारांचें काय ? ··· त्यांच्याशीं लढून काय होणार ? "

प्रेसमधील कामगारांच्या बाजूनें प्रेमचंद कसे लढत असत हें ध्यानांत येईल. गरीब-श्रीमंत, सेव्य-सेवक यांतील झगडा प्रेमचंद यांना नेहमीं अस्वस्थ करून सोडी. स्वतःच्या छापखान्यांत ते स्वतः मजुरांच्या बरोबरीनें वाटेल तें काम करण्यास तयार असत. मी प्रतिष्ठित, शिकलेला, असा भावहि त्यांच्या मनांत निर्माण होत नसे. थंडीच्या दिवसांत काम करतांना कष्ट होत असत. अंगावर सुती कपडे होते पण तेहि फाटलेले. तेव्हां शिवरानीदेवींनें दोन वेळां गरम कपडे करण्यासाठीं चाळीस-चाळीस रुपये प्रेमचंदांच्या स्वाधीन केले. पण प्रेमचंद स्वतःस लोकरीचे कपडे कोठून शिवणार ? दोनहि वेळां घरीं आल्यावर पत्नीजवळ ते बोलले, " मी गरम कपडे कसे शिवूं ? सर्व पैसे प्रेसमधील कामगारांना वांटून टाकले. त्यांना साधे कपडेहि पुरेसे नव्हते. आणि मीं का उंची कपडे घालावेत ? "

असा महात्मा लेखक किती ठिकाणीं सांपडेल ? व्यावहारिक जगतांत आकार धारण करणारी एवढी विशाल सहानुभूति इतरत्र सांपडणें कठीण आहे. प्रेमचंदांच्या अंतर्यामीं ही दयेची वृत्ति लहानपणापासूनच होती. प्रेमचंद लहान असतांना त्यांना सांभाळणारा, शाळेंत नेऊन पोंचविणारा एक

गडी होता. त्याचा विशेष लळा लहानग्या धनपतरायास लागलेला होता. त्याच्या खांद्यावर बसून लहानपणीं प्रेमचंद अनेक ठिकाणीं हिंडले होते. तो सुद्धां या लहान पोरास ऊंस, पेरू, गाजर वगैरे देऊन खूष ठेवीत असे... पण एके दिवशीं प्रेमचंदांच्या वडिलांनीं त्याला हाकलून दिलें. दुसऱ्या दिवशीं तो जेव्हां दिसला नाहीं तेव्हां त्यांनीं त्याची चौकशी केली. तेव्हां उत्तर मिळालें, 'पाजी होता, दिलें हाकलून.' प्रेमचंदांनीं लिहिलें आहे : "मला रात्रभर झोप आली नाहीं. किती चांगला मनुष्य होता बिचारा! मी मोठा होईन तेव्हां अशाच माणसास जवळ करीन. दुसऱ्या दिवशीं सकाळ होतांच मी त्याला हुडकून घरीं घेऊन आलों. घरीं चोरून चोरून पीठ, डाळ, तांदूळ वगैरे पदार्थ मीं त्याला देऊन टाकले. मी तेव्हां आठव्या यत्तेंत शिकत होतों."

हीच प्रेमचंदांच्या स्वभावांतील वृत्ति मोठेपणींहि कायम राहिली होती. दुःखितांचें दुःख पाहून प्रेमचंद हैराण होऊन जात. होईल तेवढी मदत करून त्या यातना दूर झाल्या तर पाहण्यासाठीं ते नेटानें प्रयत्न करीत. बनारस येथें त्यांच्या घरीं एक मोलकरीण होती. तिचा छोटा मुलगा आगीनें भाजला. त्याच्या सर्व तोंडावर मलम फासलें होतें आणि कपडेसुद्धां खराब होऊन गेले होते. प्रेमचंदांच्या छोट्या मुलानें त्याला आपल्या घरीं आणलें आणि आईस तो म्हणाला, "अम्मा, याला कांहीं खायला दे. या पोराचें तोंड पाहून माझ्या पोटांत कसेंसें होत आहे." शिवरानीदेवीला भीति वाटली कीं, न जाणो पोरगा त्याला शिवेल आणि त्याच्या हाताला सर्व घाण लागेल. पण प्रेमचंदांचे डोळे मात्र भरून आले आणि ते झटकन् म्हणाले, "देना लौकर याला कांहीं खावयास...हा पोरगा मोठा दयावान् दिसतो. तुला-मलासुद्धां त्याच्याकडे पाहवेना, पण बन्नूनें त्याला घरांत आणलें." नोकरमाणसाकडे व त्यांच्या मुलांबाळांकडे आपुलकीनें पाहणारे किती महात्मे आपणांस या जगांत दिसतील? पण प्रेमचंदांच्या प्रीतीची व सहानुभूतीची जातच निराळी होती.

त्यांच्या घरांत एक म्हातारी मोलकरीण होती. रात्रंदिवस ती त्यांच्याच घरीं राही व पडेल तें काम करी. तिला एक मुलगी व चार जवान मुलगे होते. पण त्यांचा उपयोग मात्र कांहीं नव्हता. महिन्याकांठचे पैसे म्हातारीच्या हातीं आले कीं कोणता तरी पोरगा येई, धाक दाखवी व म्हातारीकडून पैसे

हुवाडून नेई. प्रेमचंदांना या परिस्थितीची जाणीव झाल्याबरोबर अति दुःख झालें. त्यांनीं उद्गार काढले, "या म्हातारीचीं मुलें माणसें आहेत कीं सैतान ! माझ्या ध्यानांत येत नाहीं कीं, या बूढीनें काम करावें मरमरेपर्यंत आणि वयांत आलेल्या पोरट्यांनीं ते पैसे उधळावेत !" आणि मग प्रेमचंदांनीं एकंदर परिस्थितीवर एक व्याख्यान तयार केलें, "हीच परिस्थिति आजकाल इंग्रजी शिक्षणामुळें चांगल्या चांगल्या लोकांतहि निर्माण झाली आहे. पहिल्यानें आपल्या आईबद्दल मुलांना केवढा आदर वाटे. आतां मात्र सर्व उलटें होऊन गेलें आहे. त्या बिचारीला भाकरी घालणारे कोणीहि नाहीं. आणि हे नवजवान बेटे लहानपणीं आईचें दूध जसें शोषून घेत तसेंच आतांही पैसा ओढून घेतात. यांच्यांत आणि पशूंत काय फरक ! कुत्रीसमोर रोटी टाकली कीं तिचीं पिलें नाहीं का ते तुकडे पळवून नेतात !—तशीच ही अवस्था. त्यांना हें समजत नाहीं कीं, आपली आई भुकेलेली आहे. तसेंच हे म्हातारीचे बेटे. सगळीकडे स्वार्थ मात्र वाढलेला दिसतो.... काय करावें त्या बिचारीनें ! तिला मोठी बादली पाण्यानें भरलेली उचलत नाहीं. हातपाय कांपूं लागतात; तेव्हां मीच माझ्या हातांनीं पाणी घेऊन स्नान करतों. मला त्या म्हातारीची फारच दया येते."

असें हें प्रेमचंदांचें दयापूर्ण अंतःकरण. त्यांनीं सर्वांची काळजी वाहिली. सर्वांची चिंता केली. दयाभाव हा प्रेमचंदांच्या स्वभावाचा स्थायीभाव होता. व्यावहारिक जीवनांतील कांहीं प्रसंगांवरून आपण त्याचा परिचय थोडक्यांत करून घेतलाच. पण या देशांतील कित्येक राजकीय व सामाजिक प्रश्नांचा विचार त्यांनीं याच प्रकारच्या दयेच्या भूमिकेवरून केलेला दिसून येतो. या आपल्या विस्तीर्ण देशाची भाषा — राष्ट्रभाषा — कोणती असावी म्हणून केवढा वाद माजला होता ! हिंदु-मुसलमान यांची एकी व्हावी म्हणून केवढाले प्रयत्न या देशांत थोरामोठ्यांनीं केले. पण लढाईनें हे प्रश्न सुटणारे नव्हते. एकमेकांचीं अंतःकरणें शुद्ध असतील तरच आपल्या देशाच्या या प्रमुख प्रश्नाचा निकाल समाधानकारक रीतीनें लागेल, असें प्रेमचंद यांना वाटे. प्रेमचंद यांना स्वतःचें 'नवाबराय' नांव प्रिय वाटे तें दोन कारणांसाठीं. पिताजींनीं तें ठेवलें असल्यामुळें त्यांना आवडे; दुसरें असें कीं, या नांवामुळें हिंदु व मुसलमान या दोन संस्कृतींचा मिलाफ झाल्यासारखा त्यांना वाटे. पंधराव्या शतकांत कबीरें महात्मा ज्याप्रमाणें हिंदु-मुसलमानांना सारखाच

वाटणारा होऊन गेला, त्याचप्रमाणें प्रेमचंदांनाहि दोन धर्म, दोन जमाती वेगळ्या वाटत नसत. प्रेमचंदांची भाषा उर्दूमिश्रित हिन्दी म्हणजे हिंदुस्तानी आहे. पण याहि भाषेची पूर्वपीठिका ऐकण्यासारखी आहे. तिच्याहि पाठीमागें एक विशिष्ट तत्त्वज्ञान आहे. महात्मा गांधींशीं बातचीत करून प्रेमचंद वर्ध्याहून घरीं आले होते. भाषेसंबंधीं चर्चा निघाली तेव्हां प्रेमचंद म्हणाले, " गांधीजी हिंदु–मुसलमानांची एकता व्हावी म्हणून म्हणतात; मीहि हिंदी व उर्दू यांच्या मिश्रणानें हिंदुस्तानी तयार करीन. "

शिवरानी:—आपण कशी बनवाल हिंदुस्तानी ?

प्रेमचंद:—जें कांहीं लिहीन तें हिंदुस्तानींतच लिहीन.

शिवरानी:—मग तुमच्या एकट्याच्या लिहिण्यानें हिंदुस्तानी होईल ?

प्रेमचंद:—हो. जिला हिंदु-मुसलमान दोघेहि मानतील, जिला सर्व जनता समजूं शकेल ती हिंदुस्तानी. आणि माझा विश्वास आहे कीं, जेव्हां केव्हां राष्ट्र-भाषा निर्माण होईल तेव्हां हिंदी-उर्दू यांच्या मिश्रणानेंच ती बनेल.

शिवरानी:—पण हा तर हिंदुस्थान आहे. येथील भाषा केवळ हिंदीच व्हावयास पाहिजे.

प्रेमचंद:—हें हिंदुस्तान नांव कसें पडलें आहे ठाऊक ? जेव्हां येथें मुसलमान येऊन स्थायिक झाले तेव्हांच हें नांव पडलें. हिंदु-मुसलमान जेव्हां एकदिलानें राहतील तेव्हांच या देशांत खरी शांतता निर्माण होईल.

शिवरानी:—मग काय करणार ? हिंदींत फारसी शब्द घुसडून देणार कीं उर्दूंत संस्कृत शब्द मिसळणार ?

प्रेमचंद:—असें कांहींहि करण्याची जरूरी नाहीं. सर्व जनतेची भाषा आहे. हिन्दींत फारसी शब्द येवोत वा उर्दूंत संस्कृत शब्द येवोत, त्याबद्दल मला कांहींहि वाटणार नाहीं. जेव्हां देशांत दुसरी जमात येऊन स्थिर होते तेव्हां देशसुद्धां शुद्ध स्वरूपांत राहत नाहीं, मग भाषेची शुद्धता घेऊन कसें चालेल ?

हिंदु-मुसलमान यांच्या संबंधाबद्दल प्रेमचंद यांची दृष्टि फारच उदार होती. राम, रहीम, बुद्ध, येशू या सर्वांना सारखाच मान देणारे ते होते, " मी एक मनुष्य आहें. माणुसकी हा माझा खरा धर्म आहे. हिंदु-मुसलमान माझे मित्र सारख्याच प्रमाणांत आहेत. "

मुसलमान गोवध करतात म्हणून शेंकडों हिंदूंना दुःख होतें. पण या प्रश्नाकडे पाहण्याची प्रेमचंद यांची एक निराळीच दृष्टि आहे. ते म्हणत, " गोवध होऊं लागल्याबरोबर दोन जमातींत फार मोठा झगडा होतो ही गोष्ट खरी आहे. पण मग इंग्रजांच्यासाठीं शेंकडों गायी व वासरें मारलीं जातात तेव्हां हिंदूंचें रक्त उसळून कां जात नाहीं ? गायीसाठींच झगडा होता तर तो सर्वत्र व्हावयास पाहिजे. आणि हिंदूंच्या मंदिरांत तरी काय दिसतें ? शेंकडों बकऱ्यांचे व कोंबड्यांचे जीव नाहीं का त्या देवाच्या पायाशीं जात ? बकऱ्यांना काय जीव नसतो ? बकऱ्यांचें मांस मोठ्या चवीनें हिंदु खातात हा कोठला धर्म ?...... स्त्रियांच्यावर सर्वांत जास्त जुलूम हिंदुच करतात. जरा कांहीं चूक झाली कीं घराबाहेर दिली ढकलून ! मग ती बिचारी कोठें जाणार ?... " प्रेमचंदांच्या या विचारसरणींत कांहींच तथ्य नाहीं असें कोण म्हणेल ? आपल्या कथाकादंबऱ्यांतून प्रेमचंदांनीं गोवधाचे प्रसंग वर्णन करून दोन्ही समाजांतील सलोख्याचा मार्ग दर्शविला आहे. हिंदु-मुसलमान यांच्या एकतेवरच आधारलेली त्यांची ' पंच परमेश्वर ' कथा हिन्दी साहित्यांत अमर झाली आहे. त्यांतील जुम्मनशेख व अलगू चौधरी ही जोडी या जमातींच्या एकतेचें प्रतीक मानलें जातें.

हिन्दु कीं मुसलमान हा प्रश्न प्रेमचंद यांना नव्हता. जो दुःखी आहे, कष्टी आहे त्याला सहानुभूति दाखवून जवळ करणें एवढेंच त्यांना माहीत होतें. त्यामुळें हिंदु तेवढा चांगला व मुसलमान तेवढा दुष्ट, असें नेहमीं मांडलें जाणारें समीकरण प्रेमचंद यांना कसें पटणार ? दुष्टता किंवा सुष्टता दोन्ही समाजांत सारख्याच प्रमाणांत असणार. यासाठीं हिंदु व मुसलमान यांची तुलना करून एकमेकांत झगडा माजविण्यांत काय अर्थ ?

याच हिन्दु-मुसलमानांच्या प्रश्नावरील प्रेमचंद यांच्या एका लेखाबद्दल गंभीर प्रसंग निर्माण झाला होता. काशी येथील ' आज ' वृत्तपत्रांत प्रेमचंदांचा खळबळजनक लेख प्रसिद्ध झाला होता. त्याबद्दल सर्व काशी-निवासी हिंदु क्षुब्ध झाले होते. त्यांपैकीं कोणीतरी प्रेमचंदांकडे आले आणि म्हणाले, " आपण जो लेख लिहिला आहे त्यामुळें काशीचे हिंदु फारच नाराज झाले आहेत. " प्रेमचंद शांतपणें घरांत आले तेव्हां शिवरानीदेवीनें पुसलें, " हे लोक मारण्याची धमकी कां देतात ? लोकांचें शत्रुत्व मिळविण्यासाठीं का

आपण असले लेख लिहितां ? कधीं सरकारची अवकृपा, कधीं जनतेची. कधीं कोणीतरी शत्रु आहेच." यावर प्रेमचंदांनीं उत्तर दिलें,

"जनता किंवा सरकार लेखकास आपला गुलाम समजते. पण लेखक हा कोणी एक विशेष प्राणी आहे हें त्यांना कळूं द्यात ना. सर्वांची मर्जी सांभाळून लिहिणारा तो लेखक कसला ? सरकार तुरुंगांत टाकील आणि समाज मारण्याची धमकी देईल म्हणून लेखकानें आपलें लिहिणें बंद करावें कीं काय ?"

"मुळींच नाहीं. लेखन करावेंच; पण आपल्या प्राणांची कांहीं चिंता ? ...रोज रोज झगडा !"

"ही दुनियाच संग्रामाची आहे. येथून पळून जाऊन कसें चालेल ? मैदानांत खडें राहिलें पाहिजे. प्रत्येकाचें म्हणणें लेखकास कसें ऐकूं जाईल ? ही 'जी-हुजुरी' लेखकाच्या हातून होणार नाहीं. ईश्वराच्या मनांत आलें तरच हे हिंदु-मुसलमानांतील झगडे बंद होतील. आणि त्याच वेळीं खरें स्वराज्य अवतरेल. ज्या ठिकाणीं दोहोंच्यांत लढत आहे तें स्वराज्य कसलें ? गांधी या युगांतील सर्वांत मोठा पंडित आहे. त्यांच्या मनांत दोहोंच्याबद्दल सारखीच सहानुभूति आहे. माणुसकीस पहिल्यानें ते मान देतात. पण मनुष्य हा मनुष्यच जर राहिला नाहीं तर धर्म कशासाठीं व कुणासाठीं ?"

"पण गांधी तर सर्वांना प्रिय वाटतात."

"तुला माहीत नाहीं. त्यांना शिव्या देणारेहि लोक आहेत. खुद्द गांधींचा मुलगा मुसलमान झाला आणि कस्तुरबानें रडून आकांत केला. पण गांधींनीं समजावून सांगितलें कीं, धर्म बदलला तरी तुझ्या मुलांत कोणता फरक पडला ?..."

"मग काय, तुम्हीहि गांधी बनूं पाहतां ?"

"गांधीसुद्धां मनुष्यच आहे. प्रयत्न करतील तर सर्व जण गांधी होऊं शकतील. त्यांच्यांत एकप्रकारची आत्मिक शक्ति आहे. पहिल्यानें ते आपल्या-सारखेच साधे मनुष्य होते; पण यत्नपूर्वक ध्यास घेतल्यामुळें ते महात्मा बनले. त्यांना कोणीं तसें बनविलें नाहीं...."

प्रेमचंदांच्या जीवनांतील असे कितीतरी प्रसंग सांगतां येतील कीं, ज्यांतून दया, सहानुभूति, अनुकंपा यांचे झरेच्या झरे पाझरतांना दिसतील. प्रेम-

चंदांच्या घरीं एकदां चोरी झाली. एक हजार रुपये रोख आणि दीड हजारांचे दागिने चोरीस गेले. चोराचा पत्ता लागला नाहीं. पण कोण्या स्वयंपाक्यानें चोरी केली असावी. कांहींच तपास लागत नाहींसें पाहून प्रेमचंद शिवरानीदेवीस बोलले, "दागिन्यांचा शोक तूं करूं नकोस. तुझ्या पेटींतच ते पडून होते. त्याची बायको तरी अंगावर घालून खूष होईल. होय, रुपये गेले याचें दुःख तर आहेच. प्रेसमधील कामगारांचें वेतन द्यावयाचें राहिलें होतें. पण तेंहि राहूं दे. कोठून ना कोठून तरी त्यांचे पैसेहि दिले जातील."

"माझे दीड हजार रुपये गेले आणि आपणांस थट्टा करावीशी वाटते."

"तूं कां दीड हजाराची चिंता करतेस ? माणसाचें जीवन एके दिवशीं केव्हां तरी संपणार आहे....समज, तीन महिने मीं मजुरीच केली नाहीं." ही प्रेमचंदांची शिकवण सर्वत्र दिसून येते. धनवैभवाचा लोभ कसा तो त्यांना माहीत नाहीं.

नोकरमाणसाकडून प्रेमचंदांनीं कधीं काम करून घेतलें नाहीं. स्वतःचीं कामें स्वतः करण्यांतील आनंद त्यांनीं ओळखला होता. बस्ती येथें असतांना एका नोकराबद्दलची हकीगत. तो नोकर आपला बसून राही. कांहीं काम म्हणून करावयाचा नाहीं. शिवरानीदेवी विचारी, हा नोकर कशासाठीं ठेवला आहे ? त्यावर प्रेमचंद उत्तर देत, "आपल्या गरजा आपणच पूर्ण केल्या पाहिजेत. आज नोकर घरीं आहे; पण नोकर ठेवण्याची ऐपत नसण्याची पाळी आली म्हणजे ? मग मीच स्वतः नोकर नाहीं का ?"

अशा प्रकारें नोकर, कामगार, शेतकरी, मुसलमान इत्यादि लोकांकडे प्रेमचंद सहानुभूतीनें पाहत. दीन दुःखितांचा कैवार स्वतः घेत. अधिकारी, धनलोभी, सत्ताधारी यांची पर्वा त्यांनीं कधींच ठेवली नाहीं. लाचारी तर त्यांना ठाऊकच नव्हती. प्रेमचंद शिक्षक असतांनाची गोष्ट. शाळेची तपासणी करण्यासाठीं इन्स्पेक्टर आले होते. शाळेची सर्व व्यवस्था त्यांना दाखविण्यांत आली. आणि शाळेंतील मुलें चेंडू खेळण्यासाठीं निघून गेल्यावर प्रेमचंद घरीं आले आणि आरामखुर्चीवर पडून वाचूं लागले. इतक्यांत दारावरून इन्स्पेक्टरसाहेबांची मोटार गेली. त्यांनीं अपेक्षा व्यक्त केली कीं, प्रेमचंद उठून नुसता नमस्कार तरी करतील पण प्रेमचंद उठले सुद्धां नाहींत. इन्स्पेक्टरसाहेब गरम झाले. गाडी थांबवून त्यांनीं चपरासी पाठवला. त्याच्या बोलावण्यावरून प्रेमचंद

भेटण्यास गेले. इन्स्पेक्टर बोलले, "तुम्ही फार मगरूर झालांत. अधिकारी दारावरून गेला असतां उठून सलाम नाहीं केलात!" प्रेमचंदांनीं ताडकन् उत्तर दिलें, "मी जोंपर्यंत शाळेंत होतों तोंपर्यंत नोकर. त्यानंतर मी माझ्या घरचा बादशहा आहें."

● ● ●

## घरगुती वातावरणांत प्रेमचंद : ९

मुन्शी प्रेमचंद यांना बालपणापासून घरचें सुख कितीसें होतें तें मधून मधून आपण पाहिलेंच आहे. सावत्र आई असल्यामुळें प्रेमाचे चार शब्दहि लहानपणीं प्रेमचंद यांना कोणीं दिले नाहींत. स्नेहहीन जीवनाचा मार्गच प्रारंभीं तरी त्यांना चालावा लागला. बालपणींच पहिलें लग्न झालें तें दुर्दैवानें दोघांनाहि मानवलें नाहीं. प्रेमचंदांनीं दुसरें लग्न केलें. पत्नी शिवरानीदेवी हिनें मात्र पतीच्या कार्यांत सर्वतोपरी मदत केली. सावत्र आईचा स्वभाव मोठा विचित्र असल्यामुळें पहिलीं कांहीं वर्षें थोडा त्रास झालाच. परंतु कांहीं दिवसांनीं म्हणजे नोकरी लागल्यानंतर मात्र प्रेमचंदांना स्वतःचें असें घर लाभलें. दगडाविटांनीं निर्माण केलेली अवाढव्य जागा म्हणजे घर नव्हे. प्रेमचंदांनीं 'कर्मभूमि' कादंबरींत घराची व्याख्या केली आहे; "जेथें स्वतःच्या विचारांचें राज्य तें आपलें घर. जे आपल्या विचारांना मान देतात ते आपले नातेवाईक." याप्रमाणें शिवरानीदेवी व मुलें यांच्या सहवासांत प्रेमचंद रमून जात. मुलांबाळांच्या सहवासांत त्यांना फारच सुख होत असे. त्यांच्या मुलीचें नांव कमला. सन १९१८ मध्यें बस्ती येथें असतांना प्रेमचंद यांना पहिला मुलगा झाला. त्याचें नांव धुन्नू (श्रीपतराय). मधला मुलगा मन्नू नांवाचा होता. तो बालपणींच निवर्तला. सन १९२२ मध्यें जो मुलगा झाला त्याचें नांव बन्नू (अमृतराय). या मुलांच्यावर प्रेमचंद यांचें भारी प्रेम होतें. धुन्नू-बन्नू हा पुकारा नेहमीं त्यांच्या तोंडीं असावयाचा. कचेरींतून आल्या-वर तास-दीड तास मुलांच्यांत रमल्याखेरीज त्यांना चैन पडत नसे. यायोगें त्यांचे श्रम दूर होत असत. गांवांत कांहीं उत्सवसमारंभ किंवा खेळ वगैरे

असले कीं प्रेमचंद मुलांना घेऊन पहावयास जात. स्वतः मुलांना लिहावयास-वाचावयास शिकविण्यांत त्यांना मोठा आनंद वाटे.

एके दिवशींची गोष्ट. शिवरानीदेवी स्वयंपाकांत गुंतली होती. तिच्याजवळ छोटा बच्चा बन्नू रडत होता. लहान मुलीनें समजावण्यासाठीं त्याला उचलून घेतलें, तों दोघेहि जमिनीवर पडले. मुलाच्या डोक्यास जखम झाली. चार दिवसपर्यंत तो पडून होता. शिवरानीदेवीस त्याच्याजवळ बसून रहावें लागत होतें. त्यामुळें स्वयंपाकाचें काम स्वतः प्रेमचंद करीत. पहांटे साडेचार वाजतां ते उठत, कांहीं लिहिणें-वाचणें करीत, धुन्नूला शिकवीत व मग इकडचें तिकडचें करून शाळेंत जात. मुलांच्या आजारांत कित्येक वेळां प्रेमचंद स्वतः सेवा करीत बसत. त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था ते स्वतः पाहत. सेवाधर्म हा प्रेमचंद यांच्या जीवनाचा मूलमंत्र होता. बन्नूवर त्यांचें जिवापाड प्रेम होतें. १९२४ मध्यें तो साडेतीन वर्षांचा झाला. प्रेमचंद एके दिवशीं बाजारांत एक खाट आणण्यासाठीं निघाले. बरोबर बन्नू-धुन्नू होतेच. गर्दींत छोटा बन्नू हरवला. प्रेमचंद गडबडून गेले. प्रत्येक माणसाजवळ छोट्या मुलाबद्दल विचारपूस करूं लागले. घाबरून धुन्नूस बोलले, "जा बेटा, घरीं जाऊन पहा. आईला सांग." धुन्नूहि रडूं लागला आणि घरीं निघून गेला. थोड्या वेळानें बन्नूला घेऊन स्वारी घरीं आली. पत्नीनें विचारलें, "कोठें हरवला होता?"

"पोरगा सांपडला नसता तर मी कसचा जिवंत राहतों? आम्ही दुकानांत चढलों तों हा हिंडत हिंडत दुकानाच्या मागच्या बाजूस गेला; आणि तेथें रडून रडून आकांत करीत होता. इकडे मी तर हवालदील होऊन गेलों. तुला तोंड कसें दाखवूं असें झालें. आज जर हा न मिळता तर घरीं मी न येता."

"मग सांपडला कसा?"

"मी चारहि दिशांना पाहत होतों तों कोठून तरी रडण्याचा आवाज येत होता. तेथें मी चटकन् गेलों आणि त्याला उचलून घेतलें. चित्तांतील अशांति त्या वेळीं मिटली."

यानंतर लहान मुलांना घेऊन प्रेमचंद बाजारांत सहसा गेले नाहींत. मुलांच्यावर कधीं कधीं प्रेमचंद रागावतहि असत. धुन्नू लहान असतांनाची

गोष्ट. एक लेख पूर्ण करून प्रेमचंद यांनीं टेबलावर ठेवला होता. कोठून तरी धुन्नू आला आणि तो लेख त्यानें टरकावून टाकला. दौत टाक घेऊन त्यानें स्वतः त्या कागदावर लेखन सुरू केलें. प्रेमचंदांनीं खोलींत प्रवेश केला तो स्वारीचें कृत्य त्यांच्या ध्यानांत आलें. रागानें त्याला एक चापटी मारून त्याच्या अंगावर ओरडले, " चल नीघ येथून. नाहीं तर मारीन आणखी." धुन्नूची किंकाळी शिवरानीदेवीच्या कानावर आली. तिनें प्रेमचंदांच्या बहिणीला काय झालें हें पाहण्यास सांगितलें. तिनें पाहिलें तों प्रेमचंद रागांतच होते. धुन्नूला मांडीवर घेत ती बोलली, " कां पोराला मारलें ? " प्रेमचंदांनीं उत्तर दिलें, " पहा तर, माझा लेख बेट्यानें फाडून टाकला. आज मला हा पाठवावयाचा होता. दुष्ट पोरानें तो फाडून टाकला. मी काय आतां कपाळ पाठवूं ! "

" मूलच आहे. समजून थोडेंच फाडलें ? तूं पण कांहीं कमी सैतान नव्हतास. "

" मी लेख थोडेच फाडीत होतों ? "

" लेख लिहिणारा होता कोण ? पण रामूचा कान तूं कापला होतास. आठवतें का ? लेख फाडण्यापेक्षांहि हें काम भयंकर होतें. " प्रेमचंदांना बहिणीच्या माऱ्यापुढें गप्प बसावें लागलें.

मुलांना नीट वळण लागावें म्हणून प्रेमचंद अतिशय जपत असत. १९३५ सालची गोष्ट आहे. दोनहि मुलें प्रयाग येथें शिकण्यासाठीं निघालीं होतीं. प्रेमचंद, शिवरानीदेवी व इतर कांहीं माणसें पोंचविण्यासाठीं दारांत उभीं होतीं. बन्नूनें सर्वांना नमस्कार केला आणि धुन्नूनें मात्र तसेंच गाडींत बसण्याचें धाडस केलें. मुलें निघून गेलीं तेव्हां प्रेमचंद उदास होऊन बोलले, " धुन्नू फार शिष्ट झाला. त्याला ना कोणाचें प्रेम ना लोभ ! "

" काय झालें ? " शिवरानीनें विचारलें.

" तूं पाहिलें नाहींस ? आपल्याला नमस्कार सुद्धां केला नाहीं. जसें कांहीं त्याचें-आपलें नातेंच नाहीं. "

" कॉलजमध्यें शिकतो ना ! "

" म्हणून काय झालें ? इंग्रजी शिकल्यावर एवढी ऐट नको यावयास. कोणी इंग्रज मुलगा घरून निघता तर असें थोडेंच वागता. सर्वांवर त्याचें

मनापासून प्रेम असतें. बापाचें चुंबन घेणें त्यांच्यांत फार शिष्टपणाचें समजलें
जातें. त्यांना आपण हृदयहीन समजतों, पण वस्तुतः तशी परिस्थिति नाहीं."

"असूं द्या, मूलच आहे."

"जाऊं द्या, हें मला नाहीं पटायचें. मला वाईट वाटतें कीं, माणसाला
आपल्या कर्तव्याचा विसर कां पडावा ? आमच्या मनांतील प्रेमास त्यानें
ठोकर दिली आहे. स्नेहाला धक्का दिला आहे."

याप्रमाणें मुन्शी प्रेमचंद स्वतःच्याच मुलाची एवढी चिंता करीत असत
असें नव्हे. लखनौस असतांना रात्रींची स्वयंपाकीणबाई आली नाहीं. सकाळीं
आली तेव्हां तिला विचारल्यावर तिनें सांगितलें, "कालपासून माझा मुलगा
हरवला आहे. साऱ्या शहरांत धुंडून आलें पण तपास नाहीं लागत. कोणी
सांगतात कीं, पळून गेला आहे. प्रेमचंद यांच्या कानावर ही गोष्ट गेल्यावर ते
रागावतच बाहेर आले आणि म्हणाले,

"अशा नादान मुलाची एवढी चिंता कशाला ? आपली विधवा आई
आपल्यासाठीं कशी मरत असते हेंहि त्या बदमाशाला समजूं नये ? तूं कशाला
चौकशी करतेस ? कमव, खा, आणि स्वस्थ पडून रहा. तुला तो कधींच सुख
देणार नाहीं. त्रास देण्यासाठींच तो जन्मास आला आहे."

"सरकार, आईची कळकळ आहे. कांहीं मानीत नाहीं. काल रात्रीपासून
तोंडांत पाणी सुद्धां नाहीं, कांहीं खाण्याची इच्छा होत नाहीं."

"असें कां करतेस ? तो स्वतःच्या खुशीनें गेला आहे. विनाकारण तूं
त्रास भोगतेस ?"

"आई आहे ही. मुलांची काळजी वाटणारच तिला." शिवरानी बोलली.

यानंतर पतिपत्नींत कांहीं बातचीत झाली. आईच्या प्रेमावर थोडा वाद
झाला. स्वयंपाकीणबाईचें काम थोडें वेगळेंच होतें. तिला माहीत होतें कीं,
बाबूजींच्या कचेरींत ज्योतिष जाणणारा कोणी एक भला मनुष्य आहे. मुला-
संबधीं त्याला विचारावें, असें म्हातारीच्या मनांत आलें. प्रेमचंदांनीं आईचें
हृदय पुरेपूर ओळखलें होतें. देवालाहि न मानणारे प्रेमचंद त्या वृद्धेस घेऊन
ज्योतिषाच्या घरीं गेले. पंडिताला सर्व गोष्टी समजावून सांगितल्या. ज्योतिषी-
बोवाची खूप तारीफ सुद्धां त्यांनीं केली. ज्योतिषानें सांगितलें, दोनतीन दिवसांत
मुलगा येईल. प्रेमचंदांनीं त्याच्यापुढें दोन आणे ठेवले व ते घरीं येण्यास

निघाले. तिसऱ्या दिवशीं मुलगा घरीं आल्यावर म्हातारीचा आनंद जगांत मावेना.

प्रेमचंद यांच्या प्रतिभेनें मानवी प्रेमाचे सर्व प्रकार हेरले होते व कांहींचा अनुभव स्वतः घेतला होता. मातृप्रेमाचा दीर्घ अनुभव त्यांना स्वतःला नव्हता तरी या प्रेमाची अद्‌भुत शक्ति मात्र त्यांनीं ओळखली होती. कोणीं एका त्यांच्या मित्रानें म्हटलें होतें कीं, प्रेमचंदांची शेवटची कादंबरी जर कोणती असेल तर ती गॉर्कीप्रमाणें ' आई ' हीच असणार ! प्रेमचंदांचे परममित्र व हिन्दींतील विख्यात लेखक जैनेन्द्रकुमार यांच्या आईच्या निधनाची वार्ता आल्याबरोबर प्रेमचंद एकदम उदास बनले. त्यांचे डोळे सजल झाले व त्यांच्या तोंडून उद्‌गार निघाले, " आज जैनेन्द्र एकटा झाला. त्याची आई मरण पावली... आई त्याचें सर्वस्व होतें. जैनेन्द्राला तीहि प्राणापलीकडे जपत असे. ती सभ्य आणि दिलदार होती. जैनेन्द्र एवढा मोठा झाला याचें सारें श्रेय त्या बिचारीस द्यावयास पाहिजे. ...अजून वयहि झालें नव्हतें...म्हणून माझा ईश्वरावर विश्वास बसत नाहीं. खराखुरा ईश्वर जगांत असेल तर तो दुःखितांनाच दुःख कां देईल ? आणि तरीहि लोक त्याला दयाळू पिता म्हणतात. त्याला दया कोठून येणार ? चांगले लोक रडूं लागले कीं त्याला आनंद होत असला पाहिजे. आपल्याच आश्रितांना दुःख देणारा ईश्वर कसा ?..." प्रेमचंदांच्या मनांतील खळबळ सहज ध्यानांत येण्यासारखी आहे.

शिवरानीदेवीचा उल्लेख मागें अनेक वेळां आला आहे. प्रेमचंद यांना सर्व दृष्टींनीं शोभून दिसेल अशी ही पत्नी होती. सामाजिक, राजकीय, धार्मिक, साहित्यिक वगैरे सर्व विषयांवर ती चर्चा करीत असे. प्रेमचंदांच्या हरएक कामांत तिचें साह्य असे. तिनें कांहीं कथाहि लिहिल्या आहेत. तिची पहिली कथा ' साहस ' या नांवाची प्रसिद्ध झाली. तो अंक व संपादकांचें उत्तेजनपर पत्र स्वतः प्रेमचंद घेऊन आले व त्यांनीं शिवरानीस खूप चिडविलें, " आतां तूं लेखिकाहि बनलीस तर. पहा या ' चाँद ' मासिकांत तुझी कथा छापून आली आहे. पुरुषांच्यावर फारच कडक टीका केली आहेस तूं. " यानंतर शिवरानीदेवीनें अनेक उत्तम उत्तम कथा हिन्दी भाषेंत लिहिल्या आहेत.

शिवरानी राजकारणांतहि स्वतः भाग घेत असे. प्रेमचंद ज्या कार्याचा पुर-

स्कार करीत तें ती स्वतः आचरून दाखवीत असे. कॉंग्रेसमध्यें अनेक प्रकारचीं कामें शिवरानीदेवी करी. नवऱ्याच्या अगोदर आपण कांहीं कार्य करावें व तुरुंगांत जावें, ही तिची इच्छा असल्यामुळें ती आपल्या कामाची फारशी वाच्यता घरीं करीत नसे. दिवसांतून दोनतीन सभांना ती उपस्थित राहून लोकांना उत्तेजन देत असे. सन १९३० सालांतील प्रसंग. मिठाचा कायदा मोडण्यासाठीं महात्मा गांधी दांडी-यात्रेस निघाले होते. प्रेमचंद या वेळीं लखनौस होते. सबंध शहरांत गडबड उडून गेली. प्रेमचंदांच्या घरासमोरच अमीनुद्दौला पार्क होती. तेथें स्वयंसेवक येऊन बेकायदा मीठ बनवीत असत आणि त्यांना पोलीस पकडून नेत असत. शिवरानी त्या स्वयंसेवकांचें कौतुक करी. त्यांच्या गळ्यांत हार अर्पण करी. स्वयंसेवक जेव्हां त्या माउलीच्या पायाशीं लागत तेव्हां तिचे डोळे भरून येत. ती त्यांना आशीर्वाद देत असे. २० जुलै रोजीं स्वरूपरानी नेहरू लखनौस आली. जवाहरलाल तुरुंगांतच गेले होते. त्यांची आई स्वरूपरानी. हिच्या भाषणांतील तेज काय वर्णन करावें? मुडद्यांत सुद्धां प्राण निर्माण होऊन तो लढायला सिद्ध व्हावा! स्वरूपरानी नेहरू सांगतील त्याप्रमाणें कांहीं स्त्रियांनीं वागण्याचें ठरविलें. शिवरानीनें पण आपलें नांव त्या यादींत दिलें. आणि काम सुरू झालें. सन १९३१ मधील नोव्हेंबरची ११ तारीख होती. प्रेमचंद तीन दिवसांपूर्वीच बनारस येथें गेले होते.

सकाळीं आठ वाजतां कॉंग्रेस कचेरींतून शिवरानीस बोलावणें आलें. विदेशी कापडाविरुद्ध उघड प्रचार करण्यासाठीं आठ-दहा स्त्रियांच्याबरोबर जाण्याचें काम होतें. शिवरानीदेवीनें तें पत्करलें व पिकेटिंगला प्रारंभ झाला. पंधरा-वीस मिनिटांत पोलीस आले. त्यांनीं सर्वांना अटक केली. महात्मा गांधींच्या जयजयकारांत शिवरानीदेवी पोलिसांच्या स्वाधीन झाली. साऱ्या जणी मोठ्या आवाजांत राष्ट्रगीत म्हणत होत्या. शिवरानीदेवीच्या मोटारींत जो शिपाई होता त्याच्या डोळ्यांतून अश्रु ओघळत होते. त्याला या प्रकाराबद्दल फार दुःख झालें होतें. तो बोलला, "माताजी, मला येथें महिन्यास बावीस रुपये मिळतात. दुसरीकडे कोणीं दहा जरी दिलें तरी मी ही पापाची नोकरी सोडून देईन." त्यावर शिवरानीनें त्याची समजूत घातली. कर्तव्यपालन करून बंदिवानांना प्रेमानें वागविण्यास तिनें सांगितलें. शिवरानीदेवी तुरुंगांत थोडी विव्हळ होऊन गेली. मुलें घरीं एकटीं आहेत. प्रेमचंदजी बनारसला, मुलें

रात्रीं कुणाच्या तोंडाकडे पाहतील ? त्यांच्या जेवण्याखाण्याचे काय होणार ?... पण त्या वीरमतीनें आपलें मन सावरलें.

दुसऱ्या दिवशीं प्रेमचंद घरीं आले. पत्नी तुरुंगांत गेल्याचें त्यांना आधींच समजलें होतें. तुरुंगांत भेटण्यासाठीं गेले तों शिवरानीस पाहतांच त्यांना भडभडून आलें. सजल नेत्रांनीं तिच्याकडे पाहत ते उद्गारले, " अच्छा, तूं निकलेंस तर ! "

" हो. मी येथें आलें. आपण सर्व ठीक ना ? "

एकमेकांनीं एकमेकांची विचारपूस केली. कथाकादंबऱ्यांतून ज्या एका तत्त्वांचा प्रसार प्रेमचंद करीत होते तेंच तत्त्व पत्नीनें आचरणांत आणून दाखविलेलें पाहून प्रेमचंदांना धन्यता वाटली. मुदतीच्या आधींच एक दिवस शिवरानीदेवीची सुटका झाली. दौडत ती घरीं आल्यावर तिनें पतीच्या पायांना स्पर्श करून प्रणाम केला. शिवरानीची प्रकृति खराब झाली होती. सात पौंड वजन कमी झाल्याकारणानें शिवरानी कृश दिसत होती.

दुसऱ्या दिवशींची गोष्ट. प्रेमचंद यांच्या खोलींत शिवरानी गेली तों स्वतःच्या फोटोस एक उत्तमपैकीं हार घातलेला तिला दिसला. तिनें विचारलें, " येथें माझा फोटो कशासाठीं ? लोक येतात जातात, त्यांच्यासमोर...काढून टाका या ठिकाणाहून... "

" काढून टाकण्यासाठीं का लावला आहे इथें ? "

" पण इथें बरा नाहीं दिसत. कोणीं पाहिलें तर ? "

" पाहिलें तर पाहिलें. तो कांहीं दडवून ठेवण्यासाठीं नाहीं लावला ! "

याच विषयावर पतिपत्नींच्यामध्यें पुष्कळ वेळ चर्चा झाली. प्रेमचंद पत्नीच्या मनास अतिशय जपत, त्याप्रमाणें शिवरानीदेवीहि पतीची काळजी मनापासून घेत असे. त्यांच्या तब्येतीकडे ती जाणीवपूर्वक लक्ष देई. प्रेमचंद फार काम करूं लागले कीं तिला काळजी वाटे. १९३५ चा सुमार. प्रेमचंद यांच्या अंगांत बराच ताप होता. त्यांच्या पोटांत दूध सुद्धां गेलें नव्हतें. पण अशाहि अवस्थेंत प्रेमचंद लिहावयास बसले. पत्नीनें विचारलें, " काय करतां हें ? "

" ' हंस 'साठीं लेख लिहितोंय्. कालच जावयास पाहिजे होता. "

" वा ! काम फार पडलें म्हणून आपणांस ताप आला. आज खाणेंपिणें सुद्धां नाहीं. पुरें झालें लिहिणें... "

" थोडा वेळच लिहितों...जुळारी आले आहेत प्रेसमधून. "

" मी एक सेकंदहि लिहूं देणार नाहीं. कलम मोडून टाकीन. उठा पाहूं. "

" अग पण, ' हंस ' छापला कसा जाईल मग ? "

स्वतःच्या आजारपणांतहि प्रेमचंदांना ' हंस ' आणि ' जागरण ' यांची चिंता लागून राहिलेली असे. ' हंस ' साठीं त्यांनीं फार कष्ट घेतले. रागावले म्हणजे ते शिवरानीस म्हणत, " व्यर्थ संतापतेस माझ्या ' हंस ' व ' जागरण 'वर ? सावत्र आई आहेस का त्यांची ? "

प्रेमचंद यांनीं निर्मिलेल्या साहित्याची किंमत शिवरानीदेवीस नीटपणें समजली होती. प्रपंचाचें भागवून तिनें अनेक वेळां त्यांच्या लेखनास आर्थिक साह्यहि केलें. प्रेमचंद यांच्या लिखाणावर ती कधीं कधीं चर्चाहि करी. गुणग्राहकतेचा मोठा गुण तिच्या अंगीं वसत होता. ' गोदान ' ही प्रेमचंदांची सर्वोत्तम कादंबरी छापून झाल्यावर पहिली प्रत घरीं आली. शिवरानी पुनः ती वाचीत होती. प्रेमचंद आपल्या खोलींत एकटेच होते. होरीरामाच्या दुःखद मृत्यूची हकीगत वाचतांना शिवरानीस रडूं कोसळलें. शेजारच्या खोलींतून चकित होऊन प्रेमचंद काय झालें म्हणून पाहण्यासाठीं आले. ' गोदान 'चा शेवटचा भाग शिवरानीसमोर पडलेला होता. ती हातांत घेऊन प्रेमचंद बोलले,

" किती वेडी आहेस तूं. कल्पित गोष्टी वाचून रडतेस तूं ! "

" आपण बिचाऱ्या होरीला कां मारलें ? त्या बिचाऱ्या झुनियेला विधवा बनवलेंत. "

भोळ्या शिवरानीची समजूत करतां करतां प्रेमचंदांना पुरेवाट झाली.

प्रेमचंद यांच्या कुटुंबास पैसा कधींच पुरा पडला नाहीं. याला जीं अनेक कारणें आहेत त्यांतील मुख्य कारण म्हणजे प्रेमचंद यांचा भोळसर स्वभाव. अनाठायीं दयाहि त्यांच्या हातून कधीं दाखविली जात असे. कोणी गरजू येत असें. आपली अडचण प्रेमचंदांना समजावून सांगे आणि तें सर्व प्रेमचंदांना खरें वाटे. शिवरानीदेवीस आग्रहानें पैसे देण्यास सांगत. असे कितीतरी पैसे प्रेमचंद-कुटुंबांतून लोकांनीं नेले असावेत. कानपुरास असतांनाची गोष्ट. एक महाशय प्रेमचंद यांच्या घरीं आले व बोलले, " रेल्वेंत माझा कोट चोरीस गेला. त्यामध्यें माझे सर्व पैसे होते. बायकोमुलांना आणण्यासाठीं

९८२८८ दि. ५ २०२ २०१४

सासुरवाडीस जात होतों. मला कांहीं रुपये द्याल का? आपण मदत कराल का?"

प्रेमचंदांनीं शिवरानीदेवीस रुपये देण्यास सांगितलें. नाहीं नाहीं म्हणतच तिनें त्याला कसे तरी पंधरा रुपये दिले. पांच-सहा दिवसांनीं हे सद्गृहस्थ आपल्या बायकोमुलांसह प्रेमचंद यांच्या घरीं येऊन उतरले. भल्या माणसाचा पाहुणचार त्यांना द्यावयाचा होता. वीस रुपयांची नवी मागणीहि त्यांनीं केली. पुन्हा पंधरा रुपये त्यांना देण्यांत आले. पैसे परत येण्याचीं चिन्हें कांहींच नव्हतीं. शेवटीं शिवरानीदेवी बोलली, "आज प्रतिज्ञा करतें कीं, कोणास उधार-उसने पैसे म्हणून देणार नाहीं." पण देणारानें ती प्रतिज्ञा पाळली पाहिजेना! प्रेमचंदांना सर्वांच्या अडचणी खऱ्या वाटत.

ग्वाल्हेरहून एक पत्र आलें. शंभर रुपये आपण पाठविले तर दरमहा शंभर रुपयांची नोकरी मला मिळणार आहे. मला रक्कम अगोदर द्यावयाची आहे. प्रेमचंदांचा आग्रह पडला कीं, बिचाऱ्यास पैसे द्यावेत. पन्नास-पन्नासच्या हप्त्यांनीं तो सहज रक्कम फेडील अशी त्यांची कल्पना. दुसऱ्या दिवशीं शंभर रुपये पाठवून देण्यांत आले. कांहीं दिवसांनीं पैसे मागणारे गृहस्थ स्वतः प्रेमचंदांच्या घरीं आले आणि बोलले, "रजा घेऊन मुद्दाम आपल्या दर्शनास आलों आहें. लहानपणीं आई वारली, वडिलांनीं दुसरें लग्न केलें आणि मग माझे हाल सुरू झाले. मी आतां हेंच आपलें घर समजतों." प्रेमचंदांना या अनाथाची दया आली. स्वतः याच आपत्तींतून ते गेले होते. कांहीं दिवसांनीं स्वारी आणखी पन्नास रुपये घेऊन निघून गेली. कांहीं दिवसांनीं या गृहस्थानें लग्नाचा थाट मांडला. प्रेमचंदांना बोलावणें आलें. आपल्या नव्या सुनेसाठीं सोन्याच्या चार बांगड्या, गळ्यांतील साखळी, कर्णफूल आणि दोन-तीन रेशमी साड्या व बरोबर शंभर रुपये घेऊन प्रेमचंद स्वतः पाटण्यास गेले. त्याचें लग्न झाल्यानंतर त्याच्या शोधास पोलीस आले. हा फरारी झालेला मनुष्य होता. असा हा प्रेमचंदांचा व्यवहार!

शिवरानी तुरुंगांत असतांना बँकेंतून प्रेमचंदांनीं दोनशे रुपये असेच एका महाशयास देऊन टाकले. तुरुंगांतून सुटून आल्यावर शिवरानीनें जाब विचारला. प्रेमचंद बोलले, "एक सज्जन आले होते. देऊन टाकले." अशा कित्येक सज्जनांनीं प्रेमचंदांना लुबाडलें असेल.

प्रेमचंदांच्या स्वभावाचे अनेक पैलू त्यांच्या व्यावहारिक जीवनांत आपण पाहिले. घरगुती वातावरणांत प्रेमचंद ही व्यक्ति कशी होती याची यथार्थ कल्पना आतां आली असेल. मुलांशीं, नोकरमाणसांशीं, बायकोशीं त्यांचा व्यवहार कसा असे हेंहि नीट ध्यानांत येण्यास हरकत नसावी. आपण कोणी शिकलेले, प्रतिष्ठित, मोठें आहोंत हा वृथाभाव प्रेमचंद यांच्या मनांत कधींच निर्माण झाला नाहीं. आपल्या खेडेगांवीं असतांना तर ते इतके साधे वागत कीं, खेडुतांना वाटे, हा आपल्यापैकींच एक. दरवाजापुढचें झाडून काढण्याचें काम स्वतः प्रेमचंद करीत. दाराशीं छोट्या लोकांना गोळा करून माती जमवीत, पानें गोळा करीत आणि चिखल करून पोरांना खेळ शिकवीत. दुपारीं चारनंतर गांवांतील शेतकरी त्यांच्याभोंवतीं जमत तेव्हां त्यांच्याशीं प्रेमचंद मनसोक्तपणें गप्पागोष्टी करीत असत. नवे नवे कायदे त्यांना समजावून सांगत, त्यांचीं भांडणें मिटवीत. सर्वांच्याबरोबर ते स्वतःच किसान बनून जात. त्यांचीं दुःखें पाहून प्रेमचंद नेहमीं विव्हळ होत असत. शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांचा विचार ते स्वतः करीत.

प्रेमचंदांच्या जीवनांत शिवरानीदेवीस मोठेंच स्थान आहे. यश-अपयश, सुख-दुःख, या सर्वांत तिनें सहभाग घेऊन दिवस काढले. एखाद्या लहान मुलाला सांभाळावें तशी तिनें प्रेमचंदांची जपणूक केली. स्वतःस लोकरी कपडे शिवण्यासाठीं दिलेले पैसे जेव्हां प्रेमचंदांनीं प्रेसमधील कामगारांना वांटून टाकले तेव्हां शिवरानीदेवी नाराज झाली. पण प्रेमचंदांनीं समजूत केली, " रानी, दिवसभर जे प्रेसमध्यें राबून मेहनत करतात आणि भुकेले राहतात त्यांना सोडून मी गरम सूट वापरूं ? " शिवरानी चिडून बोलली, " तुमच्या प्रेसमधील कामगारांचा पत्कर मीं नाहीं घेतला." त्यावर प्रेमचंद संथपणानें बोलले, " पण तूं माझा तर पत्कर घेतला आहेस ना ! माझें तर सर्व तुझेंच आहे. तूं-मी एकाच नावेंतील यात्रेकरू आहोंत. शिवरानी स्तब्ध राहिली. शेवटीं प्रेमचंद यांच्या कपड्यांकडे तिनें स्वतः लक्ष दिलें व त्यांच्या भावाकडून कपड्यांची व्यवस्था केली. मोठ्या मुश्किलीनें प्रेमचंदांनीं सूट अंगावर घातला आणि शिवरानीदेवीपाशीं ते आले व बोलले, " मी तुला सलाम करतों. मीं तुझा हुकूम आज मानला आहे." शिवरानीदेवी थट्टेमुळें गोंधळली पण आशीर्वाद देत बोलली, " ईश्वर तुम्हांला सुखी ठेवो आणि दरवर्षी नवे कपडे मिळोत.

...पण आपण मला सलाम कां केलांत ? वय, बुद्धि, नातें, पदवी या सर्व बाबतींत मी लहान, मग आपण असें कां केलें ? त्यावर प्रेमचंदांनीं उत्तर दिलें " वय, विद्वत्ता, पदवी या गोष्टींना महत्त्व न देतां मी फक्त हृदयाकडे पाहतों. तुझें हृदय आईचें आहे. ज्याप्रमाणें आई आपल्या मुलांना खाऊंपिऊं घालून खूष करते त्याप्रमाणें तूंहि माझी निगा राखतेस, यासाठीं मीं तुला प्रणाम केला ! "

असें हें प्रेमचंदांचें आनंदी, मोकळें, साधें घरगुती जीवन. जाड्याभरड्या कपड्यांत व ओबडधोबड शरीरांत अत्यंत प्रगत झालेला आत्मा निवास करीत होता. मुलांबाळांनीं गजबजलेल्या घरांत प्रेमचंदांना स्वर्ग वाटे. या सुखमय वातावरणांत त्यांनीं सेवाभाव पत्करून सर्वांना सुखविलें. शरीराचे चोचले तर त्यांनीं केव्हांच केले नाहींत. ' लेखक ' नांवाच्या कथेंत ते लिहितात, " साहित्य-सेवा आणि स्थूलता यांत विरोध आहे. कोणी साहित्यसेवक जाडाजुडा मनुष्य दिसला कीं समजावें, त्याच्यांत माधुर्य नाहीं, कोवळीक नाहीं, हृदय नाहीं. दिव्याचें काम जळत राहणें हें आहे. दिवा परिपूर्ण भरलेला आहे याचा अर्थ असा कीं, तो जळलेला नाहीं. " प्रेमचंद तर नित्य दुसऱ्यासाठीं, पीडितां-साठीं तिळतिळ जळत होते. प्रसन्न अशा घरगुती वातावरणांत प्रेमचंद यांना हा सेवाभाव सार्थ करून दाखवितां आला. म्हणून एके ठिकाणीं प्रेमचंद यांनीं लिहिलें आहे, " घर ही वस्तु किती पवित्र, कोमल आणि मनोहर स्मृति जागृत करीत असते. घर प्रीतीचें क्रीडाकुंज आहे. प्रेमानें दीर्घ तपश्चर्या करून घर हें वरदान प्राप्त करून घेतलें आहे. "

●●●

## " मैं लुट गयी ! " : १०

कादंबरी-लेखनांत आतां प्रेमचंद यांचा हात धरणारा दुसरा गृहस्थ कोणी नव्हता. प्रगतिशील लेखक संघाच्या अध्यक्षीय भाषणानें आणि ' गोदान ' कादंबरीनें त्यांना विपुल कीर्ति प्राप्त करून दिली. उर्दू आणि हिंदी भाषांतील सर्वश्रेष्ठ कलाकार म्हणून त्यांची गणना सर्वत्र होऊं लागली होती. उर्दू भाषेंत ' फितरत निगार ' आणि हिन्दी भाषेंत ' उपन्यास-सम्राट् ' या पदव्या त्यांना

प्राप्त झाल्या. त्यांच्या कथांचे अनुवाद गुजराथी, बंगाली, मराठी इत्यादि देशी भाषांतून होऊं लागले. इंग्रजी आणि जपानी भाषांतहि कांहीं कथाचे अनुवाद झालेले होते. प्रेमचंदांच्या साहित्यास आज रशियांतहि फार मोठा मान आहे. ' प्रेमाश्रम ' आदि कादंबऱ्या रशियन भाषेंतहि अग्रगण्य ठरल्या आहेत. या प्रकारें मुन्शी प्रेमचंद यांना त्यांच्या आयुष्यांतच कीर्ति प्राप्त झालेली होती. परंतु कीर्तीच्या पाठीमागें ते कधींच नव्हते. प्रतिकूल परिस्थितीशीं झुंज खेळत खेळत प्रेमचंद आपला रस्ता सुधारत होते आणि कीर्ति त्यांच्यापाठोपाठ धांवत येत होती. लेखकाचें कर्तव्य सांगतांना प्रेमचंद यांनीं लिहिलें आहे कीं, " सच्च्या दिलानें आपण समाजाची सेवा करूं तर मान, प्रतिष्ठा, आणि प्रसिद्धि आपल्या पायाशीं लोळण घेत येईल. पण मान-प्रतिष्ठा यांची फिकीर आपण कां करावी ! त्यांची प्राप्ति जर झाली नाहीं तर आपण निराश तरी कां व्हावें ! सेवेंत जो आत्मिक आनंद आहे तोच आपला सर्वोत्तम पुरस्कार आहे. "

अनेक आपत्तींशीं तोंड देत देत प्रेमचंद यांनीं जीवनसंग्राम कसा जिंकला हें आपण पाहिलेंच आहे. या संग्रामांतील आतां शेवटची लढाई चालू होती. मुंबईहून आल्यापासून प्रेमचंद यांची प्रकृति ढांसळली ती पुनः सुधारलीच नाहीं. सन १९३६ मधील जूनच्या २५ व्या तारखेस त्यांना मध्यरात्रीस रक्ताची उलटी झाली. तेव्हांपासून झोप कशी ती प्रेमचंद यांना माहीत नाहीं. पित्ताच्या खराबीमुळें त्रास होतो, असा डॉक्टरांचा अभिप्राय पडला. असे कित्येक रोगी मीं बरे केले आहेत, असें आश्वासनहि त्यांनीं दिलें. पण प्रेमचंद यांची प्रकृति दिवसेंदिवस बिघडतच चालली. रस्त्यांतून चालतांना पाय थरथरूं लागत आणि डोळ्यांना अंधारी येई. पतीची ही दशा पाहून शिवरानीदेवी घाबरून गेली. पोटांतून कळाहि येत असत. पण या दशेंतहि काम करण्याची केवढी हौस प्रेमचंद यांना वाटे. रात्रीं दिवा लावून त्यांचें वाचणें-लिहिणें चालूच असे. ' मंगलसूत्र ' ही आपली अखेरची कादंबरी त्यांनीं लिहावयास घेतली होती. अधिक ओजस्वी भाषेंतून ती आकारास येत होती. या समयास प्रेमचंदांची प्रतिभा प्रौढ आणि परिणत प्रज्ञेनें पुष्ट झालेली होती. शिवरानीदेवी ' लिहूं नका ' म्हणून सांगत असे आणि इकडे प्रेमचंद यांना तर आवेग अनावर होऊन जात असे.

रोग वाढत होता आणि मृत्यूची वाटचाल जलद होत होती. पोटांतील रोग फार जुना होता. जवळ-जवळ पंचवीस वर्षेपर्यंत प्रेमचंद त्याच्याशीं लढत होते. आतां थोडीच भीति वाटणार त्याची त्यांना ! आपलें काम नेटानें करीत प्रेमचंदांनीं अनेकांना उदाहरण घालून दिलें होतें. त्यांच्या ' लेखक ' नावाच्या कथेंत याच प्रकारचा संदेश आहे; " आपला धर्म काम करणें हाच आहे. आपण तनमनधनापासून काम करावें आणि इतकें करूनहि उपास पडले तर दोष आपला नाहीं. मरून तर जाऊंच. आपल्याप्रमाणेंच मरणारीं लाखों माणसें आहेत. मरण ही भिण्याची वस्तु नाहीं. मी तर त्याला कधींच भीत नाहीं. " आणि याच श्रद्धेवर प्रेमचंद यांचीं नित्यकर्में नियमितपणें सुरू होतीं. रशियाचा प्रसिद्ध कथाकार मॅक्झिम गॉर्की याचें निधन झाल्याची वार्ता ऐकून प्रेमचंद यांना फार दुःख झालें. दोघेहि समानधर्मी होते. दलितांचा, पीडितांचा कैवार घेऊन दोघांनींहि आपलें कथाक्षेत्र नटविलें होतें. किसान-मजुरांच्या जीविताची पाहणी दोघांनींहि मनापासून केली होती. तो समानधर्मा गॉर्की मरण पावल्याची बातमी ऐकतांच प्रेमचंद विव्हळ होऊन उठले.

बनारस येथील ' आज ' वृत्तपत्राच्या कार्यालयांत ऑगस्टमध्यें गॉर्कींच्या मृत्यूबद्दल दुखवट्याची सभा होती. प्रेमचंद यांना रात्रभर झोप येईना, तेव्हां सभेंत करावयाच्या भाषणाची तयारी त्यांनीं चालविली. कागद-पेन्सील घेऊन ते भराभर लिहूं लागले. शिणून गेलेली शिवरानी नुकतीच झोपली होती; पण मध्येंच दचकून जागी होते तों स्वारी जमिनीवर बसून लिहिण्यांत दंग झालेली !

" काय करतां हें आपण ? " शिवरानीनें विचारलें.

" कांहीं नाहीं. "

" नाहीं कसें ? कांहींतरी लिहितां तुम्हीं. "

" उद्यां ' आज ' च्या कचेरींत गॉर्कींच्या मृत्यूबद्दल सभा आहे. "

" कसली सभा ? प्रकृति नीट नाहीं आणि भाषण लिहीत बसलांत ? माहीत आहे ? दोन वाजलेत. "

" झोप येत नाहीं तर काय करूं ? भाषण तर लिहिलेंच पाहिजे. "

" पण तब्येत बरी नाहीं तर भाषण लिहिणार तरी कसें ? "

" लिहीन तसेंच. जरूरी आहे ना ! लिहिल्याशिवाय कसें चालेल ? आपल्या खुषीनें काम चालू असलें म्हणजे आराम किंवा तकलीफ यांचा प्रश्न

६...

निर्माण होत नाहीं. ज्याला आपण कर्तव्य म्हणून म्हणतों तें करण्यांत त्रास कसला ! मोठ्या तन्मयतेनें कर्तव्य पार पाडलेंच पाहिजे माणसानें."

"आहे तरी कसली ही सभा ?"

"शोकसभा आहे."

"कोण आपल्याच देशचा माणूस होता का ?"

"इथेंच तर आमच्या लोकांचें चुकतें. गॉर्की एवढा मोठा लेखक होता कीं, त्याच्याबद्दल कोणत्या देशचा हा प्रश्नच निर्माण होऊं शकत नाहीं. हिंदुस्थानी कीं युरोपीय हा प्रश्नच चुकीचा आहे. त्यानें जें लिहिलें त्यामुळें सर्वांनाच लाभ झाला आहे."

"कां ! त्यानें हिंदुस्थानबद्दलहि कांहीं लिहिलें आहे ?"

"रानी, तूं चूक करते आहेस. लेखकाबद्दल असें म्हणतां येणार नाहीं. जें त्याच्याजवळ असेल तें तो सर्वांना देऊन टाकतो. सर्वांनाच त्याच्यापासून लाभ होत असतो."

"गांवांत किती लोकांना तुमच्या गॉर्कीचें नांव माहीत आहे ?"

"या गांवचें काय पुसतेस ! येथील लोक स्वतःलाहि जाणत नाहींत."

"कां जाणत नाहींत ? तुलसी, सूर, कबीर यांना कोण जाणत नाहीं ?"

"यांनाहि खरें जाणून घेणारे गांवांत थोडेच आहेत. आणि याचें खरें कारण आहे शिक्षणाचा अभाव... जेव्हां घरोघर शिक्षणाचा प्रसार होईल तेव्हां गॉर्कीचें नांवहि घरोघर ऐकूं येईल. सूर-तुलसीच्याप्रमाणें त्याचीहि सर्वत्र पूजा होईल......"

अशा प्रकारच्या गोष्टी चार वाजेपर्यंत चालल्या होत्या. दुसऱ्या दिवशीं दुर्दम्य उत्साहानें प्रेमचंद शोकसभेस उपस्थित झाले. आजारामुळें दुर्बलता मात्र वाढली होती. व्यासपीठाची शिडी चढतां चढतां त्यांची दमछाट झाली. भाषण करण्यास उभें राहवेना. तोंडांतून शब्द देखील बाहेर येईना. दुसऱ्या एका माणसानेंच भाषण वाचून दाखविलें. घरीं परत आले तों पाय लटपटत होते. चालणें मुश्कील होऊन बसलें होतें.

सप्टेंबर महिन्यांत प्रकृति अधिकच बिघडून गेली. परलोकची चिंता प्रेमचंद यांना मुळींच नव्हती. याच लोकांत सर्वत्र सुखसमाधान कसें नांदेल, याची काळजी मृत्युशय्येवरहि त्यांना लागून राहिली होती. गरिबांच्या दुनियेंत

सुंदरता कशी निर्माण होईल हाच एक ध्यास त्यांना लागला होता. प्रेमचंद यांची शेवटची कथा 'दो बहनें' ही ऑक्टोबर महिन्यांत 'इस्मत'मध्यें प्रसिद्ध झाली. या कथेंतील एक पात्र बोलतें, "जेवढे धनवान् लोक आहेत तेवढे सर्व लुटारू आहेत. पक्के लुटारू– डाकू! उद्यां माझ्यापाशीं रुपये यावेत– मी एक धर्मशाळा बांधीन; मग माझी किती तरी वाहवा होईल! पण ही दौलत कोठून आली हें कोण विचारणार?"

प्रेमचंद यांच्या मनास गॉर्कीच्या मृत्यूची मोठीच जखम झाली होती. कित्येक दिवस त्याच्यासंबंधींच गोष्टी ते बोलत असत; आणि दर वेळीं त्यामुळें त्यांच्या हृदयांत वेदनांची ऊर्मि उठून राही. गॉर्कीवर त्यांची अटळ श्रद्धा होती. प्रेमचंदांची प्रकृति झपाट्यानें खालावत होती. सर्व नातेवाईक मंडळी जमा झाली. मुन्शी दयानारायण निगम, जैनेन्द्रकुमार इत्यादि मित्र-मंडळीहि बनारसला आली. शेवटीं रामनाम म्हटल्यानें मुक्ति मिळते अशी आपली समजूत. प्रेमचंद यांच्या तोंडून ईश्वराचें नांव बाहेर पडावें म्हणून लोकांची खटपट सुरू झाली. पण प्रेमचंदांची दृष्टि याहि वेळीं गरीब जनतेच्या दुःखांत व्यग्र झालेली होती. 'बासी भात में खुदा का साझा' या कथेंत प्रेमचंदांनीं म्हटलें आहे, "प्रेम हेंच आपल्या जीवनाचें सत्य आहे. पण तुमचा ईश्वर मात्र दण्डभयानें सृष्टीचें राज्य करीत असतो. मग त्याच्यांत आणि मनुष्यांत फरक काय? अशा परमेश्वराची उपसना मी कशी करूं! जे मोठे आहेत त्यांच्यावर ईश्वर दया करणार; कारण ते दुनियेची लूट करतात...जोंपर्यंत जगांत ही अशीच परिस्थिति आहे तोंपर्यंत त्या ईश्वरावर माझा विश्वास बसणार नाहीं..." हाच भाव शेवटीं-शेवटींहि प्रेमचंद यांच्या बोलण्यांतून व्यक्त होत होता. मृत्युशय्येवर असतांनाहि 'हंस' कसा जगेल हीच चिंता प्रेमचंद यांना होती. सन्मित्र जैनेंद्रकुमार यांना प्रेमचंद मृत्यूच्या आधल्या दिवशीं म्हणाले,

"जैनेन्द्र, या वेळीं परमेश्वराची आठवण करावी असें तुम्ही सर्व जण म्हणतां, पण आत्तांपर्यंत ईश्वराला कष्ट द्यावेत असें मला वाटत नाहीं." एखाद्या नास्तिक तत्त्ववेत्त्याप्रमाणें प्रेमचंद बोलत होते. जैनेन्द्रांच्या समोर आपला उजवा हात करून प्रेमचंद म्हणाले, "दाब हा हात." कृश झालेला, पिवळा-पांढरा पडलेला हात जैनेन्द्रांनीं दाबला. प्रेमचंद कांहीं बोलले नाहींत. डोळे मिटून

स्वस्थ पडून होते. 'हंस' कसा टिकून राहील याची चिंता त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणें दिसत होती.

१९३६ च्या ऑक्टोबर ७ रोजीं थोडी बेशुद्धि दूर झाली. प्रेमचंद शिवरानीदेवीस बोलले, "शिवप्रसादजी गुप्तनें एक मातृमंदिर बनविलें आहे. महात्मा गांधींच्या हस्तें उद्घाटन होईल. लाखों लोक त्या ठिकाणीं जमतील."

"आपली प्रकृति चांगली होईल तर मीहि आपल्याबरोबर येईन."

"रानी, या जन्मीं तुझी इच्छा सफल होईल कीं नाहीं कोण जाणे."

"आपण कां आशा सोडतां! आपण कोणाचें काय नुकसान केलें आहे! भगवान् आपली इच्छा पुरी करीलच."

"रानी, माझ्यापासून दूर जाऊं नकोस. तूं जवळ असलीस म्हणजे माझें धैर्य खचत नाहीं..."

शिवरानीदेवीच्या डोळ्यांतून टपटप् अश्रूंचे थेंब ओघळूं लागले. पतीच्या देखत डोळ्यांत पाणी येऊं नये म्हणून तिनें आत्तांपर्यंत जपलें होतें. पण पतीला धीर देणाऱ्या शिवरानीचेंच धैर्य या वेळेस खचून गेलें होतें.

दुसऱ्या दिवशीं प्रेमचंदांना पुनः बेशुद्धि आली. जोराचा एक जुलाब झाला. साफ करण्यासाठीं शिवरानीदेवी पुढें झाली तों तिच्या भावानें म्हटलें, "बहन, आतां ते नाहींत. कोठें जातेस?"

शिवरानीनें हंबरडा फोडला. दि. ८ ऑक्टोबर १९३६ या दिवशीं हिन्दी भाषेंतील उपन्यास-सम्राट्, महान् कलाकार, गरिबांचा वाली, दलितांचा कैवारी मुन्शी प्रेमचंद यांचा आत्मा नश्वर कुडी सोडून मॅक्झिम गॉर्कीच्या भेटीस निघून गेला.

* * *

मे १९३७ मध्यें 'हंस' मासिकाचा 'प्रेमचंद स्मारकांक' प्रसिद्ध झाला. त्यांत पहिलाच लेख शिवरानीदेवीचा आहे. "मैं लुट गयी!" या शीर्षकाखालीं त्यांनीं आपल्या पतीस श्रद्धांजलि समर्पण केली आहे. शोकग्रस्ता शिवरानीदेवीनें प्रेमचंदांचें आयुष्य जवळून निरखलें असल्यामुळें या लेखास फार महत्त्व आहे. त्यांत त्या लिहितात —

२५ जूनच्या रात्रीं दीड वाजतां—

'बेटा धुन्नू, जरा पंखा चालू कर पाहूं. फार उकडतें आहे.'—हे त्यांचे शब्द होते. थोड्या वेळांत धुन्नू दौडत माझ्यापाशीं आला व बोलला, "आई, बाबूजींना उलटी झाली आहे.' आशंका, भय आणि दुःख यांनीं मी फुलून निघालें. झटकन् मी तेथें येऊन पोंचलें. रक्ताची उलटी पाहून स्तब्ध झालें. जणु कोणीं विजेचा प्रहार मार्थ्यावर केला होता. थोड्या वेळानंतर त्यांनीं उद्गार काढले, 'रानी, आतां मी चाललों.' येणाऱ्या दुःखाच्या वावटळीस थोपवून धैर्य व साहस यांचा उसना आव आणून मीं म्हटलें— 'गप्प रहा आपण. आपण मला सोडून कसे जाणार!' त्या वेळीं रक्ताच्या पाटाकडे बोट दाखवून बोलले, 'ज्याच्या तोंडून हा रक्ताचा प्रवाह वाहिला, त्याचीच का तू आतां आशा करतेस!"...त्या दिवसानंतर मला नीट झोप आली नाहीं. रात्रीं दिव्याच्या प्रकाशांत त्यांचें लेखन याहि वेळीं चालू असे. 'मंगल-सूत्र' या कादंबरीचीं वीस पृष्ठें त्यांनीं याच अवस्थेंत लिहिलीं...कधीं कधीं रात्रभर त्यांना झोप येत नसे; त्या वेळीं मी त्यांना वाचावयास पुस्तकें देत असें. त्यांच्यासमोर खूष राहण्याचाहि प्रयत्न मी करीत असें.

एका रात्रीं—

"माझ्या स्वामींच्या पोटांत वेदना सुरू झाल्या. मी त्यांच्या उशाशीं बसून होतें. दुःख थोडें कमी झाल्यावर ते बोलले, 'रानी, मला तुझी व बन्नूची मोठीच चिंता वाटते. धुन्नू आतां मोठा झाला आहे; मुलीचेंहि लग्न झालें; ती सुखी आहे. पण तुझी व बन्नूची दशा काय होणार!" त्या वेळीं माझ्या धैर्याचे, संयमाचे व विश्वासाचे बांध फुटले गेले. जीवनांत पहिल्यानेंच मी रडूं लागलें. पण मीं माझ्या अश्रूंना लपविलें. ते बोलूं लागले, 'रानी, पूर्वजन्मीं तूं माझी आई होतीस व या जन्मीं देवी होऊन आली आहेस...तूं माझी आदिशक्ति आहेस...' मी ऐकून घेत होतें. त्यांचा वरदहस्त माझ्या डोक्यावर होता.

"...आज माझें सर्वस्व हिरावलें गेलें आहे. माझा सर्व निधि आज रिता पडलेला आहे. आज माझें मलाच दुःख होत आहे कीं, मी किती अभागी आहें! माझे सर्व विचार आणि विश्वास उखडून निघाले आहेत. ईश्वराच्या न्यायीपणावरहि माझी श्रद्धा ठरत नाहीं. माझ्या जीवनाची अमावस्या सुरू आहे. वारंवार माझ्या मनांत येतें कीं, ते किती महान् होते, देव होते आणि

मी तर त्यांच्यावर अधिकार गाजवूं पाहत असें. माझ्या निकटवर्ती असूनहि मी त्यांचें देवत्व नीट ओळखलें नाहीं. तसें पाहिलें तर मजजवळ काय होतें ? तरीसुद्धां त्यांनीं माझा उद्धार केला, प्रेम केलें, सन्मानासहित मला आपल्या अंतःकरणाच्या उच्च आसनावर बसविलें. त्या काळीं मला किती अभिमान होता—मी रानी होतें. ते उपन्यास-सम्राट् लोकांच्या दृष्टीनें—पण माझे स्वामी असूनहि ते माझे विनीत मित्र होते. त्या वेळीं माझ्याजवळ सर्व विश्वाचें सुख सांठवलेलें होतें. पण आज मी एकटी आहें. आज माझें समस्त जीवन उद्ध्वस्त होऊन गेलें आहे. माझी लेखणी चालू शकत नाहीं. घरकाम मला सुचत नाहीं.

"आज घरांत तें सरळ हास्य नाहीं. त्यांची संपादकीय खोली रिकामी आहे. आज माझे ईश्वर नाहींत. ... त्यांची स्मृति 'हंस' आज जिवंत आहे. पण त्या 'हंसा'चा मोती कोठें आहे ?... "

●●●

## प्रेमचंद कोण होते ? : ११

प्रेमचंद कोण होते ?— हा प्रश्न चमत्कारिक तर खराच, पण तो तितकाच महत्त्वाचाहि आहे. आतांपर्यंत त्यांची जी चरित्रकथा आपण पाहिली तीवरून व पुढें त्यांच्या साहित्याचें विवेचन आपण करणार आहोंत त्यावरून प्रेमचंद कोण होते, याचा उलगडा आपणांस थोड्याफार प्रमाणांत होईल. तत्पूर्वी त्यांच्या मित्रपरिवारानें व टीकाकारवर्गानें प्रेमचंद यांच्या व्यक्तिमत्त्वाचें व साहित्याचें मोजमाप कसें केलें आहे हें पाहणें उपयुक्त ठरणार आहे. असें सांगतात कीं, प्रेमचंद यांच्या साहित्याचा गौरव हिंदी भाषेखेरीज इतर भाषीय लोकांनींच मनापासून केला. प्रेमचंद हयात असेपर्यंत त्यांचा व त्यांच्या साहित्याचा सन्मान जसा करावयास पाहिजे होता तसा हिंदी भाषीय लोकांनीं केला नाहीं. जगांतील श्रेष्ठ कथाकारांच्या पंक्तींत बसणारा एक लेखक या हिंदी भाषेस मिळाला, पण त्याची योग्य ती दखलगिरी समकालीन साहित्यिकांच्या मेळाव्यांत घेतली गेली नाहीं. रवींद्रनाथ, शरद्बाबू, कन्हय्यालाल

मुन्शी, आपले हरिभाऊ आपटे या सर्वांच्याहून प्रेमचंद यांची कला थोड्या वेगळ्या स्वरूपाची होती. त्यांच्या ‘गोदान’ कादंबरीसारखें शेतकऱ्याच्या जीवनावरील महाकाव्य इतरत्र सांपडणें दुर्मिळ आहे. इतर भाषियांच्या तोडीस तोड म्हणून एकच कथाकार हिंदीस लाभला आणि तो म्हणजे मुन्शी प्रेमचंद. पण असें असतांना प्रेमचंद यांच्या हयातींत त्यांना मिळावयास हवा तसा मानसन्मान प्राप्त झाला नाहीं.

हें मत खरें कीं खोटें याची चर्चा आपणांस करावयाची नाहीं. उपन्यास-सम्राट् ही त्यांची पदवी कोणीहि हिरावून घेऊं शकणार नाहीं. प्रेमचंद हयात असतांना व त्यांच्या पश्चातहि त्यांच्या साहित्याचें गुणग्रहण करणारीं अनेक पुस्तकें झालीं. प्रेमचंद यांचा मित्रपरिवारहि मोठा होता. त्यांतील कांहीं विख्यात साहित्यिकांनीं प्रेमचंद यांच्याबद्दल गौरवात्मक लिहिलें आहे. त्यांपैकीं कांहींच्या मतांचा सूर वर दर्शविलेल्याप्रमाणें प्रेमचंद यांच्या उपेक्षेसंबंधीं आहे. एवढा मोठा साहित्यसम्राट् पण हिन्दी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यास कां लाभूं नये? ‘मंगलाप्रसाद’ हें सर्वोच्च पदक त्यांच्या ‘गोदान’ कादंबरीस कां मिळूं नये! असे अनेक प्रश्न प्रेमचंद यांच्या मित्रांच्या मनांत निर्माण होतात. प्रेमचंदांच्या शेंकडों चाहत्यांनाहि हे प्रश्न मधून मधून सतावत असत. पण याहि ठिकाणीं महत्त्वाची गोष्ट अशी कीं, प्रेमचंद ज्या वर्गासाठीं लिहीत होते तो वर्ग मात्र त्यांना पूर्णपणें मानतो. जनतेनें त्यांना उपन्याससम्राट् हें पद केव्हांच बहाल केलें होतें. जनतेकडून मिळालेल्या या श्रेष्ठतम पदवीबद्दल प्रेमचंद स्वतःच खूष होऊन गेले असतील. मी जनतेचा एक तुच्छ सेवक आहें, जनतेकडून रायसाहेबी मिळाली म्हणजे सर्व पावलें, अशा आशयाचीं वचनें प्रेमचंद यांच्या तोंडून निघालीं आहेत. अर्थात् प्रेमचंद यांचा हा वैयक्तिक दृष्टिकोन झाला.

प्रेमचंद कथाकार, कादंबरीकार, म्हणून प्रसिद्ध होते. पण सर्वांआधीं ते मनुष्य होते ही गोष्ट महत्त्वाची आहे. मानवी गुणावगुणांवर त्यांची निस्सीम श्रद्धा होती. आणि या श्रद्धेंतून त्यांच्या कथासंसाराची उभारणी झाली आहे. त्यांच्या कथाविश्वावर बेहद्दपणें खूष होऊन जाणारे लोक त्यांचा गौरव कसा करतात, हें पाहण्यापूर्वी प्रेमचंद स्वतःविषयींच नेमकें काय म्हणतात हेंहि पाहणें उपयुक्त होईल.

डॉ. इन्द्रनाथ मदन यांना ७।९।३५ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत मुन्शी प्रेमचंद म्हणतात,

" माझ्या लहानपणीं माझ्या घरचा जो प्रभाव माझ्या मनावर पडला तो अगदीं सामान्य होता. त्याला चांगलें म्हणतां येणार नाहीं आणि वाईटहि समजतां येणार नाहीं. मी आठ वर्षांचा असतांना माझी आई दिवंगत झाली. त्याआधींची आठवण पुसट पुसट अशी आहे. केवळ एवढेंच स्मरतें कीं, माझी दुर्बल माता कधीं अत्यंत ममतामयी वाटे तर वेळ पडल्यास कधीं कधीं कठोरहि होत असे...... पहिल्यानें मीं उर्दू साप्ताहिकांत व नंतर मासिकांतून लिहावयास प्रारंभ केला... लिहिणें हेंच माझें व्यसन होतें. पण शेवटपर्यंत मी लिहीतच राहीन असें कधीं वाटलें नव्हतें. मी सरकारी नोकरींत होतों आणि वेळ मिळाला कीं लिहीत होतों.... माझा पहिला लेख १९०१ मध्यें छापला गेला आणि पहिलें पुस्तक १९०३ मध्यें प्रसिद्ध झालें. या रचनेनें आत्मतुष्टीखेरीज दुसरा कोणताहि लाभ मला झाला नाहीं. सन १९०७ सालापासून मीं कथा लिहिण्यास आरंभ केला; आणि यश मिळत आहेसें पाहून लिहिणें चालू ठेवलें. सन १९१४ मध्यें माझ्या कथा हिंदींतून प्रसिद्ध होऊं लागल्या. त्या वेळेपासून मी हिंदी भाषेंतूनच 'सरस्वती' मासिकांत लेखन करूं लागलों. त्यानंतर माझी 'सेवासदन' कादंबरी प्रसिद्ध झाली आणि मी नोकरी सोडून स्वतंत्रपणें लेखन करूं लागलों.

माझ्या जीवनांत कोणताहि प्रेमप्रसंग निर्माण झाला नाहीं. जीवन इतकें कठीण होतें आणि जीवनोपार्जनासाठीं इतके कष्ट करावे लागले कीं, त्यांत रोमान्सला अवकाशच उरला नाहीं. कांहीं सर्वसाधारण घटना आहेत, पण त्यांना प्रेमप्रसंग म्हणतां येणार नाहीं.

अविरत कार्य हेंच माझें जीवन बनलें आहे. जेव्हां मी सरकारी नोकर होतों तेव्हांहि साहित्यसेवेंतच मी माझा वेळ खर्च करीत असें. मी काम करण्यांतच आनंद मानीत आलों आहें. कधीं कधीं निराशेच्या क्षणीं आर्थिक कष्टांचेहि अनुभव येत असत. याखेरीज मी आपल्या भाग्यावर संतुष्ट आहें; आणि मला माझ्या अपेक्षेपेक्षां अधिक यश प्राप्त झालें आहे. आर्थिक दृष्टीनें मात्र मी अयशस्वी आहें...मी कधीं पत्रकार नव्हतों, परंतु परिस्थितीमुळें मी अगतिक होऊन, साहित्यनिर्मितीमुळें जें कमावलें तें सर्व पत्रव्यवसायांत मीं खर्च केलें.

मानवी चरित्रांत जें कांहीं सुंदर व मानवोचित आहे त्याचें उद्‌घाटन करण्याच्या दृष्टीनें मीं आपलीं कथानकें निवडलीं आहेत. हें कार्य फार गूढ आहे...माझ्या कथांचा आधार मनोविज्ञानच ठेवण्याचा प्रयत्न मीं केलेला आहे...रोमाँरोलाँप्रमाणें नियमित कार्य करण्यावर माझा पूर्ण विश्वास आहे... ''

दि. २६।१२।१९३४ रोजीं लिहिलेल्या आणखी एका पत्रांत मुन्शी प्रेमचंद म्हणतात, '' होय. मी टॉल्स्टॉय, व्हिक्टर ह्यूगो आणि रोमाँ रोलाँ यांच्या साहित्यानें प्रभावित झालों आहें. कथांच्या संबंधीं बोलावयाचें झाल्यास डॉक्टर रवींद्रनाथ ठाकूर यांच्याकडून मीं प्रेरणा घेतली आहे. शैलीचा विकास मात्र माझा मींच स्वतः केला आहे...सिनेमांत साहित्यिक व्यक्तीला स्थान नाहीं. आर्थिक दृष्टीनें स्वावलंबी होतां आलें तर पहावें म्हणून मी येथें ( मुंबईस ) आलों होतों. पण माझा हा भ्रम होता. आतां मी परत साहित्यांत येत आहें...मी कधीं तुरुंगांत गेलों नाहीं. मी क्रियात्मक व्यक्ति नाहीं... जनमत तयार करणें हा आपला उद्देश असल्यामुळें सामाजिक विकासावर माझा पूर्ण विश्वास आहे. प्रत्येकास सारखी संधि मिळणें हा माझा आदर्श आहे. प्रारंभीं प्रारंभीं चिन्तनाचा परिणाम म्हणून नव्हे तर परंपरागत श्रद्धे-मुळें मी एका महान् दैवी शक्तीवर विश्वास ठेवीत होतों. विश्वाच्या बुडाशीं ईश्वरीय शक्ति असली तरी मानवी जीवनाशीं तिचें कांहीं देणें-घेणें असेल असें मला वाटत नाहीं. ''

मुन्शी प्रेमचंद यांच्या संक्षिप्त आत्मनिवेदनावरून त्यांच्या कार्यासंबंधीं कांहीं कल्पना करतां येण्यासारखी आहे. प्रेमचंद यांच्या निधनानंतर ' हंस 'चा एक विशेषांक प्रसिद्ध झाला. त्यांत प्रेमचंदांच्या मित्रांनीं व चाहत्यांनीं त्यांच्या-संबंधीं कांहीं माहिती व कांहीं आठवणी दिल्या आहेत. त्यांतील कांहीं महत्त्वाच्या भागाचा परिचय करून घेण्यासारखा आहे. प्रेमचंद कोण होते ?—या प्रश्नाचें उत्तर कदाचित् त्यानंतर मिळण्यासारखें आहे.

'' प्रेमचंद यांच्या मृत्यूमुळें हिंदी भाषेचा एक स्तंभ तुटला गेला आहे. हिन्दीचा सर्वश्रेष्ठ कथाकार निघून गेला. आज आपल्या उपन्यास-सम्राटाचें देहावसान झालें. पण त्यांच्या अमर कीर्तीची ध्वजा सर्वत्र फैलावत राहील. मी आज निःसंकोच भावनेनें म्हणूं शकतों कीं, प्रेमचंदखेरीज हिन्दी भाषेस एवढा

मोठा लेखक लाभला नाहीं. भाषा प्रेमचंदांची दासी बनून गेली होती. माझा विश्वास आहे कीं, त्यांच्या साहित्यांत अमरत्वाची सामग्री भरपूर आहे.”

—श्री. अवध उपाध्याय.

“सन १९२७ मध्यें प्रेमचंदजी ‘माधुरी’ मासिकाचें संपादन करीत असत. त्या वेळीं लखनौ येथें पहिल्याप्रथम मीं त्यांची भेट घेतली. त्यांच्या दर्शनानेंच मी थोडासा संकोचल्यासारखा झालों. त्यांचें चमकणारें विस्तृत ललाट, अन्तर्भेदी आणि सुगंभीर शांत डोळे, मोठ्या भुंवया आणि मोठ्या मिशा या सर्वांच्या एकीकरणामुळें त्यांच्यांत असें एक व्यक्तिमत्त्व निर्माण झालें होतें कीं, ते संपूर्ण भारतीय असूनहि आपल्या भावलोकाच्या वैशिष्ट्यामुळें त्यांच्यांत एक निराळीच विशेषता निर्माण झाली होती. मला असें स्मरतें कीं, रवीन्द्रनाथांनीं ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या बाबतींत असें म्हटलें आहे कीं, ते आपल्या बालपणीं पूर्ण बंगाली होते आणि बंगाली लोकांच्याबद्दल त्यांच्या मनांत पूर्ण आदर वसत होता. तथापि ते अन्तर्जीवनांत एकदम अ-बंगाली होते. आपल्या सतेज व्यक्तिमत्त्वानें ते आपल्या समाजापासून वेगळे दिसत. प्रेमचंद यांना पाहतांच माझ्या मनांत तीच धारणा निर्माण झाली:... केवळ बाह्य साम्यतेवरच नाहीं तर आंतील व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीनें पाहिल्यास प्रेमचंद व गॉर्की यांच्यांत समानता दिसून येते. ज्या प्रकारें गॉर्कीनें दलित माणसांच्या सुखदुःखांचा वास्तविक अनुभव प्राप्त करून खऱ्या सहृदयतेनें आणि समवेदनामूलक अनुभूतीनें आपल्या रचनेंत अत्यंत सुंदर रूपांत त्याचा आविष्कार केला, त्याचप्रमाणें प्रेमचंद यांनींहि भारताच्या पीडित अन् उपेक्षित ग्रामीण जनतेच्या आत्म्याचें यथार्थ चित्रण केलें आहे.

“......प्रेमचंद यांना उच्च दर्जाचा कलाकार म्हणून जनता मानते. याहिखेरीज त्यांच्यांत जी माणुसकी होती तिचा परिचय फार थोड्या लोकांना आहे. आपल्या साहित्यांत त्यांनीं ज्या दलित आत्म्यांचा निर्देश केला आहे त्यांच्याबद्दल त्यांना केवळ वरवरची सहानुभूति होती असें नव्हे तर वास्तविक जीवनांतहि त्या अनुभूतीनें व्यवहारिक रूप प्रकट करून आमच्या कलाकारांना एक महान् आदर्श त्यांनीं निर्माण करून ठेवला आहे....... त्यांनीं आपल्या जीवनांत जे कष्टदायक अनुभव घेतले त्यामुळें दुसऱ्या पीडितांचें दुःख ते वर्णन करूं शकले....”

—श्री. इलाचन्द्र जोशी.

" मी गुजराथ, काठेवाड आणि दक्षिण भारत या देशांत दोन-तीन वेळां जाऊन आलों आहें. प्रत्येक वेळीं नव्या नव्या साहित्यप्रेमींना भेटण्याची संधिहि मला प्राप्त झालेली आहे. प्रेमचंदांचें प्रेम मला सर्वत्र दिसून आलें. अहिन्दी प्रान्तांत प्रेमचंदांचेंच नांव सर्वांत प्रसिद्धीस पावलें आहे. ......त्यांचें अंतिम दर्शन मीं त्यांच्या रुग्णशय्येवरच घेतलें. मला पाहून ते हंसले आणि बोलले, ' किनाऱ्यावर तर आलों आहें. नाव केव्हां सुटेल कोणास ठाऊक ? ' असें म्हणून त्यांनीं एक पद्यचरण म्हटलें. त्यांच्या मृत्यूनें आपल्या साहित्याकाशामधील एक मोठें नक्षत्र निखळून गेलें आहे. हिन्दीच्या नंदनवनांतील एक सुगंधी फूल अकालींच सुकून गेलें. आमच्या साहित्यिक जीवनांतील एक झरा सुकून गेला. गरिबांच्यासाठीं तडफडणारें हृदय एकदम बंद पडलें ! "

— श्री. रामनरेश त्रिपाठी.

" ... त्या दोनतीन दिवसांत मीं प्रेमचंद यांना जवळून पाहिलें. त्यांच्या मुक्तपणें हंसण्याच्या संवयीचा परिचय मला पहिल्यानेंच झाला होता. पण त्यांच्या सुहास्यापाठीमागें त्यांच्या पवित्र आणि सरळ आत्म्याचा परिचय त्यांच्या निकट राहूनच मला झाला. त्यांच्या सहानुभूतिपूर्ण हृदयांत सांसारिक, राजनैतिक किंवा सामाजिक रूढींबद्दल मोह असलेला मला दिसला नाहीं. धर्म, जाति किंवा देश यांच्या सीमा तोडून तो महान् कलाकार सर्व अवस्थांत अत्यंत उदार व अनुभूतिपूर्ण अशा स्वरूपांत बनून राहिला होता......... फ्रेंच साहित्यांत सर्वश्रेष्ठ नाटककार म्हणून मोलियरचें नांव घेतलें जातें. पण मोलियरच्या हयातींत त्याला ही प्रतिष्ठा मिळूं शकली नाहीं; कारण तो स्वतः आपल्या नाटकांतून भूमिका करीत असे; आणि त्या काळांत तर नाटकांत काम करणें हें कुलीनतेचें लक्षण समजलें जात नसे. त्यामुळें त्याची अवहेलना एवढी झाली कीं, फ्रान्सच्या सर्वश्रेष्ठ साहित्यसंस्थेंत—फ्रेंच ॲकेडेमींत—त्याला सभासद होतां आलें नाहीं. मोलियरच्या मृत्यूनंतर फ्रेंच ॲकेडेमीनें आपली चूक सुधारली आणि या चुकीचें प्रायश्चित्त या प्रकारें घेण्यांत आलें—फ्रेंच ॲकेडेमींत एकूण शंभर सभासद होते. एखाद्या सदस्याचा मृत्यु झाला कीं त्याच्या स्थानीं दुसऱ्याची नेमणूक होत असे. मोलियरच्या निधनानंतर जेव्हां दुसऱ्या एका सभासदाच्या मृत्यूमुळें एक स्थान रिकामें झालें तेव्हां त्या

रिकाम्या जागेवर मोलियरची निवड झाली! जिवंत असणारीं माणसेंच सभासद असत. मृत्यूनंतर अर्थातच सदस्यत्व रद्द होई. पण निधनानंतर जो सभासद झाला त्याचें सभासदत्व रद्द कसें होणार? फ्रेंच ॲकेडेमींत आजहि शंभर सदस्य आहेत. एक कै. मोलियर आणि इतर नव्याण्णव. जिवंत सदस्य बदलले जातात, पण मोलियरचें स्थान अबाधित आहे. ... याचप्रमाणें या वर्षाचें साहित्याचें 'मंगलाप्रसाद पारितोषिक' 'गोदान' ला देऊन हिन्दी साहित्य संमेलन स्वतःचा गौरव करून घेऊं शकणार नाहीं काय! —"

— श्री. चन्द्रगुप्त विद्यालंकार.

"औपन्यासिक सम्राट् श्री. प्रेमचंद यांच्याबद्दल जेवढें लिहावें तेवढें थोडेंच होणार आहे. हिन्दुस्तानी लिहिणारांत त्यांना तुलना नव्हती. राष्ट्रभाषा-प्रचारासाठीं त्यांचा आत्मा व्याकूळ होत असे. साहित्यसेवेच्या द्वारां त्यांनीं राष्ट्रीयतेची जोपासना केली व संस्कृतीस उजळा दिला. ग्रामवासीयांबद्दल त्यांना कमालीची आत्मीयता वाटे."

—सेठ जमनालालजी बजाज.

"शैलीकार या दृष्टीनें प्रेमचंद यांचें स्थान हिन्दी साहित्यांत असाधारण आहे. सरळ, सुबोध, सालंकृत आणि सजीव गद्याचा अभ्यास त्यांनीं पहिल्या-नेंच केला होता...कोणत्याहि लेखकाच्या किंवा कवीच्या प्रभावाची साक्ष ही कीं, जाणूनबुजून किंवा अजाणता त्याचे टीकाकारच त्याचें अनुकरण करूं लागतात. या दृष्टीनें प्रेमचंद हे आधुनिक हिन्दी साहित्याच्या आपल्या विभागांत सर्वश्रेष्ठ प्रतिनिधि तथा प्रमुख लेखक होत. आणि मला संदेह नाहीं कीं, हिन्दींतील इतर विभागांत सुद्धां त्यांच्यापुढें जाणारा दुसरा कोण-ताहि प्रतिनिधि अजून निर्माण झालेला नाहीं. ज्याप्रमाणें हरिश्चंद्र एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत चमकून गेले, त्याचप्रमाणें विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत प्रेमचंद चमकले. दोघेहि हिन्दी साहित्याचे अमर चंद्र आहेत."

—श्री. धीरेन्द्र वर्मा.

"प्रेमचंदांची सर्वांत महत्त्वपूर्ण विशेषता ही कीं, ते भारतीय संस्कृतीचें प्रतिपादन करीत. त्याचबरोबर मर्यादा आणि आदर्शवाद स्थापित होण्यासाठींहि ते प्रयत्न करीत असत. कारण त्यांचा असा अढळ विश्वास होता कीं, समाज व राष्ट्र यांची उन्नति आपली संस्कृति, सदाचार आणि आदर्श यांच्यावरच

अवलंबून आहे. प्रेमचंद यांचा विश्वास असा होता कीं, आपली अवनति आपल्यांतील स्वाभिमान नष्ट झाल्यामुळें झाली आहे. आपल्या विभूति आणि त्यांचें मोठेपण यांची उपेक्षा करून दुसऱ्यांचे कांचेचे तुकडे घेऊन आपले हिरे फेकून दिल्यामुळें ही परिस्थिति आपणांस प्राप्त झाली आहे. त्यांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे कीं, 'युरोप व भारतवर्ष यांच्या आत्म्यांत फार अंतर आहे. युरोपची दृष्टि सुंदरतेवर असून भारताची सत्यावर आहे. संपन्न युरोपनें मनोरंजनासाठीं कथा लिहिल्या, तर भारतानें नीति आणि धर्म यांना प्राण समजून रचना केली. आम्ही परतंत्र असलों तरी आमची सुधारणा पाश्चात्यांपेक्षां उच्च प्रकारची आहे...साहित्यांत आम्हीं आमच्या आत्म्याचें जतन करावयास पाहिजे. आपण कादंबरी व कथा यांचें वरवरचें शरीर जरी युरोपकडून घेतलें असलें तरी त्यांतील आत्मा मात्र भारतीय असल्याची आपण खबरदारी घेतली पाहिजे. मी एवढें म्हणूं शकतों कीं, या नवीन कलेवरांत भारतीय आत्मा मीं सुरक्षितपणें जतन केला आहे–' हा प्रेमचंद यांच्या साहित्यनिर्मितीचा मूलमंत्र आहे; आणि याच विचारांच्या पायावर त्यांच्या कथाकादंबऱ्यांचा इमला खडा आहे."

—श्री. जगन्नाथप्रसाद शर्मा.

"प्रेमचंद आपल्या साहित्यांतील गॉर्की होते. गॉर्कीप्रमाणेंच बालपणापासूनच त्यांनीं दुःखाचे अनेक आघात सहन केले होते. पण त्यांचें दुःखच त्यांना अमृतदायी बनलें. या अमृताच्या मदतीनेंच ज्याप्रमाणें गॉर्कीनें लेनिनप्रणीत युगाची वाटचाल केली, त्याप्रमाणें प्रेमचंदांनीं गांधीयुगाचा पुरस्कार केला. जगतांत दोन प्रकारचीं माणसें असतात : दुःख सहन करून करून पाषाणाप्रमाणें निर्दय व कठोर होणारीं आणि विपत्तींच्या फत्तरांशीं टकरा देत देत नदीप्रमाणें संतप्त पृथ्वीला शांत करणारीं. गॉर्की आणि प्रेमचंद या दुसऱ्या प्रकारांतील श्रेष्ठ कलाकार होते. दोघांनींहि कथासाहित्याच्या साधनानें आपापल्या युगांत माणुसकीचा पुरस्कार केला. त्यांच्या लेखणींतून झरणाऱ्या शाईत अत्याचार करणाऱ्यांचा काळिमा आणि पीडितांचे अश्रु दिसून येतात. मनुष्यता जोंपर्यंत दानवतेचा पराभव करीत राहील तोंपर्यंत गॉर्की व प्रेमचंद अजरामर राहतील. प्रेमचंद साहित्यांतील शिव होते. त्यांनीं भवसागरांतील विष पिऊन आपल्या ललाटावर प्रेमाचा चंद्र आणि मस्तकावर देशभक्तीची

गंगा धारण केली होती. मुसलमानांचा चांद आणि हिंदूंची गंगा यांचें सामंजस्य प्रेमचंदसारखा कलावंतच धारण करूं शकतो. ”

— श्री. शान्तिप्रिय द्विवेदी.

“ ... शेवटीं १९२५ मध्यें जेव्हां आर्य समाजाच्या वार्षिक उत्सवासाठीं मीं जावयाचें ठरविलें तेव्हां प्रेमचंद यांना भेटण्याचा मीं निश्चय केला. उत्सव समाप्त झाल्याबरोबर मी बनारसला पोंचलों व तेथून प्रेमचंद यांच्या गांवची वाट धरली. वाटचाल करीत असतांना मनांत कोणकोणते विचार येत होते, हें कांहीं सांगतां येत नाहीं. पण तेथें पोंचतांच मी निराश होऊन गेलों. प्रेमचंद घरीं नव्हते. एक चिठ्ठी लिहून मी उदास होऊन परत फिरलों. दुसऱ्या दिवशीं गंगास्नान करून हॉटेलपाशीं येतों तों माझ्या खोलीच्या दाराशीं एक गृहस्थ बसले होते. कोणाची तरी वाट पाहत असणाऱ्या त्या गृहस्थानें हंसून मला म्हटलें, ‘ नमस्ते. ’

मीं विचारलें, ‘ आपण कोणास भेटावयास आलां आहांत ? ’

‘ महाशय सुदर्शन यांना. मी प्रेमचंद. ’

लागलीच मीं त्यांच्या पायांवर मस्तक ठेवलें. त्यांनींहि माझ्या गळ्यांत गळा घालून स्वागत केलें व बोलले, ‘ काल आपणांस विनाकारण हेलपाटा पडला याबद्दल मला फार दुःख झालें. पण भाईसाहेब, ध्यानांत असूं द्या. त्याची शिक्षा आज मला मिळाली बरं का ! दोन तास येथें बसावें लागलें ’ प्रेमचंद यांच्या शब्दांनीं मी मोहित होऊन गेलों. कित्येक वर्षांचे आम्ही दोस्त असल्याप्रमाणें आमच्या गप्पा झाल्या.

मीं विचारलें, ‘ आपण नवाबराय नांव कां सोडून दिलें ? ’

प्रेमचंद हंसून म्हणाले, ‘ नवाब त्याला म्हणतात कीं, ज्याच्यापाशीं जमीनजुमला खूप आहे, कांहीं मुलूख आहे. माझ्या पदरीं मुलूख कोठला ? ”

‘ मुलूख नसला तरी नवाब असतात ना. ’

‘ हें कथेचें नांव मात्र शोभून दिसेल. पण मला हें नांव घमेंडखोर वाटलें. चार पैसे जवळ नाहींत आणि नांव काय तर नवाबराय ! या नवाबापेक्षां ‘ प्रेम ’ बरें वाटलें. त्यांत सुख-संतोष तरी आहे. ’

असें म्हणून त्यांनीं एक हास्याची लकेर सोडून दिली. तें त्यांचें खुलें

आणि दिलदार हास्य आजहि मला स्मरत आहे आणि हृदयांत सुरीप्रमाणें शिरून घुसतें आहे. ते दिवस गेले आतां!"

—श्री. सुदर्शन.

"विशेषतः हिन्दी साहित्यांत उपनाम धारण करण्याची एक प्रथाच निर्माण झालेली दिसते. पण कांहीं दिवसांपूर्वीं जेव्हां धनपतरायजींनें आपलें नवें साहित्यिक नांव धारण केलें तेव्हां जणुं नव्या युगाच्या अस्तित्वास आरंभ झाला. त्यांनीं आपली लेखणी प्रेमाच्या सेवेसाठींच जणुं अर्पण केली. तें केवळ मानवी प्रेम नव्हतें कीं लोकोत्तर म्हणून समजलें जाणारें ईश्वरीयहि नव्हतें. तर तें असें सत्यस्वरूपाचें होतें कीं, त्यामुळें मनुष्याच्या भोंवतीची परिस्थिति बदलून जाऊन आवश्यक अशी क्रांति निर्माण व्हावी...त्यांच्या 'गोदान' कादंबरींत भारतीय शेतकऱ्याची हृदयविदारक कथा आपणांस वाचावयास मिळते. ज्याच्या सर्वस्वाचें अनेक मार्गांनीं अपहरण झालें आहे, मिथ्या विश्वास व खोटा धर्म यांवरच ज्यांचें लालनपालन झालें आहे व ज्यांना नेहमींच दारिद्र्य व ऋण यांच्याशीं तोंड द्यावें लागतें, अशा भारतीय शेतकऱ्यांचें चित्र या कथेंत आहे. ग्रामीण जीवनांतील सर्व गोष्टी यांत तपशीलवार आल्या आहेत. खेडेगांवांत जी दुष्टता आणि कुटिलता आहे, जें सौंदर्य व भलेपण आहे, जें सुखदुःख आहे, ज्या अद्‌भुत परिस्थिति निर्माण होतात, त्या सर्वांचें उत्कृष्ट दिग्दर्शन या कादंबरींत आलें आहे...प्रेमचंद केवळ साहित्यिक कलाकारच नव्हते, त्यांनीं आपली कला व आपलें मानवजातिसंबंधींचें ज्ञान यांचा उपयोग देशसेवेसाठीं केला. त्यांनीं केवळ प्रचाराच्या दृष्टीनेंच विचार प्रकट केले असें नव्हे तर महात्मा गांधींच्या आदर्शानुसार त्यांनीं शेतकऱ्यांच्या हृदयांत शिरण्याचा प्रयत्न केला."

—श्री. प्रियरंजन सेन.

"प्रेमचंदजी साम्यवादी होतेच; परंतु वर्तमानकाळची सर्व समाजव्यवस्था एकदम उखडून टाकून त्या जागीं सीमान्तस्थानीं असणारा साम्यवाद प्रस्थापित करणाऱ्या उग्र व कट्टर साम्यवाद्यांपैकीं ते नव्हते. ते भावपूर्ण साम्यवादी असून साम्यावादाचीं बरींच तत्त्वें त्यांना पूर्णपणें परिचित होतीं. दीन-दुःखी व गरीब यांच्याबद्दल त्यांना नेहमीं करुणा वाटे. साम्यवादांतील सर्वच गोष्टी चांगल्या आहेत असे ते मानीत नसल्यामुळें त्यांना समजूतदार साम्यवादी म्हणणें युक्त

होईल. त्यांना हें पण मान्य होतें कीं, आज समाज ज्या वाईट स्थितीपर्यंत जाऊन पोंचला आहे, त्यांतून मुक्तता होण्यासाठीं साम्यवादाचें कोणतेंहि रूप येथें आणावें. आपल्या येथील जमीनदार व भांडवलदार आपल्या खोट्या ताकदीमुळें अंधळे झाले आहेत. यामुळें कोणत्या ना कोणत्या तरी रूपाचा साम्यवाद या देशांत यावा असें त्यांना वाटे. ... सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, प्रेमचंद हे थोर देशभक्त होते. सामाजिक व धार्मिक झगड्यांपासून अलिप्त राहून ते पहिल्यापासूनच पूर्ण भारतवासी बनले होते. ते स्वतः कोणत्याहि एका धर्माचे, पंथाचे, समाजाचे नव्हते, तर ते स्वतःस फक्त हिंदुस्थानी समजत."

— प्रो. अशफाक हुसेन.

" आज प्रेमचंद यांच्या निधनानें बहन शिवरानीदेवीच विधवा झाली असें नव्हे तर राष्ट्रवाणीहि कांहीं काळपर्यंत विधवा झाली आहे. शिवरानीदेवी आपल्या मुलांच्या तोंडाकडे पाहून तरी समाधान मानून घेईल, मित्रांच्या सहानुभूतीवर धीर धरील, पण बिचाऱ्या हिन्दीनें आतां कोणाच्या आधारावर जगून रहावें ? आतां प्रेमचंद बनण्याचा उत्साह कोणास येणार ? ..... प्रेमचंदजींचा शेवटचा नायक होरी जणुं प्रेमचंदांचें स्वतःचेंच चित्र आहे. आमरण भांडवलदारांची शिकार होणें, प्राप्तीचा महत्त्वाचा भाग साहित्यसेवेसाठीं खर्च करणें, शेवटीं आपली मनःकामना पूर्ण होण्याच्या आधींच परिश्रमानें विदीर्ण होऊन अकाल-काल-कवलित होऊन जाणें—हें प्रेमचंदांचें संक्षिप्त जीवन आहे. आणि हेंच होरीचें चरित्र आहे. "

— श्री. ब्रजनन्दन शर्मा.

" राष्ट्रभाषेसंबंधीं प्रेमचंदांचे विचार असे होते कीं, राष्ट्रभाषेस हिंदी म्हणा, उर्दू म्हणा, हिंदुस्तानी म्हणा, वस्तु एकच आहे. नांवाशीं आपला वाद नसावा. जिवंत भाषा ही नेहमीं जिवंत देहाप्रमाणेंच असते. 'शुद्ध हिन्दी' हे निरर्थक शब्द आहेत. भारत जर शुद्ध हिन्दु असता तर त्याची भाषा शुद्ध हिन्दी राहिली असती. येथें तर मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, अफगाणी इत्यादि सर्व जाती आहेत. आपली भाषा या दृष्टीनें व्यापक रहावी. ... भाषासुंदरीस कोठडींत बंद करून आपण तिच्या सतीत्वाचें रक्षण कराल पण त्याच वेळीं तिची प्रकृति मात्र बिघडून गेलेली असेल. तिचा आत्मा एवढा बलवान् व्हावा कीं, तिचें सतीत्व व स्वास्थ्य दोहोंचेंहि रक्षण व्हावें. आमच्या-

समोर आदर्श असा असावा कीं, आमची भाषा जास्तींत जास्त लोकांना समजावी."

— श्री. का. श्री. श्रीनिवासाचार्य.

"मुन्शी प्रेमचंद हिन्दीचे सच्चे सेवक आणि तिचें मुख उज्ज्वल करणाऱ्यांपैकीं एक होते. योग्य सुपुत्र मिळवून हिन्दी गौरवान्वित व धन्य झाली आहे. कांहीं लोकांचें म्हणणें आहे कीं, हिन्दी साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद देऊन त्यांचा यथार्थ सन्मान केला गेला नाहीं. मी तर असें म्हणेन कीं, जो खरोखरीच देशरत्न आहे, महान् पुरुष आहे, ज्याच्यांत सर्वांत श्रेष्ठ प्रतीचे गुण आहेत, तो स्वतःच आदररूप आहे; त्याचा आदर कोण कसा करणार ? लोकमान्य टिळक काँग्रेसचे अधिपति झाले नाहींत म्हणून त्यांची यथार्थ पूजा सर्व देशांत होत नाहीं असें आहे का ? याच प्रकारें प्रेमचंद संमेलनाचे अध्यक्ष झाले असते तर संमेलनाचाच गौरव झाला असता; प्रेमचंदांचा त्यांत विशेषसा आदर कोणता ? प्रेमचंद यांच्या मृत्यूनंतर समस्त भारतवासीयांनीं जो सच्चा व हार्दिक शोक प्रकट केला तो थोड्याच साहित्यिकांच्या व राष्ट्रपुरुषांच्या वांट्यास येण्यासारखा आहे. प्रेमचंद मिळून-मिसळून वागणारे होते, नम्र होते, मधुरभाषी होते, सच्चे व सरळ होते."

— श्री. भगवानदास हालना.

"प्रेमचंद यांचें घर सुव्यवस्थित नव्हतें. आंगणांत पाणीच पाणी पसरून गेलें होतें. वस्तु नीटनेटक्या स्थानांवर नव्हत्या.... सर्व काम सोडून प्रेमचंद माझ्याशीं गप्पा मारीत बसले. सात वाजले, साडेसात वाजले, आठ वाजण्यास आले, गप्पांचा रंग चढत चालला. मी कितीतरी गोष्टी विसरून गेलों. मी प्रेमचंदांशीं—हिंदीच्या साहित्यसम्राटांशीं—बोलत आहें हेंहि मी विसरून गेलों.

मीं विचारलें :— बंगाली साहित्य हृदयास स्पर्श करणारें आहे नाहीं ?

प्रेमचंद :— होय. त्यांत स्त्री-भावना अधिक आहे. माझ्यांत तर ती बेताचीच.

मी :— स्त्रीत्व आहे, म्हणून तें हृदयस्पर्शी आहे ?

प्रेमचंद :— हो तर. जागजागीं तें स्मरणशील आहे. स्मृतींत भावनेची तरलता अधिक असते, संकल्पांत भावनेची कठिणता असते.

७...

पाहतां पाहतां प्रेमचंद यांचे डोळे विचारपूर्ण झाले. दूरवर दृष्टि टाकून ते पाहूं लागले. कोणतें तरी एक स्वप्न जणुं ते पाहत होते. त्यांच्या वाणींत थोडी कातरता निर्माण झाली होती. त्यांचे उच्छ्वास जणुं सांगत होते, ' मी काय सांगत होतों तेंहि मला समजत नाहीं. ' प्रेमचंदांनीं तरी बोलावयास आरंभ केला, ' जैनेन्द्र, मला नीट समजत नाहीं. मी बंगाली नाहीं. ते मोठे भावुक लोक आहेत. भावुकतेमुळें जें जाणतां येतें तेथें मी पोंचूं शकत नाहीं. मला ती देणगी कोठून प्राप्त होणार ? ज्ञानानें जेथें पोंचतां येत नाहीं तेथें भावना पोंचूं शकते. पण जैनेन्द्र, मी असें सांगतों कीं, काठिण्य सुद्धां हवें... ' हें म्हणत असतांना प्रेमचंद एखाद्या मुलीप्रमाणें लज्जित झाले. त्यांच्या मिशा घनदाट होत्या. त्यांतून कांहीं पांढरे केसहि डोकावत होते. तरी सुद्धां मी म्हणतों कीं, ते एखाद्या मुलीप्रमाणें लाजेनें चूर झाले आणि बोलले, ' जैनेन्द्र, रवीन्द्र व शरद् दोघेहि महान् आहेत. पण हिन्दीसाठीं काय तोच आदर्श असावा ? नाहीं. हिन्दी राष्ट्रभाषा आहे. माझ्यासाठीं तर तो निश्चितपणें नाहीं.'— "

* * *

" जैनेन्द्र, चला कचेरींत जाऊं, " जेवणखाण झाल्यावर प्रेमचंद बोलले. निघण्याला मी उत्सुक होतोंच. ज्या ढंगानें त्यांनीं गाडीवाल्यास बोलावलें, ठरवलें, त्याचें क्षेमकुशल विचारलें, त्याचा माझ्या मनावर विलक्षण प्रकारचा ठसा उमटला. रस्त्यांत त्यांनीं मला विचारलें,

" काय जैनेंद्र, सामुद्रिक शास्त्रासंबंधीं काय मत आहे तुमचें ? "

" आपला आहे विश्वास ? "

" काय सांगूं ! पण कचेरींत एक दोस्त आहे. हात चांगला पाहतो. त्यानें सांगितलेल्या कित्येक गोष्टी खऱ्या ठरलेल्या पाहून, हें शास्त्र पाखंड आहे असें नाहीं वाटत. "

" आपला विश्वास दिसतोय्. मी कधींच नाहीं...आपला तर परमेश्वराबरहि विश्वास नाहीं. "

प्रेमचंद गंभीर होऊन बोलले –

" जैनेन्द्र, मीं मघांच सांगितलें, मी परमेश्वराचा विचार करूं शकत नाहीं. माझा विश्वास बसत नाहीं. कसा बसणार ? पोरं भुकेनें रडताहेत, रोगी तडफडत आहे, ठिकठिकाणीं भूक, क्लेश, ताप मला स्पष्टपणें दिसतो. ज्या

जगतांत या गोष्टींचें साम्राज्य आहे तेथें परमेश्वर कसा वसत असेल? मला तर दिसत नाहीं; यांत माझा काय दोष? आणि कठिण गोष्ट अशी कीं, ईश्वर मानला तर त्यास दयाळू म्हणावयास हवें. मला तर त्याचें दयाळुत्व कोठेंहि दिसत नाहीं. मग त्या दयासागरावर माझा विश्वास कसा बसणार?"

*  *  *

"... मरणाच्या आदल्या रात्रीं मी प्रेमचंद यांच्या खाटेशेजारीं बसलों होतों. सकाळीं सात वाजल्यापासून आमचें बोलणें चालू होतें. चहूं दिशांस शांतता पसरली होती. खोली लहान आणि अंधाराची होती. सर्व जण अर्धवट झोपेंत होते. त्यांच्या मुखांतून अस्पष्ट-अस्पष्टसे शब्द बाहेर पडत होते. कानांपेक्षां मनानेंच ते ऐकावे लागत होते...रात्रीं बारा वाजेपर्यंत 'हंस'विषयीं चर्चा चालू होती. आपल्या आशा, आपल्या अभिलाषा कधीं त्रोटक शब्दांनीं, तर कधीं डोळ्यांनीं ते मजजवळ प्रकट करीत होते. 'हंस' व साहित्य यांची चिंता त्यांना त्याहि वेळीं व्यथित करीत होती...इतक्यांत प्रेमचंद बोलले...'जैनेन्द्र!' एवढेंच बोलून ते गप्प राहिले. मीं पुनः त्यांचा हात हातांत घेतला आणि त्यांना सांगितलें, 'बाबूजी, आपण कोणतीच काळजी नका करूं. सर्व कांहीं ठीक होईल.'

ते माझ्याकडे पाहतच राहिले व पुनः म्हणाले, 'आदर्श काम होईल का?'.

'आदर्श?...' माझ्या मनांत विचार आला.

त्यावर 'वादविवाद नको' म्हणून त्यांनीं कूस बदलली व डोळे बंद करून घेतले. त्यानंतर माझ्या मनावर जणुं व्यथेची धोंड पडल्यासारखें झालें. नाना प्रकारच्या चिन्तांनीं प्रेमचंदांचे प्राण अवघडले होते. 'हंस'साठीं जगण्याची इच्छा त्यांना होती; 'हंस' बंद पडेल तर जगणें असह्य झालें असतें त्यांना...मी त्या साहित्यसम्राटाला कांहींहि आश्वासन देऊं शकलों नाहीं.

थोड्या वेळांत ते बोलले, 'तगमग फार होत आहे, पंखा चालू करा.'

पंखा चालू केला. त्यांना झोप कशी ती नव्हतीच. तकलीफ फारच होत होती. गुपचूप डोळे बंद करून ते स्वस्थ होते.

दहा-पंधरा मिनिटांनीं ते बोलले, 'जैनेंद्र, जा, झोप घ्या थोडी.'

आतां थोडाच वेळ राहिला आहे हें मला काय माहीत ? मी झोपीं गेलों आणि सकाळ होतांच त्यांना अशी मूर्च्छा आली कीं, पुनः तींतून ते जागे झाले नाहींत. ”

— जैनेंद्रकुमार

● ● ●

## प्रेमचंदांची साहित्यसृष्टि : १२

हिन्दी ही आपली राष्ट्रभाषा. चंदबरदाई, कबीर, तुलसीदास, मीराबाई, बिहारी, देव, भूषण, केशवदास वगैरे साहित्यिकांनीं व संतांनीं आपल्या उपदेशपर व भक्तिपर वाणीनें पावन केलेली अशी ही भाषा. मुन्शी प्रेमचंद यांचा उदय होण्यापूर्वी या भाषेंत कथासाहित्य कोणत्या प्रकारचें होतें हें आपण थोडक्यांत पाहूं, म्हणजे प्रेमचंद यांचें स्थान आपल्या ध्यानांत येण्यास अडचण पडणार नाहीं.

ज्या वेळेस माणसास भाषा हें साधन विचार व्यक्त करण्यासाठीं सांपडलें त्या वेळपासून मनुष्य हा गोष्टीवेल्हाळ प्राणी म्हणून प्रसिद्धीस आला आहे. गोष्टी सांगणें आणि ऐकणें याची त्याला मनस्वी हौस आहे. आपल्या प्राचीन साहित्यांत वेद, उपनिषदें, रामायण, महाभारत वगैरे ग्रंथांतून कथा व उपकथा यांचाच भरणा विशेष आहे. एखादें अमूर्त तत्त्वज्ञान समजावून सांगण्यास चारित्रकथेसारखें दुसरें साधन नाहीं. कित्येक वेळां या कथा कल्पितांतून निर्माण झालेल्या असतात; आणि बहुतेक जुन्या वाङ्मयांतील कथा या पद्यांतूनच होत्या. गद्य अगदींच नव्हतें असें नव्हे; पण प्रथा मात्र पद्यांत लिहिण्याची असे. या जुन्या कथांची रुचि आजहि आपणांस वाटते. हिन्दींतील आधुनिक काळांतील विख्यात साहित्यिक राधेश्याम कथावाचक, बदरीनाथ भट्ट, माधव शुक्ल, मैथलीशरण गुप्त, माखनलाल चतुर्वेदी, विश्वंभरनाथ कौशिक, सुदर्शन, जयशंकर प्रसाद इत्यादि आपल्या कथाकाव्यांसाठीं कथानकेंहि जुन्या वाङ्मयांतून निवडतांना दिसतील.

आधुनिक काळांत गद्याचा प्रसार होण्यास कारणीभूत झालेली परिस्थिति

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८५५८

म्हणजे मुद्रणकलेचा शोध ही होय. छापण्याचीं यंत्रें निघाल्यामुळें पुस्तकें भराभर निर्माण होऊं लागलीं. त्यामुळें मुखोद्गत करण्याची प्रवृत्ति सपत येऊन पाठान्तराचें महत्त्व कमी झालें. आणि पाठान्तराची आवश्यकता न उरल्यामुळें पद्याची मातब्बरीहि त्या प्रमाणांत कमी झाली. सरळ ऐसपैस गद्यांत माणसें लिहूं लागलीं. बाणाची कादंबरी, आधुनिक गद्यांतील कथात्मक वाङ्मयाची गंगोत्री म्हणावयास हरकत नाहीं. पण हेंहि ध्यानांत ठेवावयास पाहिजे कीं, आधुनिक काळांतील कथा आणि कादंबरी यांचें स्वरूप इंग्रजी कथासाहित्यावरून ठरत गेलें आहे. सतराव्या, अठराव्या, एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांत इंग्रजी संस्कृतीशीं जो आपला दीर्घ परिचय झाला, त्यामुळें ज्या ज्या नव्या गोष्टी आपण स्वीकारल्या त्यांत कथासाहित्याचें स्वरूप ही महत्त्वाची बाब होय. कथासाहित्यांतील वास्तवता म्हणजे जसें घडतें तसें लिहिण्याची प्रवृत्ति आणि पात्रांच्या मनांतील विकारांचें व विचारांचें चलनवलन मनोविज्ञानाच्या आधारानें वर्णन करण्याची पद्धति. आपल्या कथासाहित्यांत ही पाश्चात्यांकडून घेतलेली आहे. अतिरंजिताकडून वास्तवाकडे, अद्भुताकडून यथार्थाकडे आपण वळलों आहोंत, तें इंग्रजी साहित्याच्या परिचयामुळें.

असें सांगतात कीं, पाश्चिमात्य संस्कृतीचा पहिला प्रभाव बंगाली वाङ्मयावर झाला. राजा राममोहन रॉय ( १७७२-१८३३ ) हे बंगालचे आद्य गद्यलेखक मानले जातात, पण त्यांच्याहि पूर्वी रामवसु नांवाच्या लेखकाचें 'प्रतापादित्य चरित्र' बंगाली गद्यांत १८०१ मध्यें प्रसिद्ध झालेलें आहे. त्यानंतर राममोहन रॉय यांच्या गद्यलेखनास सुरुवात झाली आहे. त्यांनीं कथासाहित्य जरी लिहिलें नसलें तरी कथासाहित्य निर्माण होईल अशा गद्याची मात्र जोपासना केली. त्यानंतर ईश्वरचंद विद्यासागर ( १८२०-१९०१ ) या समाजसुधारकानेंहि बंगाली गद्याच्या वाढीस चांगलाच हातभार लावलेला आहे. यानंतरच्या काळांत बंकिमचंद्र चट्टोपाध्याय ( १८३८-१८९४ ), रवीन्द्रनाथ ठाकूर ( १८६१-१९४१ ), शरच्चंद्र चट्टोपाध्याय ( १८७६-१९३८ ) वगैरे एकापेक्षां एक वरचढ असे कथासम्राट् बंगाली भाषेस लाभले आणि त्यांच्या कथासाहित्याची थोरवी एवढी मोठी कीं, प्रारंभींच्या काळांत हिंदी, मराठी, गुजराथी यांसारख्या पूर्वपरंपरासंपन्न अशा भाषांतहि बंगाली कथांच्या भाषांतराचा म्हणून त्या युगाचा एक विशेष बनून गेला.

[library stamp]

हिन्दीच्या गद्य साहित्याची परंपरा जुनी असली तरी १८६० च्या आसपास मुन्शी सदासुखलाल, इंशाअल्ला, सदलमिश्र, इत्यादि लेखकांना हिन्दी कथांचे निर्माते म्हणून मान द्यावयास पाहिजे. मुसलमानी संस्कृतीचा संबंध या देशाशीं कित्येक शतकें एकसारखा येत राहिल्यानें उर्दू साहित्याचा परिणामहि हिंदी साहित्यावर होणें अपरिहार्य होतें. अलीफ लैला किंवा तिलस्म होशरुबा वगैरे फारसी कथा हिन्दीला निकटच्या वाटतात. मसनवीच्या ढंगावर हिन्दु कथानक सांगणारा मलिक महंमद जायसी ( –मृ. १५४३ ) याची 'पद्मावत' ही अद्‌भुत कथा एका वेगळ्याच कथापरंपरेस जन्म देणारी ठरली आहे. मौखिक स्वरूपांत रूढ असणाऱ्या परीकथा, भूतकथा, तोता-मैनांच्या कथा यांची वाढहि लोकसाहित्याच्या दृष्टीनें झाली असली पाहिजे. तरी नांव घेण्यासारखा हिन्दींतील पहिला गद्यांतील कथालेखक म्हणजे इंशा-अल्ला खाँ. यानें लिहिलेली 'रानी केतकी की कहानी' ही उपन्यासवजा कथा आजहि भाषा व वातावरण या दृष्टीनें वाचण्यासारखी आहे. सदलमिश्राचें 'नासिकेतोपाख्यान'हि कादंबरीच्याच धर्तीवर हिंदु पुराणाच्या आधारें निर्माण झालें आहे.

यानंतरचें युग भारतेन्दु हरिश्चंद्र (१८५० – ८४) यांनीं प्रवर्तित केलेलें. हिन्दी भाषेचें रूप संस्कृतनिष्ठ असावें कीं उर्दूनिष्ठ असावें, असा वाद अजूनहि चालतो. त्या वादाचा निर्णय मात्र या श्रेष्ठ साहित्यिकानें पूर्वीच घेतलेला आहे. उर्दू किंवा संस्कृत यांचीं रूपें हिन्दीला देण्याऐवजीं दोहोंच्यामधील स्वतःचें असें एक स्वतंत्र रूप हिंदीचें असावें असा सार्थ आग्रह धरणारा हा पट्टीचा लेखक होता. भारतेन्दु हरिश्चंद्र यांनीं हिन्दींत जवळजवळ शंभर लहानमोठीं पुस्तकें लिहिलीं. त्यांमधील नाटकें विशेष लोकप्रिय अशीं आहेत. भारतेन्दु हरिश्चंद्र यांच्यानंतर हिन्दींत एक मोठी परंपरा निर्माण झाली. पंडित बालकृष्ण भट्ट (१८४४–१९१४) यांच्या 'नूतन ब्रह्मचारी', 'सौ अजान एक सुजान' वगैरे कथा प्रसिद्ध आहेत. श्रीनिवासदास (१८५१-१८८७) यांनीं हिन्दी भाषेंतील नांव घेण्यासारखी 'परीक्षागुरु' ही पहिली कादंबरी लिहिण्याचें श्रेय पटकावलें. यांच वेळीं राधाकृष्णदास यांची 'निःसहाय हिंदु' नांवाची सामाजिक कादंबरी प्रसिद्ध झाली. राधाचरण गोस्वामी यांची 'विरजा' आणि किशोरीलाल

गोस्वामी यांची ‘ कुसुमकुमारी ’ या कथांचाहि उल्लेख या ठिकाणीं करावयास पाहिजे. किशोरीलाल गोस्वामी यांनीं जवळजवळ साठ छोट्या-मोठ्या कथा लिहिल्या आणि त्या फारच लोकप्रिय झाल्या होत्या. यानंतरचा प्रमुख कादंबरीकार म्हणजे देवकीनंदन खत्री. हिन्दी साहित्यांत प्रेमचंद यांच्या-अगोदर यांच्याखेरीज दुसरा लोकप्रिय कथाकार झाला नाहीं. अद्‌भुत घटना व कुतूहलप्रधान मनोरंजक कथानक या दृष्टीनें देवकीनंदन खत्री यांच्या ‘ चन्द्रकान्ता ’ आणि ‘ चन्द्रकान्ता सन्तति ’ या कथांनीं लोक वेडावून गेले होते.

यानंतरच्या काळांत महावीरप्रसाद द्विवेदी ( १८७०–१९३७ ) या एका प्रख्यात युगप्रवर्तकाचा उल्लेख करावयास पाहिजे. त्यांनीं ‘ सरस्वती ’ नांवाची मासिक-पत्रिका काढून हिन्दी कथासाहित्यास एक नवें क्षेत्र प्राप्त करून दिलें. ‘ इंदु ’, ‘ गृहलक्ष्मी ’ वगैरे मासिकें पुढें कथासाहित्यामुळेंच लोकप्रिय बनून गेलीं. यानंतर हिन्दीच्या कथासाहित्यास नवा बहर येत राहिला. पं. विश्वंभरनाथ शर्मा कौशिक, पं. चंद्रधर शर्मा गुलेरी, पं. ज्वालादत्त शर्मा, श्री. चतुरसेन शास्त्री, पं. जयशंकर प्रसाद आदि एकापेक्षां एक सरस आणि वरचढ असे कथालेखक हिन्दी भाषेस लाभले; आणि याच काळांत हिन्दी कथाविश्वांत एक तारा चमकून गेला. प्रथम प्रथम कोणाचेंहि लक्ष या नक्षत्राकडे गेलें नसलें तरी आपल्या तेजानें त्यानें सर्वांचें चित्त आपणांकडे ओढून घेतलें व इतरांना अनेक प्रकारें मार्ग दर्शविण्याचें सामर्थ्य स्वतःमध्यें असल्याचें त्यानें सिद्ध केलें. या प्रकाशमान् ताऱ्याचें नांव मुन्शी प्रेमचंद !

प्रेमचंद यांच्या कथा-साहित्यावर व विशेषतः भाषेवर उर्दूची छाप बरीच आहे. प्रेमचंद यांचें प्रारंभिक शिक्षणहि उर्दूमधूनच झालें असल्यामुळें उर्दू भाषेंतील कथा वाचण्याचें वेड त्यांना लागलें होतें. त्यामुळें उर्दू कथासाहित्याचाहि येथें थोडक्यांत निर्देश केला पाहिजे. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धांत सैयद हैदर बख्श हैदरीनें अमीर खुशरो याच्या मसनवीचें ‘ किस्सा लैला मजनू ’ नांवानें भाषांतर केलें. ‘ तोता कहानी ’ हें एका संस्कृत कथेचें रूपांतरहि त्यानें उर्दू भाषेंत केलें होतें. याशिवाय हतीमताईच्या कथेचा अनुवाद ‘ आरायशे महफिल ’ म्हणून त्यानें केला आहे. काजीम अली याचा कालिदासाच्या ‘ शाकुंतल ’ नाटकाचा अनुवाद व निहालचंद लाहौरी याची ‘ किस्सा गुलबकावली ’ ही

कथा यांचाहि उल्लेख प्रामुख्यानें करावयास पाहिजे. मतहरअलीनें संस्कृत-मधील 'वेतालपंचाविशी'चा उर्दू अनुवाद केलेला होता. उर्दूमधील प्रसिद्ध कथा-लेखक म्हणजे मिर्झा रजबअली. त्याची ' फिसाने अजायब ' ही प्रसिद्ध प्रेम-कथा सर्वांच्या चित्तास भुरळ पाडणारी ठरली. नजीर अहमद हे उर्दूतील पहिले कादंबरीकार मानले जातात. प्रेमचंदांच्यावर सर्वांत मोठा प्रभाव पाडणारा उर्दू कथाकार म्हणजे रतनलाल सरशार. याच्या एका उर्दू कादंबरीच्या अनुवादानेंच प्रेमचंद यांची साहित्यसेवा सुरू झाली.

याशिवाय शरर, मुहमद हादी रुसवा इत्यादि उर्दू कादंबरीकारांच्या कथाहि प्रेमचंद यांच्या वाचण्यांत आल्या होत्या. प्रेमचंद यांचें प्रारंभींचें लिखाण बहुतांशीं उर्दूतच असे, याचें कारणहि आतां ध्यानांत येण्यास अडचण नसावी. इंग्रजी, उर्दू, बंगाली इत्यादि भाषांतील कथासाहित्याचें अध्ययन प्रेमचंद यांनीं केलें असलें तरी त्यांची कथासृष्टि अगदीं स्वतंत्र व वेगळी अशी आहे. श्रेष्ठ कलाकाराचें श्रेष्ठत्वहि याच स्वतंत्र स्वरूपांत असतें.

या पार्श्वभूमीवर प्रेमचंद यांच्या कथासृष्टीची उभारणी झालेली आहे. हिन्दी भाषेस पूर्वपरंपरा पद्याच्या दृष्टीनें फार मोठी असली तरी आधुनिक काळांत मात्र बाहेरच्या प्रान्तीय भाषांच्या कथाकारांना तोंड देणारा पहिला कादंबरीकार म्हणजे मुन्शी प्रेमचंद होय. तोंपर्यंतच्या काळांत उर्दू-बंगाली यांच्या भाषांतराचें तरी काम चाले किंवा त्यांच्याच धर्तीवर अद्‌भुत अशा कल्पनारंजित वातावरणांतील कथा लिहिल्या जात असत. त्यांचें स्वरूप कशा प्रकारचें होतें तें वर केलेल्या संक्षिप्त वर्णनावरून ध्यानांत येण्यासारखें आहेच. मनोरंजनाखेरीज दुसरा हेतुच त्या कथालेखनांत नव्हता. देशकालपरिस्थिती-ची जाणीवहि फारच थोड्या ठिकाणीं दिसून येई. मुन्शी प्रेमचंद यांची महत्ता एवढ्याचसाठीं कीं, त्यांच्या कथाकादंबऱ्यांतील अप्रतिम वास्तववादी कथानक, सूक्ष्म स्वभावचित्रण, खटकेबाज पण सजीव संवाद, मनोविज्ञानाचा सखोल अभ्यास आणि देशकालपरिस्थितीचा गंभीर दृष्टीनें केलेला विचार इत्यादि गोष्टींना त्यांनीं स्थान दिलेलें आहे. त्यामुळें या साहित्याच्या वाचनानें वाचकाचें मनोरंजन तर होतेंच पण त्याच्या मनोवृत्तिहि सद्‌भावनांनीं उजळून निघतात. देशांत चालू असणाऱ्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक चळवळींत भाग घेणारीं पात्रें कथाकादंबरींत असल्याकारणानें प्रेमचंद यांचें

साहित्य खऱ्या अर्थानें राष्ट्रीय धन म्हणावें लागेल. शिवाय अनेकवार सांगितलेली महत्त्वाची गोष्ट अशी कीं, जे दलित आहेत, पीडित आहेत, अशांच्या दुःखाचें वर्णन तन्मयतेनें व कळकळीनें हिन्दी भाषेंतच काय पण भारतीय भाषांतहि करणारे पहिले लेखक म्हणजे मुन्शी प्रेमचंदच. प्रथम यांच्या साहित्यसृष्टीवरून एक ओझरती नजर टाकूं व मग विचारदर्शनाचा परिचय करून घेऊं.

मुन्शी प्रेमचंद यांचें साहित्य विपुल व विविध प्रकारचें आहे. कांहीं प्रमुख कादंबऱ्यांचाच परिचय आपण करून घेणार असलों तरी त्यांच्या साहित्याच्या व्यापाची कल्पना यावी म्हणून एक आराखडा खालीं दिला आहे —

**कादंबऱ्या :—** १ रूठी रानी, २ वरदान ( १९०२ ), ३ प्रेमा अथवा प्रतिज्ञा ( १९०६ ), ४ सेवासदन ( १९१६ ), ५ प्रेमाश्रम ( १९२२ ), ६ रंगभूमि ( १९२५ ), ७ निर्मला ( १९२३ ), ८ कायाकल्प ( १९२८ ), ९ ग़ब्न ( १९३१ ), १० कर्मभूमि ( १९३२ ), ११ गोदान ( १९३६ ), १२ मंगलसूत्र ( अपूर्ण ).

**कथा :—** सोजे वतन, सप्तसरोज, नवनिधि, प्रेमपूर्णिमा, प्रेमपचीसी, प्रेमतीर्थ, प्रेमद्वादशी, प्रेमप्रसून, प्रेरणा, पांच फूल, ग्राम्यजीवन की कहानियाँ, नारी, नारीजीवन की कहानियाँ, समरयात्रा, मानसरोवर ( ४ भाग ), अग्निसमाधि, कफ़न इ०

**नाटकें :—** प्रेम की वेदी, कविता, संग्राम.

**अनुवाद :—** सृष्टि का आरंभ, फ़िसाने आझाद, सुखदास, अहंकार, हड़ताल, चांदी की डिबियाँ, न्याय.

**बालोपयोगी :—** मनमोदक, कुत्ते की कहानी, जंगल की कहानियाँ, टॉल्स्टाय की कहानियाँ, दुर्गादास, रामचर्चा.

**निबंध :—** कुछ विचार, कलम, तलवार और त्याग, मौ. शेख़ सादी.

**पत्र :—** हंस, जागरण.

विसाव्या शतकांत हिन्दी भाषेंत महावीरप्रसाद द्विवेदी यांच्याखेरीज इतक्या विस्ताराचें व महत्त्वाचें वाङ्मय कोणींहि निर्माण केलें नाहीं. तरी प्रेमचंद यांच्या उर्दू साहित्याचा हिशेब या ठिकाणीं फारसा विचारांत घेतला नाहींच. शिवाय १९०६ पासून 'ज़माना' पत्रांत व पुढें इतरत्रहि अनेक

लेख त्यांनीं लिहिले. प्रेमचंद यांनीं जवळजवळ दहा हजार पृष्ठांचें उत्कृष्ट साहित्य निर्माण केलें.

प्रेमचंद यांच्या साहित्याचा परिचय करून घेतांना एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, त्यांनीं आपलें मन सतत प्रगतिशील ठेवलें. देशांत होणाऱ्या सामाजिक व राजकीय क्रांतीकडे त्यांचें जाणीवपूर्वक लक्ष होतें. सन १९०८-०९ मध्यें ज्या वेळीं त्यांनीं 'ज़माना' मध्यें लिहिण्यास प्रारंभ केला तेव्हां आर्य-समाजाचें आन्दोलन जोरांत होतें. हिन्दु समाजाच्या मध्यमवर्गानें त्यांत भाग घेऊन समाज सुधारण्याचा प्रयत्न चालविला होता. प्राचीन परंपरागत रूढि आणि नवविचार यांचें द्वंद्वयुद्ध सुरू झालें होतें. जुन्या विचारांची थट्टा नवीन लोक करीत असत. नव्या-जुन्याचा संघर्ष व सुधारणावाद यांचा परिचय कथाकार प्रेमचंद यांना निश्चितपणें होता. विधवाविवाह, बालविवाह, हुंडापद्धति इत्यादि अनेक बिकट प्रश्न त्या वेळीं समाजसुधारकांसमोर होते. कॉंग्रेसचें राजकारणहि सुरू झालें होतें. १९१४ मध्यें महायुद्धास प्रारंभ झाल्यामुळें राजकीय प्रश्नास चांगलीच धार प्राप्त झाली होती. महायुद्धाच्या समाप्तीनंतर इंग्रज सरकारनें 'रौलट ॲक्ट' पास केला. त्यांतून मिळालेले हक्क पुढाऱ्यांना मान्य नव्हते. सन १९१९ मध्यें महात्मा गांधींची राज-कारणांत प्रवेश करण्याची तयारी चालू होती. ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध असंतोषाचा फैलाव सर्व देशभर झालेला होता. विदेशी वस्तूंवर बहिष्कार, राष्ट्रीय संस्थांची स्थापना, खादीचा प्रचार, इत्यादि राष्ट्रीय कार्यक्रमांना चांगलीच गति मिळाली होती.

सन १९१९ च्या आरंभींच पंजाबांत जालियनवाला बागेंतील प्रसिद्ध भीषण असें हत्याकांड झालें. त्यामुळें राजकीय चळवळीस जोराची चालना मिळाली. १९२०-२१ मध्यें महात्माजींची असहकाराची चळवळ सुरू होऊन सबंध हिंदुस्थान खडबडून जागा झाला. आठ वर्षांतच सन १९३० मध्यें महात्मा गांधींचें दुसरें आन्दोलन सुरू झालें. सन १९३५ मधील मिठाचा सत्याग्रहहि उग्र प्रमाणांत राजकीय स्वरूप धारण करणारा होता. या सर्व जागृतीमुळें हिन्दुस्थानांत एक प्रकारचें नवचैतन्य निर्माण होण्याच्या वेळींच मुन्शी प्रेमचंद यांची बहुप्रसवा व सामर्थ्यवान् लेखणी पुढें सरसावली व मध्यमवर्गापासून खेडेगांवांतील शेतकरीवर्गापर्यंतचें भारतीय लोकजीवन तिनें

प्रभावीपणें चित्रित करून दाखविलें. प्रेमचंद यांच्या कलाकृतींतून तत्कालीन समाजांतील राजकीय-सामाजिक संघर्ष कोणत्या प्रकारचा होता हें तर स्पष्टपणें दिसून येतेंच; परंतु हिंदुस्थानचा वीस वर्षांचा राजकीय इतिहासहि प्रेमचंद-साहित्य स्थूलरूपानें वाचकांपुढें ठेवण्यास समर्थ असें आहे. आर्य समाजाची चळवळ, समाजसुधारकांचे विचार, गांधींचा सत्याग्रह व असहकार आणि साम्यवाद या चार प्रमुख आन्दोलनांचा परिणाम प्रेमचंद यांच्या साहित्यावर पडलेला दिसून येतो. प्रेमचंदांच्या लोकप्रियतेचीं कारणेंहि यामुळें ध्यानांत येण्यासारखीं आहेत. सामाजिक किंवा राजकीय प्रश्न हातीं घेऊन त्याभोंवतीं कथानक गुंफण्याची हातोटी प्रेमचंद यांना उत्तम प्रकारें साधली होती. अत्यंत रोचक, मनोरंजक व गतिपूर्ण कथानक त्यांच्या कादंबऱ्यांतून असे. व्यक्ति, वर्ग किंवा समाज यांच्या मानसिक हालचालीचा बारकावा त्यांच्या कथासाहित्यांत दिसून येत असल्याकारणानें वाचकांना तेथें सजीवतेचा साक्षात्कार होई. प्रेमचंद मुख्यतः कलावंत होते, पण त्यांच्या कलेनें देशकालपरिस्थितीकडे डोळेझांक केली नाहीं. देशांतील कित्येक समस्यांची चर्चा त्यांच्या कादंबऱ्यांतून झालेली दिसून येईल.

प्रेमचंद यांच्या प्रत्येक कादंबरीचा थोडक्यांत परिचय करून घेतल्यास किती विस्तृतपणें त्यांनीं आपली कलात्मक दृष्टि देशासाठीं वापरलेली आहे हें ध्यानांत येईल. देशांतील घटनांची वाङ्मयांत दखल घेणारा प्रेमचंद यांच्याएवढा कथाकार आपल्या देशांत झालेला नाहीं. रवीन्द्रनाथ किंवा शरद्बाबू यांचें साहित्य कांहीं अपवाद सोडून बहुधा देशकालपरिस्थिति यांचा विचार करणारें दिसत नाहीं. प्रेमचंद-साहित्यांत मात्र पदोपदीं भोंवतींच्या समस्यांचा विचार झालेला दिसून येतो. आणि महत्त्वाची गोष्ट अशी कीं, त्यामुळें त्यांच्या कथांना क्षणभंगुरता मात्र आलेली नाहीं. बहुधा असें होतें कीं, कोणत्या तरी एखाद्या राजकीय किंवा सामाजिक प्रश्नावर कादंबरी लिहिली कीं कांहीं काळपर्यंत तिचा बोलबाला राहतो; पण तो सामाजिक वा राजकीय प्रश्न संपत आला कीं, त्या कादंबरीचें महत्त्वहि संपून जातें. प्रेमचंद यांच्या कोणत्याहि कादंबरीचें स्वरूप असें नाहीं. याचें कारण असें कीं, त्यांच्या कादंबऱ्यांचीं कथानकेंहि मनोविज्ञानाच्या आधारावर मोठ्या कलात्मक रीतीनें गुंफलेलीं असतात. त्यामुळें त्यांतील सजीवता अमर होऊन राहिलेली आहे.

(१) **रूठी रानी**:—ज्या प्रकारें प्रेमचंद यांनीं प्रारंभींच्या काळांत ऐतिहासिक कथा लिहिल्या त्याचप्रमाणें त्यांनीं ही एक छोटीशी ऐतिहासिक कादंबरी लिहिली. भारतवर्षाच्या इतिहासांत पठाण आणि मोंगल यांची राजसत्ता स्थापन करण्यासाठी जी स्पर्धा सुरू होती तिच्यासंबंधींची ही कथा आहे. रजपूत वीरांच्यांतहि आपापसांत भांडणें होत असत; त्यामुळें त्यांच्याहि पराक्रमास फारशी किंमत राहिलेली नव्हती. या कादंबरीची नायिका जेसलमेरचा राजा मोनकिरण याची मुलगी उमादेवी ही आहे. या रावळचें मारवाड देशचा राजा मालदेव याच्याशीं शत्रुत्व होतें. उमादेवीच्या सौंदर्याची सर्वत्र चर्चा होत असे. मारवाड देशाच्या राजानें तिला मागणी घातली. रावळनें ही सूचना पसंत असल्याचा देखावा दाखवून मालदेवच्या हत्येचा कट उभारला. पण रावळची राणी व उमादेवी यांनीं कटाची बातमी आधींच मालदेवास दिलेली होती. पुढें मालदेव व उमादेवी यांचा विवाह होतो पण कांहीं कारणावरून उमादेवी रुष्ट झालेली असते. राजाची उच्छृंखलता, सवतीचें कारस्थान, उमादेवीचा स्वाभिमान इत्यादि कारणांमुळें राजा-राणी यांच्यांत सख्य निर्माण झालें नाहीं. याच समयास शेरशहानें हुमायुनास दिल्लीच्या गादीवरून हाकलून दिलें व आपलें राज्य चालू करून मारवाड देशावर आक्रमण केलें. मालदेवानें हें आक्रमण परतवून लावलें. पण त्याची तरुण राणी उमादेवी मात्र जन्मभर रुष्ट झालेलीच होती. राजा मालदेवच्या निधनानंतर ती त्याच रागावलेल्या मनःस्थितींत सती गेली.

प्रेमचंद यांनीं या कथेंत नेहमींच्याच सामग्रीवर कथेची उभारणी केलेली आहे. रजपुतांची देशभक्ति व त्यांचा पराक्रम वाखाणण्यासारखा असला तरी आपापसांतील फूटहि अंतीं देशाला विघातकच ठरते, हें तत्त्व प्रेमचंद यांनीं या कादंबरींत सूचित केलें आहे. याशिवाय बहुपत्नीत्वामुळें निर्माण होणारे पेचप्रसंग, राजभवनांतील कारस्थानें, गृहकलह इत्यादींचे वाईट परिणामहि या कथेंत वाचावयास मिळतात. रजपूत जातींत त्या काळीं असणारी स्त्रियांची परिस्थिति लिहितांना प्रेमचंद सांगतात, " वयांत आलेली मुलगी ही बिनशिंगांची गाय आहे. मातापिता तिचें रक्षण करतात व मनास येईल त्याच्या दावणीस बांधून देतात. "

(२) **वरदान** :— सन १९०५-६ सालीं प्रेमचंद यांनीं ही कादंबरी लिहिली. जगांत या वेळीं आर्थिक दृष्ट्या मोठेंच संकट निर्माण झालेलें होतें. जपाननें रशियाचा पराभव केला असल्यामुळें पूर्वेकडे एक नवें तेज उदयास आल्याचा साक्षात्कार पश्चिमेकडील राष्ट्रांना झाला होता. आशियांतील राष्ट्रांत देशप्रेमाची भावना उदित होऊन परकीय सत्तेविरुद्ध असंतोष निर्माण झालेला होता. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक तर हिंदी राजकीय असंतोषाचे जनक म्हणून ओळखले जाऊं लागले होते. प्रेमचंद यांच्या या कादंबरीचा विषयहि या काळांत उदित झालेल्या देशभक्तीचाच आहे. भारताची सुशील नारी सुवामा हिचें पवित्र दर्शन पहिल्यानेंच प्रेमचंद यांनीं घडविलें आहे. ही सुवामा देवीची उपासना करते व देशाचा उद्धार करणारा पुत्र दे, अशी प्रार्थना करते. देवीच्या प्रसादामुळें सुवामास पुत्र होतो. त्याचें नांव प्रताप. या प्रतापची व विरजन (व्रजरानी) यांची ही प्रेमकथा आहे. कथानकांत अनेक गुंतागुंती व जटिलता आहे. प्रेमभंगामुळें प्रतापचें संन्यासग्रहण आणि त्याची देशकार्यमग्नता यामुळें कादंबरीस देशभक्तीचा साज चढल्यासारखा दिसतो. कादंबरी पहिल्यानें उर्दू भाषेंत लिहिलेली होती; आणि तिचें नांव 'जलवाए इसार' (त्याग का दिग्दर्शन) असें होतें. प्रेमभंगामुळें आत्महत्याच करण्याची प्रवृत्ति बंगाली कथाकारांच्या साहित्यांत दिसून येते. प्रेमचंद यांनीं या प्रेमवेड्यांना दुसरा एक अधिक सकस व चांगला मार्ग सुचविला आहे, तो म्हणजे देशभक्तीचा.

प्रेमचंद यांच्या या प्रारंभींच्या कादंबरींत आदर्शवादास प्राधान्य देण्यांत आलें असलें तरी त्यामुळें पात्रांच्या स्वभावरचनेंत अनेक दोष निर्माण झाले आहेत. तंत्रदृष्ट्याहि अनेक दोष या कादंबरींत आहेत. कित्येक ठिकाणीं अतिशयोक्ति तर कित्येक ठिकाणीं चुकीची माहितीहि या कादंबरींत आढळते. असें असलें तरी कादंबरीचा विषय नव्या दृष्टीनें हाताळलेला असल्यामुळें एक नवा लेखक हिन्दींत उदयास आल्याचें या कादंबरीनें जाहीर झालें. प्रेमचंद यांच्या पुढील कादंबऱ्यांकडे लोकांचें लक्ष वेधलें गेलें.

(३) **प्रेमा अथवा प्रतिज्ञा** :— ही कथा सुद्धां पहिल्यानें उर्दू भाषेंत 'हम खुर्मा व हम सवाब' या नांवानें प्रसिद्ध झाली होती. सन १९०५ च्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या या कादंबरींत प्रेमचंद यांनीं सामाजिक प्रश्नांचा विचार केला आहे. स्वातंत्र्याच्या चळवळींबरोबरच समाजसुधारणेचें आन्दो-

लनहि या देशांत त्या वेळीं चालू होतें. आर्य समाजाच्या चळवळीस महत्त्व प्राप्त झालें असल्यामुळें प्रेमचंद यांच्या या कादंबरींत त्याच चळवळीच्या पार्श्वभूमीवर कथानकाची उभारणी झालेली आहे. अस्पृश्योद्धार आणि विधवा-विवाह हीं समाजसुधारणेचीं दोन महत्त्वाचीं अंगें असून 'प्रतिज्ञा' कादंबरींत मुख्यतः विधवांच्या करुण परिस्थितीची चर्चा आलेली आहे. कथानक प्रेमा-संबंधींचें असलें तरी त्याबरोबर विधवांच्या दुःखद अवस्थेचें विवेचन आलें आहे. मुन्शी प्रेमचंद यांच्या वैवाहिक जीवनाचा परिचय ज्यांना आहे त्यांना या कादंबरींचें मर्म चटकन् समजेल. लहानपणींच प्रेमचंद यांचें लग्न एका कुरूप व अडाणी स्त्रीशीं झालें असल्यामुळें प्रेमचंद सदैव उद्विग्न असत. ते या संबंधास 'विवाह' म्हणावयास तयार नव्हते. वैवाहिक आयुष्याची ही विटंबना प्रेमचंद यांनीं स्वतः भोगली होती आणि कांहीं काळानें त्यांनीं एका विधवेशीं लग्न करून दुसऱ्या एका प्रश्नाचीहि अनुभूति घेतली होती. अशा प्रकारें विवाहाचें स्वरूप व विधवाविवाह हा या कादंबरीचा विषय प्रेमचंद यांच्या चरित्रांतहि अस्फुट का होईना पण दिसून येतो.

मानवी मनाच्या हालचालींचेंहि सूक्ष्म चित्रण या कादंबरींत वाचावयास मिळतें. 'पूर्णा' हिच्या जीवनांतील प्रश्न मोठा महत्त्वाचा आहे. उत्पन्नाचें साधन कांहीं नाहीं, घरची इस्टेटहि नाहीं, अशा अवस्थेंत समाजाच्या चमत्कारिक रचनेंत विधवा स्त्रीनें काय करावें ? त्यांचा प्रश्न केवळ आध्यात्मिक वा नैतिकच नाहीं तर मीठभाकरी तरी त्यांना सुखानें कशी मिळेल हा आहे. प्रेमचंदांनीं तिला वनिताश्रमाची वाट दाखविली आहे तीहि कितपत योग्य आहे, याचा विचार करणें अगत्याचें आहे. या कादंबरींतील पूर्णा त्या आश्रमांत झाडलोट करून झोपडी उभारते व कृष्णाच्या मूर्ति स्थापन करून त्याच्या पूजनांत रममाण होते, असें दर्शविलें आहे.

**( ४ ) सेवासदन :** — प्रेमचंद यांची गाजलेली अशी ही पहिली कादंबरी. हिन्दी वाचकांनीं हिचें मनापासून स्वागत केलें. या यशामुळें प्रेमचंद उर्दू भाषेकडून हिन्दी भाषेकडे वळले. समाजांत वेश्याव्यवसायास कितपत स्थान आहे ? वेश्यावृत्ति बंद होईल काय ? कोणत्या सामाजिक परिस्थितीमुळें घरांतील कुलीन स्त्रियाहि या वाममार्गास लागतात ? वेश्यावृत्ति समाजास कलंक चढविणारी असल्यामुळें तिचा अंत व्हावा, म्हणून प्रेमचंद यांचा हा

प्रयत्न होता. वेश्यांसाठीं ' सेवाश्रम ' सारखी संस्था निर्माण करण्याचा मार्ग त्यांनीं दर्शविला असला तरी हेंहि स्पष्ट केलें आहे कीं, निष्ठुर असलेला समाजहि या हीन प्रवृत्तीस कारणीभूत आहे.

' सेवासदन 'चा प्रारंभ दुसऱ्याच एक प्रश्नानें झाल्यासारखा दिसतो. ब्रिटिश पोलीसपद्धति किती नादान व अत्याचारी होत राहिली आहे, याचें दर्शन प्रारंभीं होतें. समाजरक्षण व जनसेवा हीं दोन प्रमुख कर्तव्यें सोडून लांच-लुचपत, भ्रष्टाचार, बेइमानी करण्यास चांगलीं माणसेंहि कशीं प्रवृत्त होतात, हें कृष्णचंद्र याच्या उदाहरणावरून प्रेमचंद यांनीं दर्शित केलें आहे.

कथेची नायिका सुमन मानिनी व हट्टी मुलगी आहे. सुख व आरामांत जीवन व्यतीत करून ती एका मधुर अशा स्वप्नांत दंग होती. पण लग्नानंतर तिला सुख मिळालें नाहीं. कटु व कठोर अनुभव प्राप्त झाल्यामुळें तिला एकंदर या समाजाबद्दलच घृणा निर्माण झाली. समाजांत सतीत्व राखणाऱ्या स्त्रियांचा मान न राहून बाजारबसव्यांचा मात्र सन्मान होतो असें तिला दिसल्यावरून ती अतिशय उद्विग्न बनली. समाजांतील ढोंग व दांभिकता यांसहि ती पूर्णपणें विटून गेली होती. घरच्या सर्व कष्टांना तिनें तोंड दिलें असतें; पण घाणेरडे आरोप ठेवून नवऱ्यानें घराबाहेर हाकून दिल्यानंतर ती जाणार तरी कोठें ? नाइलाजानें व फसगतीनें तिनें वेश्यावृत्ति स्वीकारली. यामध्यें दोष तिचा, तिच्या नवऱ्याचा, कीं समाजाचा ?

याच कादंबरींत प्रेमचंद यांची प्रसन्न भाषाशैली व निवेदनपद्धति यांचा अनुभव हिन्दी वाचकांना आला. हिन्दु नारी कुमार्गापासून बांचावी म्हणून प्रेमचंद यांनीं ' सेवासदन 'चा मार्ग दाखविला, पण तोहि कितपत योग्य आहे ?

( ५ ) **प्रेमाश्रम** :—प्रेमचंद यांच्या या कादंबरीनें एका नव्या युगास प्रारंभ केला असें मानलें जातें. हिन्दी भाषेंतील पहिली राजकीय कादंबरी म्हणून ' प्रेमाश्रम 'चा उल्लेख केला जातो. गरिबांची दुःखद अवस्था, शेतकऱ्यांची अनुकंपनीय स्थिति, हिंदु-मुसलमान यांची एकी, नागरिक व ग्रामीण जीवन, अंधविश्वास, धर्माचें अवडंबर इत्यादि अनेक विषय या कादंबरींत आलेले आहेत. जमीनदार, त्यांचे साथीदार, पोलीस व त्यांची शासनपद्धति, साव-कार व त्यांनीं चालवलेली पिळवणूक यांमुळें भारतीय किसान कसा

नाडला जातो, याचें चित्रण या कादंबरींत प्रेमचंद यांनीं केलें आहे. किसानांचें शोषण करणाऱ्या जमीनदारी पद्धतीचें संवर्धन इंग्रजांनीं या देशांत केलें आणि आपल्या राज्यास त्यायोगें मजबुती आणली. याच जमीनदारी पद्धतीमुळें किसानांचे कसे हाल होत राहिले आहेत याचें यथार्थ चित्रण येथें आहे. या कादंबरींत नायक प्रेमशंकर जणुं प्रेमचंदांचेच विचार बोलून दाखवितो. या देशांतील जनतेनें भोळी धर्मश्रद्धा व अंधविश्वास सोडून देऊन नव्या विचारांचें शिक्षण घ्यावें, देश समृद्ध करावा, अशी त्याची शिकवण आहे. गरीब व पीडित शेतकऱ्यांना सहानुभूति दाखवून तो ज्वालासिंहाला म्हणतो, "जो कसेल त्याची जमीन हेंच बरोबर!" पण यासाठीं किसानांनीं धाक दाखवावा, बंड करावें, असें त्याला वाटत नाहीं. गांधींच्या चळवळीचे ते दिवस असल्यामुळें प्रेमचंद यांचा मानसपुत्र प्रेमशंकर किसानांचें अहिंसात्मक मार्गानें हृदयपरिवर्तन व्हावें असा प्रयत्न करणारा आहे. म्हणून क्रान्तीचा मार्ग सोडून 'प्रेमाश्रम' स्थापन करून त्याच्याद्वारा किसानांची सेवा करण्याचा निर्धार त्यानें केलेला असतो. या कादंबरींतील दुसरें एक पात्र बलराज रशियन राज्यक्रांतीनें प्रभावित झालेलें आहे. किसान-मजूर यांचें राज्य स्थापन झाल्याचीं स्वप्नें तो पाहत आहे; सरकारच्या विरुद्ध किसान-कामगारांचा पक्ष घेऊन तो लढत असतो. अन्याय व अत्याचार यांच्याविरुद्ध जोराचा सामना देण्याची त्याची तयारी असते. त्याची आई विलासी ही सुद्धां पराक्रमी स्त्री आहे.

या कादंबरींत किसानांच्या जीवनाचें मार्मिक वर्णन आलें आहे. त्यांची बोलण्याची भाषाहि लेखकानें या कादंबरींत वापरली आहे. कथा सांगण्याची पद्धति पण अतिशय मनोवेधक अशी आहे. गरिबांची बाजू घेऊन उन्मत्तांशीं झगडणारा एक तरी लेखक भारतांत प्रामाणिकपणें लिहीत आहे, याची जाणीव 'प्रेमाश्रम' मुळें निर्माण झाली.

(६) **रंगभूमिः**— प्रेमचंद यांची सर्वांत मोठी अशी ही कादंबरी जवळजवळ हजार पृष्ठांची असून जगाच्या रंगभूमीवर येणाऱ्या सर्व प्रमुख व्यक्तींचा समावेश या कादंबरींत झालेला आहे. प्रसंग आणि पात्रें यांची रेलचेल येथें असून उपकथानकेंहि भरपूर आहेत. तरीसुद्धां कादंबरीचें कथानक बांधेसूद आणि मनोरंजक झालें आहे. काशी, पांडेपूर आणि जसवन्तनगर

या ठिकाणीं मुख्य घटना घडत आल्या आहेत. कादंबरीचा मुख्य उद्देश यंत्रयुगांतील अपरिहार्य भीषणता हा आहे. कारखानदारीमुळें छोटे छोटे धंदे तर नाहींसे होतातच पण त्या धंद्यांतून प्राप्त होणाऱ्या सुखालाहि मनुष्य मुकतो. यंत्राच्या प्रचंड शक्तीमुळें उत्पादन भरपूर वाढलें तरी बेकारी त्यामुळें अधिक निर्माण होते. माणसाचें जीवनच निर्जीव होऊन बसतें. यंत्रयुगाची ही भयानकता मुन्शी प्रेमचंदांनीं या कादंबरींत वर्णन केली आहे.

सन १९२१ च्या सुमारास या कादंबरीचें लेखन सुरू होऊन ती १९२४ पर्यंत प्रकाशित झाली आहे. याच काळांत महात्मा गांधींची चळवळ उदयास आली. असहकाराचें आन्दोलन प्रेमचंद यांनीं प्रत्यक्ष पाहिलें होतें आणि कांहीं मर्यादेपर्यंत अनुभविलेंहि होतें. आपल्या नोकरीचा राजीनामा प्रेमचंद यांनीं याच वेळीं दिला. महात्मा गांधींच्या व्याख्यानानें ते प्रभावित झालेले असत. पण असहकाराचें आन्दोलन अपयशदायी ठरलें, हीहि गोष्ट प्रेमचंद यांच्या दृष्टीआड नव्हती. या आन्दोलनाचें स्पष्ट चित्र या कादंबरींत नसलें तरी त्याच्यापाठीमागें असणारें गांधीवादी तत्त्वज्ञान मात्र प्रेमचंद यांच्या मनांत निःसंशय होतें अहिंसा, अस्तेय, कष्ट सहन करण्याची तयारी, अपरिग्रह, सत्य, आत्मत्याग इत्यादि गांधीप्रणीत मार्गाचें श्रेष्ठत्व प्रेमचंद यांना मान्य होतें; व व्यावहारिक जगांतील त्याची उपयुक्तताहि त्यांच्या डोळ्याआड नव्हती. कादंबरीचा नायक भिकारी आणि आंधळा सूरदास ही हिन्दी वाङ्मयांतील एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा आहे. प्रेमचंदांनीं आपली सर्व कलात्मक शक्ति या सूरदासच्या निर्मितींत खर्च केली आहे असें वाटतें. गांधीवादी जीवनाचें प्रतीक म्हणजे सूरदास, असा निष्कर्ष प्रेमचंदांच्या टीकाकारांनीं काढलेला आहे.

सूरदास हा काशी शेजारच्या पांडेपूर गांवचा राहणारा एक गरीब भिकारी. गांवाच्या बाहेर त्याची दहा बिघे जमीन असते. तींत गांवचीं गुरें चरण्यास मोकळीक होती. भीक मागूनच सूरदासनें आपल्याजवळ ५०० रुपयांपर्यंतची कमाई करून ठेवली होती. एक दिवशीं एका खिश्चन भांडवलदारानें सिगरेटचा कारखाना काढण्यासाठीं सूरदासच्या जमिनीचा सौदा ठरविण्यास आरंभ केला. चांगला पैसा येणार असूनहि सूरदास जमीन विकण्यास तयार नसतो. सूरदासच्या मनांत येतें, जमीन गेल्यावर या गांवचीं गुरें चरणार

कोठें ? कारखाना निघाल्यावर सर्वत्र अनाचार पसरेल, ही एक भीति त्याच्या मनांत निर्माण झालेली असते. कारखाना काढणाऱ्या जानसेवकाची मुलगी सोफिया ध्येयवादी असते. ती सूरदासच्या बाजूनें प्रचार करूं लागते. भांडवलवाल्या कारखानदारानें या भूमींत कारखाना काढल्यानंतर काय भीषण परिस्थिति निर्माण होईल याचें सूरदासनें काढलेलें चित्र पहा —

" साहेब बोलून चालून खिस्ती आहे. तंबाखूचीं गोदामें भरलीं जातील. मंदिरांत कारखान्यांतील मजूर झोपतील. विहिरीवर खिस्ती मजुरांचा अड्डा होईल. मुलीबाळी त्या ठिकाणीं पाणी कशा भरणार ?...ताडीदारूचा प्रचार जोरांत चालू होईल. कसबिणींचा थयथयाट होईल. परदेशी माणसें आपल्या स्त्रियांना घेरूं लागतील, किती अधर्म होईल ! खेडेगांवचा शेतकरी आपलें काम सोडून मजुरी करण्याच्या लालसेंत राहील. त्या ठिकाणीं त्याला नाना प्रकारचीं व्यसनें लागतील; आणि त्याच्या वाईट वर्तनाचा प्रसार सर्व गांवांत होईल. खेडेगांवच्या बायकामुलीहि या कारखान्यांत पैसा मिळवण्याच्या इरादानें येतील आणि मग सर्वत्र अनर्थ होईल."

गांधीवादाच्या आदर्शांचा हा एक नमुना आहे. पण प्रेमचंद यांचें कसब कसें आहे तेंहि पाहा. गांधीवादाचें प्रतीक म्हणून त्यांनीं जें निर्माण केलें तो सूरदास आंधळा आहे. वस्तुस्थितीकडे न पाहतां डोळे बंद करून लढत राहणारा गांधीवाद आहे, असें का प्रेमचंद यांना सुचवावयाचें आहे ? प्रेमचंद वास्तववादी असल्याकारणानें डोळे बंद करून त्यांचें चालण्यासारखें नव्हतें. त्यामुळेंच कदाचित् या कादंबरींत त्यांनीं आदर्शवादाविरुद्ध यथार्थवाद किंवा वास्तववादाचाच विजय झालेला दाखविला आहे. सूरदासाचा कडवा विरोध असतांना देखील त्याच्या जमिनींत कारखाना उभारला गेला, त्यांत सूरदासची झोपडीहि वांचली नाहीं. गांववाले परागंदा झाले. यंत्रयुगाचें भयानक चित्र तर हें आहेच, पण त्याची अपरिहार्यताहि स्पष्टपणें सूचित झालेली आहे. प्रेमचंदांची ही कादंबरी कथोपकथनाच्या दृष्टीनेंहि सर्वांगसुंदर म्हणून गणली जाते. हजार पृष्ठांच्या या कादंबरींत शेंकडों पात्रें व शेंकडों प्रसंग येऊन जातात. कथा भिन्न भिन्न असल्या तरी त्यांची गुंफण एकमेकांशीं कलात्मक रीतीनें करण्यांत प्रेमचंद यशस्वी झाले आहेत.

(७) **कायाकल्पः**—प्रेमचंद यांची ही पांचवी कादंबरी. या कथेंत प्रेमचंदांनीं एक अद्‌भुत कथानक मिसळून दिलें आहे. एकीकडे सामाजिक प्रश्नांची चर्चा आहे तर दुसरीकडे जन्मान्तरानन्तरहि अविचल राहणाऱ्या प्रेमाची महती आहे. घटनांची संख्याहि मोठी आहे. हिंदु-मुसलमानांचा दंगा, गोवध, तुरुंगांतील झगडा, इत्यादि अनेक प्रसंग विस्तारानें या कादंबरींत वर्णन केले आहेत. चक्रधर आणि मनोरमा यांच्या प्रेमप्रसंगाचा एक कथाभाग कादंबरींत विस्तारानें आला असून दुसऱ्या कथाभागांत जगदीशपूरची राणी 'देवप्रिया' राज्य सोडून तीर्थयात्रेला निघाली आहे व ठाकूर विशालसिंह तिच्या राज्यावर बसून राजा बनला आहे. आणि याहि ठिकाणीं मनोरमेच्या प्रेमाचा प्रकार वर्णन केलेला आहे. 'कायाकल्प' या अद्‌भुतरम्य कादंबरीचीं मुख्य पात्रें आहेत— देवप्रिया, महेन्द्रसिंह, हर्षपूरचा राजकुमार, कमला, शंखधर ! पण खरीं म्हणजे दोनच पात्रें–देवप्रिया आणि महेन्द्रसिंह. कमला 'देवप्रिया'च असते. त्याचप्रमाणें हर्षपूरचा राजकुमार आणि शंखधर महेन्द्रसिंहाचेच अवतार आहेत. जन्मजन्मान्तरांतून चालू असणारी ही अद्‌भुत कहाणी प्रेमचंद यांनीं हेतुपरःसर निर्माण केली असावी. सर्व कादंबरींत रस आणि नाना प्रकारचे भाव यांचा नित्य प्रवाह चालू असलेला दिसतो. प्रेममूलक महाकाव्यच आपण वाचतों आहों, असा भास वाचकास पदोपदीं होत असतो. प्रेमचंदांच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणें टीकाकारांनीं या कादंबरीस मनापासून मान्यता दिलेली नाहीं. "कायाकल्पांतील रचना सर्वत्र शिथिल झाली आहे. अद्‌भुतरम्य घटनांमुळें हिला 'भानुमतीची पेटी' असेंच नांव द्यावें." असा अभिप्राय टीकाकार व्यक्त करतात.

(८) **ग़बन**:—या कादंबरीचा विषय मध्यमवर्गीतील पांढरपेशा समाजाचा आहे. 'दागदागिन्यांची हौस व तिचे दुष्परिणाम' असें थोडक्यांत या कादंबरीचें सूत्र सांगतां येईल. जालपा आणि रमानाथ यांच्या लग्नांत सर्व दागिने अंगावर चढविण्यांत आले; पण एक चंद्रहार नव्हता. जालपाच्या मनांत तर लहानपणापासून चंद्रहाराची इच्छा. आणि दागिन्यांच्या अनावर हौसेमुळें कुटुंबावर आघात कसकसे आले त्याचें चित्र या ठिकाणीं रंगविलें गेलें आहे. मध्यमवर्गीय कुटुंबांत खोटा दिमाख व पोकळ प्रतिष्ठा बऱ्याच प्रमाणांत असते. श्रीमंतीचा विनाकारण देखावा करावासा वाटतो. रमानाथ

हा एक असाच भ्रमांत राहणारा गृहस्थ आहे. खरी परिस्थिति तो आपल्या बायकोजवळहि सांगत नाहीं. जालपा ही आदर्श महिला आहे, पण सामंत-घराण्यांत वाढली गेली असल्यामुळें व शिक्षण फारसें झालेलें नसल्यामुळें समजूत तिला कमी आहे.

कादंबरीच्या पहिल्या वीस अध्यायांत कथानकाचें केंद्र प्रयाग हें आहे. इतर सर्व घटना कलकत्याशीं संबंधित आहेत. 'गबन'ची समस्या मुख्यतः मनोवैज्ञानिक आहे. आपल्या या मध्यमवर्गीय समाजरचनेंत स्त्री ही पुरुषानें कमावलेल्या संपत्तीची अधिकारी होण्याची इच्छा धरीत असते. संपत्तीची किंवा दागदागिन्यांची ही लालसा एक प्रकारची तीव्र मनोवृत्ति बनून गेलेली दिसते. 'गबन'मध्यें स्त्रीमनांतील या प्रबळ मनोविकाराचा इतिहास आहे. आभूषणप्रियता हा कथेचा मुख्य आधार असला तरी नायक-नायिकांच्या चारित्राचित्रणाच्या दृष्टीनें ही कादंबरी उल्लेखनीय आहे. रमानाथ हा एक दुर्बलतेस वश होणारा यथार्थवादी नायक आहे. प्रेमचंद यांनीं सामाजिक प्रश्न घेऊन ज्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत त्यांत कला व दृष्टिकोनाची परिपक्वता यांच्या दृष्टीनें 'गबन'ची श्रेष्ठता सर्वमान्य आहे. घराण्याची प्रतिष्ठा दागदागिन्यांच्या सांठ्यांत आहे, या उराशीं बाळगलेल्या कल्पनेमधून कथानकाचा विकास होत राहिला आहे. आपली समाजरचनाच अर्थव्यवस्थेवर अवलंबून असल्यामुळें, म्हणजे ज्याच्याजवळ धन तो श्रेष्ठ अशी समजूत असल्यामुळें, सर्व प्रश्न उपस्थित झाले आहेत. घरांत असणारी संपत्ति प्रदर्शनांत मांडून ठेवण्यासाठीं सोयिस्कर जागा म्हणजे स्त्रीदेह अशीहि समजूत कित्येक ठिकाणीं असते. सोन्याचांदीच्या मापानें मोजली जाणारी प्रतिष्ठा ही अन्तीं घातकारीच ठरते, हा सिद्धान्त या कादंबरींत मांडला आहे.

**(९) निर्मला :**— याहि सामाजिक कादंबरींत प्रेमचंदांनीं हुंड्याची अनिष्ट प्रथा व बिजवराचें लग्न या रूढींवर प्रकाश टाकण्यासाठीं कथानक निर्माण केलें आहे. उदयभानूलाल आपल्या मुलीचा—निर्मलेचा—विवाह खूप थाटामाटांत उच्च कुलवंताशीं करूं पाहत होते. पण त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें निर्मलेचें लग्न वकील तोताराम यांच्याशीं होतें. तोताराम वृद्ध असून त्यांना मंशाराम, जियाराम आणि सियाराम अशीं तीन पहिलीं मुलेंहि आहेत. वयस्कर अशा बिजवराशीं निर्मलेनें विवाह केल्यामुळें होणाऱ्या अनर्थांची परंपरा या

कादंबरींत लेखकानें वर्णन केली आहे. विजोड विवाह, वृथा संशय, नणंद-भावजयी यांचा झगडा यामुळें एका सुखी गृहस्थाच्या घरांत कसा बखेडा माजतो, हें या कादंबरीनें वाचकांसमोर नीटपणें मांडलें आहे. परंपरागत चालत आलेली सामाजिक व्यवस्थाहि आज बदलावयास पाहिजे व निष्प्राण होत चाललेली कुटुंब-व्यवस्थाहि सुधारावयास पाहिजे, असा प्रेमचंद यांचा आग्रह या ठिकाणीं दिसतो. विवाह या पवित्र वस्तूचें विडंबन होत असलेलें पाहून प्रेमचंद यांचें मन अनेक वेळां संत्रस्त झालें आहे. कथानकाच्या गुंफणीच्या दृष्टीनेंहि प्रेमचंद यांची ही छोटी कादंबरी वरच्या दर्जाची आहे. नारी-मनांतील दडपल्या जाणाऱ्या अनेक भावनांचा सुंदर आविष्कार या कथेंत झालेला आहे.

(१०) **कर्मभूमि**:—१९३२ सालीं प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीनें प्रेमचंद यांना 'रंगभूमि' एवढी कीर्ति मिळवून दिली. 'कर्मभूमी'त नांवा-प्रमाणेंच क्रियावान् जीवनाचें चित्रण आहे. कर्म हेंच जीवनाचें सार असून अमरकान्त हा नायक कर्माचें प्रतीक आहे. महात्मा गांधींच्या सत्याग्रह-चळवळीची पार्श्वभूमि या कादंबरीस घेतली असून धनवान् मनुष्यच या जगतांत हरएक प्रकारची गुलामगिरी कायम ठेवतो, या निष्कर्षावर या कथेची उभारणी आहे. कादंबरीचा नायक अमरकान्त आपल्या वडिलांना म्हणतो —

"दादा, आपल्या घरांत माझें जीवन नष्ट होत चाललें आहे. आतां अधिक नष्ट होण्याची वाट मी पाहणार नाहीं. केवळ खाणें, पिणें व मजा मारणें यासाठींच का माणसाचें जीवन असतें ? धनसंचय करीत राहणें हाच का त्याच्या जीवनाचा हेतु ?... मी एका नवजीवनाचा सूत्रपात करण्याचा निश्चय करणार आहें." असें म्हणून अमरकान्त घराबाहेर पडला आहे. अमरकान्त निघून गेल्यावर त्याची पत्नी सुखदा हिचे डोळे उघडतात; आणि तीहि जनसेवेस सुरुवात करते. शहरांतील मंदिर अस्पृश्यांना खुलें व्हावें म्हणून ती डॉक्टर शांतिकुमार यांच्याबरोबर चळवळ करते. तिकडे अमरकान्तहि शेतकऱ्यांची बाजू घेऊन लढा चालू करीत असतो. या प्रकारें कादंबरींत राजकीय चळवळीसहि स्थान देण्यांत आलें आहे. भरमसाट व्याज घेऊन फसवणारे सावकार, चोरीच्या मालाचे व्यापार, पिता-पुत्र वा पति-पत्नी यांच्यांतील

दास्यत्व, कुचकामी शिक्षणपद्धति, शिकलेल्या लोकांच्या वृत्तींतील स्वार्थ, सरकारची कर उकळण्याची प्रवृत्ति वगैरे गोष्टींवर चांगलाच प्रकाश या कादंबरींत पाडलेला आहे.

कादंबरीचें 'कर्मभूमि' हें नांव मोठें सार्थ आहे. विरुद्ध परिस्थितीशीं टक्करा देत देत माणसानें नित्यकर्म करीत राहिलें पाहिजे, हा संदेश या कादंबरीनें दिलेला आहे. तप, साधना आणि ज्ञान यांशिवाय अविरत कर्म हाहि एक मनोविकासाचा मार्ग आहे आणि साधारण जनांसाठीं हाच मार्ग योग्य आहे. संसारांत राहावें, निरंतर होणाऱ्या संघर्षांशीं टक्करा द्याव्यात व शेवटीं कर्म करीत असतांनाच मनःशांति मिळवावी, हें या कादंबरीचें थोडक्यांत उद्दिष्ट म्हणून सांगतां येईल.

(११) **गोदानः**— प्रेमचंद यांच्या कीर्तिशिखरावर मुकुटमणि चढविला तो या कादंबरीनें. पूर्ण झालेली त्यांची ही अखेरची कादंबरी. चरित्रकथा सांगत असतांना कित्येक वेळां या कादंबरीचा उल्लेख आला आहेच. या ठिकाणीं संक्षेपानें कांहीं मुख्य गोष्टींचाच उल्लेख करूं. सन १९३६ मध्यें प्रसिद्ध झालेल्या या कादंबरींत नेहमींप्रमाणेंच दोन मुख्य कथानकें प्रेमचंद यांनीं तयार केलीं आहेत. एक नायक होरीरामाची कथा व दुसरी रायसाहेब व त्यांच्या मित्रांची कथा. एकांत ग्रामीण जीवनाचें यथार्थ चित्र रंगविण्यांत आलें आहे, तर दुसऱ्यांत नागरी जीवनांतील रेखाचित्र पाहावयास सांपडतें.

होरी बिहारीगांवचा एक शेतकरी आहे. चार-पांच बिघे स्वतःचीं म्हणून असणारी जमीन कष्टानें खपवून आपली प्रतिष्ठा राखून असतो. त्याची बायको धनिया व पुत्र गोबर. सोभा व हीरा हे दोन बंधु आहेत पण ते वेगळे राहतात. होरीरामास दोन मुली— सोना आणि रूपा. त्यांच्या लग्नाची चिंता त्याला आहेच. पतिपत्नींत अनेक कारणांवरून नित्य झगडा होत असे. मोठ्या कष्टानें कसें तरी जीवन व्यतीत करणाऱ्या या शेतकऱ्याच्या मनांत एकच इच्छा— एक गाय पाळण्याची इच्छा— असते. एक भोला नांवाचा शेतकरी त्याला गाय उधार देतो. होरीरामाचें स्वप्न साकारलें जातें; पण त्याचा भाऊ गायीस विष देऊन मारून टाकतो. गोबर व भोलाची विधवा कन्या झुनिया यांचा प्रेमप्रसंग ग्रामीण चित्राचा एक वास्तविक नमुना म्हणून सांगण्यासारखा आहे.

आपली कन्या सोना हिच्या विवाहासाठीं होरीराम थोडेंसें कर्ज काढतो आणि तेथून त्याच्यावर अनर्थकारी परंपरा कोसळते. पैसा जवळ नसल्यामुळें रूपाचा विवाह एका म्हाताऱ्या गृहस्थाशीं करणें होरीरामास भाग पडतें. शेवटीं जमीन विकून मजूर होण्याची पाळी त्यावर येते. अतिशय कष्टामुळें त्याचा देह थकून गेलेला असतो; डोळे सुकून गेलेले दिसतात. एके दिवशीं काम करतां करतां होरीराम बेशुद्ध होऊन पडतो. मृत्यूची वेळ जवळ येते. धनिया गडबडून गेलेली असते. गाय पाळण्याची इच्छा मनांतल्या मनांत राहिलेली पाहून घरांत उरलेले वीस आणे हेंच गोदान समजून होरीच्या निर्जीव हातांतून धनिया दान करते व मूर्छित होते !

धन निर्माण करणाऱ्या, कष्ट करणाऱ्या भारतीय किसानाचा हा शोक-दायक अंत ! किसान-जीवनाचा अनुभव स्वतः प्रेमचंद यांनीं घेतला असल्या-मुळें होरीरामचें चित्र भारतीय वाङ्मयांत अमर होऊन राहील. भारतीय शेतकरीवर्गाचा प्रतिनिधि म्हणजे ‘ गोदान ’मधील होरीराम. त्याचें दुःख आपल्या देशांतील सर्व शेतकऱ्यांचें दुःख आहे. प्रेमचंदांची सर्व कलासक्ति ‘ गोदान ’-मध्यें पणास लागलेली दिसते. होरीराम, धनिया, गोबर, झुनिया, सिलिया हीं पात्रें अत्यंत सजीव व वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. एका टीकाकारानें म्हटलें आहे कीं, येत्या पन्नास वर्षांत होरीराम या पात्रास तोंड देईल असें एक तरी पात्र हिंदी-उर्दू भाषेंत तयार होईल कीं नाहीं कोणास माहीत ! शेतकऱ्यांच्या स्वभावांतील गुण आणि दोष यांचें यथार्थ चित्रण या कादंबरींत मिळतें. त्यांच्या आशा, त्यांचीं दुःखें, त्यांच्या मनःकामना, त्यांच्या समजुती या सर्वांचा वास्तव दृष्टीनें परामर्श या कादंबरींत घेतलेला आहे. होरीरामाचा मुलगा गोबर हा नव-विचाराचा तरुण आहे. व्याजखोरी, जमीनदारी आणि धर्माच्या नांवाखालीं चाललेली फसवणूक बंद व्हावी असें त्याला वाटतें. शहरांत मजुरी करण्यास त्यानें प्रारंभ केलेला असतो. ‘ गोदान ’ कादंबरींत प्रेमचंदांची कला, त्यांचें चिंतन आणि त्यांची शैली यांनीं सीमान्त यश गांठलेलें दिसतें.

( १२ ) **मंगलसूत्रः**— मृत्युशय्येवर असतांना लिहावयास घेतलेली प्रेमचंद यांची ही शेवटची कादंबरी. ती पूर्ण होऊं शकली नाहीं. या अर्धवट कादंबरीचा नायक देवकुमार एक लेखक आहे. पण लिहिण्यापासून कांहीं आर्थिक फायदा मात्र त्यास होत नाहीं; उलट हातीं आलेली संपत्ति मात्र तो

घालवून बसतो. या दरिद्री देवकुमारास दोन मुलें. थोरला मुलगा संतकुमार वकिली करीत असतो. बापाच्या आदर्शवादाशीं त्याचें जमत नसल्यामुळें पैसा कमावणें हेंच एक त्याचें ध्येय असतें. छोटा मुलगा साधुकुमार मात्र बापाच्या वृत्तीस अनुकूल अशा स्वभावाचा असतो. असें सांगतात कीं, या कादंबरींत प्रेमचंद आपली जीवनकथाच लिहीत होते.

**प्रेमचंदांच्या नाट्यकृतिः**—प्रेमचंद यांना नाटक लिहिणें फारसें जमलें नाहीं. मागें उल्लेखलेलीं त्यांचीं नाटकें आहेत, पण नाटक लिहिण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत नव्हती. 'संग्राम' आणि 'कर्बला' या नाटकांखेरीज आणखी नाटकें लिहिण्याच्या भानगडींत प्रेमचंद पडले नाहींत. आणि हीं नाटकें सुद्धां कादंबरी-प्रमाणेंच आहेत. तीं स्टेजवर यशस्वी होण्याची खात्री नाहीं डॉ. इन्द्रनाथ मदन यांना लिहिलेल्या दि. २६ डिसेंबर १९३४ च्या एका पत्रांत मुन्शी प्रेमचंद म्हणतात, "मीं कधीं गंभीरतेनें नाटक लिहिण्याचा प्रयत्न केला नाहीं... भारतांत, विशेषतः हिन्दी भाषेंत, रंगभूमि नाहीं. जर रंगभूमि थोडीशी उरली असेल तरी पारशी रंगभूमीचा भग्नावशेषच तो आहे....शिवाय असें कीं, नाट्यकला आणि रंगभूमीचें कौशल्य यांचें ज्ञान पण प्राप्त करून घेतलें नाहीं. त्यामुळें माझीं नाटकें फक्त वाचनीय आहेत. आणि प्रश्न असा कीं, कादंबरी लिहितांना मी चरित्रविकास साधीत असतां मी नाटकाची निर्मित कां करूं?"

**प्रेमचंदांच्या कथाः**—आपण मराठींत ज्यांना लघुकथा म्हणतों त्यांना हिंदींत 'कहानी' असें नांव प्राप्त झालें आहे. उपन्यास-सम्राट् प्रेमचंद यांच्या कथाहि हिन्दींत सर्वप्रसिद्ध अशा आहेत. मराठींत त्यांच्या कांहीं कथांचें भाषांतर झालेलें आहे. 'प्रेमचंदांच्या गोष्टी' म्हणून एक पुस्तकहि प्रसिद्ध झालें आहे. नागपूरचे श्री. आनंदराव जोशी यांनीं १९२९ सालीं हें पुस्तक पुण्याच्या चित्रशाळेमार्फत प्रसिद्ध केलें आहे. राजा हरदौल, रानी सारन्धा, मन्दिर और मसजिद, एक्ट्रेस, अग्नि-समाधि, विनोद, आत्माराम, सुजान-भगत, बूढी काकी, दुर्गा का मंदिर, शतरंज के खिलाडी, पंचपरमेश्वर, बडे घर की बेटी आणि विध्वंस या चौदा कथा या पुस्तकांत आहेत. आणि महत्त्वाची गोष्ट अशी कीं, प्रेमचंदांनीं स्वतःच्या उत्कृष्ट कथा म्हणून या गोष्टींची निवड केलेली आहे. प्रेमचंदांनीं एकूण साडेतीनशेपर्यंत कथा उर्दू व हिन्दी भाषांतून लिहिल्या आहेत. त्या सर्वांचा निर्देश या छोट्या पुस्तकांत करणें अशक्य आहे. तरी स्थूल माहिती खालीलप्रमाणें देतां येईल.

प्रेमचंद यांच्या प्रारंभिक कथा घटनाप्रधान व अद्‌भुताच्या मिश्रणानें युक्त अशा असत. कथानक महत्त्वाचें असून चरित्रचित्रणापेक्षा प्रसंगनिर्मितीस महत्त्व फार दिलेलें आहे. चरित्रप्रधान अशा कथा प्रेमचंद यांनीं फार थोड्या लिहिल्या आहेत. 'माता का हृदय', 'स्वर्ग की देवी' हीं नांवें नमुन्यादाखल सांगण्यासारखीं आहेत. समाजांतील वाईट चालीरीतींवर व अज्ञानावर टीका करण्याच्या दृष्टीनें प्रेमचंद यांनीं पुष्कळ कथा लिहिलेल्या दिसतात. 'स्त्री और पुरुष', 'दिवाला', 'नैराश्य', 'लीला' 'उद्धार' इत्यादि कथा हेतुपूर्वक लिहिलेल्या असाव्यात असें वाटतें. अशा प्रकारें त्यांच्या कथांचें वर्गीकरण करतां येण्यासारखें आहे, पण तें तितकेंसें बरोबर होणार नाहीं. त्यांच्या ऐतिहासिक कथांत 'शतरंज के खिलाडी' ही कथा अत्यंत सुंदर आहे. सरंजामशाही पद्धतीचें खोटें रूप यांत वर्णन करून दर्शविलें आहे. त्यांच्या सामाजिक कथांत 'मंत्र' ही कथा विशेष उल्लेखनीय अशी आहे. या 'मंत्र' कथेसंबंधीं एक आख्यायिका येथें सांगण्यासारखी आहे.

दिल्लीच्या प्रान्तीय साहित्य संमेलनासाठीं सभापति म्हणून प्रेमचंद यांची नियुक्ति झालेली होती. चार-पांच दिवस तेथें प्रेमचंदांचा मुक्काम होता. स्थानीय हिन्दी सभेतर्फे प्रेमचंदांच्या सत्काराची सभा चालू होती. त्या सभेस एक पंजाबी गृहस्थ येऊन बसला होता. त्यानें कांहीं प्रमुख व्यक्तींची भेट घेऊन प्रेमचंद यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. प्रेमचंद यांना त्याच रात्रीं दिल्लीहून निघावयाचें होतें. सभेचें कामहि लौकर आटोपावयाचें होतें. या गडबडींत त्या बिचाऱ्या गृहस्थास कोण दाद देणार? सभा समाप्त होण्याच्या वेळीं तो उठला व हात जोडून त्यानें प्रार्थना केली, "या रात्रीं प्रेमचंद यांना मी मुळींच जाऊं देणार नाहीं. त्यांच्यासहित या सभेला मी उद्यां घरीं येण्याचें आमंत्रण देत आहें–" प्रेमचंद हे प्रथम थांबण्यास तयार नव्हते. तेव्हां त्यानें थोडें निवेदन केलें, "आजपर्यंत प्रेमचंद यांना पाहण्यासाठीं, भेटण्यासाठीं मीं खूप प्रयत्न केले. लखनौहून दोन वेळां येथें आलों. एक वेळ बनारस येथेंहि गेलों होतों. तीन वेळां घरीं जाऊन सुद्धां त्यांची भेट होऊं शकली नाहीं.... कित्येक वर्षांपूर्वींची गोष्ट आहे. नशीब काढण्यासाठीं मी पूर्वेकडे निघालों होतों. माझ्या खिशांतील सर्व पैसे संपण्याच्या बेतांत होते. मी स्टेशनवर भटकत असतांना खिशांतील दोन रुपये खर्च करून प्रेमचंद

यांचें एक पुस्तक विकत घेतलें. मी काय करतों हेंच मला समजत नव्हतें. पुढें सर्वच अंधार होता... पण त्यांतील 'मंत्र' ही कथा वाचली मात्र; माझ्या मनांतील नैराश्य एकदम दूर झालें. मीं मन भक्कम केलें व या आजच्या स्थितींत केवळ त्या कथेमुळें येऊन पोंचलों आहें. त्या वेळेपासून 'मंत्र' कथेचा मंत्रदाता शोधण्याच्या खटपटींत मी आहें. आज तो मला दिसला आहे; मी त्याला सोडणार नाहीं. घरीं बायको आजारी आहे. ती अंथरुणावरून उठूंहि शकत नाहीं. केव्हांपासून ती प्रेमचंद येण्याची वाट पाहत असेल...." प्रेमचंद थांबणार नव्हते, पण ही कथा ऐकल्यावर थांबणें भाग पडलें. प्रेमचंदांनीं त्याच्या आदरसत्काराचा मोठ्या आनंदानें स्वीकार केला.

'सोजे वतन' आणि 'सप्तसरोज' हे प्रेमचंद यांचे प्रारंभींचे कथासंग्रह. 'सप्तसरोज'बद्दल बंगालचे महान् कथाकार शरच्चन्द्र चट्टोपाध्याय यांनीं म्हटलें आहे, 'कथा खरोखरीच अत्यंत भावपूर्ण आणि उत्तम आहेत. रवीन्द्र-बाबूंशीं तुलना करणें अन्यायाचें व अनुचित असें होणार आहे. पण दुसरा कोणताहि बंगाली लेखक इतक्या चांगल्या कथा लिहूं शकेल असें मला वाटत नाहीं.'

'बडे घर की बेटी' आणि 'पंचपरमेश्वर' या संग्रहांतील नांवाजलेल्या कथा आहेत. प्रेमचंद यांच्या 'नवनिधि' या कथासंग्रहांतील बहुतेक कथा ऐतिहासिक आहेत. त्यांतील 'धोखा', 'अमावस्या की रात्रि', 'ममता', 'पछतावा', इत्यादि कथा उल्लेखनीय आहेत.

'मानसरोवर'च्या पहिल्या भागांत प्रेमचंद यांनीं कहानी-कला या विषया-वरील आपले विचार प्रकट केले आहेत. "कथा जीवनाच्या अगदीं निकट येत आहे. तिची जमीन लांबरुंद अशी नसते. त्यामुळें तिच्यांत कित्येक रस, कित्येक चरित्रें, कित्येक घटना यांना स्थान उरत नाहीं. एकाच प्रसंगाचें, आत्म्याच्या एकाच विशेषाचें सजीव आणि हृदयस्पर्शी चित्र म्हणजे कथा" असें त्यांनीं त्यांत म्हटलें आहे. कादंबरीप्रमाणेंच कित्येक कथांतून प्रेमचंद यांनीं देशभक्तीचा प्रचार केला. 'सोजे वतन'ची माहिती आपण पाहिलीच आहे. त्यांचा दुसरा एक कथासंग्रह 'समर-यात्रा' हा सुद्धां सरकारच्या अव-कृपेमुळें जप्त झालेला होता.

मुन्शी प्रेमचंद यांनीं अनुवाद करण्यांतहि कमीपणा मानला नाहीं. प्रारंभीं-च्या आयुष्यांत उर्दू साहित्यांतील कांहीं कथांचा अनुवाद त्यांनीं प्रसिद्ध केला

होताच. उत्कृष्ट कलाकृति आपल्या बांधवांना रसास्वादासाठीं द्याव्यात ही एक त्यांची वृत्ति असल्यामुळें त्यांनीं परभाषेंतील कलकृतींचे अनुवाद हिन्दी भाषेंत केलेले आहेत. त्यांमध्यें ‘ अहंकार ’ या अनुवादाचा उल्लेख करण्यासारखा आहे. युरोपमधील पहिल्या श्रेणीचा फ्रेंच लेखक अनातोल फ्रान्स याच्या ‘ थायस ’ या सर्वोत्कृष्ट ऐतिहासिक कथेचा हा अनुवाद प्रेमचंदांनीं भूमिकेसहित प्रसिद्ध केला आहे. भूमिकेंत या अनुवादित कादंबरीचें त्यांनीं मार्मिकतेनें रसग्रहण केलें आणि शेवटीं उत्कृष्ट अनुवाद कसा असावा यासंबंधीं कांहीं सूचनाहि केल्या आहेत. याशिवाय प्रेमचंद यांच्या आणखी एका महत्त्वाच्या पुस्तकाचा उल्लेख या ठिकाणीं करावयास पाहिजे. १९०३-४ सालीं राष्ट्रीय जाग्रतीच्या काळांत प्रेमचंदांनीं ‘ ज़माना ’ पत्रांत कांहीं राष्ट्रपुरुषांचीं स्फूर्तिदायक चरित्रें प्रसिद्ध करून तीं ‘ बाकमालों के दर्शन ’ ( महापुरुषांचें दर्शन ) नांवाच्या पुस्तकांत संग्रहितहि झालीं होतीं. याचें हिन्दी नामकरण प्रेमचंद यांनीं मृत्यूच्या आधींच्या दिवशीं ७ ऑक्टोबर १९३६ रोजीं ‘ कलम, तलवार और त्याग ’ असें केलें होतें. राणा प्रताप, रणजितसिंह, राणा जंगबहादुर, अकबर महान्, स्वामी विवेकानंद, राजा मानसिंह, राजा टोडरमल, माननीय गोपाल कृष्ण गोखले, गॅरिबाल्डी, मौलाना वहीउद्दीन ‘ सलीम ’, डॉक्टर सर रामकृष्ण भांडारकर, बदरुद्दीन तैयबजी या श्रेष्ठ पुरुषांचीं जिवंत चरित्रें या पुस्तकांत एकत्रित झालीं आहेत.

प्रेमचंद यांच्या या साहित्यसृष्टीवर आपण ही जी ओझरती नजर टाकली आहे तीवरूनहि ध्यानांत येईल कीं, प्रेमचंदांचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. समकालीनांपेक्षां कांहीं वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण कलाकृति निर्माण करणाराच महान् साहीत्यिक म्हणून नांवारूपास येतो. मनोरंजन आणि मार्गदर्शन यांचा उत्कृष्ट मिलाफ प्रेमचंद यांच्या कथासाहित्यांत दिसून येतो. प्रेमचंदपूर्व लेखकांनीं कादंबरीलेखन केलेंच नव्हतें असें नाहीं; पण अद्‌भुतरम्य प्रेमविलास, जादूटोणा आणि कल्पनांच्या भराऱ्या यांनींच तें साहित्य भरून गेलेलें होतें. त्यायोगें वाचकाची जिज्ञासा आणि साहसप्रीति जागृत झालेली होती. रहस्यमय कथानकामुळें बुद्धीस कदाचित् चालनाहि मिळाली असेल. पण मानवी चरित्रचित्रणास प्रारंभ मात्र प्रेमचंद यांनींच केला. गगनविहार करणारीं पात्रें चालतीं-बोलतीं पृथ्वीवरीलच माणसें आहेत; आपल्याप्रमाणेंच

तीं निराश होतात, दुःख भोगतात, अपयशी होतात, याची जाणीव प्रेमचंदांची कथा वाचून हिन्दी वाचकांना पहिल्यानें झाली. आणि या आत्मप्रत्ययामुळें हिन्दी जनतेनें प्रेमचंदांना 'उपन्याससम्राट्' ही पदवी अर्पण केली. वास्तववाद व देशकालपरिस्थितीस अनुसरून ध्येयवाद यांचा सुंदर संगम मुन्शी प्रेमचंद यांच्या कथासाहित्यांत दिसून येतो. या त्यांच्या ध्येयवादाचा व विचारदर्शनाचा जवळून परिचय आपण पुढल्या प्रकरणांत करून घेणार आहोंत.

●●●

## प्रेमचंद : विचारदर्शन : १३

"स्वराज्य ही एक चित्तवृत्ति आहे. पराधीनतेची जाणीव चित्तांतून निघून गेली कीं तुम्हांस स्वराज्य मिळालें असें समजा. भीति हीच पराधीनता आहे. निर्भयता हें स्वराज्य आहे. व्यवस्था व संघटन हाहि एक गौरवाचाच भाग आहे." हें मुन्शी प्रेमचंद यांच्या 'समरयात्रा' नांवाच्या कथेंतील एक वाक्य आहे. 'समरयात्रा' या नांवाचें एक पुस्तकहि त्यांनीं प्रसिद्ध केल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. या पुस्तकांत राजकारणविषयक अशा अकरा कथा एकत्रित केल्या आहेत. तत्कालीन परिस्थितीशीं प्रेमचंद नेहमींच समरस होत राहिल्याकारणानें त्यांच्या सर्वच साहित्यांत देशकारण, समाजकारण, धर्मकारण इत्यादि गोष्टींचें प्रतिबिंब पडलेलें दिसून येतें. त्यांतील कांहींचा परिचय या प्रकरणांत आपण करून घेणार आहोंत. प्रेमचंदसारख्या मोठ्या कलावंताची दृष्टि दूरगामी असते. चिरकाल टिकणाऱ्या प्रश्नांवरील त्यांचें विवेचन मार्गदर्शन करण्यासाठीं सदैव तयार असतें; आणि तेंहि रुक्षतेच्या मार्गानें नव्हे तर मनोरंजन करीत करीत. तत्कालीन प्रश्नांचा विचार थोर कलावंत करीत असले तरी त्यांवरील त्यांचें भाष्य मात्र तसे प्रश्न भविष्यकाळांत जेव्हां जेव्हां निर्माण होतील तेव्हां तेव्हां उपयोगी पडण्यासारखें असतें. मुन्शी प्रेमचंद हे नुसते कल्पनारंजित अशा गोष्टी सांगणारे कहानीकारच नव्हते, तर गोष्ट सांगतां सांगतां एखादें तत्त्व मनावर बिंबावें, एखाद्या बिकट प्रश्नाची चर्चा व्हावी,

एखाद्या सत्प्रवृत्तीचें बीजारोपण व्हावें, इत्यादि हेतु त्यांच्या साहित्यनिर्मितीच्या पाठीमागें निःसंशय होते. किंबहुना त्याप्रमाणें त्यांनीं साहित्याची व साहित्य-शास्त्राची व्याख्याहि करून ठेवलेली आपण पाहिली आहे.

केवळ कलेची उपासना करणें, जें जगतांत दिसेल त्याचा यथातथ्य दृष्टीनें विचार करणें,एवढेंच काम त्यांनीं पत्करलें नव्हतें. कलेसाठींच कला हा त्यांचा आग्रह नव्हता. कला मनुष्याला फक्त आनंदच देऊं शकते, साहित्यानें दुसरा कोणताहि हेतु मनाशीं न बाळगतां केवळ आनंदानिर्मितीकडे लक्ष द्यावें, हें जें एका पंथाचें तत्त्वज्ञान आहे तें मुन्शी प्रेमचंद यांना मान्य नव्हतें. कला ही सुद्धां उपयोगी असावी, आपल्या सद्भावना उज्ज्वल करणारी असावी, असा आग्रह पदोपदीं त्यांनीं धरलेला दिसतो. त्यावरून प्रेमचंद यांच्या साहित्यनिर्मितीचा हेतु स्पष्ट होण्या-सारखा आहे. ‘ प्रेमप्रसून ’ या आपल्या कथासंग्रहाला भूमिका लिहितांना ते म्हणतात, “ ध्येयवादी असे मानीत असतात कीं, यथार्थाचें स्वरूप यथार्थ वर्णन करून आपणांस काय मिळणार आहे ? तें तर आपल्या उघड्या डोळ्यांनाहि दिसतेंच. कांहीं काल तरी आपण या कुत्सित पण यथार्थ व्यवहारांपासून दूर राहिलें पाहिजे; नाहीं तर साहित्याचा मूळ उद्देशच नष्ट होण्यासारखा आहे. तो साहित्याला समाजाचा दर्पण मानीत नसून दीपक मानीत असतो. प्रकाश देणें, मार्ग दाखविणें हेंच दिव्याचें कार्य आहे. भारताचें प्राचीन साहित्य ध्येय-वादीचेंच समर्थन करणारें आहे. आपण सुद्धां याच आदर्शाचें पालन करा-वयास पाहिजे. आमचा असा विश्वास आहे कीं, कथेचे खालील मुख्य विशेष असावेत : ( १ ) आध्यात्मिक किंवा नैतिक उपदेश, ( २ ) अत्यंत सरळ भाषा, ( ३ ) आणि स्वाभाविक वर्णन शैली. ” आणि याच आदर्शाला धरून प्रेमचंद यांनीं आपल्या साहित्याची अशी रचना केली आहे कीं, त्यास प्रचाराचें स्वरूप प्राप्त झालें असलें तरी त्यांतील रंजकता व अमरता सहसा कमी होऊं नये. प्रत्यक्ष उपदेशाचे धडे दरएक कथेंत किंवा कादंबरींत जरी नसले तरी जीवनांतील आदर्शवादाचा मात्र पुरस्कार व्हावयास पाहिजे, अशी प्रेमचंद यांची श्रद्धा होती. आपल्या भारतीय वाङ्मयाचा ध्येयवाद किंवा आदर्शवाद हा एक महत्त्वाचा विशेष आहे, हें त्यांनीं बरोबर हेरलें होतें. त्यांनीं आपल्या ‘ प्रेमद्वादशी ’ या कथासंग्रहाच्या भूमिकेंत तर स्पष्टच म्हटलें आहे : “ ज्या कथेंत जीवनाच्या कोठल्या ना कोठल्या तरी अंगावर प्रकाश

टाकलेला नाहीं, सामाजिक रूढींविषयीं जींत तीव्र आलोचना नाहीं, जी मनुष्याच्या सद्‌भावना दृढ करीत नाहीं व जी मनुष्याची कुतूहलप्रवृत्ति जागी करीत नाहीं, ती कथाच नव्हे." युरोपियन कथेला कदाचित् निर्हेतुकता किंवा केवळ मनोरंजन हेंच ध्येय मानवत असेल; पण भारतीय भाषांतील कथा मात्र आपल्या वैशिष्ट्यानें चमकलीच पाहिजे, असा प्रेमचंद यांचा आग्रह होता. याच भूमिकेंत ते आणखी म्हणतात,

"युरोप आणि भारतवर्ष यांच्या आत्म्यांत खूप अंतर आहे. युरोपची दृष्टि सुंदरतेवर असते, तर भारताची दृष्टि सत्यावर असते. संपन्न युरोप मनोरंजनासाठीं कथा लिहील, तर भारत हा असला आदर्श केव्हांहि स्वीकारणार नाहीं. नीति आणि धर्म याच आमच्या जीवनाच्या प्रेरणा होत. आम्ही परतंत्र आहोंत; पण आमची संस्कृति पाश्चात्यांपेक्षां उच्च आहे. यथार्थावर दृष्टि ठेवणारा युरोप आम्हां ध्येयवादी लोकांशीं जीवनसंग्रामांत विजयी झाला असला तरी आम्ही आमच्या परंपरागत संस्कारांना सोडूं शकणार नाहीं. साहित्याच्या द्वारांच आम्हांस आमच्या आत्म्याचें रक्षण करावयाचें आहे. कथा आणि कादंबऱ्या यांचें शरीर आम्हीं युरोपापासून घेतलें असलें तरी त्यांतील आत्मा मात्र भारतीय आहे."

प्रेमचंद यांच्या मनासमोरचा साहित्याचा आदर्श हा असा आहे. प्रगतिशील लेखक संघाच्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं असाच निष्कर्ष काढलेला आपण पाहिला आहे. दीन-दुःखितांचा व गोरगरिबांचा कैवार घेऊन त्यांच्या मनांतील वेदना जाणून घेणें व त्यांना सहानुभूति दाखविणें हेंच साहित्यिकाचें प्रमुख कर्तव्य आहे, असें प्रेमचंद मानीत असत. यासाठींच 'जीवनाची आलोचना' अशी त्यांनीं साहित्याची व्याख्या केलेली आहे. साहित्यकारानें आपल्याभोंवतींच्या देशकालपरिस्थितीची दखल घेतलीच पाहिजे, असें प्रेमचंद सांगत असत. 'जीवनांतील साहित्याचें स्थान' या आपल्या लेखांत ते म्हणतात, "साहित्यकार हा बहुधा आपल्या देशकालानें प्रभावित झालेला असतो. जेव्हां देशांत एखादी लाट उसळते तेव्हां अविचल राहणें हें साहित्यिकाला कधींहि शक्य होत नाहीं. त्याचा विशाल आत्मा आपल्या देशबांधवांचे कष्ट पाहून विव्हळ होऊन उठत असतो; कित्येक वेळां तो आक्रंदनहि करीत असतो; पण त्या आक्रंदनांत एक प्रकारची व्यापकता

असते. तो स्वदेशासंबंधीं असूनहि सार्वभौमिक असतो. ... अमर साहित्य विध्वंस करीत नाहीं, निर्माण करीत असतें. मानवचरित्रांतील काळिमा वर्णन करणें हेंच त्याचें काम नसतें तर त्यास त्याची उज्ज्वलताहि दाखवावी लागते." यावरून प्रेमचंद यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन दिसून येईल. साहित्य हें हेतुपूर्वकच असूं शकतें, अशी श्रद्धा बाळगणाऱ्या प्रेमचंदांनीं लिहिलें आहे, "वाचकांचें मन आनंदित करणें एवढेंच काम साहित्यकाराचें नाहीं. भाट, विदूषक, तोंडपुजे आणि स्तुतिपाठक यांचें तें काम आहे. साहित्यकाराचें पद याहून उंच आहे. आपला पथप्रदर्शक होण्याचें काम साहित्य करीत असतें. आपल्यांतील माणुसकी जागृत करीत असतें; आपल्यांतील सद्भावांचा संचार साहित्यामुळेंच जागृत होत असतो. आपली दृष्टि विशालहि साहित्यामुळेंच होत असते." तेव्हां साहित्यानें केवळ कला हेंच उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून चालणार नाहीं. निदान आपल्या देशांत तरी हें ध्येय साहित्यकाराचें ठरत नाहीं. एके ठिकाणीं ते लिहितात, "कलेसाठीं कला या तत्त्वाचा प्रसार जेव्हां देश संपन्न व सुखी असेल तेव्हां. पण जेव्हां आपण सामाजिक व राजकीय बंधनांत जखडून गेलेलों असतों, जेथें दुःख व दरिद्रता यांचें भीषण दृश्य दिसत आहे, विपत्तीमुळें ज्या ठिकाणीं आक्रंदन ऐकूं येत आहे, तेथें विचारशील प्राण्याचें हृदय हलल्याखेरीज कसें राहणार!" आणि यासाठींच आपलें साहित्य ध्येयवादी हवें असें प्रेमचंद यांचें म्हणणें होतें. आदर्शवादच आम्हांस आमच्या खऱ्या परिस्थितीची जाणीव करून देत असतो; आणि याच दृष्टीनें प्रेमचंद-साहित्य तपासून त्यांतील विचारदर्शनाचा लाभ घेतला पाहिजे.

'समरयात्रा' या पुस्तकांतील कथांचा जन्म साहित्यकारास वाटणाऱ्या देशाच्या तीव्र जाणिवेंतूनच झालेला दिसतो. देशांत सर्वत्र स्वाभिमानाची ज्योत उसळत आहे, सर्वत्र दिशा उजळून निघत आहेत, मृत झालेल्यांना संजीवनी प्राप्त होत आहे, स्वत्वाचा, स्वदेशाचा, स्वराज्याचा, देशभक्तीचा डांगोरा सर्वत्र झडत आहे, नवयुगाची तुतारी सर्वांना चेतना देत आहे, गांधींच्या राजकारणाचा प्रसार खेड्यापाड्यांतून होत आहे, देशाच्या कणाकणांतून देशप्रीति भिनून राहिली आहे— अशा वेळीं प्रेमचंद यांची लेखणीच अलिप्त राहणार कशी! तिलाहि आपली करामत दाखवावी लागलीच.

'सोजे वतन' या पुस्तकानें देशप्रीतीचा अनुभव त्यांना देऊन ठेवलाच होता; पण त्या वेळीं ते सरकारी नोकरींत तरी होते. पण त्यानंतर थोड्याच दिवसांत त्यांच्या पायांतील शृंखला तुटल्या गेल्या व प्रेमचंदांची लेखणी पुनः एकदां देशभक्तीनें पावन झाली. त्यांच्या राजकीय विचारांचें दर्शन प्रथम त्यांच्याच कथा-कादंबऱ्यांवरून आपण करून घेणार आहोंत.

महात्मा गांधींच्या विश्वव्यापी चळवळीमुळें प्रेमचंद प्रारंभीं प्रारंभीं तरी भारावलेले होते. १९३० सालच्या एका लेखांत स्वतःच्या मनातील अभिलाषे-संबंधीं प्रेमचंद लिहितात, "माझ्या अभिलाषा फारच थोड्या आहेत. या वेळीं सर्वांत मोठी अभिलाषा अशी कीं, आपण स्वातंत्र्य-संग्रामांत विजयी व्हावें. मला धन-दौलतीची इच्छा नाहीं. खाण्यास कसेंहि मिळत राहील. मोटार व बंगला असावा अशीहि हौस नाहीं...हां, एवढें मात्र वाटतें कीं, दोनचार श्रेष्ठ प्रतीच्या कलाकृति मागें ठेवून आपण जावें; पण त्यांचा उद्देश सुद्धां स्वातंत्र्यप्राप्तीचा राहील......जडजीवन मला मुळींच पसंत नाहीं. साहित्य व देशसेवा यांजकडेच माझें सदोदित चित्त असतें. सोनें व रुपें यांच्या दागिन्यांनीं मढवलेला मनुष्य कोणत्याहि दृष्टीनें मोठा होऊं शकत नाहीं. जो धनाचा पुजारी आहे अशा माणसाचा प्रभाव माझ्यावर कधींच पडत नाहीं. मला याच गोष्टीचा अभिमान वाटतो कीं, निसर्ग व भाग्य यांनीं मला साह्य दिलें व मला गरिबांचें दुःख भोगावें लागलें. यामुळेंच मला आध्यात्मिक संतोष प्राप्त झालेला आहे..."

गांधी व कॉंग्रेसचें राजकारण प्रेमचंदांना पसंत होतेंच असें मात्र नाहीं. पण ज्या ठिकाणीं जागृति आहे, चमक आहे. तेज आहे, त्या ठिकाणीं मात्र ते लुब्ध होऊन जात असत. त्यामुळें कोणत्याहि एकाच राजकीय पक्षास ते चिकटून राहिले नव्हते. तो त्यांच्या मनाचा धर्मच नव्हता. सन १९२३ मध्यें त्यांनीं 'ज़माना' च्या संपादकांना लिहिलें होतें, "मी कोणत्याहि एका राजकीय पक्षांत नाहीं. जी सर्वसामान्य गरीब जनतेची पार्टी निर्माण होईल, तिचा मी सभासद होईन." आणि याच दृष्टीनें त्यांची साहित्यनिर्मिति होत होती. कोणत्याहि एका पक्षाचा प्रचार त्यांत नसला तरी देशभक्तीचा उठाव मात्र डोळ्यांत भरण्याजोगा असे. 'समरयात्रा' या कथेंत नायक भाषण करतांना म्हणतो, "लोक तुम्हांस लुटून नेतात त्याची खबर तुम्हांस कशी

नाहीं ? आपल्या हातांतील सर्व रोजगार हिसकावून घेतले जात आहेत, आपला सर्वनाश होत राहिला आहे, आपण डोळे उघडून कां बघत नाहीं ? पूर्वीं लाखों बांधव स्वतःच्या हातानें सूत काढीत व कापडा बनवीत; पण आतां सर्व कापड विदेशांतून येतें. पहिल्यानें लक्षावधि लोक येथें मिठाचा धंदा करीत असत, आतां मीठहि बाहेरून येतें. येथें मीठ तयार करणें हा गुन्हा मानला जातो. आपल्या देशांतच मीठ एवढें आहे कीं, सर्व जगाला दोनशें वर्षें पुरेल; पण आपण सात कोटि रुपये केवळ मिठासाठीं खर्च करीत असतों. अपल्या येथें मिठाचे ढीग आहेत पण त्यास आपण शिवूं शकत नाहीं...आपण काय हा अन्याय सहन करणार ?... तुम्हांस तुमच्या शक्तीचें ज्ञान नाहीं. एवढी गोष्ट ध्यानांत असूं द्या कीं, या जगांत जो आपलें स्वतःचें रक्षण करूं शकत नाहीं तो नेहमीं दुष्ट व स्वार्थी लोकांची शिकार बनत असतो...तुम्ही काय करणार आहांत ? मर्दांप्रमाणें आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करणार आहांत कीं भित्र्याप्रमाणें घरीं बसून नशिबाच्या नांवानें रडणार आहांत ? पण असें कधीं होऊं नये...आपण न्याय व सत्य यांच्या पायावर उभे आहोंत; हींच आपलीं हत्यारें आहेत. आपणांस अशा वीरांची जरुरी आहे कीं, चित्तांतील हिंसा व क्रोध टाकून देऊन धर्मासाठीं ईश्वरावर विश्वास ठेवून कांहींहि करावयास तयार होतील...'' या सर्व वक्तव्याचा अर्थ कथेंतील पात्राच्या तोंडूनच व्यक्त झालेला आहे. वाचकांनीं नेमका बोध त्या वेळीं घेतला असेलच. एवढ्या कडक शब्दांत स्पष्टपणें राजकीय उत्थानाचा पुरस्कार करणारा कथाकार प्रेमचंदांखेरीज दुसरा कोणीहि नव्हता. याच कथासंग्रहांत 'आहुति' नांवाची एक सुंदर कथा आहे. येणाऱ्या स्वराज्याचें स्वरूप कसें असावें, त्यांत वरिष्ठ किंवा धनवान् लोकांची सत्ता किती असावी याचें विवरण करतांना एक नायिका रूपमणि म्हणते, "आणि स्वराज्य प्राप्त झाल्यानंतरहि हें संपत्तीचें प्रभुत्व कायम राहिलें तर आणि शिकलांसवरलेला समाज असाच स्वार्थान्ध बनला तर तर मी सांगतें कीं, असें स्वराज्य न आलें तरी चांगलें. इंग्रजी धनवंतांची धनलोलुपता व शिक्षितांची स्वहित साधण्याची प्रबळ इच्छा आज आपणांस पीडा देणारी आहे. या दुःस्थितीबद्दल प्राण हातावर घेऊन आपणांस तोंड द्यावयास नको का ? हे सर्व लोक स्वदेशींचे असले म्हणून त्यांची गय थोडीच करावी ?

माझ्या मनांत तरी स्वराज्याचा हा अर्थ नाहीं, कीं जॉनच्या जागीं सेठ गोविंद बसावा. मी समाजाची अशी व्यवस्था होण्याची इच्छा धरतें कीं, तेथें कमींत कमी विषमता रहावी.''

आज स्वराज्य आलेलें आपण पाहिलें. पण इंग्रज गेला आणि आपण आपले शत्रु झालों असें होऊं नये, म्हणून जपण्यासाठीं केवढा मोठा इशारा प्रेमचंद यांनीं या ठिकाणीं दिलेला आहे. प्रत्येकाच्या मनाची स्वाधीनता रक्षण करणें, सर्वांना समान संधि देणें; सर्वांचा आत्मविकास घडवून आणणें, पीडितांचें दुःख दूर करणें, याचेंच नांव स्वराज्य व स्वातंत्र्य. नुसता मनुष्य पदवीधर झाला म्हणजे त्यास माणुसकी येते असेंहि नव्हे. मानवजातीचें विशाल सहानुभूतीनें दुःखनिवारण करील तोच खरा शिक्षित. नाहीं, तर काय त्या शिक्षणाचा उपयोग? जी विद्या आपलें पारतंत्र्य हरण करीत नाहीं ती विद्या कसली? याच कथेंत रूपमणि पुढें म्हणतें, काय "डिग्री घेण्यांतच माणसाचें जीवन सफल झालेलें असावें? सारा अनुभव, सारें ज्ञान काय पुस्तकांतच सांठविलेलें आहे? पोट भरण्याचें साधन म्हणून का शिक्षण? राष्ट्रसंग्रामांत मनोबल वाढावें व चारित्र्याची घडण व्हावी हाच शिक्षणाचा हेतु रहावा..." याच प्रकारच्या राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार प्रेमचंद आपल्या साहित्याच्या द्वारां करीत होते.

इंग्रज सरकार जुलमी बनलें होतें. सर्वत्र धाक दाखवून छळ सुरू होता. पुढाऱ्यांची धरपकड होत होती. आर्थिक परिस्थिति भीषण होऊन बेकारी माजत होती. मजुरांची व शेतकऱ्यांची उपासमार सुरू होती. अशा वेळीं प्रेमचंदांची लेखणी त्यांचीं दुःखें वर्णन करण्यासाठीं सरसावली आहे. 'जेल' नांवाच्या कथेंतील एक नायिका सजल नेत्रांनीं बोलत असते, "खेडेगांवांतून आजकाल बंदुकीच्या धाकानें धान्य वसूल केलें जातें; कर वा शेतसारा वसूल केला जातो. गरीब शेतकऱ्यांपाशीं रुपये कोठून असणार? धान्याचा भाव दिवसेंदिवस घटत चालला होता. पावणेदोन रुपयांत मणभर गहूं येतात... अम्माजी म्हणत होती कीं, धान्य इतकें स्वस्त कधींच झालें नव्हतें. ... गरीब किसान सारा कोठून देणार? आणि सरकारचा हुकूम असा कीं, शेतसारा बळजबरीनें वसूल करावा. ... सरकार आपल्याच फायद्यांत गुंग... इकडे प्रजा जगो वा मरो, जमीनदाराच्या मदतीला वसुलीसाठीं पोलीसहि सज्ज

....

झाले आहेत. ... या शेतकऱ्यांची दुःखद कथा कोण ऐकणार ? ” किसानांचें हें दुःख पाहून प्रेमचंद अनेक वेळां व्याकुळ होऊन गेलेले असत. इंग्रज सरकार व त्याच्या मदतीस आपल्याकडचे धनवान् जमीनदार असल्यामुळें शेतकऱ्यांचे विलक्षण हाल होत असत. किसानांची हीच परिस्थिति ‘ कर्मभूमि ’ कादंबरींतहि वर्णन केलेली आहे : “ जेव्हां भाव चांगले होते तेव्हां धान्य विकून शेतकरी सारा भरीत असे. पण आतां भावच उतरल्यावर किसान बिचारा करणार काय ? शेतसारा कोठून देणार आणि कर्ज तरी कसें फेडणार ? मोठा बिकट प्रसंग निर्माण झाला आहे खरा. ... एक एक दाणा विकून, जमिनींतील एक एक तृण विकून, शेतकऱ्यांनीं पैसा उभा केला पण साऱ्याच्या चौथ्या हिश्शानेंहि त्यामुळें भरती झाली नाहीं. ” देशांत निर्माण झालेल्या आर्थिक संकटाचें किती मार्मिक चित्र प्रेमचंदांनीं रेखाटलें आहे ! ‘ समरयात्रा ’ या पुस्तकांतील सर्वच कथा देशभक्तीच्या भावनेनें भरलेल्या आहेत, त्यामुळेंच प्रेमचंदांचें हेंहि पुस्तक जप्त झालें होतें, पण त्यामुळें प्रेमचंद यांच्या लेखणीची धार थोडीच बोथट होणार ?

या किसानांच्या पाठीमागें लागणाऱ्या सर्व प्रकारच्या शत्रूंचा समाचार प्रेमचंद यांनीं घेतला आहे. भूमिपति, उद्योगपति आणि सरकार यांची एक-सारखी करडी नजर बिचाऱ्या किसानावर खिळून राहिलेली असते. ‘ रंगभूमि ’ कादंबरींतील उद्योगपतीच्या लीला या दृष्टीनें पाहण्यासारख्या आहेत. फार मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या औद्योगिकीकरणामुळें सर्व ग्रामीण व्यवस्था बिघडून जाते. खेडेगांवांतील शांत व रमणीय निसर्गदृश्यांवर भाळून गेलेली जनता निर्जीव अशा यंत्रांच्या नादानें व शरीरकष्टानें जणुं यंत्रच बनून जाते. या कारखानदारांना व भांडवलदारांना इंग्रज सरकारचें पाठबळ असल्यामुळें ते करतील ती पूर्व ठरत असे. धरणीमातेची सेवा कोण करीत बसतो ? गिरणींत जावें, रात्र-रात्र राबावें आणि दहा रुपयांचा माल स्वतःच्या श्रमानें निर्माण करून दहा आणेच पदरीं घ्यावेत, या ताबेदारीचेंच त्याला सुख वाटूं लागतें. स्वच्छ हवेंत राहून सकस अन्न खाणारा शेतकरी मजूर झाला कीं त्याचें जीवन किती भकास व भयाण होऊन जातें ! प्रेमचंद लिहितात, “ ते मग घाणेरड्या, तुटलेल्या-मोडलेल्या व दुर्गंधानें युक्त अशा झोपडींत राहतात. त्यांना पाहतांच शिसारी येते. ते असे कपडे वापरीत असतात

कीं, त्यायोगें आपण आपले बूटहि पुसणार नाहीं. ते असें अन्न खातात कीं, आपण आपल्या कुत्र्यासहि तसलें अन्न घालीत नसतों. एवढें असूनहि हे भांडवलदार व उद्योगपति होणारा नफा भागीदारांना वाटतात व कष्ट करणाऱ्या मजुरांना मात्र उपाशी ठेवतात. " ही शेतकऱ्यांची-मजुरांची अवस्था. आपल्या इकडील शेतकरीहि पुष्कळ वेळां मुंबईस जातात व गिरण्यांतून राबत असतात. त्यांच्यांत पडलेला फरक नीट पाहिला तर प्रेमचंद यांच्या लिहिण्यांतील सत्यता पटण्यासारखी आहे. जमीनदारी पद्धत व भांडवलशाही यांच्या मिश्रणांतूनच दारिद्र्याचा जन्म होतो. प्रेमचंद यांची ' गोदान ' ही कादंबरी तर भारतीय शेतकऱ्याची दुःखद परिस्थिति, हे सावकार व भांडवलदार कशी करून टाकतात हें दर्शविणारी आहे. या कादंबरीचें परीक्षण करतांना श्री. मदन गोपाल यांनीं खेडेगांवीं एक प्रचलित असणारें छोटेंसें प्रहसन दिलें आहे. त्यांत सावकार व किसान यांची झटपट चांगलीच रंगलेली दिसते. कोणी एक शेतकरी येऊन ठाकुराचे पाय धरीत आहे. दादा-बाबा केल्यानंतर सावकार दहा रुपये कर्ज देण्यास तयार होतो. कागदपत्र तयार होऊन त्या शेतकऱ्याचा आंगठा घेतला जातो. आणि ठाकूर त्याच्या हातावर केवळ पांचच रुपये ठेवतात. शेतकऱ्यास मोठेंच आश्चर्य वाटून तो विचारतो,

" मालक, हे तर पांच रुपये आपण दिले. "

" असें कसें होईल ? पांच नाहींत, दहा आहेत. "

" नाहीं सरकार, पांचच आहेत. "

" नीट मोज पाहूं. दहा आहेत. "

" पुनः मोजा मालक, दहा रुपये नाहींत, पांचच आहेत. "

" एक रुपया नजराण्याचा झाला कीं नाहीं ? "

" होय सरकार. "

" एक रुपया लिहिणावळ नको द्यायला ? "

" हां सरकार. "

" एक कागदाचा झाला. "

" हां सरकार. "

" एक सही केल्याचा. "

" बरोबर सरकार. "

" एक व्याजाचा. "

" होय मालिक. "

" आणि पांच रोख दिले तुला. झाले कीं नाहीं दहा ? "

" होय सरकार, आतां हे पांच रुपये सुद्धां ठेवून घ्या मालक ! "

" काय ? वेडा आहेस काय ? "

" नाहीं सरकार ! एक रुपया छोटी ठाकुरीण हिच्यासाठीं नजराणा. एक रुपया मोठ्या ठाकुरीणसाठीं समजा. एक रुपया छोट्या ठाकुराणीस पान खाण्यासाठीं, एक रुपया मोठ्या ठाकुराणीस पान खाण्यासाठीं आणि उरला एक तो मालक, आपल्या क्रियाकर्मान्तरासाठीं– "

सावकाराची निर्दयता आणि शेतकऱ्याची अनुकंपनीय स्थिति या छोट्या प्रहसनांत चांगलीच व्यक्त झालेली आहे. या किसानाच्या घराचें वर्णन तरी काय विचारावें ? अर्धें-अधिक पडलेलें, दारांत एकच बैल बांधलेला आणि पोरेंबाळें उघड्या अंगानें हिंडत आहेत. ही स्थिति पर्वताएवढें धन व धान्य निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यांची !

प्रेमचंद यांचें लक्ष अस्पृश्यांपर्यंत पोंचलेलें होतें. 'ठाकुर का कुआँ' ही प्रेमचंद यांची एक छोटीशी पण अत्यंत रसपूर्ण व श्रेष्ठ दर्जाची कथा आहे. ठाकुरांच्या विहिरीवर आजारी बापाला पाणी आणून देण्यासाठीं एक अस्पृश्य मुलगी – गंगा – आलेली होती. तिच्या बापाला हें पसंत नव्हतेंच. " हातपाय मात्र तोडून घेशील. गप्प बैस मुकाट्यानें. ब्राह्मणाच्या बायका रागें भरतील. ठाकूर काठी मारतील " असा इशारा त्यानें पोरीला दिलाच होता. पण बापास न जुमानतांच गंगा रात्रीं पाणी आणावयास गेली खरी; पण तिच्या मनांत सहस्र प्रश्न निर्माण झाले. हे सर्व लोक उच्च वर्णाचे... आणि आम्ही मात्र नीच–हें कोणीं केलें ? या अजाण पोरीच्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर असें अजून कोणींहि दिलेलें नाहीं.

अशा प्रकारें समाज व राजकारण यांचें निरीक्षण प्रेमचंद यांनीं केलें आहे. जीवनांतील विषमता दूर व्हावी व अर्थव्यवस्था समान प्रमाणांत रहावी हें साधें सामाजिक तत्त्वज्ञान प्रेमचंद यांचें होतें. स्वाधीनता किंवा स्वतंत्रता हें त्यांचें राजकीय ध्येय आपण अनेक वेळां निरखून पाहिलें आहे. चालू असणाऱ्या समाजरचनेंत अर्थातच त्यांना पुष्कळ दोष दिसून येत असत. अन्याय,

गुलामगिरी, असत्य, अस्पृश्यता, अज्ञान, इत्यादींचा लोप होऊन सर्वसुखी असणारा समाज निर्माण व्हावा, हें प्रेमचंदांचें प्रमुख असें सामाजिक ध्येय होतें. प्रेमचंद स्वतः कोणत्याहि एखाद्या धर्माला वा संप्रदायाला चिकटलेले नव्हते. देवधर्म प्रेमचंद मानीत नसत याचा अर्थ जुन्या रूढि किंवा अनिष्ट परंपरा व भांडणें निर्माण करणारा परमेश्वर त्यांना नको होता. जनता-जनार्दनाची सेवा-उपासना त्यांनीं कशी केली तें आपण पाहिलेंच. या जनतेस दुःख देणारा देव मानण्यास प्रेमचंद तयार नव्हते व या देवावर आधारलेला, विषमता निर्माण करणारा कोणताहि धर्म त्यांना नको होता. 'गोदान'मधील मेहता ही व्यक्ति मोठी चिंतनशील दर्शविली आहे. त्यांच्या मानसिक विकासा-संबंधीं लिहितांना प्रेमचंद लिहितात, "कोणत्याहि सर्वज्ञ ईश्वरावर त्यांचा विश्वास नव्हता. जरी ते आपली नास्तिकता वारंवार प्रकट करीत नव्हते तरी त्यांच्या मनांत दृढ धारणा अशीच बनली होती कीं, प्राण्यांचें जन्म-मरण, पाप-पुण्य, सुख-दुःख यांमध्यें ईश्वराचा कांहीं संबंध नसावा. त्यांचा असा विश्वास होता कीं, माणसाचा अहंकार एवढा वाढला कीं त्यानें आपल्या प्रत्येक कार्याची प्रेरणा ईश्वराशीं नेऊन भिडवली." स्वतःच्या वैयक्तिक जीवनांत परमेश्वरास स्थान देण्याची जरूरी प्रेमचंद यांना वाटत नसली तरी जनतेनें मानलेल्या परमेश्वराची निंदा किंवा तिचा बुद्धिभेद प्रेमचंद यांनीं कधीं केला नाहीं. दीन-दरिद्री माणसांना आपलें दुःख विसरून जाण्यासाठीं एक साधन म्हणून धर्माची व देवाची आवश्यकता असते. अर्थात् हा धर्महि प्रेमचंद यांना मान्य नव्हता. जगांत दीन-दरिद्री कोणीच असूं नये; परमेश्वर दयाळू तर मग सर्वच सुखी-समाधानी कां असूं नयेत? असे विचार प्रेमचंदांनीं अनेक ठिकाणीं व्यक्त केले आहेत. देवधर्म यांच्या नांवाखालीं चाललेलें ढोंग व जनतेची चालू असणारी लूट प्रेमचंद कशी सहज करणार? हिन्दु-मुसलमान यांच्या सदैव होणाऱ्या झगड्यांकडे ते याच दृष्टीनें पाहत. त्यांच्या कथेंतील कित्येक पात्रें मुसलमान आहेत. हिंदुस्तानी भाषेवरहि त्यांचें प्रेम असे. उर्दू साहित्याचा अभ्यास त्यांनीं विशेष केला होता. नवाबराय व प्रेमचंद हीं नांवेंहि त्यांना एका विशिष्ट हेतूनें आवडत असत. त्यामुळें मुसलमानी धर्माबद्दल त्यांना तिरस्कार नव्हता, तसा हिंदु धर्माबद्दलहि नव्हता. पण दोनहि धर्मीयांचा या देशांत नांदण्याचा सारखाच अधिकार

आहे; दोघांनीं सलोख्यानें दिवस काढले तरच कांहीं निभाव लागेल, असें विचार मात्र त्यांनीं वेळोवेळीं व्यक्त केलेले आहेत.

अनेक बिंदूंनीं बनलेल्या समुद्रांत जाऊन विलीन होण्याचा मार्ग दाखविणारा प्रकाशकिरण म्हणजे धर्म. धर्मामुळें आपल्या दृष्टीची विशालता वाढते, आपली अनुभूति विस्तृत होते. माणसाच्या चित्तांत दया निर्माण होणें हें एक धर्माचेंच लक्षण आहे, हे प्रेमचंदांचे विचार कोणासहि पटण्यासारखे आहेत. त्याचप्रमाणें खोट्या धर्मावर प्रेमचंदांनीं अनेक ठिकाणीं प्रखर टीका केलेली आपण पाहिली आहे. 'जे मोठे आहेत, प्रतिष्ठित आहेत, त्यांच्यासाठीं ईश्वर दयाळू बनतो, कारण ते दुनियेला लुटणारे आहेत! पण आपल्यासारख्यांना ईश्वराची दया कोठेंच दिसत नाहीं...पूर्वजन्माची कथा मनोरंजनासाठींच निर्माण झाली असावी. ज्या शिक्षेचें कारण आपल्यास समजून येत नाहीं तिचें महत्त्व तरी मानावें कशाला?... आजकाल धर्म हा धूर्तांचा व संधिसाधु लोकांचा अड्डा बनलेला आहे. या निर्मळ अशा सागरांत अनेक बलशाली व उपद्रव देणारे मासे निर्माण झाले आहेत.' इत्यादि विचारहि पटण्यासारखे आहेत. म्हणजे मुळांत देवधर्मांची कल्पना उदात्त असेल ती मान्य करण्यास प्रेमचंदांची हरकत नाहीं. पण ज्या वेळीं वैयक्तिक स्वार्थ, दंभ, कटुता, शत्रुत्व, लुटारूपणा, फसवेगिरी इत्यादि अनिष्ट प्रकार देवधर्माच्या नांवाखालीं सुरू झाले तेव्हां प्रेमचंदांनीं त्यावर कडाडून टीका केली.

असें असलें तरी भारताच्या प्राचीन संस्कृतीबद्दल प्रेमचंद यांच्या मनांत नितान्त आदर वसत असे. धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृति इत्यादि गोष्टींचें रक्षण होणें आवश्यक आहे, असें त्यांना वाटे. भारताची आध्यात्मिकता त्यांना अभिमानाची वाटे. या दृष्टीनें त्यांच्या एका सुंदर कथेचें उदाहरण या ठिकाणीं द्यावयास हरकत नाहीं. 'यही मेरी मातृभूमि है' ही एक प्रेमचंद यांची भावपूर्ण कथा असून तींत मातृभूमीबद्दलचा स्वाभिमान फारच चांगल्या प्रकारें व्यक्त झालेला आहे आणि हिंदुस्थानचें खरें वैभव कोणतें हेंहि चांगल्या प्रकारें दर्शित केलें गेलें आहे. आधुनिक काळांतील सुखसोयींनीं व सुधारणांनीं गजबजलेल्या आपल्या समाजानें आपणांसमोर कोणता आदर्श ठेवावा, याचीहि सूचना या कथेंत मिळण्यासारखी आहे. कथेंतील मुख्य कल्पना अशी कीं, कोणी एक वृद्ध गृहस्थ साठ वर्षांनंतर अमेरिकेंतून आपली मायभूमि पाहण्या-

साठीं परत भारतांत येत आहे. अमेरिकेंत त्यानें खूप मोठा व्यापार केला, दौलत मिळवली, मानसन्मानहि त्याला भरपूर प्रमाणांत प्राप्त झाला; पण या परक्या देशांत किंमतवान राजवाड्यांत राहण्यापेक्षां आपल्या मातृभूमीच्या झोंपडींत रहावें असा विचार करून तो हिंदुस्थानांत येतो. प्रथम तो मुंबईस उतरला तेव्हां त्याची थोडी निराशाच झाली. काळे, काळे कोट-पाटलोण घातलेले व अर्धवट इंग्रजी बोलणारे कांहीं लोक त्याला प्रथम भेटले. इंग्रजी दुकानें, ट्राम-गाड्या, मोटारगाड्या यांची गर्दीच उसळलेली होती. रेल्वेंतून तो जेव्हां आपल्या गांवीं येण्यास निघाला तेव्हां त्याच्या डोळ्यांतून अश्रु ओघळत होते. आपल्या मातृभूमीचें दर्शन घ्यावें, ही लालसा त्याच्या मनांत तीव्रतेनें निर्माण झाली होती; पण मुंबईला ती कांहीं पूर्ण झाली नाहीं. ज्या देशाच्या दर्शनाची इच्छा त्याच्या मनांत होती तो देश जणुं हा नव्हताच. येथें तर इंग्लंड किंवा अमेरिकाच उतरलेली दिसत होती.

तो आपल्या गांवांत जाऊन पोंचला तों त्यास कोण ओळखणार ! त्याच्या बालपणाचे सर्व साथीदार मरण पावले होते. त्याची मोडकीतोडकी झोपडी जमीनदोस्त होऊन गेली होती. लहानपणीं ज्या ठिकाणीं त्यानें मनसोक्तपणें आनंद लुटला होता, त्याची एकहि साक्ष त्याच्या दृष्टीस पडेना. गांवांत कोर्ट-कचेऱ्या, पोलीसठाणें इत्यादि गोष्टी नव्यानेंच आल्या होत्या. लोकांच्या मुखांवर दैन्य, चिंता व दुर्बलता स्पष्टपणें दिसत होती. सांसारिक चिंतेनें सर्व जण व्यग्र झालेले होते. दुर्बल, कांतिहीन, रोगिष्ट, फाटके कपडे घातलेले लोक पाहून त्याला वाटलें, हा का आपला भारतवर्ष ! याच्यासाठीं का आपण अमेरिकेंतून परत आलों ! अशा प्रकारें तो सर्वत्र हिंडत राहिला. त्याला आपली खरी मातृभूमि मात्र कोठेंहि सांपडली नाहीं. शेवटीं एका अंधाऱ्या रात्रीं तो उदास होऊन हिंडत असतांना त्याचें चित्त मातृभूमीच्या चिंतनानें भरून आलें. आपल्या मायभूमीची अति उत्कृष्ट अशी सजीव मूर्ति त्यानें डोळ्यासमोर उभी केली. पहांटे तीनच्या सुमारास 'हमारे प्रभु अवगुन चित न धरो' या गाण्याच्या ओळी त्याच्या कानांवर आल्या मात्र—तो चटकन् सावध झाला. त्याचें हृदय सद्गदित झालें. आवाजाच्या अनुरोधानें त्यानें पाहिलें—हाच त्याच्या मातृभूमीचा जीवनदायी स्वर ! त्यानें पाहिलें तों पंधरावीस वृद्ध स्त्रिया पांढरें वस्त्र धारण करून, हातांत लोटे घेऊन गंगास्नानास निघाल्या आहेत

आणि रस्त्यानें वरील गाणें म्हणत आहेत. शिवशिव, हरहर, गंगे गंगे, नारायण-नारायण असे शब्द मधून मधून उच्चारले जात आहेत; आणि मधुर भावमय आणि एक प्रकारचा प्रभाव निर्माण करणारें गाणें गात आहेत. हें दृश्य पाहतांच आपला भारत जवळ असल्याचें त्याच्या लक्षांत येऊं लागलें.

तो गृहस्थ आनंदानें बेहोष होऊन गेला. त्या लोकांच्या समुदायांत तो आपोआप मिसळून गेला. पांच-सहा मैलांचें डोंगरमाथ्यावरील अंतरहि त्यानें त्या भरांत तोडलें आणि तो पवित्र गंगा नदीच्या किनाऱ्यावर पोंचला. प्रत्येक हिंदूला या ठिकाणीं येण्यांत अभिमान वाटे. गंगामातेच्या दर्शनानें तो पावन होऊन गेला. शेंकडों माणसें भक्तिभावानें स्नान करीत असल्याचा देखावा त्याच्या दृष्टीस पडल्याबरोबर तो हर्षित होऊन गेला. कोणी मंत्र म्हणत आहे, कोणी ध्यान करीत आहे, कोणी हवन करीत आहे, कोणी गंध वा भस्म कपाळीं लावून संध्येस बसलें आहे. त्याच्या मनावर या दृश्याचा फारच परिणाम झाला व तो एकदम बोलला, " हां! हाच माझा प्रिय असा भारत-वर्ष आहे. हीच माझी पवित्र अशी भरतभूमि आहे. याच सर्वश्रेष्ठ भारताच्या दर्शनाची एकमात्र इच्छा मला होती. येथल्याच पवित्र धुळीचा एक कण बनून राहण्याची लालसा होती. " त्यानें मनसोक्तपणें गंगा नदींत स्नान केलें. शूचिर्भूत होऊन त्यानें सर्व देवतेवतांचें दर्शन घेतलें व तेथेंच राहण्याचा निश्चय केला. अमेरिकेंत मोठमोठ्या इमारतींत आधुनिक साधनांनीं युक्त अशा सुधारणा होत्या, पण त्या या गृहस्थास मानवल्या नाहींत. गंगातीरावर एक छोटीशी झोपडी बांधून आपलें आयुष्य व्यतीत करण्याचा निश्चय त्यानें केला.

●●●

## प्रेमचंद : भाषासौंदर्य : १४

प्रेमचंदांच्या चरित्रकथनाचा भाग संपवून त्यांच्या वैचारिक वैभवाचीहि आपण थोडक्यांत ओळख करून घेतली आहे. यानंतर आतां प्रेमचंदांच्या भाषासौंदर्यासंबंधीं थोडा विचार करावयाचा आहे. प्रेमचंद यांच्या साहित्याचें

प्रत्यक्ष वाचन आणि मनन झाल्याखेरीज त्यांच्या भाषेसंबंधीं कांहीं निश्चितपणें सांगतां यावयाचें नाहीं. मनुष्य जसा असतो तशी त्याची भाषाशैली असते, या टीकाकारांच्या मतानुसार प्रेमचंद कसे होते, याचें विवेचन केल्यानंतर प्रेमचंदांच्या भाषाशैलीविषयीं कांहीं अंदाज या ठिकाणीं करावयास हरकत नाहीं. स्वतःची आवडनिवड, स्वतःचे राजकारणविषयक सिद्धान्त, समाज, धर्म-नीति यांसंबंधींचे स्वतःचे विचार, जीवनाकडे पाहण्याची स्वतःची दृष्टि इत्यादींच्या चिंतनाचा परिणाम लेखकाच्या लिहिण्याच्या पद्धतींत वा भाषासरणींत प्रकट झालेला असतो. प्रेमचंद यांच्या भाषेच्या सौंदर्याचें वर्णन करतांना त्यांची विशिष्ट वर्णनपद्धति, चरित्राचित्रणाचे कांहीं नमुने, सुखःदुखादि मानासिक अवस्थांचें सूक्ष्म रेखाटन, निसर्गाचें मनोवेधक वर्णन इत्यादींचाहि विचार कांहीं उदाहरणें देऊन आपण करणार आहोंत. अर्थात् या सर्व प्रकारांत त्यांच्या भाषाशैलीस प्राधान्येंकरून महत्त्व राहीलच.

प्रेमचंदांची स्वतःची म्हणून एक विशिष्ट प्रकारची भाषासरणी आहे. आपण पाहिलेंच आहे कीं, प्रेमचंद उर्दू भाषेशीं निकटत्वानें परिचित होते. उर्दू साहित्याचा व भाषेचा त्यांचा अभ्यास असून त्या भाषेंतून त्यांनीं प्रारंभींच्या काळांत कांहीं लेखनहि केलें. यामुळें त्या भाषेंत उर्दू शब्दांचा किंवा वाक्प्रचारांचा भरणा विशेष दिसेल तर त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. भाषा सरळ, अलंकाररहित पण थोडक्या शब्दांत मोठा आशय व्यक्त करणारी आहे. पात्रांना अनुसरून त्यांची भाषा बदलत असते. मुसलमान व्यक्ति बोलूं लागल्या कीं उर्दू किंवा फारसीमिश्रित हिन्दी या भाषांचा वापर अधिक प्रमाणांत झालेला दिसून येतो. खेडुतांच्या भाषेशीं तर प्रेमचंद यांचा लहानपणापासूनचा संबंध होता. ग्रामीण जीवनाचा सारा उठाव त्यांच्या कथाकादंबऱ्यांतून जो दिसून येतो, तो पात्रांच्या खास ग्रामीण भाषेमुळेंच. सारी सजीवता भाषेमुळेंच पात्रांच्यामध्यें निर्माण होत असते. या दृष्टीनें प्रेमचंद यांच्या भाषेचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यांच्या भाषेंत जोर आहे, प्रवाह आहे, प्रसाद आहे. अर्थवाही भाषा प्रेमचंदांखेरीज दुसऱ्या कथालेखकास क्वचितच जमणारी होती. हिन्दु आणि मुसलमान यांना सहज पचनीं पडणारें प्रेमचंद यांचें साहित्य आहे, याचें कारण त्यांच्या भाषेचें अधिष्ठान विस्तृत होतें हेंच होय.

सर्व कथांतून किंवा कादंबऱ्यांतून एकच प्रकारची भाषा प्रेमचंदांनीं वापरली आहे असें नव्हे. त्यांच्या भाषासरणींत उत्तरोत्तर विकास झालेला दिसून येतो. साधेपणा व गतिपूर्णता हे गुण उत्तरोत्तर त्यांच्या लेखनांत वाढीस लागलेले दिसतात. प्रारंभिक काळांत त्यांच्या लेखनांत साहजिकपणेंच थोडी कृत्रिमता आणि शब्दांची कसरत दाखविण्याची पोरकट हौस असली तरी प्रेमचंद या अवस्थेंतून चटकन् बाहेर आले. ज्ञान व अनुभव यांचें क्षेत्र वाढीस लागलें कीं साधेपणा येऊं लागतो. आत्मविश्वासाची प्रचीति येत राहिली कीं सुबोधता आपोआप निर्माण होऊं लागते. उर्दू, इंग्रजी किंवा बंगाली वाङ्मय वाचून प्रेमचंदांची शैली आकारास येत होती या म्हणण्यासहि फारसा अर्थ नाहीं असें नव्हे. पंडित बनारसीदास चतुर्वेदी यांच्या शैलीविषयक प्रश्नाला उत्तर देतांना प्रेमचंदांनीं म्हटलें, "माझ्या लेखनशैलीवर दुसऱ्या कोणाचाहि प्रभाव पडलेला नाहीं. जर थोडा असेलच तर तो पंडित बिशननारायण दर आणि डॉक्टर रवींद्रनाथ यांच्या शैलीचा असावा."

प्रेमचंद हे कथादंबऱ्यांच्या क्षेत्रांत तरी युगप्रवर्तक ठरलेले आहेत. चरित्र-चित्रण, कथानक, परिस्थितीशीं सामरस्य, भाषाशैली आणि मानव्याबद्दल विशाल सहानुभूति या प्रेमचंद यांच्या यशाच्या विशेषांचें अनुकरण त्यांच्या हयातींत व नंतरहि अनेकांनीं करण्याचा प्रयत्न केला. प्रेमचंद अनेकांना गुरुस्थानीं झालेले दिसून येतात. प्रभावी शैलीकार कथालेखक म्हणून प्रेमचंदांचा गौरव यथार्थ आहे.

अमूर्त वस्तु आपल्या लेखनाच्या विशिष्ट शैलीनें मूर्त करण्यांत प्रेमचंद यांचा हात धरणारा दुसरा लेखक हिन्दींत तरी नाहीं. वर्णनांतील सूक्ष्मता, वैचित्र्य, मार्मिक निरीक्षण आणि सजीवता यांचे कितीतरी नमुने आपणांस त्यांच्या साहित्यांत पाहावयास मिळतील. कांहींचीं उदाहरणें आपण पाहिलींच आहेत. 'गोदान' मधील वर्णनाचा नमुना पाहा : "ज्येष्ठाचा सूर्य आंब्यांच्या राईतून वरतीं येऊन आकाशांत पसरून राहिलेल्या लालीस आपल्या रुपेरी तेजाचें दान करीत आकाशांत आक्रमण करीत होता; हवेंत उष्णता वाढत चालली होती. शेतांच्या दोनहि बाजूंना काम करणारे शेतकरी त्यांचें दर्शन घेत व राम राम म्हणत एकमेकांना सन्मानानें चिलीम देण्याच्या तयारींत होते; पण होरीरामास एवढा वेळ कोठून मिळणार! त्याच्या मनांत सन्मानाची दडून राहिलेली

भावना त्याच्या सुकलेल्या मुखावर गर्वरूपानें प्रकट झालेली होती. " खेडे-गांवांतील निसर्गरम्य वातावरणाचें वर्णन करतांना प्रेमचंद रंगून जातात. ' रंगभूमि ', ' कर्मभूमि ', ' प्रेमाश्रम ' आणि ' गोदान ' या कादंबऱ्यांतून अशा प्रकारचीं रम्य वर्णनें किती तरी सांपडतील. ' कर्मभूमि ' कादंबरींतील एका गांवाचें वर्णन पाहण्यासारखें आहे–

" उत्तरेकडील गिरिमालांच्या पायथ्याशीं एक छोटेंसें हिरवेंगार गांव आहे. जवळून गंगा नदी एखाद्या तरुणीप्रमाणें हंसत, खेळत, नाचत, गात गात वाहत जाते. गांवाच्या पार्श्वभूमीवर एक मोठा पहाड एखाद्या वृद्ध योग्याप्रमाणें जटा वाढवून काळ्या व गंभीर स्वरूपांत विचारमग्न होऊन खडा झालेला आहे. हें गांव जणुं त्याच्या बालपणची स्मृति आहे, उल्लास व मनोरंजन यांनीं परिपूर्ण असलेल्या जवानींतील जणुं तें एक स्वप्न आहे. गांवांत फार फार तर वीस-पंचवीस झोपड्या दिसतील. दगडावर दगड ठेवून कशा तरी भिंती रचलेल्या आहेत. ... " भारतदेश हा खेड्यांचाच बनलेला आहे. झुळझुळ आवाज करून वाहणाऱ्या नद्या, धीरगंभीर असणारे पर्वत, लहरी-लहरींनीं डोलणारीं शेतें, कुई-कुई आवाज करणाऱ्या मोटा, पहांटेस कोंबड्यानें दिलेली बांग, इत्यादींचें वर्णन प्रेमचंद मनापासून करतात. सारी संस्कृति याच निसर्गरम्य अशा साध्याभोळ्या जीवनांत त्यांना दिसून आल्याकारणानें प्रेमचंद निसर्गसौंदर्याचें वर्णन तन्मयतेनें करतात. आणखी एका प्रसंगाचें वर्णन पाहा : " माघाचे दिवस होते. वारा सुटलेला होता. एकदम अंधार दाटून आलेला होता. एक तर थंडींतील रात्र व माघांतील पाऊस. मृत्यूप्रमाणें भयाण शांतता पसरली होती. या वेळीं होरीराम पुनियाच्या शेतांतील बांधावर आपल्या झोपडींतून येऊन विश्रांति घेत पडलेला होता. त्याला वाटत होतें, थंडी निवारण होईल आणि आपण झोपीं जाऊं. पण फाटलेली कांबळ, फाटलेली रजई व थंडीवाऱ्यानें भिजून गेलेला वृक्ष या शत्रूंच्यासमोर येण्याचें साहस थंडीमध्यें नव्हतें. आज तंबाखू पण मिळाली नव्हती कीं ज्यामुळें मनरंजन व्हावें. गोवऱ्या पेटवलेल्या होत्या पण थंडीमुळें त्याहि विझून गेल्या होत्या. पाय पोटाशीं घेऊन, हात दाबून धरून कांबळ्यांत तोंड लपवीत आपल्याच श्वासांनीं उष्णता निर्माण करण्याचा त्याचा प्रयत्न चालू होता; पण तें कांबळेंहि फाटलेलें असल्यामुळें चर्वणास निरुपयोगी

झालेल्या दुखऱ्या दांतांप्रमाणें व्यर्थ होतें. " या ठिकाणीं शेतकऱ्याच्या दुःखद आणि दरिद्री जीवनाचा अनुभव तर आहेच, पण त्याच्याभोंवतीं रुष्ट झालेली सृष्टिहि प्रेमचंदांनीं रेखीवपणें वर्णन केली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत पाऊस न पडेल तर होणारी जिवाची उलघाल प्रेमचंद कशी वर्णन करतात तेंहि पाहण्यासारखें आहे : " श्रावणाचा महिना तर आला होता आणि वावटळी तर उठलेल्या असत. विहिरींचें पाणी आटून गेलें होतें. उन्हामुळें ऊंस करपून चालले होते. नदीच्या पात्रांत थोडें पाणी शिल्लक होतें पण त्याच्यासाठीं दररोज भांडणें होत असत. ... जागोजागीं चोऱ्या होत असून कांहीं ठिकाणीं दरोडेहि पडत असत. सर्वत्र हाहाःकार माजून राहिला होता. " आणि या अवस्थेनंतर पावसाचीं चिन्हें दिसूं लागलीं तर ? शेतकऱ्याचा आनंद गगनांत मावेनासा होतो. हर्षातिरेकानें तो नाचूं-बागडूं लागतो. आपण शहरांतील माणसें पाऊसकाळ आला कीं नको ती चिकचिक म्हणून कंटाळतों, संतापतों, पण जीवनदायी पावसाचें स्वागत शेतकरी उल्हासानें करीत असतो. धरणीमातेला संतुष्ट करून तिच्यांत धान्याचे सहस्र अंकुर निर्माण करणारा पाऊस हें शेतकऱ्याचें दैवतच म्हटलें पाहिजे. याहि परिस्थितीचें प्रेमचंदकृत वर्णन मागें आपण थोडक्यांत पाहिलें आहेच. प्रेमचंद लिहितात : " केवढी उत्तम गोष्ट झाली कीं, भाद्रपदांत पाऊस पडला आणि किसानाचें चित्त आनंदानें भरून आलें. केवढा उत्साह भरून राहिला होता ! तहानेनें व्याकुळ झालेली पृथ्वी आतां तृप्त झाली असल्यामुळें शेतकरी संतुष्ट होते. जणुं हें पाणी म्हणजे आकाशांतून सुवर्णवृष्टिच होत होती. मनास वाटेल तेवढ्या मोहरा गोळा कराव्यात. जेथें वावटळी उठत त्या ठिकाणीं आतां नांगर चालूं झाले होते.... " शेतकऱ्यांची चिंता व त्यांचा उल्हास यांचें वर्णन प्रेमचंद समरसतेनें करीत असतात.

' रंगभूमि ' आणि ' गोदान ' या कादंबऱ्यांतून अशा प्रकारचीं कितीतरी वर्णनें वाचावयास मिळतात. या यंत्रयुगांत जेव्हां यंत्रांचा धडधडाट सुरू झाला तेव्हां कारखानदार व भांडवलदार यांची चैन सुरू झाली; पण अशा वेळीं शेतकऱ्यांची वा मजुरांची अवस्था मात्र शोचनीय होत राहिली. प्रेमचंदांसारखा विशाल हृदयाचा साहित्यिक त्यामुळें विरघळून गेला. त्यांनीं अति हळुवारपणानें त्यांचीं चित्रें लेखणीच्या सामर्थ्यानें साकार केलीं आहेत.

शेतकऱ्यांचीं गरीब मुलें बापापाशीं हट्ट तरी कसा करतात ? त्यांच्या मनांत कोणत्या आकांक्षा असतात ? 'गोदान' कादंबरींतील हें चित्र आहे : "रूपा रडतच आली. उघड्याबागड्या शरीरावर एखादें फाटकें वस्त्र, विसकटलेले-विखुरले केस यांनीं विभूषित असणारी रूपा होरीरामाच्या छातीशीं लपेटली गेली. तिची थोरली बहीण सोना सांगतें, 'गाय येईल तेव्हां तिचें शेण मी थापीन'; रूपाला तें बोलणें सहन झालें नाहीं. ती फणकाऱ्यानें म्हणाली, 'सोना कोण अशी आजीबाई कीं सारें शेण तिनेंच थापावें ? मी काय कमी आहें ? सोना भाकऱ्या भाजते तर मी भांडीं घांसतें. सोना पाणी ओढते तर मी विहिरींवर पोहरा-दोरी घेऊन जातें.'–" दरिद्री शेतकऱ्याच्या मुलींतील गायीचें शेण थापण्यावरून होणारा हा कलह वास्तववादी तर खराच; पण त्यांच्या छोट्या व साध्या जीवनांत तो समाधान देणाराहि आहे. होरीराम व धनिया यांच्या भांडणाचें वर्णन आपण मागें एकदां पाहिलेंच आहे.

प्रकृतिवर्णन वा सृष्टिवर्णन प्रेमचंद जेवढ्या सरसतेनें करतात तेवढ्याच उत्कटतेनें पात्रांच्या मानसिक अवस्थांचेंहि वर्णन त्यांनीं अनेक ठिकाणीं केलेलें आहे. प्रेमचंदांची नजर सर्व प्रकारच्या मानवी व्यवहारांतून फिरलेली दिसते. नाना प्रकारचे लोक प्रेमचंद यांच्या कथासृष्टींत वावरतांना दिसतात. नायक, नायिका, उपनायक, उपनायिका, खलनायक ही सर्व सृष्टि प्रेमचंदांनीं उभारली आहे पण प्रत्येक व्यक्तीचें वैशिष्ट्य वेगळालें आहे. आपल्याकडे हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्या कांहीं मर्यादित क्षेत्रांतील असल्या तरी त्यांत वावरणारीं माणसें मात्र विविध प्रकारचीं व नमुन्याचीं आहेत. इंग्रजी भाषेंतील श्रेष्ठ नाटककार शेक्स्पिअर याची महती एवढ्याचसाठीं कीं त्यानें मानवी मनाचे शेंकडों पैलू स्पष्ट करून दाखविणाऱ्या पात्रांची निर्मिति केली. मनाची जी जी म्हणून भावना-लहर निर्माण होईल तिचें प्रतीक थोर साहित्यिकांच्या रचनेंत दिसून येतें. कथा-कादंबऱ्यांत पोशाख व नांवें बदलून तींच तींच माणसें हिंडूं लागलीं कीं लेखकाचें अनुभवदारिद्र्य दिसूं लागतें. प्रेमचंदांची साहित्यसृष्टि या दृष्टीनें अति विस्तृत अशा प्रकारची आहे. धर्माचा खोटा अभिमान बाळगणारे ढोंगी, बेइमानी पोलिस, लुटारू जमीनदार, बेदरकारपणें छळणूक करणारा अधिकारी, अट्टल दारूबाज, फसवणारा ज्योतिषी, कॉंग्रेसचा जमीनदार, स्वार्थी पत्रकार, आदर्शवादी जमीनदार, कर्जाच्या बोज्याखालीं दडप-

लेला किसान, उदार समाजसुधारक इत्यादि विविध प्रकारचे नमुने प्रेमचंदांच्या कथासृष्टींत पाहावयास मिळतात. ‘ प्रेमाश्रमां ’तील प्रेमशंकर, ‘ कायाकल्प ’-मधील चक्रधर, ‘ रंगभूमी ’मधील विनोद किंवा ‘ कर्मभूमि ’ मधील अमरकान्त या व्यक्ति ध्येयवादी तर आहेतच, पण देशांतील तरुणांना मार्ग दर्शविण्याचें कार्यहि त्यांनीं केलें आहे. सुशिक्षित नवयुवकांना राष्ट्रीय विचारांचीं व देश-भक्तीच्या भावनांचीं रसभरीत आदर्श चरित्रें प्रेमचंद यांच्या वाङ्मयांत ठायीं ठायीं मिळत राहतात.

प्रेमचंद यांच्या जीवनांत व साहित्यांत विवाहसंस्था व स्त्रीजात यांच्यासंबंधीं अनेक ठिकाणीं चर्चा आलेली आहे. जीवन सुखी व समृद्ध बनविण्यासाठीं प्रेम व विवाह यांना फारच महत्त्व असल्याचें ते सांगतात. चालू काळांतील विवाहपद्धति तितकीशी त्यांना पसंत नव्हती. ‘ दो सखियाँ ’ या कहाणीचा नायक विनोद एके ठिकाणीं म्हणतो, “ वर्तमान विवाहपद्धति मला पसंत नाहीं. सुधारणेच्या प्रारंभिक काळांत या प्रथेचा जन्म झाला असावा. आतां जग कितीतरी पुढें गेलेलें आहे, पण आपली विवाहाची प्रथा मात्र जशीच्या तशी आहे. वर्तमानकाळांत या आहे या प्रथेचा काय उपयोग ? ” अशा विकृत भूमिकेवरून झालेल्या विवाहांचे विपरीत परिणाम व त्यांपासून स्त्रियांना होणारा त्रास मुन्शी प्रेमचंदांच्या कादंबऱ्यांतून अनेक ठिकाणीं चित्रित केलेला आढळतो. ‘ अभिलाषा ’ नांवाच्या एका कथेंतील वर्णन या दृष्टीनें पाहण्या-सारखें आहे. “ काल शेजारीं मोठीच गडबड उडाली होती. एक पानवाला आपल्या बायकोस मारीत होता, आणि ती बिचारी रड-रड रडत होती. पण शेवटीं त्या स्त्रीसहि क्रोध आला. तिनें उठून उद्‌गार काढले, पुरे झालें, आतां जर माराल तर ठीक होणार नाहीं. आज माझा तुझ्याशीं कांहीं संबंध उरलेला नाहीं. मी भीक मागेन पण तुझ्या घरीं राहणार नाहीं. ’—” प्रेमचंदांच्या कथासृष्टींतील सर्व स्त्रीपात्रें अत्यंत हळुवार हातानें निर्माण केलेलीं वाटतात. समर्पक अशा भाषाशैलीनें कथाकारानें त्यांच्यांत प्राण फुंकलेला दिसतो. ‘ गोदान ’मधील कामानें व कष्टानें ऐन वयांत शिजून गेलेल्या धनियाचें वर्णन पहावें. प्रेमचंद लिहितात, “ तिचें वय असें काय होतें ? अवघें छात्तिसावें तर वर्ष तिला लागलें होतें, पण सर्व केस पिकून गेल्यामुळें ती वृद्ध दिसत होती. चेहऱ्यावर सुरकुत्या पडून सर्व शरीर बेढौल झालेलें होतें. गव्हासारखा सुंदर

रंग आतां काळवंडून गेला होता. डोळ्यांनीं दिसण्याचें मानहि कमी झालें होतें. पोटाची चिन्ता नित्य होतीच. पण जीवनांत सुख म्हणून थोडें तरी असावें ना ? या चिरस्थायी जीर्णावस्थेनें ती उदास बनून गेली होती. ... ''
पण हीच धनिया वेळ आली कीं वाघासारखी धांवून कशी जात असे व प्रसंगीं लोण्याहून मऊ कशी होत असे हेंहि आपण पाहिलें आहे. तिची मुलगी सोना हिचें वर्णन प्रेमचंदांनीं असेंच रेखीवपणें केलें आहे. " सोना वयानें किशोरीच होती. शरीराच्या बांध्यावरून युवती पण बुद्धीनें मात्र बालिका होती. यौवन तिला पुढें खेचीत होतें आणि बालपण मागें ओढीत होतें. कांहीं बाबतींत ती इतकी चतुर मुलगी होती कीं, पदवीधर मुलींनाहि तिनें शिकवावें, तर कांहीं गोष्टींत एवढी अल्लड कीं, बालकांनींसुद्धां मागें हटावें. उंच, रुक्ष पण प्रसन्न मुख, डोळ्यांत एक प्रकारची तृप्ति, केसांना तेल नाहीं, डोळ्यांत काजळ नाहीं, देहावर कोणताहि दागिना नाहीं. प्रपंचाच्या भारानें तिचें वय जणुं दडपून गेलें होतें— '' शेतकऱ्याच्या मुलीचें किती यथार्थ चित्र हें !

' कर्मभूमि ' मधील रेणुकादेवीचें रेखाचित्र एका निराळ्याच वर्गातील म्हणून ध्यानांत ठेवण्यासारखें आहे : " रेणुकादेवी रूप व वय या दृष्टीनें नव्हे तर विचार आणि व्यवहार यांनीं वृद्ध होती. दान व व्रत यांवर तिचा फारसा विश्वास नव्हता, पण लोकमताची अवहेलनाहि ती करूं शकत नव्हती. विधवांचें जीवन हें एक तप आहे. याच्याविरुद्ध लोकमत कांहीं करूं शकत नाहीं. भोगविलास...नाटक-तमाशे यांना पाहून तिच्या जीवनांत स्वस्थता येणार नव्हती. नुसती चटणी वा भाजी खाऊन कोणाची भूक शांत होते का ?... कोणत्या तरी एका ध्येयावरच जीवन उभें राहूं शकतें. रेणुकेच्या जीवनाचा आधार म्हणजे तिला वाटणारें पशुप्रेम होतें. तिनें आपल्याबरोबर पशुपक्ष्यांचा एक अजबखानाच घेतला होता. पोपट, मैना, मांजर, गायी, हरणें, मोर यांना पाळून त्यांच्या सुखदुःखांत मिसळून जाण्यांतच तिला सार्थकता वाटे. तिनें प्रत्येकाचें नांव वेगळें ठेवलें होतें, प्रत्येकाचें राहण्याचें ठिकाण वेगळें होतें, खाण्यापिण्याची सोय न्यारी होती. त्या सर्व प्राण्यांना ती मातृत्वाच्या प्रेमानें सांभाळीत असे. जणुं तिचींच तीं नातवंडें होतीं. '' याच रेणुकादेवीची मुलगी सुखदा हिचेंहि एक शब्दचित्र वाचण्यासारखें आहे : " संध्याकाळचा समय होता.

बच्चा पाळण्यांत झोपलेला होता. सुखदा शेजारींच बसलेली होती. पूर्वीची कृशांगी गर्भिणी आतां विकसित अशा मातृत्वाच्या तेजानें आणि शक्तीनें फुलून निघाली होती. तिच्या माधुर्यांत किशोरींतील चपलता नव्हती. गर्भिणीची आलस्यमय कातरता नव्हती, तर मातेचा शांत, तृप्त, मंगलमय विलास होता. ”

याच कादंबरींतील सकीना ह्या मुसलमानी युवतीचें प्रेमचंद कशा प्रकारें वर्णन करतात हेंहि पाहण्यासारखें आहे, “ सकीनाचा रंग सांवळा होता. रूपरेखा पाहिली तर तिला सुंदर म्हणतां आलें नसतें. तिच्या अंगप्रत्यंगाचें वर्णन कवींच्या उपमानांप्रमाणें खचित नव्हतें, पण रंगरूप, चालढाल, शील-संकोच या सर्वांच्या मिश्रणामुळें तिला शोभा आली होती. ”

प्रेमचंदांच्या विशिष्ट भाषाशैलीमुळें त्यांचीं सर्व पात्रें सजीव वाटतात. अमूर्त कल्पनेचें मूर्त रूप उभें करतांनाहि प्रेमचंदांची भाषासरणी विशेष डौलाचें रूप धारण करीत असते. जीवनाचें रूपक रंगवून सांगतांना प्रेमचंद ‘ गोदान ’ कादंबरींत एके ठिकाणीं लिहितात, “ वैवाहिक जीवनांतील प्रभात-काळांत लालसा आपल्या गुलाबी मादकतेसहित उदयास येते आणि हृदयाच्या सर्व आकाशांत आपल्या माधुर्याच्या सोनेरी किरणांनीं सुशोभित करीत असते. नंतर मध्यान्हकाळचा प्रखर ताप सुरू होतो. क्षणाक्षणाला वावटळी उठतात आणि पृथ्वीचा थरकाप होऊं लागतो. लालसेचें सोनेरी रूप हळूहळू नाहींसें होतें आणि वास्तविकता आपल्या यथार्थ स्वरूपांत आपल्यापुढें उभी राहते. त्यानंतर विश्राममय संध्याकाळची वेळ होते. शीतल आणि शांत असें तिचें रूप असतें. दमल्याभागल्या पथिकास ज्याप्रमाणें दिवसभरल्या यात्रेचा वृत्तान्त सांगावासा व ऐकावासा वाटतो, त्याप्रमाणें तटस्थ भावनेनें आपण या वेळीं अशा एका उच्च स्थानावर बसलेलों असतों कीं, खालचीं माणसें आपणांस नगण्य वाटतात. ”

किसानाच्या स्वार्थी व निःस्वार्थी जीवनाचा परिचय करून देतांना प्रेमचंद लिहितात, “ किसान पक्का स्वार्थी असतो यांत शंकाच नाहीं... पण त्याचें संपूर्ण जीवन निसर्गाशीं सहयोग देणारें आहे. वृक्षांवर फळें पिकतात, पण तीं फळें लोक खातात; शेतांत धान्य उत्पन्न होतें आणि तें जगाच्या हितासाठीं उपयोगास येतें; गायीच्या स्तनांत दूध असतें पण त्याचा तिला उपयोग नसतो; तें दुसऱ्यासाठींच असतें; मेघांतून वर्षाव होतो पण तृप्त होणारी

पृथ्वी असते. अशा संगतींत कुत्सित स्वार्थाला कोठून अवसर मिळणार? होरीराम शेतकरी होता; पण कोणाच्या जळत्या घरावर हात शेकून घ्यावेत हें त्याला मान्य झालें नसतें. ''

अशा प्रकारें मुन्शी प्रेमचंद यांची भाषा साधी, अनलंकृत असली तरी तिच्यांतील रसवत्ता श्रेष्ठ प्रकारची आहे. मनाची पकड घेणारी तिची शक्ति विलक्षण आहे. त्यांच्या भाषेंतील मुख्य गुण काव्यात्मकतेचा असला तरी ती अजीबात अलंकाररहित आहे असें मात्र नव्हे. उपमा, दृष्टान्त, रूपक इत्यादींचा वापर पुष्कळ ठिकाणीं पण उचित अशा पद्धतीनें त्यांनीं केलेला आहे. कांहीं उदाहरणें पाहण्यासारखीं आहेत.

" समोर गगनचुंबी पर्वत अंधकाराच्या विशालकाय राक्षसाप्रमाणें उभा होता. शंखधर जलद गतीनें अरुंद पायवाटेनें चालत होता. त्यानें आपोआप ती पायवाट स्वतः होऊन पत्करली होती. ती कोठें जाऊन पोंचली होती हें त्यास माहीत नव्हतें. आपण सुद्धां जीवनाच्या या अरुंद व खडबडीत अशा पायवाटेनें तीव्र गतीनें नाहीं जात ? आपल्यासमोर त्याच्याहिपेक्षां मोठे असे अंधाराचे पर्वत उभे राहत नाहींत ? '' ('कायाकल्प'). याच कादंबरींत पुढील वाक्यें आलीं आहेत, तीं अशीं; " मनांत वारंवार प्रश्न निर्माण होत होता पण पाण्यांत उसळ्या घेणाऱ्या माशांप्रमाणें पुनः मनांतल्या मनांतच विरून जात होता. '' ; " चक्रधरला असें समजूत आलें कीं, जणुं सर्व पृथ्वी डगमगूं लागली आहे, जणुं सर्व ब्रह्माण्ड एका प्रयलयकारी भूकंपानें आन्दोलित होत आहे. ''; " पिता व पुत्री यांच्या भेटीचें दृश्य मोठें आनंददायक होतें. कामनांच्या वृक्षांवर निराशा-तुषार पडल्यामुळें ते सुकून गेले होते, पण आज लवलवणाऱ्या, हिरव्यागार अशा पल्लवांनीं ते सुशोभित झाले. '' कित्येक ठिकाणीं रूपकांचा आश्रयहि प्रेमचंद घेत असतात.

याप्रमाणें त्यांच्या भाषाशैलीचे, वर्णनशैलीचे कांहीं नमुने पाहिल्यावर आपणांस हें मान्य करावें लागतें कीं, त्यांची भाषा ही स्वतःची आहे. तिची तुलना दुसऱ्या कोणाच्याहि भाषेशीं होऊंच शकत नाहीं. आणि हेंच प्रेमचंदांचें सर्वांत मोठें वैशिष्ट्य आहे. प्रेमचंदांच्या भाषेचें सौंदर्य, तिचें मार्दव, तिच्यांतील रंग, तिच्यांतील प्रवाह, तिच्यांतील व्यंग्य, तिच्यांतील प्रसाद, तिच्यांतील काव्य इतरत्र सांपडणें दुर्मिळ आहे. याच भाषासौष्ठवामुळें प्रेमचंदांच्या कथांचे प्रारंभ

व शेवट अतिशय आकर्षक व उत्कंठा निर्माण करणारे झाले आहेत. ‘ पंच-परमेश्वर ’ ही त्यांची सर्वोत्तम कथा या दृष्टीनें पाहण्यासारखी आहे. अलगू चौधरी व जुम्मनशेख यांच्या मैत्रींत अनेक प्रकारें बिघाड झाला असतांहि पंचांमध्यें वास करणाऱ्या परमेश्वराच्या अस्तित्वानें त्यांची मैत्री पुनः जमली, असें सांगण्याऐवजी प्रेमचंद या कथेचा शेवट करतांना म्हणतात, “ अलगू रडूं लागला. या पाण्यामुळें दोघांच्याहि मनांतील किल्मिष धुऊन निघालें. मैत्रीची सुकलेली लता पुनः ताजी टवटवीत झाली. ”

मुन्शी प्रेमचंद यांच्या भाषासौंदर्याचा आणखी एक विशेष सांगावयाचा आहे. प्रेमचंद हे जसे थोर कलावंत होते, त्याचप्रमाणें ते विचारवंतहि होते. सामाजिक, राजकीय, धार्मिक वगैरे पुष्कळ विषयांवर त्यांचें चिंतन चालू असे. त्यामुळें त्यांच्या कादंबऱ्यांतून या निरनिराळ्या विषयांतील सत्यें सुभाषितवजा वाक्यांतून किंवा म्हणीवजा वाक्यांतून त्यांनीं अनेक ठिकाणीं सांगितलीं आहेत. या सुभाषितरत्नांचा सुगंध प्रेमचंद-साहित्यांत सर्वत्र दरवळत असलेला दिसून येईल. कांहीं थोडीं वचनेंच येथें आपण पाहणार आहोंत.

( १ ) भाषा साधन आहे, साध्य नाहीं.

( २ ) खरें साहित्य कधींहि जुनें होत नाहीं.

( ३ ) साहित्य ही अशी जादूची कांडी आहे कीं, तिच्यामुळें पशूंत, विटा-फत्तरांत, झाडांझुडपांत आत्म्याचें दर्शन होऊं लागतें.

( ४ ) अन्यायपूर्ण शासन, शासन नसून युद्ध आहे.

( ५ ) ज्यांच्याजवळ पैसा असतो त्यांची पाठ कायदा व धर्म राखीत असतो.

( ६ ) सदैव पुढें जाण्याची इच्छा धरणें याचेंच नांव कर्म.

( ७ ) मनुष्यजातीसमोरचें सर्वांत बिकट असें कोडें मनुष्य हेंच आहे.

( ८ ) म्हातारपणांत पत्नी मरणें म्हणजे पावसाळ्यांत घर कोसळण्या-पैकींच आहे.

( ९ ) मन हा एक मोठा शत्रु आहे. तें नेहमीं पाठीकडून वार करतें.

(१०) मनुष्य स्वभावतः न्यायप्रिय आहे.

● ● ●

# प्रेमचंदांचा जीवनसंदेश : १५

प्रेमचंदांची जीवनकथा हीच एका अद्‌भुतरम्य कादंबरीप्रमाणें आहे. या कादंबरीचीं बरींचशीं प्रकरणें वाचून झाल्यानंतर आतां उपसंहारात्मक भागाकडे वळावयाचें आहे. मुन्शी प्रेमचंद यांचें चरित्र व त्यांची वाङ्‌मयीन तपस्या यांचा परिचय करून घेतल्यानंतर वास्तविकपणें सांगावयाचें असें कांहीं उरत नाहीं. सबंध चरित्रकथा वाचीत असतांना त्यांच्या जीवनांतील संदेशाची कल्पना आपणांस ठायीं ठायीं येण्यासारखी आहे. प्रेमचंदांच्या जीविताचा हेतु कोणता ?— या प्रश्नाच्या उत्तरांतच त्यांच्या जीवनसंदेशाचा पत्ता आपणांस सहज लागण्यासारखा आहे. विरोधी परिस्थितीशीं टक्कर देत प्रेमचंद झिजत राहिले; पण त्यांच्या झिजण्यांतून चंदनाप्रमाणें सुगंध दरवळत राहिला, या गोष्टीस फारच महत्त्व आहे. एका पोस्टल कारकुनाचा एक साधा मुलगा तो काय आणि तो राष्ट्रभाषा हिन्दीचा उपन्यास-सम्राट् होतो तो काय, सारेंच आश्चर्यकारक आहे. प्रेमचंदांनीं कितीतरी उद्योग केले. किती ठिकाणीं नोकऱ्या केल्या पण सर्वांकडे त्यांना पाठ फिरवावी लागली. ईश्वरानें त्यांचा जन्म ज्या एका कामासाठीं योजला होता त्याखेरीजकरूनच्या सर्व कार्यांत त्यांना अपयश येत राहिलें. आणि कोणत्याहि अपयशास न भितां निर्भयपणें प्रेमचंद कर्म करीत राहिले, हाच त्यांच्या जीवनांतील मोठा संदेश आहे. दीन-दरिद्री व दुःखितांचा कैवारी म्हणून त्यांचें नांव प्रसिद्ध होईलच, पण भारतीय किसान-मजुरांचा खरा पाठीराखा म्हणून त्यांची योग्यता मोठी आहे. प्रेमचंद स्वतः मजुराप्रमाणें जगले आणि त्याच जीवनांत त्यांना संतोष लाभला. त्यांची लेखणी हें त्यांचें फावडें होतें. या फावड्यानें त्यांनीं देशांतील, समाजांतील घाण दूर केली व त्याच फावड्यानें जें मंगल आहे, उदात्त आहे, रक्षणीय आहे त्याचा संग्रह केला. आणि प्रेमचंद-साहित्य हें आज भारतीय संस्कृतीचें अभिमानाचें स्थान होऊन बसलें आहे. प्रेमचंदांचें गुणगान दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें आहे. दोन-तीन वर्षांपूर्वीं दिल्लीच्या 'आजकल'चा एक 'प्रेमचंद विशेषांक' निघाला होता. त्यांत फिराक गोरखपुरी (रघुपति सहाय) यांचा 'प्रेमचंद की आवाज़' या नांवाचा एक लेख आहे. त्या लेखाचा समारोप करतांना लेखक म्हणतो, "प्रेमचंदांचीं पुस्तकें वाचतांना असें वाटतें

कीं, भारतमातेनें जणुं आपणांस स्वतःच्या मांडीवर घेतलें आहे. प्रेमचंदांच्या आवाजांत आपल्या हृदयाची धडधड आपणांस ऐकूं येतें. भारताचे अश्रु, भारताचें अस्तित्व, भारताची ऐट, त्याचें सुखदुःख, त्याचें भाग्य, त्याचें मंगलगीत प्रेमचंदांच्या जादूच्या लेखणीनें निर्माण केलेल्या साहित्यांत ज्याप्रमाणें मिळतें त्याप्रमाणें अन्यत्र कोठेंहि मिळणें अशक्य आहे. याच कारणासाठीं प्रेमचंद यांना हिन्दी-उर्दू भाषांतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय ख्यातीहि प्राप्त झाली आहे. ''

चित्रपटाच्या धंद्यांत प्रेमचंद पहिल्याच वर्षी कसे वैतागून गेले हें आपण पाहिलेंच आहे. मुंबईहून प्रेमचंद बनारसला आले त्या वेळची गोष्ट. श्री. चंद्रगुप्त विद्यालंकर त्यांना भेटावयास गेले आणि एकदम बोलले, " काय बाबूजी, किती दिवस सुट्टी घेऊन आलांत ? '' त्यावर प्रेमचंद हंसतच म्हणाले, " मी तर कैदखान्यांतून सुटून आलों आहें. भाई, यांत किती दिवसांची सुट्टी या प्रश्नास अर्थ कोठचा ? '' हंसत हंसत बोलणाऱ्या प्रेमचंदांचा चेहरा बदलून गेला; आणि थोड्या कष्टदायक अवस्थेंतच त्यांनीं उत्तर दिलें, " भाई ! कुठें आपण आणि कुठें सिनेमावाले. त्यांचें-आपलें कसें जमणार ? माझ्या आयुष्यांतील सर्वांत मोठी चूक केली ती ही कीं, मी त्यांच्याकडे गेलों.... संधि मिळतांच आलों झालें दावें तोडून ... कांहीं पैसा मिळाला ही गोष्ट खरी; पण त्यांनीं माझ्या कादंबरीची जी हत्या केली ती मात्र मला पाहवत नाहीं. मी सुद्धां त्या कथेस माझी म्हणून ओळखणार नाहीं. मला सारखें म्हणत, कथेंत असें काढून टाका, असें जोडून द्या. शेवटीं मीं साफ सांगितलें कीं, ' बाबा रे, हें माझ्याच्यानें होणार नाहीं '–'' आणि याच कारणावरून प्रेमचंद यांनीं मुंबई सोडली व ते पुनः आपल्या नेहमींच्या व्यासपीठावर बसून लेखन करूं लागले.

जीवनांत विविध प्रकारचे अनुभव प्रेमचंद यांनीं घेतलेले असल्यामुळें प्रेमचंदांच्या कादंबऱ्यांचें क्षेत्रहि अति विस्तृत असें आहे. मानवी जीवनाचा एक विशाल दृष्टिकोन त्यांना प्राप्त झालेला होता. आपल्या ' रंगभूमि ' नांवाच्या प्रसिद्ध कादंबरींत मानवी जीवनासंबंधीं प्रेमचंद काव्यमय भाषेंत लिहितात कीं, " जीवन काय फुलापेक्षां कोवळें नाहीं ?–– जें वाऱ्याचे झोके सहन करील पण सुकणार नाहीं. लतेपेक्षां का कोमल नाहीं ? कठोर वृक्षाचे झोके खाऊनहि त्यांनाच लिपटून जाणाऱ्या वेलीप्रमाणें जीवन आहे. पाण्याच्या

बुडबुड्याप्रमाणें जीवन असावें, जो लाटांवर तरंगतो पण तुटत मात्र नाहीं." मानवी जीवनांत निर्माण होणाऱ्या सर्व दुःखांना धीमेपणानें तोंड द्यावें व आपल्या वांट्यास येणारें कर्तव्यकर्म करीत असावें हाच एक संदेश प्रेमचंद-साहित्यांतून मिळण्यासारखा आहे. निष्काम कर्म, फलत्यागपूर्वक कर्तव्यपालन, यशापयशाकडे दुर्लक्ष करून काम करण्याची प्रवृत्ति, या गोष्टी असल्या कीं जीवनांतील कटुता पुष्कळ अंशीं कमी होणारी असते. जीवन ही एक क्रीडा आहे. सर्वत्र खेळकर वृत्तीनें आपण वागत राहिलों तर जीवनांतील पुष्कळशीं दुःखें कमी होतील असें त्यांना वाटे. माणसानें कांहीं एक ध्येय आपल्या डोळ्यासमोर ठेवूनच कर्तव्यपालन सदोदित करीत राहिलें पाहिजे. नाहींतर त्याची घडगत नाहीं. ध्येयविहीन माणसाच्या जीवनाची काय किंमत ? 'कर्मभूमि' कादंबरींत प्रेमचंद लिहितात, "कांहीं एक ध्येय समोर ठेवून जीवितभर तें हस्तगत करण्यासाठीं लढत राहणें हेंच खरें पुरुषार्थाचें लक्षण आहे. कर्तव्यपराङ्मुख होतां कामा नये. नाहींतर दोरी तुटलेल्या पतंगाप्रमाणें हवा नेईल तिकडे आपणांस जावें लागेल." पण ध्येयावर दृष्टि ठेवून सदैव प्रयत्न करीत राहणें, पुढें जाण्याची इच्छा व तसा दीर्घोद्योग करणें, याचेंच नांव मानवी जीवन आहे. आपत्तींशीं झगडतांना जो संघर्ष करावा लागतो त्यांतूनच आपणांस शक्ति प्राप्त होत असते. या जगांत जिवंत माणसाप्रमाणें जगण्यांतच पुरुषार्थ आहे. मुडद्याप्रमाणें नुसतें पडून राहणें यांत काय फायदा ! व्यर्थ जगून राहण्यापेक्षां मरण पावणें यासाठीं उत्तम, असें प्रेमचंद सांगत. आपल्या जीवनांतील सफलता आपण जो उद्योग करीत असतों त्यावर अवलंबून असते.

सत्य, न्याय व मानवधर्म यांचाच विजय पुढल्या काळांत होणार आहे, असें प्रेमचंदांना वाटे, आणि सर्व प्रकारचे धर्मपंथ याच एका नीतितत्त्वावर उभे राहिले पाहिजेत, असा त्यांचा आग्रह असे. "मी तर नीतीलाच धर्म समजतों आणि सर्व संप्रदायांत नीतिहि एकच असली पाहिजे. हिन्दु, मुसल-मान, बौद्ध, खिश्चन यांनीं नेहमीं सत्कर्म आणि सद्‌विचार यांचाच पुरस्कार केला पाहिजे. व्यक्ति, समाज, आणि राष्ट्र यांचा उद्धार या प्रकारच्या नीति-तत्त्वांमुळेंच होईल. बाह्य अवडंबराचा खोटा धर्म व खोट्या धर्मकल्पना, दुष्ट चालीरीती यांना यापुढें थारा मिळून चालणार नाहीं, असें प्रेमचंद प्रतिपादन

करीत. मनुष्याचा पराजय झालेला दिसतो; पण तो जर झगडत झगडत पराभूत झाला असेल तर त्यास विजयीच म्हणावें. स्वतः प्रेमचंद कित्येक ठिकाणीं पराभूत झाले; पण टक्कर देत देत त्यांनीं नेहमीं सामना दिलेला होता; त्यामुळें त्यांचें जीवन हें एका रणझुंजार पण घायाळ झालेल्या सेनानीप्रमाणें होतें. प्रेमचंदांनीं निर्माण केलेलें सूरदास हें पात्र या दृष्टीनें अभ्यास करण्यासारखें आहे.

जग हें एका क्रीडांगणाप्रमाणें आहे. खेळाडूप्रमाणें आपली वृत्ति पाहिजे. दोन धक्के खावेत व द्यावेत, डाव जिंकावा व हरावा. पडल्यावर रडत बसणें किंवा विजयानें हुरळून जाणें हें खऱ्या खेळाडूस मान्य नसतें. दुसऱ्याच्या गुणांचें तो मनापासून कौतुक करीत असतो. कोणावर चिडणें किंवा संतापणें हेंहि त्याला ठाऊक नसतें. खेळांत रडण्याला स्थान कोठलें ? हंसण्यासाठीं, दुःख विसरण्यासाठीं तर आपण खेळ खेळत असतों. या ठिकाणीं रडण्याला, चिडण्याला स्थान नाहीं. प्रेमचंदांच्या मतांवर गांधीवादाची छायाहि थोड्याफार प्रमाणांत मिळते. 'कायाकल्प' कादंबरींतील चक्रधर एके ठिकाणीं म्हणतो, "परोपकार ही अमरत्व प्रदान करता है। कालपर विजय पाने का अर्थ यह नहीं है कि हम कृत्रिम साधनों से भोग-विलास में प्रवृत्त हों, वृद्ध होकर जवान बनने का स्वप्न देखें और अपनी आत्मा को धोखा दें। लोकमत पर विजय पाने का अर्थ है अपने सद्विचारों और सत्कर्मों से जनता में आदर पाना और सम्मान प्राप्त करना। आत्मा पर विजय पाने का आशय निर्लज्जता या विषयवासना नहीं, बल्कि इच्छाओं का दमन करना और कुवृत्तियों को रोकना है।" प्रेमचंदांनीं वर्णन केलेल्या या विजयी वृत्तीचें मनन आजच्या तरुण पिढीनें करण्यासारखें आहे.

प्रेमचंदांनीं दिलेलें जीवनाचें तत्त्वज्ञान फार महत्त्वाचें आहे. समकालीन लोकांना त्याचें महत्त्व तितकेंसें पटलें नाहीं तरी पुढील काळांत त्यामुळें निश्चितपणें मार्गदर्शन होत राहील. आणि हें मार्गदर्शन कथाकादंबरीच्या माध्यमांतून असल्यामुळें शेंकडों नीरस व्याख्यानांपेक्षां फलदायी ठरणारें आहे. प्रेमचंदांचे निकटवर्ती मित्र श्री. जैनेन्द्रकुमारांनीं प्रेमचंदांविषयीं म्हटलें आहे, "प्रेमचंद हे हिन्दींतील सर्वांत मोठे लेखक आहेत. आपण हिंदी भाषाभाषी त्यांची किंमत नीटपणें ओळखत नाहीं. आपण चित्राच्या इतके जवळ आहोंत कीं,

( १२ ) मुन्शी प्रेमचंद यांच्या वैचारिक वैभवाची ओळख तुमच्या शब्दांत थोडक्यांत करून द्या.

( १३ ) मुन्शी प्रेमचंद यांच्या विविध प्रकारच्या साहित्याचा आढावा अगदीं संक्षेपानें द्या.

( १४ ) धनवान् व कारखानदार यांच्याविषयीं प्रेमचंदांचीं मतें कोणत्या प्रकारचीं होतीं ? त्यांच्याशीं प्रेमचंदांचें कितपत पटत असे ?

( १५ ) मुन्शी प्रेमचंद यांच्या जीवनाचें सार वीस-पंचवीस ओळींत लिहून दाखवा.

( १६ ) तुम्हीं वाचलेल्या चरित्रांत अनेक प्रकरणें आहेत. त्यांपैकीं प्रत्येकास तुम्ही स्वतंत्र असें अन्वर्थक शीर्षक द्या.

( १७ ) मुन्शी प्रेमचंद हे स्वतः आपली जीवन-कथा सांगत आहेत, अशी कल्पना करून तीस ओळींत त्यांची जीवन-कथा लिहा.

( १८ ) प्रेमचंदांच्या चरित्रांतील तुमच्या लक्षांत राहतील असे तीन प्रसंग सांगा व त्यांचें महत्त्व कोणतें तें लिहा.

( १९ ) शिवरानीदेवींच्या स्वभावांतील मुख्य मुख्य वैशिष्ट्यें थोडक्यांत लिहा.

( २० ) मराठी भाषेंतील प्रेमचंदांचीं पुढील अनुवादित पुस्तकें वाचा—

१. प्रेमचंदांच्या गोष्टी — आ. ल. जोशी

२. कथा-मंजरी — ह. बा. अत्रे

३. ‘ प्रेमचतुर्थी ’ — यदुनाथ थत्ते

वा. क्र. ८५५९.

● ● ●